**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ)**

## लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २ बाबत

**उपाध्यक्ष :** लक्षवेधी सूचना क्रमांक १ सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा यांची आहे. तथापि, ते सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती गीता जैन यांना ती मांडण्यास मी अनुमती देत आहे. तसेच लक्षवेधी सूचना क्रमांक २ ही सन्माननीय सदस्य श्री. रोहित पवार यांची आहे. या लक्षवेधीसंबंधी विभागाचे उत्तर तयार असले तरी त्याच्या प्रती अद्याप सन्माननीय सदस्यांना वितरित केलेल्या नसल्यामुळे आणि सन्माननीय सदस्य श्री. रोहित पवार यांनी विनंती केली असल्यामुळे सदरची लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

आता सन्माननीय सदस्या श्रीमती गीता जैन यांनी लक्षवेधी सूचना क्रमांक १ मांडण्यास मी अनुमती देत आहे.

असुधारित प्रत

**पृ. शी.:** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गौरव एनक्लेव या गृहनिर्माण संस्थेच्या २३३ रहिवाशांची विकासकाने केलेली फसवणूक

**मु. शी.:** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गौरव एनक्लेव या गृहनिर्माण संस्थेच्या २३३ रहिवाशांची विकासकाने केलेली फसवणूक यासंबंधी श्रीमती गीता जैन, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे घोडबंदर सर्व्हे नं. ७२/२, ७३/१, २, ३, ४ या भागातील मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गौरव एनक्लेव को-ऑप. हौ. या सोसायटीमध्ये राहणाऱ्या २३३ सदनिका/गाळे धारक व त्यामध्ये वास्तव्य करणारे जवळ जवळ ३००० नागरिक यांना सदर इमारत धोकादायक दाखवून तिचा पुनर्विकास करण्यासाठी महानगरपालिकेकडून रवि डेव्हलपर्स या विकासकास दिला जाणे व इमारतीतील रहिवाशांना जबरदस्तीने सदनिका खाली करण्यास भाग पाडणे, सदर सोसायटीमधील सर्व रहिवाशांना घर व दुकाने देण्याचे आश्वासन देऊन देखिल अद्याप सदर प्रकल्प अर्धवट स्वरुपात असणे, जवळपास ७ वर्ष इतक्या कालावधीत रहिवाशांना रवी डेव्हलपर्स यांनी केलेल्या करारानुसार भाडे सुध्दा न देणे, सन २०१३ ते आजपर्यंत सदर इमारतीचे बांधकाम अपूर्ण स्वरुपात असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिकेकडे याबाबत चौकशी करणे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेडून देण्यात आलेली सदर बांधकामाची परवानगी वारंवार रद्द होणे, परिणामी सदर इमारतीतील रहिवाशांचे भविष्य अंध:कारमय होणे, सदर विकासकाने रहिवाशांची केलेली फसवणूक लक्षात घेता त्यांच्यावर कडक कारवाई करुन गौरव एनक्लेव को-ऑ.हौ.सो. या इमारतीतील रहिवांशाना न्याय मिळण्याबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे (नगरविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्रीमती गीता जैन : अध्यक्ष महोदय, आज रोजी जरी ही इमारत तोडली गेली असली तरी त्या विकासकासमवेत रहिवाशांचा एमओयू झाला आहे आणि त्यानुसार त्यांनी रहिवाशांना तात्पुरते घर आणि त्याचे भाडे देणे अनिवार्य आहे. परंतु बिल्डरने या रहिवाशांना घर दिले नाही आणि त्याचे भाडे सुध्दा ते देत नाहीत. कोर्टामध्ये हे प्रकरण सध्या प्रलंबित आहे ही एक बाजू झाली. परंतु या रहिवाशांना न्याय देण्यासाठी त्यांच्या दुसऱ्या प्रकल्पात सध्या घरे देण्यात येतील काय तसेच त्यांना भाडे सुध्दा दिले जात नाही. त्या ठिकाणी ६ इमारती आहेत आणि त्यावर टीडीआर घेऊन त्या इमारती नियमित करायच्या होत्या त्या देखील त्यांनी केल्या नाहीत. एक इमारत तुटली तशा ६ इमारती सुध्दा तुटू शकतात. यामध्ये माननीय उच्च न्यायालयाचे आदेश आहेत की जशी एक इमारत तुटली आहे तशा ६ इमारती सुध्दा तुटू शकतात. यामध्ये वनशक्ती यांनी पीआयएल दाखल केले असून त्यामध्ये कोर्टाचे असे आदेश आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या रहिवाशांना घर मिळणार आहे काय आणि त्यांना द्यावे लागणारे भाडे मिळणार आहे काय आणि हे न दिल्यास संबंधित बिल्डरवर शासन कोणती कारवाई करणार आहे, हे माझे प्रश्न आहेत.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती गीता जैन यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो म्हणजे मौजे घोडबंदर, मिरा भाईंदर महानगरपालिका येथील रस्त्यावर गौरव इन्क्लेव सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना घरे मिळतील काय आणि त्यांना भाडे मिळणार काय असा तो प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, सन १९९५ मध्ये नगरपरिषद काळात स्टील्ट + ७ माळे अशी परवानगी घेऊन ती इमारत बांधण्यात आली आहे. सन २०१३ मध्ये ही इमारत धोकादायक ठरविण्यात आली. ती धोकादायक ठरविल्यानंतर पाडण्यात आली. सन २०१३ मध्ये सीआरझेडचा भाग वगळून त्या इमारतीला परवानगी देण्यात आली. त्यावेळी असलेला ५०० मिटर सीआरझेडचा नियम १०० मिटर लांबीपर्यंत आल्यामुळे दिनांक ३०.३.२०१९ रोजी २१ माजल्यांची इमारत बांधण्यासाठी परवानगी देण्यात आली. त्यानंतर काही वाद निर्माण झाले. त्यामध्ये मालकी हक्क

अस्सुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे...

किंवा इतर करारनाम्यांचे वाद आहेत. त्या स.नं.वर काही लोकांनी हरकती घेतल्या होत्या. हा सर्व वाद झाल्यानंतर महापालिकेने दिनांक १७.६.२०१९ रोजी ही बांधकाम परवानगी रद्द केली. ही परवानगी रद्द केल्यानंतर संबंधित विकासक हायकोर्टात गेला. हायकोर्टाने या बांधकामावर कोणत्याही प्रकारची कारवाई करुन नये अशा प्रकारची स्थगिती दिली.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे....

तशा प्रकारचा उच्च न्यायालयाचा आजपर्यंत स्टे आहे. त्या आदेशात नमूद आहे की, "The Defendant hereby is restrained from taking coercive or forcible steps in respect of suit property on the basis of order dated 17.06.2019 of Commissioner of Cooperation till filing of say or next date whichever is later.". उच्च न्यायालयामध्ये आल्यानंतर या विकासकाने शासनाकडे अपिल केले. नगर विकास विभागाने त्याच्या अपिलावर निर्णय दिला की, जे सर्व्हे नंबर डिस्प्युटेड असतील ते बाजूला ठेवून ज्याच्यामध्ये मालकीचे ऑब्जेक्शन, प्रॉपर्टी किंवा ॲग्रीमेंटचे डिस्प्युट नाहीत अशा प्रॉपर्टीला त्यांची कागदपत्रे तपासून महापालिकेच्या टाऊन प्लानिंगच्या नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करा. जेणेकरुन महापालिकेने त्यांची कागदपत्रे तपासून ज्यामध्ये वादग्रस्त नाही त्यांचे नकाशे मंजूर केल्यानंतर तो विकासक त्याप्रमाणे बांधकाम करु शकतो. आज जवळपास २३३ लोक घरापासून वंचित आहेत. त्यांना ती घरे देण्याचा मार्ग मोकळा होईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा विषय भाडे देण्यासंदर्भात मांडलेला आहे. तिथे राहणाऱ्या लोकांना भाडे दिले नसेल तर महापालिका आयुक्तांनी तात्काळ विकासकासोबत बैठक घेऊन संबंधीत लोकांना बोलावून त्यांना भाडे द्यावे. कारण शेवटी भाडे आणि घरे देण्याची विकासकाची जबाबदारी आहे. त्यामुळे त्यांना भाडे मिळवून देण्यासाठी जे काही कार्यवाही करायची आहे ती तात्काळ कार्यवाही त्यांनी करावी.

श्रीमती गिता जैन : अध्यक्ष महोदय, ती इमारत बेकायदेशीर होती. ती कायदेशीर करण्यासाठी टीडीआर घेऊन तो बाजारात विकला. परंतु ती इमारत कायदेशीर केली नाही. त्यामुळे त्या इमारतीत राहणाऱ्या लोकांचे काय होणार असा प्रश्न पुढे येऊ शकतो. तो प्रश्न स्कोपच्या बाहेरचा असला तरी देखील आता या इमारतीमध्ये राहणाऱ्या लोकांची अशी अवस्था आहे की, जी घरे तुटली आहेत त्याचा ईएमआय देखील त्यांना भरावा लागतो आणि त्यांना भाडेही भेटत नाही. याचा

असुधारित प्रत

श्रीमती गिता जैन....

अर्थ तिथे राहणाऱ्यांची परिस्थिती एवढी बिकट आहे की, तेथील रहिवाश्यांचे दागिने सुद्धा विकले गेले आहेत. आज ७ ते ८ वर्षे झालेली आहेत तरी देखील आपण त्यांना न्याय देऊ शकलो नाही. त्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण विकासकांना कसा भुर्दंड देऊ शकतो, तसेच रहिवाशांना हे ८ वर्षाचे भाडे आपण कसे देऊ शकतो हे बघावे. जे लोक ईएमआय भरत आहेत त्यांना अजून घरे भेटलेली नाहीत. दुसऱ्या प्रकल्पामध्ये घरे घेण्यासाठी जे लोक तयार आहेत त्याचाही विचार करण्यात यावा. माननीय मंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपण या बाबत एक संयुक्त बैठक घेऊन रहिवाशांना घरे मिळवून द्यावीत. कारण आज त्यांचे बरेच प्रकल्प सुरु आहेत. त्यामुळे ते त्यांना कुठेही accommodate करु शकतात.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, मघाशीच सांगितले आहे की, विकासकांनी नियमाप्रमाणे प्रस्ताव दाखल केलेले आहेत. त्याप्रमाणे स्क्रुटीनी सुरु आहे. त्यामुळे महापालिका आयुक्तांनी यावर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्यांनी बैठक घेण्याची विनंती केलेली आहे तर संबंधीत विकासक आणि तेथील काही प्रमुख लोक आणि सन्माननीय सदस्यांना बोलावून त्या लोकांना लवकरात लवकर घरे आणि भाडे कशी मिळतील यावर बैठकीमध्ये निर्णय घेतला जाईल.

श्रीमती गिता जैन : अध्यक्ष महोदय, दोन ते तीन वर्षात त्यांनी सीसी घेण्यासाठी नवीन नकाशा पुन्हा सादर केलेला नाही किंवा प्रपोजलही ठेवलेले नाही. त्यासाठी आपण एक कालावधी नक्की करा. जेणेकरुन त्या कालावधीत सीसी करुन बाकीच्या इमारतीलाही न्याय मिळेल.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, महापालिकेने कळवलेले आहे की, त्या विकासकाने नकाशे मंजुरीसाठी प्रस्ताव दाखल केलेले आहेत.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** नागपूर-मुंबई दरम्यान विकसित करण्यांत येत असलेल्या बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचा तातडीने विस्तार करण्यासंदर्भात

**मु.शी.:** नागपूर-मुंबई दरम्यान विकसित करण्यांत येत असलेल्या बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचा तातडीने विस्तार करण्यासंदर्भात या संबंधी श्री. धर्मरावबाबा आत्राम वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर-मुंबई दरम्यान विकसित करण्यांत येत असलेला बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग माहे सप्टेंबर, २०२२ पर्यंत जनतेसाठी खुला करण्याचे शासनाने नियोजन करण्यात येणे, तथापि हा समृध्दी महामार्ग केवळ नागपूरपर्यंत मर्यादीत न ठेवता गडचिरोली जिल्ह्यापर्यंत विस्तारीत करण्यांत येणार असल्याचे दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजी सहसंचालक अभियांत्रिकी यांनी प्रसार माध्यमासमोर तर मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्व. उपक्रम) तथा जिल्हा पालकमंत्री, गडचिरोली यांनी प्रसार माध्यमातर्फे आयोजित, कार्यक्रमात दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास जाहीर करणे, गडचिरोली जिल्हा हा आदिवासी व नक्षलवादी जिल्हा असल्याने उपराजधानी असलेल्या नागपूरसारख्या शहरांशी तातडीने संपर्क साधण्यासाठी समृध्दी महामार्गासारख्या महामार्गाची असलेली तातडीची गरज, परिणामी, शासनाच्या या निर्णयाबाबत गडचिरोली जिल्हावासियांनी व्यक्त केलेली समाधानाची भावना, त्यामुळे सदर समृध्दी महामार्गाचा तातडीने विस्तार करण्यासंदर्भात शासनाने, त्याबाबतचा व्यवहार्यता अहवाल (Feasibility Report)

श्री. धर्मरावबाबा आत्राम.....

व सल्लागार कंपनी नेमण्याचे दृष्टीने शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया

असुधारित प्रत

श्री. संजय बनसोडे (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्री. धर्मरावबाबा आत्राम : अध्यक्ष महोदय, सदर लक्षवेधी सूचनेचे निवेदन वितरित झालेले नाही. मी या ठिकाणी मंत्री महोदयांचे आभार मानतो. समृध्दी महामार्ग नागपूर पासून गडचिरोली येथे येत आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, गडचिरोली पासून चामोर्शी, आलापल्ली, सिरोंचा येथ पर्यंत महामार्ग पुढे आणला तर छत्तीसगड, आंध्र प्रदेश व तेलंगणा या ३ राज्यांना जोडता येईल. या दृष्टीने मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. हा महामार्ग गडचिरोली पर्यत जाणार असून त्या करिता डीपीआर झाला आहे काय, हा महामार्ग प्रत्यक्ष कधी सुरु होईल ?

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धर्मरावबाबा आत्राम यांनी बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग गडचिरोली पर्यंत नेण्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली आहे. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग७०० कि.मी चा मोठा प्रकल्प आहे. राज्याच्या दृष्टीने हा हिताचा प्रकल्प आहे. याचे काम देखील सुरु आहे. गडचिरोली हा नक्षलग्रस्त, आदिवासी भाग असून इतर जिल्ह्यांच्या मागे विकासात मागे असलेला भाग आहे. हे लक्षात घेऊन बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग गडचिरोली पर्यंत वाढवावा, असा निर्णय घेतला आहे. गडचिरोली, गोंदिया व भंडारा अशा ३ जिल्ह्यांपर्यंत हा महामार्ग वाढवण्यात येणार आहे. यामध्ये नागपूर ते गोंदिया, गोंदिया ते गडचिरोली व गडचिरोली ते नागपूर असा त्रिकोण तयार होईल. त्याचा व्यवहार्यता अहवाल, डीपीआर तयार केला जात आहे. दि.१४ फेब्रुवारी रोजी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या निविदा काढलेल्या आहेत. सुसाध्यता व व्यवहार्यता अहवाल तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल व निविदा पूर्व कामांचा समावेश केलेला आहे. यामध्ये नागपूर ते गोंदिया, गोंदिया ते गडचिरोली व गडचिरोली ते नागपूर अशा ३ निविदा मागवल्या आहेत. निविदा प्रक्रियेकरिता निविदा पूर्व बैठक दि. २.३.२०२२ रोजी झाली आहे. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक ३१.३.२०२२ होता. सदर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचा कालावधी एक वर्षाचा आहे. लवकर या निविदा उघडल्या जातील.

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे ......

दि. ३१.३.२०२२ रोजी निविदा उघडून पुढील काम सुरु होईल. एमएसआरडीसीच्या माध्यमातून मुख्यमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली चांगले काम केले जात आहे. तेलंगणा, आंध्र प्रदेश व छत्तीसगड या ३ राज्यांना हा महामार्ग जोडणार आहे. केवळ आपल्या राज्यापुरता हा महामार्ग मर्यादित नसून या भागातील लोकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. यासाठी सर्व लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या सहकार्याची आवश्यकता आहे. हे काम लवकरात लवकर होईल याकरिता सर्व प्रयत्न एमएसआरडीसीच्या माध्यमातून केले जातील.

--------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : भिवंडीतील प्रकल्प बाधितांच्या खाजगी मालमत्तेची नुकसान भरपाई मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून न मिळणे

**मु. शी. :** भिवंडीतील प्रकल्प बाधितांच्या खाजगी मालमत्तेची नुकसान भरपाई मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून न मिळणे, या संबंधी श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रईस शेख ( भिवंडी – पूर्व ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"भिवंडी शहरात मुलभूत आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणे, यासंदर्भात मुंबई महानगर विकास प्राधिकरण कडून मेट्रो ५ प्रकल्पातंर्गत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प राबविण्यात येत असणे, सदर प्रकल्पाचा दुसऱ्या टप्प्याच्या विस्तारिकरण प्रकल्पबाधीतांना दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. व्दारे पुनर्वसनासाठी शिथिल धोरण अवलंबिण्याची शिफारस करण्यात येणे, दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी शिफारस केलेल्या धोरणांनुसार मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत आजपर्यंत भिवंडीतील प्रकल्प बाधितांच्या खाजगी मालमत्तेची नुकसान भरपाई न मिळणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असणे, नागरिकांनी वेळोवेळी मागणी करून देखील मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून याबाबत नुकसान भरपाई मिळण्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे ( नगर विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. *

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री रईस शेख : अध्यक्ष महोदय, मेट्रो-५ प्रकल्प भिवंडी शहर के लिए सबसे महत्वपूर्ण है. इससे पूरे एमएमआर रिजन में विकास होगा. लेकिन भिवंडी और कल्याण के लोगों को पिछले दो साल से निर्णय का इंतजार है. जवाब में दिया गया है कि इस प्रकल्प की मान्यता दिनांक २९ दिसम्बर, २०१७ को दी गई थी. उसके बाद रुट के बारे में लोगों का विरोध होने के कारण दिल्ली मेट्रो को रुट डिसाईड करने के लिए नियुक्त किया गया. मेरा पहला प्रश्न यह है कि दिल्ली मेट्रो ने जो सिफारिश दी है, उसमें यह भी लिखा हुआ है कि भिवंडी शहर के सभी भागों को मेट्रो से कनेक्ट करना है. आज जो निर्णय यहां पर लिया गया है कि अंडरग्राऊंड मेट्रो कल्याण रुट से जाएगी, उससे भिवंडी का बहुत बड़ा एरिया वंचित रह जाता है. मैं सम्माननीय मंत्री महोदय से कहना चाहता हूं कि अगर कल्याण रोड से मेट्रो जा रही है, तो वंजारपट्टी नाका हो, नासिक रोड हो या निजामपुरा हो, उसको कैसे कनेक्ट किया जाएगा ? मेरा सुझाव है कि लास्ट माईल कनेक्टीव्हिटी के लिए भिवंडी में बस सुविधा होना बहुत जरुरी है. पूरे भिवंडी शहर को कैसे कनेक्ट किया जाएगा? यह मेरा प्रश्न है. मेरा दूसरा प्रश्न यह है कि जवाब में कहीं भी नहीं लिखा गया है कि टेंडर कितने जल्दी होगा? दो साल हो गए. फरवरी माह में निर्णय हुआ है. मुझे लगता है कि डीपीआर भी रेडी नहीं है. मैं सम्माननीय मंत्री महोदय से बहुत ही नम्र निवेदन करना चाहूंगा कि पटल पर यह बात आ जाए कि डीपीआर होकर टेंडर कब तक हो जाएगा? मेरा अगला प्रश्न यह है कि जितने स्ट्रक्चर्स बाधित होते है, उस बारे में मेरा निवेदन यह है कि वहां पर जमीन किसी और की है, स्ट्रक्चर किसी और का है, लिगल का थोड़ा इश्यू है. जितने स्ट्रक्चर तोड़े जाएंगे उन सभी को मुंबई के आधार पर कॉम्पेन्सेशन मिलना चाहिए. सम्माननीय मंत्री महोदय जी, आपके नेतृत्व में एमएमआर रिजन का विकास हो रहा है. यदि एमएमआरडीए वहां पर एक बस सर्व्हिस चलाता है, तो तहसील के जो लोग है, जो बच्चे लॉजिस्टिक पार्क में काम करने के लिए जाते है, तो भिवंडी, कल्याण या अंबरनाथ के सभी लोग मेट्रो की सुविधा ले पायेंगे. इस तरह मेरे चार प्रश्न है. मुझे उम्मीद है कि सम्माननीय मंत्री महोदय आज भिवंडी शहर को आश्वासित करेंगे कि उनको अपनी भिवंडी मेट्रो कब मिलेगी?

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रईस शेख यांनी मेट्रो ५ च्या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. ठाणे, भिवंडी, कल्याण अशी मेट्रो ५ ही या भिवंडी शहरातून जाऊन खऱ्या अर्थाने भिवंडी शहराला .... त्यांनी सांगितले ते बरोबर आहे की, ज्या पध्दतीने इतर शहरांना बस सेवा आहे, शटल आहे, लोकांना कनेक्टिव्हीटी आहे, त्या प्रमाणे भिवंडीमध्ये जेवढी पाहिजे तेवढी कनेक्टिव्हीटी नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच भिवंडी मेट्रो ५ चा निर्णय त्यावेळेस घेतला गेला.

अध्यक्ष महोदय, यामध्ये जे बाधित होणार आहेत म्हणजे पहिल्या टप्प्यामध्ये जवळपास ३१३ प्रकल्पग्रस्त आहेत. एमएमआरडीएच्याच घरांमध्ये ... रेंटल स्कीममधून जी घरे मिळालेली आहेत, ती घरे आपण त्यांना देणार आहोत. त्यांनी असा मुद्दा उपस्थित केलेला आहे की, ही मेट्रो कधीपर्यंत होणार, डीपीआर कधी होणार? या मेट्रोबाबत बऱ्याच वेळा आंदोलने झाली. तेथे अनेक दुकानदार, निवासी घरे आहेत, तेथील नागरिक आहेत. अनेकवेळा त्या ठिकाणी आंदोलने केली गेली. आमदार महोदयांना त्याबाबत माहिती आहे.

अध्यक्ष महोदय, यामध्ये कमीत कमी लोक बाधित झाले पाहिजेत अशी मी एमएमआरडीएच्या आयुक्तांना सूचना दिलेली आहे. आपल्याला प्रकल्प करीत असताना संघर्ष करुन करावयाचा नाही तर आपण लोकांच्या संमतीने प्रकल्प करु. त्यानंतर हा जो उन्नत मार्ग होता तो आपण काही प्रमाणात अंडरग्राऊंड करण्याचा निर्णय ऑथॉरिटीमध्ये घेतला आहे. त्यामध्ये जवळपास ७३५ बांधकामे ही बाधित होण्यापासून थांबत आहेत. त्यामुळे तेथील लोकांचा रोष कमी होईल.

अध्यक्ष महोदय, ऑथॉरिटीमध्ये हा निर्णय घेतलेला आहे. आता शासनाकडे तो प्रस्ताव येईल. त्याकरिता जवळपास १४०० कोटी रुपये अतिरिक्त लागणार आहेत. शासनाच्या मंजुरीनंतर तातडीने त्याची पुढची निविदा प्रक्रिया आपण सुरु करु. यामध्ये एवढेच आहे की, या प्रकल्पामध्ये कुठल्याही परिस्थितीमध्ये कोणालाही आपण वंचित ठेवणार नाही व कोणावरही अन्याय होणार नाही.

श्री.एकनाथ शिंदे...

अध्यक्ष महोदय, त्याच बरोबर सन्माननीय सदस्यांनी बस सेवेच्या संदर्भामध्ये देखील उल्लेख केलेला आहे. भिवंडी ग्रामीण भाग असला तरी मोठ्या प्रमाणावर मल्टी नॅशनल गोदामे तेथे आहेत. हजारो, लाखो लोक त्या ठिकाणी काम करीत आहेत. त्यांना तसेच त्या गावातील लोकांना, मुलांना शाळेसाठी असेल किंबहुना तेथे ये-जा करणारे जे कर्मचारी असतील त्यांना देखील ही सोय मिळाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या संदर्भात देखील एमएमआरडीएच्या माध्यमातून त्यांनी अशा प्रकारची सोय करता येईल काय, असा मुद्दा उपस्थित केला आहे. भिवंडी महापालिका त्या ठिकाणी आहे. ठाणे महापालिकेची बस सेवा भिवंडीपर्यंत जाते. कल्याण-डोंबिवलीची देखील बस सेवा तेथे जाते. माझ्या माहितीप्रमाणे भिवंडी महापालिकेची बस सेवा नाही. त्यामुळे आपण याबाबतीत एक चर्चा करु. त्याची व्यवहार्यता, व्हायाबिलिटी काय आहे, हे लक्षात घेऊन आपण त्या लोकांना सोय देण्यासाठी नक्की निर्णय घेऊ.

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित

श्री रईस शेख : अध्यक्ष महोदय, सम्माननीय मंत्री महोदय ने बहुत ही विस्तार से जवाब दिया है. उन्होंने कहा कि जो रेसिडेन्शियल स्ट्रक्चर्स प्रभावित होंगे उनको हम रेंटल स्कीम में देंगे. लेकिन जो कमर्शियल स्ट्रक्चर्स वहां पर प्रभावित होंगे, उनको अच्छे से अच्छा मोबदला मिलना चाहिए. क्योंकि वह स्ट्रक्चर्स वहां पर कई सालों से है. अगर यह ऐसा होता है तो इस प्रकल्प को बहुत गति मिलेगी. मैं लोकप्रतिनिधी होने के नाते आपको आश्वासित करना चाहता हूं कि भिवंडी शहर इस प्रकल्प के लिए १०० प्रतिशत शासन की मदद करेगा, पूरी तरह से मदद करेगा. आपने देखा होगा कि जब से मैं विधायक बना हूं, दो साल से इस विषय पर एक भी आंदोलन नहीं हुआ है. क्योंकि हमने आपके माध्यम से लोगों को आश्वासित किया है कि लोगों को मोबदला मिलेगा. आप आश्वासन दीजिए. आपका कहना है कि यह मंत्रिमंडल में जाएगा. यदि आप चाहेंगे, तो यह प्रकल्प ६ महीने में शुरु हो सकता है. यदि आप अवधि सही बताऐंगे तो भिवंडी को आश्वासन मिलेगा. आपने भिवंडी-निजामपुरा महानगर के माध्यम से बस सर्व्हिस के बारे में कहा है. एमएमआरडीए प्लॅनिंग ऑथॉरिटी है. एमएमआरडीए चाहें तो वेट लिस्ट बेसिस पर तुरंत बस सेवा शुरु कर सकता है. फिजिब्लिटी की जो बात है, बड़े बड़े प्राईव्हेट ऑपरेटर्स वहां पर काम कर रहे है, जो हमारे बच्चों को एक्सप्लॉईट करते है, वहां पर रेट फिक्स नहीं है. यदि आप एमएमआरडीए के माध्यम से लीज बेसिस पर बस सेवा शुरु करेंगे, तो बहुत अच्छा होगा. ऐसे मेरे कुछ प्रश्न है.

श्री एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, इसके लिए मैं आपको बता रहा हूं कि ये एमएमआरडीए के माध्यम से करना है या थाना महानगरपालिका की वहां पर बस सर्व्हिस है या कल्याण-डोंबिवली महानगरपालिका की बस सेवा है? इस बारे में हम बैठकर तय करते है. अभी इस बारे में ऐसा कुछ जवाब देना, मतलब अपने को निर्णय लेना है, लोगों को फायदा देना है. व्यावसायिक गाळेधारकांना २२५ चौ.फुटांचा व्यावसायिक गाळा देण्याचा निर्णय घेतला आहे. सन्माननीय सदस्य यांनी ६ महिन्यात काम सुरु करण्याची विनंती केली आहे. हा विषय अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या प्रकरणी अथॉरिटीने निर्णय घेऊन तो प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून त्यावर निर्णय झाल्यानंतर ६ महिन्यात नव्हे तर ४ महिन्यात काम सुरु करता येईल.

अप्रकाशित

श्री.रईस शेख : अध्यक्ष महोदय, धन्यवाद !

----------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : मेट्रो-४ व मेट्रो-९ च्या कारशेडच्या आरक्षणासंदर्भातील विविध प्रश्नांवर शासनाने सत्वर भुमिका स्पष्ट करणे व उपाययोजना करणे

**मु. शी. :** मेट्रो-४ व मेट्रो-९ च्या कारशेडच्या आरक्षणासंदर्भातील विविध प्रश्नांवर शासनाने सत्वर भुमिका स्पष्ट करणे व उपाययोजना करणे संबंधी **श्री. प्रताप सरनाईक, श्रीमती यामिनी जाधव,**वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. प्रताप सरनाईक (ओवळा-माजिवाडा) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे व मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून मेट्रोचे काम सुरु असून त्यापैकी मेट्रो-४ व मेट्रो-९ हे ओवळा-माजीवाडा मतदारसंघातील असणे, मेट्रोचे काम पूर्णत्वाला येण्यापूर्वी कारशेडची जागा एम.एम.आर.डी.ए.च्या ताब्यात असणे, याकरिता मेट्रो-४ साठी एम.एम.आर.डी.ए.ने घोडबंदर रोडवरील मोघरपाडा येथे रहिवाशी क्षेत्रातील शेतकरी कसत असलेल्या जागेवर आरक्षण टाकणे, त्यानंतर एम.एम.आर.डी.ए.चे अधिकारी जागेवर सर्वेक्षण करण्याकरिता गेले असता स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांना विरोध करणे, स्थानिक आमदार म्हणून मध्यस्थी करुन एम.एम.आर.डी.ए.ने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या माध्यमातून सर्वेक्षणाचे काम पूर्ण करणे, शेतकऱ्यांना जो मोबदला द्यावयाचा आहे तो आर्थिक मोबदला न देता मेट्रो कारशेडसाठी लागणाऱ्या जागे व्यतिरिक्त रहिवाशी क्षेत्रातील त्यांच्याच जमीनीचा उर्वरित विकसित भाग परत त्यांना देणेबाबत मा.मुख्यमंत्री व मा.नगरविकास मंत्री हे अंतिम निर्णय घेणेसंदर्भात आश्वस्त केलेले

असुधारित प्रत

श्री. प्रताप सरनाईक...

असणे, मिरा भाईंदर क्षेत्रातील मेट्रो-९ चे काम सुरु असुन त्यासाठी लागणाऱ्या कारशेडसाठीचे आरक्षण राई, मुर्धा व मोर्वा या गावातील शेतकऱ्यांच्या कसत असलेल्या जमिनीवर एम.एम.आर.डी.ए.ने टाकलेले असणे, जमिनीच्या आसपास अनेक खाजगी, मालकी, धर्मादाय संस्था तसेच शासकीय जमिनी उपलब्ध असतानाही जाणीवपूर्वक एम.एम.आर.डी.ए.ने भात शेती व इतर शेती विषयक व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमीनीवर हे आरक्षण टाकून अन्याय करणे, त्यामुळे तेथील शेतकऱ्यांनी सर्वेक्षण न होणेसाठी एम.एम.आर.डी.ए.च्या विरोधात एल्गार पुकारणे, त्यामुळे या गावापासून काही अंतरावर असलेल्या खोपरा गावातील शासकीय जमिनीवर मेट्रो-९ च्या कारशेडचे आरक्षण टाकावे व राई, मुर्धा, मोर्वा गावापर्यंत मर्यादित असलेली मेट्रो सेवा पुढे उत्तन व गोराई जवळ असलेल्या पॅगोडापर्यंत नेल्यास पर्यटनाला चालना मिळून या परिसराचा विकास होईल व या गावाजवळून जाणाऱ्या ३० मीटरच्या रस्त्याऐवजी १८ मीटरचा रस्ता व मेट्रो कारशेडकडे जाणाऱ्या १८ मीटरच्या रस्त्याऐवजी ३० मीटरचा रस्ता बनविण्यात यावा अशी स्थानिक नागरीकांची मागणी असणे, तसेच मेट्रो-४ व मेट्रो-९ च्या कारशेडच्या आरक्षणाबाबत शासनाने सत्वर भुमिका स्पष्ट करणेबाबत, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

श्री.एकनाथ शिंदे (नगरविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, ठाणे व मिरा-भाईंदर या दोन्ही क्षेत्रात माझ्या मतदारसंघाचा अर्धा-अर्धा भाग आहे. सन २००९ पासून या भागासाठी मेट्रोच्या मागणीचे आंदोलन करीत असताना त्यावेळी आताचे माननीय नगरविकास मंत्री हे आंदोलन म्हणून सहभागी झाले होते. मागील युती सरकारच्या कार्यकाळात ठाणे येथील मेट्रो ४ व भाईंदर येथील मेट्रो ९ या दोन्ही प्रकल्पांना राज्य शासनाने मंजुरी दिली असून सदरहू काम अतिशय वेगाने सुरु आहे. यामुळे दोन्ही शहरातील वाहतुकीवर चारचाकी गाड्यांचा मोठा ताण पडणार होता तो मेट्रो सुरु झाल्याने कमी होऊन नागरिकांना त्याचा खूप फायदा होणार आहे. एमएमआरडीएने मेट्रोचे उक्त क्षेत्रात काम करीत असताना मेट्रो कारशेडची जागा ताब्यात घेणे गरजेचे होते. त्यानंतर मेट्रोचे काम सुरु करणे गरजेचे होते. आता मुंबईची परिस्थिती आपण पाहत आहोत. गोरेगाव येथील आरे कारशेड प्रकरणी अनेक विघ्न आल्यानंतर ती कारशेडची जागा बदलण्यात येऊन कांजूरमार्ग येथे निश्चित करण्यात आली आहे. सदरहू ठिकाणच्या परिस्थितीची आपणा सर्वांना कल्पना आहे. त्यामुळे मेट्रोचे काम थंडावले आहे. या प्रकरणी काही चूका एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी केल्यामुळे राजकीय नेते अडचणीत आले आहेत. त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे ठाणे येथील मेट्रो ४ करिता मोघरपाडा येथे कारशेडचे आरक्षण टाकण्यात आले आहे. मिरा-भाईंदर मेट्रोचे आरक्षण मेट्रो ९ चे आरक्षण मुर्धा, राई व मोर्वा येथे टाकण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, शिवसेना पक्षाची स्थापना सन १९६६ मध्ये झाली आहे.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित

श्री.प्रताप सरनाईक.....

भूमिपुत्र आणि स्थानिक मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी शिवसेना पक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. आज मी तिसऱ्यांदा शिवसेना पक्षाचा आमदार म्हणून सभागृहामध्ये उभा आहे. मला त्याचा अभिमान आहे. मोघरपाडा, कासारवडवली, मुर्धा व राई येथे भूमिपुत्रांच्या जमिनीवरच कारशेडचे आरक्षण टाकण्यात आलेले आहे. ठाणे शहरामध्ये आगरी-कोळी लोक मोठ्या प्रमाणावर राहतात. त्यांच्याच जमिनीवर शासनाने मेट्रोचे आरक्षण टाकलेले आहे. या जमिनीवर कोणत्याही हिंदीभाषिक व्यक्तीचा मालकी हक्क नाही. पाटील, भोईर, म्हात्रे, जोशी असे हे भूमिपुत्र आहेत. याच लोकांनी ठाणे शहराच्या विकासासाठी फार मोठे योगदान दिले आहे. या भूमिपुत्रांमुळेच ठाणे महानगरपालिका व मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा मोठ्या प्रमाणावर विकास झालेला आहे. या शहरातील रस्त्यांसाठी भूमिपुत्रांनी जमिनी दिलेल्या आहेत. या भूमिपुत्रांनी आरक्षित भूखंड देखील महानगरपालिकेच्या ताब्यामध्ये दिलेले आहेत. याच भूखंडावर उत्तुंग आशा शासकीय इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. ठाणे मेट्रोसाठी कासारवडवली येथे १०० एकरवर आरक्षण टाकलेले आहे. सदर १०० एकर जमीन वाहित आहे. त्या शेतीमध्ये भाताचे उत्पन्न घेतले जात आहे. एमएमआरडीएने मोघरपाडा येथील जमिनीवर मेट्रोसाठी आरक्षण टाकेलेले आहे. या ठिकाणी देखील तेथील भूमिपुत्र शेती करीत आहेत. मुर्धा व राई या गावांच्या आसपास शेकडो एकर शासकीय जमीन आहे. या जमिनीच्या शेजारी अनेक हिंदीभाषिक लोकांच्या मालकी हक्काच्या जमिनी आहेत. तरी देखील मुर्धा, राई, व मोर्वा या गावातील भूमिपुत्रांच्या जमिनीवरच मेट्रोसाठी आरक्षण टाकण्यात आलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मागील अनेक वर्षांपासून ठाणे जिल्ह्यावर शिवसेनेचे प्राबल्य आहे. शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे ठाणे जिल्ह्यावर विशेष प्रेम होते. आता माननीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे देखील ठाणे जिल्ह्यावर विशेष प्रेम आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेबांनी या गावांतील लोकांना भेटी देऊन त्यांना वेळोवेळी मदत केलेली आहे. धर्मवीर स्व.आनंद दिघे साहेबानंतर आता माननीय

असुधारित प्रत

श्री.प्रताप सरनाईक.....

श्री.एकनाथ शिंदे यांनी राई, मुर्धा व मोर्वा या गावावर अतोनात प्रेम केलेले आहे. त्या गावांच्या ३ किलोमीटर अंतरावर शासनाची शेकडो एकर जमीन असून देखील तेथे आरक्षण न टाकता भूमिपुत्रांच्या जमिनीवर आरक्षण टाकण्यात आलेले आहे. त्यामुळे तेथील नागरिक आक्रोश करीत आहेत. त्या जमिनीच्या ३०० मीटर अंतरावर अनेक लोकांच्या खाजगी जमिनी आहेत. तरी देखील भूमिपुत्रांच्याच जमिनीवर मेट्रोचे आरक्षण का टाकलेले आहे, असा त्यांचा प्रश्न आहे. विकास झाला पाहिजे, या मताशी मी सहमत आहे. किंबहुना आम्ही आंदोलने केली म्हणून मेट्रो अस्तित्त्वात येत आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या माध्यमातून नगरविकास मंत्री महोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, राई, मुर्धा व मोर्वा या गावांच्या पुढे तीन किलोमीटर अंतरावर शासकीय जमीन आहे. त्या जागेवर मेट्रोचे आरक्षण टाकण्यात येणार आहे काय?

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी मेट्रो-४ व मेट्रो-९ संदर्भात लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. उक्त लक्षवेधी सूचनेवर त्यांनी अतिशय सविस्तर मत व्यक्त केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, राई, मुर्धा व मोर्वा या गावांमध्ये भूमिपुत्र आहेत, ही बाब खरी आहे. जेव्हा जेव्हा विकासासाठी शासनाला गरज भासेल तेव्हा तेव्हा या भूमिपुत्रांनी स्थानिक स्वराज्य संस्थेला व शासनाला मदत केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेब मुख्यमंत्री असताना मुंबईबाहेर म्हणजे ठाणे येथे मेट्रो उपलब्ध करुन देण्याबाबत माझ्यासह सन्माननीय सदस्य श्री.प्रताप सरनाईक, माननीय श्री.राजन विचारे व अन्य अनेक सन्माननीय सदस्यांनी मागणी केली होती. परंतु तेव्हा शासनाच्या माध्यमातून या ठिकाणी feasibility नाही, व्हॅबिलिटी नाही, रायडरशिप नाही, असे उत्तर दिले जात होते. त्यावेळी आम्ही आग्रही मागणी केली की, मेट्रोसारख्या सुविधा उपलब्ध करुन देणे

असुधारित प्रत

श्री.एकनाथ शिंदे.......

हे शासनाचे काम आहे. ती शासनाची जबाबदारी आहे. विकासाच्या दृष्टीने connectivity खूप महत्त्वाची असते.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे.....

त्यामुळे मुंबई व इतर मोठ्या शहरांप्रमाणे ठाणे एमएमआरला देखील मेट्रोचा फायदा मिळाला पाहिजे. याकरिता तेव्हा मोठ्या प्रमाणात आंदोलने झाली होती. हे सर्व प्रश्न तेव्हा सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेरही उपस्थित करण्यात आले होते. रस्त्यावरही याकरिता संघर्ष करावा लागला होता. त्यावेळेस मेट्रोचा निर्णय झाला होता. त्यानंतर आम्ही मागणी केल्याप्रमाणे श्री. देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळातही मेट्रोचा विस्तार होऊ लागला. त्याबाबत निर्णय देखील घेण्यात आले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी मोघरपाडा येथील विषयही उपस्थित केला आहे. मी सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांवर अन्याय करुन हा प्रकल्प पुढे नेला जाणार नाही. शासन असे होऊ देणार नाही. त्यांनी मघाशी माननीय मुख्यमंत्री आणि आदरणीय श्री. आनंद दिघे यांचा उल्लेख केला आहे. तेथील भुमिपूत्र हे आपलेच बांधव आहेत. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे अन्याय करुन किंवा जबरदस्तीने जागा ताब्यात घेऊन किंवा अधिग्रहित करुन शासनाने कोणताही प्रकल्प पुढे नेलेला नाही. शासनाच्या समृद्धी महामार्गाचे ज्वलंत उदाहरण आपल्यासमोर आहे. मोघरपाडा येथील आरक्षणाची ६४ गुंठे जमीन शासनाने सन १९६० ला तेथील शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी दिली होती. ही जमीन शासनाच्या मालकीची आहे. शेतकरी ती जमीन वापरत आहेत. सन्माननीय सदस्यांनीही या शेतकऱ्यांसोबत चर्चा करुन काही बाबी समजावून सांगितलेल्या आहेत. मेट्रो, कारशेड, मेट्रो स्टेशन झाले तर त्या भागाचा विकास होणार आहे. तेथील भुमिपुत्रांच्या हाताला रोजगार मिळत असतो. तेथील व्यापार वाढत असतो. विकासाचे हे चक्र आहे. या सर्वांमुळे हे चक्र सुरु होईल. मी सांगू इच्छितो की, शिवसेना पक्षाने विकासाकरिता कधीही विरोध केला नाही. सन्माननीय सदस्यांनीही याकरिता मध्यस्थी केली आहे. या विषयाचा निर्णय बैठकीनंतर घेतला जाईल.

अध्यक्ष महोदय, सभागृहात राई, मुर्धा येथील विषय उपस्थित करण्यात आला आहे. या बाबत एमएमआरडीएने माहिती दिली आहे. यात पुढील पाच कि.मी. चे अंतर आहे. कारशेड किंवा स्टेशन तयार करण्यासाठी जमिनीची भौगोलिक

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे.....

व्यवहार्यता लागत असते. राई, मुर्धा या गावातील भुमिपूत्र हे आपले बांधव आहेत. यात कोणत्याही प्रकारे जबरदस्तीने निर्णय घेतला जाणार नाही. सन्माननीय सदस्यांच्या मध्यस्थीने तेथील शेतकरी, प्रतिनिधी, एमएमआरडीए आयुक्त व इतर संबंधित अधिकाऱ्यांसोबत एक बैठक आयोजित केली जाईल. त्यांच्या काय अडचणी आहेत, हे देखील त्यांना आपण समजावून सांगू. तेथे स्टेशन, कारशेड झाले तर त्याचा त्या भागासाठी कशा प्रकारे फायदा होईल, हे समजावून सांगावे लागेल. यामुळे तेथील पोटेन्शिअल वाढेल, तेथील जागांचे भाव दहापट होतील. समृद्धी महामार्गाला जमीन देण्यासाठी सुरुवातीला लोकांनी विरोध केला होता. परंतु तेथील लोकांना विश्वासात घेऊन जमीन मोबदल्याचे वाटप करण्यात आले होते. त्यांना या महामार्गाचे पैसे वेळेत मिळतील, असा विश्वास नव्हता. परंतु त्यांना प्रत्यक्षात अनुभव आल्यानंतर जे लोक विरोध करीत होते ते देखील त्यांच्या जमिनी देण्यास सहमत झाले होते. त्यांनी या विकास प्रकल्पामध्ये आमच्याही जमिनी घ्याव्यात, अशी भूमिका मांडली होती.

अध्यक्ष महोदय, राई, मुर्धा, मोर्वा या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर आरक्षण दर्शविण्यात आलेले असले तरीही जबरदस्तीने जमीन अधिगृहित न करता तेथील लोकांच्या संमतीनेच ती घेतली जाईल. यासाठी सन्माननीय सदस्यांनी मध्यस्थी करावी. आवश्यकता भासल्यास याकरिता माननीय मुख्यमंत्र्यांकडे या विषयाची बैठक आयोजित करता येईल. तेथून पुढे असलेल्या शासनाच्या पाच कि.मी. जमिनीची व्यहार्यता एमएमआरडीएने कळविली आहे. त्यानुसार ती जागा योग्य नाही. परंतु भविष्यात या प्रकल्पाचा विस्तार करता आला तर तो केला जाईल. जसे की, पूर्वी मेट्रोचा प्रकल्प ठाण्यापर्यंत होता. त्यात वाढ करुन तो कल्याण, भिवंडी, मिरा-भाईंदरपर्यंत नेला आहे. तसेच बोरीवलीहून लूप जोडण्यात येणार आहे. आपणास कनेक्टीव्हीटी वाढवावयाची आहे.

यानंतर श्री. चौधरी.....

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री.एकनाथ शिंदे.....

त्यासाठी लोकांचे देखील सहकार्य अपेक्षित आहे. या विषयाबाबत आपण एक बैठक घेऊ. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात पुढाकार घ्यावा. मेट्रोच्या मार्गातील अडचणी आपण निश्चितपणे दूर करु. सन्माननीय सदस्यांनी मघाशी मांडलेली वस्तुस्थिती देखील खरी आहे की, मेट्रो लाईनचे काम सुरु करण्यापूर्वीच कारशेडबाबत विचार करण्याची आवश्यकता होती. पूर्वी काही अधिकाऱ्यांनी केलेल्या चुकांच्या खोलात आता जाऊन उपयोग नाही. परंतु ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मेट्रोसारखा मोठा प्रकल्प पुढे नेत असताना त्याचा सर्वच बाजुंनी सारासार विचार करणे आवश्यक आहे. त्यातल्या त्यात कारशेड, स्टेशनसाठी लागणारी जागा यांच्याकडे त्यावेळी थोडेसे दुर्लक्ष झाले ही वस्तुस्थिती आहे. यापुढे लोकप्रतिनिधी आणि स्थानिक भुमिपुत्र-शेतकरी यांना विश्वासात घेऊन हा प्रकल्प पुढे नेऊ.

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांचे मी सर्वप्रथम मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. कारण ठाणे जिल्हयाच्या विकासाचे शिल्पकार असलेल्या आगरी-कोळी समाजाची भूमिका समजून घेऊन त्यांनी सभागृहामध्ये उत्तर दिले आहे.

अध्यक्ष महोदय, मेट्रोचे काम गतीने पूर्ण होऊन ती लवकरात लवकर सुरु होणे तेवढेच गरजेचे आहे, हे खरे आहे. मी मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे या तिन्ही कारशेडशी संबंधित सर्व भुमिपुत्र आहेत. मंत्री महोदयांनी या विषयासंदर्भात बैठक घेण्याचे आश्वस्त केले आहे. परंतु मोघरपाडा आणि कासरवडवली येथील भुमिपुत्र ठाणे महानगरपालिका हद्दीतील आहेत व मुर्धा, राई, मोर्वा येथील भुमिपुत्र मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील आहेत. त्यामुळे या दोन्ही ठिकाणच्या भुमिपुत्रांच्या प्रश्नांसाठी वेगवेगळया बैठकांचे आयोजन करावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मुर्धा, राई आणि मोर्वा गावांच्या समोरुन जाणारा रस्ता एमएमआरडीए ने ३० मिटरचा दर्शविला आहे. परंतु त्यामुळे ग्रामस्थांची स्वातंत्र्योत्तर काळातील जुनी घरे जात आहेत. ग्रामस्थांचा विकासाला विरोध नाही.

असुधारित प्रत

श्री.प्रताप सरनाईक.....

परंतु त्यांचे म्हणणे आहे की, सदर ३० मिटरऐवजी १८ मिटरचा रस्ता करण्यात यावा. तसेच मेट्रो कारशेडकडे जाणारा १८ मिटरचा रस्ता ३० मिटर करावा, अशी त्यांची शासनास विनंती आहे. त्यामुळे मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, ३० मिटर दर्शविण्यात आलेला रस्ता १८ मिटर व मेट्रो कारशेडकडे जाणारा १८ मिटर दर्शविलेला रस्ता ३० मिटर करुन भुमिपुत्रांना न्याय देणार का ?

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, ज्याप्रमाणे आपण उपनगरीय रेल्वेला मुंबईची लाईफलाईन म्हणतो त्याप्रमाणेच रस्ते देखील कोणत्याही शहराच्या विकासातील महत्त्वाचा घटक असतात. सन्माननीय सदस्यांना देखील माहिती आहे की, ज्या शहरातील रस्ते रुंद झाले त्या शहराचा विकास वेगाने झाला. ठाणे शहरातील रस्ते, मुंबई शहरातील रस्ते, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग ही त्याची उदाहरणे आहेत. ज्या शहराची दळणवळण यंत्रणा सक्षम असते त्या शहराचा विकास अधिक वेगाने होत असतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ज्या भागातून ३० मिटरचा रस्ता दर्शविण्यात आलेला आहे त्या भागात जुनी घरे आहेत. मी सन्माननीय सदस्यांना मघाशीच आश्वस्त केले आहे की, आपण यासंदर्भात बैठक घेऊ. तसेच तेथील स्थानिकांना रस्त्यांच्या विकासाच्या महत्त्वाबाबत सन्माननीय सदस्यांनी देखील सांगितले पाहिजे. एखाद्या भागातील मालमत्तेची किंमत १० रुपये असेल तर रस्ता रुंदीकरण झाल्यानंतर त्याच मालमत्तेची किंमत २० रुपये होते. यासंदर्भात आपण ठाण्यामध्ये काही मॉडेल देखील तयार केले आहेत की, रस्ते रुंद करताना त्यामध्ये ज्यांची घरे जातील त्यांचे दूर अंतरावर पुनर्वसन न करता आजुबाजूलाच पुनर्वसन करण्याचा आपण प्रयत्न करतो. या प्रकरणी देखील तसे करता येईल किंवा कसे याचा आपण बैठकीमध्ये विचार करु. अर्थात, असे करावेच असे मी म्हणत नाही. बैठकीमध्ये लोकांना समजावून सांगून, त्यांचे मत विचारात घेऊन अंतिम निर्णय घेऊ. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, हा प्रकल्प आपण लोकांच्या संमतीनेच करणार आहोत.

असुधारित प्रत

श्री.एकनाथ शिंदे.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मोघरपाडा आणि मुर्धा, राई, मोर्वा यांच्यासंदर्भात वेगवेगळया बैठका घेण्याबाबत विनंती केली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, हे दोन्ही विषय वेगवेगळे असल्यामुळे आपण नक्कीच दोन वेगळया बैठका घेऊ. तसेच लवकरात लवकर निर्णय घेण्याचा प्रयत्न करु. कारण प्रकल्पास जेवढा विलंब होईल तेवढा त्यावरील खर्च वाढेल व त्याचा बोजा प्रत्यक्षरित्या शासनावर आणि अप्रत्यक्षरित्या जनतेवर पडेल.

अध्यक्ष महोदय, एमएमआर क्षेत्रामध्ये ३३७ किलोमीटर लांबीचे मेट्रो रेल्वेचे जाळे पूर्ण होईल त्यावेळी रस्त्यावरील रहदारी मोठया प्रमाणात कमी होऊन प्रदुषण कमी होईल, अपघात कमी होतील व लोकांचा वेळ देखील वाचेल. त्यामुळे मेट्रोचे ३३७ किलोमीटर लांबीचे जाळे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सर्वच लोकप्रतिनिधींची आपापल्या भागातील लोकांना याचे महत्त्व पटवून दिले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे दोन्ही विषयांच्या वेगवेगळया बैठका घेण्यात येतील. बैठकीमध्ये रस्त्याबाबत देखील चर्चा करण्यात येईल.

---------

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

**पृ. शी.:** चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक वीज केंद्राच्या प्रदुषणात दिवसेंदिवस होत असलेली वाढ

**मु. शी.:** चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक वीज केंद्राच्या प्रदुषणात दिवसेंदिवस होत असलेली वाढ यासंबंधी श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक वीज केंद्राच्या प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत असणे, सदर केंद्राच्या प्रदुषणाचा परिणाम चंद्रपूरसह थेट नागपूर, पुणे व मुंबईवर होत असल्याचा दावा पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या द सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी ॲण्ड क्लिन एअर (सीआरईए) नामक संस्थेने नुकताच केलेला असणे, सदर महाऔष्णिक वीज केंद्रातून निघणारे एस.पी.एम., सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड आणि मर्क्युरी सारखे प्रदुषणकारी घटक हवेच्या माध्यमातून उक्त शहरांपर्यंत पोहोचणे, त्यामुळे उक्त शहरातील नागरीकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचा दावाही सदर संस्थेने करणे, सदर वायू प्रदूषणामुळे २०२० मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील ८५, नागपूर ६२, यवतमाळ ४५, मुंबईत ३० आणि पुणे व नांदेड मध्ये प्रत्येकी २९ जणांचा अकाली मृत्यू झाल्याचे उक्त संस्थेच्या अहवालात नमूद करण्यात येणे, त्यामुळे महाऔष्णिक वीज केंद्राचे मुदतबाह्य झालेले ३ आणि ४ क्रमांकाचे संयंत्र बंद करण्याची व सल्फर कमी करण्यासाठी यंत्रणा उभारण्याची मागणी करणाऱ्या द सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी ॲण्ड क्लिन एअर (सीआरईए) नामक संस्थेने केलेली असणे, चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक वीज केंद्रच नव्हे तर राज्यातील इतरही औष्णिक वीज केंद्र अशाच पध्दतीने प्रदूषणात भर घालत असल्याचे चित्र असणे, शासनाने यासर्व बाबीचा गांभीर्याने विचार करुन निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता वा शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत

श्री. संजय बनसोडे (पर्यावरण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. किशोर जोरगेवार : अध्यक्ष महोदय, सर्वप्रथम मी आपले धन्यवाद व्यक्त करतो की आपण केवळ लक्षवेधी सूचनेकरिता सकाळी ९ वाजल्यापासून हे सभागृह सुरु ठेवले आहे. या ठिकाणी अत्यंत महत्त्वाच्या विषयासंबंधी मी लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. महाराष्ट्र शासनाचा सर्वात मोठा आणि सर्वात जुना महाऔष्णिक वीज निर्मिती प्रकल्प चंद्रपूर येथे सुरू आहे. परंतु या प्रकल्पामुळे जे प्रदुषण होत आहे त्यामुळे केवळ चंद्रपूर जिल्हाच नव्हे तर इतरही लगतच्या अनेक जिल्ह्यांपर्यंत प्रदुषण पोहोचले आहे. या विषयी शासनाची भूमिका काय असेल, तसेच येथील संच क्रमांक ३ ते ७ सन १९८६ पासून कार्यान्वीत आहेत. तेथील संच क्रमांक १ व २ हे जुने झाल्यामुळे बंद केले आहेत. उर्वरित ३ ते ७ हे चार संच शासन किती दिवस चालू ठेवणार आहे आणि ते कधी बंद करणार आहेत याबद्दल माहिती देण्यात आलेली नाही.

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधीच्या उत्तरातून असे दिसते की, या प्रकल्पावर अनेकदा दंडात्मक कारवाई झाली आहे. अनेकदा या प्रकल्पाला नोटीसेस बजाविण्यात आल्या आहेत आणि हरित लवादाने ५ कोटी रुपयांचा दंड देखील या प्रकल्पाला आकारला आहे. परंतु असे असताना केवळ इतर गोष्टींवर निधी खर्च केला जातो. मात्र लोकांच्या आरोग्याशी निगडीत प्रदुषणासंबंधी शासन कोणती उपाययोजना करणार आहे, हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. मंत्री महोदयांच्या उत्तरानंतर मी इतर उपप्रश्न विचारणार आहे.

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक वीज केंद्राच्या प्रदुषणासंबंधी या ठिकाणी लक्षवेधी सूचना मांडली आहे. द सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी ॲण्ड क्लिन एअर (सीआरईए) या खाजगी संस्थेने अभ्यास करुन चंद्रपूर विद्युत केंद्राच्या प्रदुषणाचा परिणाम नागपूरपर्यंत होत असल्याच्या बातम्या दिनांक १.३.२०२२ रोजी लोकसत्ता, लोकमत यासारख्या दैनिकांमधून प्रकाशित झाल्या होत्या.

असुधारित प्रत

श्री. संजय बनसोडे...

अध्यक्ष महोदय, सदर संस्थेच्या अहवालानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील ८५, नागपूर ६२, यवतमाळमध्ये ४५ आणि मुंबईत ३० व पुणे आणि नांदेडमध्ये प्रत्येक २९ अकाली मृत्यू झाल्याचे सुध्दा त्या बातम्यांमधून नमूद केले होते. याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ असेल किंवा आरोग्य विभाग असेल यांच्याकडून तसेच चंद्रपूर, यवतमाळ, नागपूर, पुणे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून प्राप्त अहवालानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक वीज केंद्रातून सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड आणि मर्क्युरी या हवेतील प्रदुषणकारी घटकांमुळे मृत्यू झाले नसल्याचे नमूद केले आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी आणखी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. हे प्रदुषण कमी करण्याकरिता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि केंद्र सरकारचा पर्यावरण विभाग यांच्या आदेशानुसार संच क्रमांक ३ आणि ४ यांच्या आदेशानुसार २०० मेगावॅट वीज निर्मिती करताना ३०.१.२०२३ पर्यंत सल्फर कमी करण्याकरिता फ्लू गॅस डिस्प्लॉयरजेशन ही प्रदुषण यंत्रणा तेथे बसविण्यात येणार आहे. त्यामुळे तेथील प्रदुषण कमी होईल. तसेच मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय पर्यावरण मंत्री आणि आपली एक बैठक आपण आयोजित करुन जे निर्णय घ्यायचे असतील ते निर्णय आपण त्या बैठकीत घेऊ.

श्री. किशोर जोरगेवार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी खाजगी संस्थेचा जो अहवाल आहे त्यावर त्यांनी अधोरेखित केले आहे. परंतु या ठिकाणी मंत्री महोदयांच्या उत्तरातूनच एक गंभीर बाब स्पष्ट होत आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. किशोर जोरगेवार....

प्रदुषण नियंत्रण मंडळाची प्रकल्पासाठीची वैधता केवळ दिनांक ३१ ऑगस्ट,२०२१ पर्यंत होती. आज सन २०२२ सुरु आहे म्हणजेया प्रकल्पाला प्रदुषण नियंत्रण मंडळाची मान्यता नसताना आणि संमती व मुदतवाढ नसताना हा प्रकल्प सुरु आहे. या विषयी सुद्धा माननीय मंत्री निवेदन करतील. वायू प्रदुषणासाठी नेमके काय करण्यात येणार आहे ? या प्रकल्पासंबंधीत जे विभाग आहेत त्याबाबत त्यांनी काय उपाययोजना केली याचा कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. तसेच जल प्रदुषणासाठी सुद्धा यांच्यावर दंड झालेला आहे. या सर्व बाबींचा माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, मी आताच आपल्याला सांगितल्याप्रमाणे माननीय पर्यावरण मंत्री आणि माननीय उर्जा मंत्री या दोघांचाही विभाग या प्रकल्पामध्ये आहे. सन्माननीय सदस्यांनी सभागृहात जी लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे किंवा आणखी काही प्रश्न असतील तर त्याबाबत आम्ही त्यांच्यासोबत एक बैठक घेऊ. सन्माननीय सदस्य श्री. किशोर जोरगेवार यांना मी बघत आहे की, ते पर्यावरणासंदर्भात खूप जागृक असतात. विदर्भामध्ये ते चांगल्या प्रकारचे काम करीत असतात. त्यामुळे आम्ही लवकरात लवकर त्यांच्यासोबत एक बैठक घेऊन त्याबाबत निर्णय घेऊ.

श्री. किशोर जोरगेवार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी आमच्या कामाबाबत दखल घेतली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. परंतु आपण एक बाब लक्षात घ्या की, चंद्रपूर महानगरपालिकेसाठी केवळ १० लाख रुपयांची अनुदानित रक्कम दिली आहे. दोन्ही विभागाचे कॅबिनेट मंत्री देखील सभागृहात उपस्थित आहेत. त्यांना माझी विनंती असणार आहे की, ५ लाख लोकसंख्येचे शहर आणि लगतचा १० किमीचा परिसर हा प्रकल्पामुळे बाधित होत आहे. माननीय मंत्री हे स्वत: मान्य करतील की, या प्रकल्पाच्या प्रदुषणामुळे जे रोग किंवा आजार बळावत आहेत त्यासाठी विशेष अनुदान म्हणून ५ कोटी रुपये चंद्रपूर महानगरपालिकेला देण्यात यावे.

असुधारित प्रत

श्री. किशोर जोरगेवार....

जसे दिल्ली शहरात एअर प्युरिफायर टॉवर मशिन बसविण्यात आले आहेत तसे टॉवर चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात व लगतच्या परिसरात शासन लावणार आहे काय ?

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किशोर जोरगेवार यांनी महानगरपालिकेला अनुदान देण्याच्या संदर्भातील विषय मांडला आहे. तो विषय नगर विकास विभागाकडे येतो. माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि माझे चांगले संबंध आहेत हे त्यांना माहीत आहे. त्यामुळे मी तिथेही त्या विषयाचा पाठपुरावा करतो. तसेच या महानरगपालिकेला जास्तीत जास्त निधी कसा देता येईल याचा ही मी प्रयत्न करतो. केंद्र शासनाने एनसीएपीमध्ये रक्कम दिलेली आहे. त्याबाबत मी आताच सांगितले की, आम्ही सर्वजण मिळून लवकरात लवकर एक बैठक घेऊ आणि चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक केंद्राचे जे प्रश्न असतील ते तातडीने सोडविण्याचा प्रयत्न करु.

श्री. किशोर जोरगेवार : अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय हरित लवाद खंडपीठ, पुणे यांनी एक समिती गठीत करण्यासाठी सांगितले होते. ती समिती गठीत झालेली आहे. त्याची पाहणी झाली आहे काय, त्याचा काही अहवाल आला आहे काय ? तसेच बैठक लावण्याबाबत माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले आहे. तर माझी विनंती एवढीच आहे की, दोन्ही विभागाचे माननीय मंत्री आणि माननीय पर्यावरण मंत्री यांनी संयुक्तपणे चंद्रपूरच्या परिसरामध्ये बैठक घेऊन चंद्रपूर येथील सर्व सामाजिक जनतेची भावना जाणून घ्यावी.

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, माननीय पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनी परवाच चंद्रपूर जिल्ह्याचा दौरा करुन तेथील सर्व पाहणी केलेली आहे. तिथे सुद्धा त्यांनी एक बैठक आयोजित केली होती. सनमाननीय सदस्य श्री. किशोर जोरगेवार यांनी आता सांगितल्याप्रमाणे मंत्रालयामध्ये माननीय पर्यावरण मंत्री, माननीय ऊर्जा मंत्री यांच्यासोबत लवकरात लवकर बैठक घेऊन नियमानुसार असणारे प्रश्न सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करु.

असुधारित प्रत

**लक्षवेधी सूचनेसंबंधी**

**उपाध्यक्ष** : आजच्या कामकाजपत्रिकेतील विशेष बैठकीमध्ये दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २ नियमित बैठकीमध्ये चर्चेस घेण्यात येईल. तसेच लक्षवेधी सूचना क्रमांक ३ वरील निवेदन अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पटलावर ठेवण्यात येईल.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी ९.४९ ते ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर )**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. संजय शिरसाट)**

**स्थगन प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, आम्ही स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. आपण ती प्रश्नोत्तराच्या तासानंतर चर्चेला घ्यावी, अशी आमची विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : ठीक आहे.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी /मु.शी :** तोंडी उत्तरे

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतलेल्या गट "क" सेवा मुख्य परीक्षेच्या भरती प्रक्रियेस दिलेली स्थगिती**

**(१) * ४३७९८ डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) गट "क" सेवा मुख्य परीक्षा सन २०१९ मध्ये कर सहाय्यक, लिपिक टंकलेखक व दुय्यम निरीक्षक या ३ पदांसाठी परीक्षा घेण्यात आली असून सदर पदांची भरती प्रक्रिया न्यायालयीन स्थगिती आणि कोवीड महामारीमुळे गत २ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भरतीप्रक्रियेत सामाजिक शैक्षणिक मागासप्रवर्ग (SEBC) आरक्षण असल्यामुळे आणि या प्रवर्गाच्या आरक्षणावरील मा.न्यायालयीन स्थगितीमुळे पात्र उमेदवारांना शासनाकडून नियुक्ती देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने सामाजिक शैक्षणिक मागासप्रवर्ग आरक्षण रद्द केल्यामुळे शासनाने वेळोवेळी शासन निर्णय जारी करून प्रलंबित भरती प्रक्रियेला गती दिली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या सुनावणीत १०% आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक उमेदवारांच्या नियुक्तीचा प्रश्न उद्भवलेला असून सामाजिक शैक्षणिक मागासप्रवर्ग आरक्षण मधील ९०% उमेदवारांना नियुक्ती देण्यासाठी कोणतीही अडचण येत नसल्याने ऊर्जा विभागातील महावितरणच्या भरती प्रक्रियेमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या १०% उमेदवारांना वगळून इतर सर्व प्रवर्गातील ९०% उमेदवारांना नियुक्ती दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) उक्त प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तसेच सन २०१९ मध्ये परीक्षा दिलेल्या कर सहाय्यक, लिपिक टंकलेखक व दुय्यम निरीक्षक या पदांसाठीची भरती प्रक्रिया १०% आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांना वगळून उर्वरित इतर सर्व प्रवर्गातील ९०% उमेदवारांच्या नियुक्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात

असुधारित प्रत

येत आहे,
ता.प्र.क्र. ४३७९८ .....
डॉ.विनय कोरे **.....**

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे, श्री.उद्धव ठाकरे, यांच्याकरिता :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०९.२०२० रोजी अंतरिम आदेशान्वये एसईबीसी आरक्षणासह पदभरतीस स्थगिती दिली होती. त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०५.०५.२०२१ रोजी एसईबीसी आरक्षण रद्द केल्यानंतर दि.०९.०९.२०२० पासून एसईबीसी प्रवर्गासह स्थगित असलेली पदभरती राबविण्यासाठी शासनाच्या मागास वर्ग कक्षाच्या दि.०५.०७.२०२१ व १५.०७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

(४) महावितरण कंपनीने, दि. ०५.०७.२०२१ च्या शासन निर्णयातील सूचना विचारात घेऊन, एसईबीसी आरक्षण वगळून इतर प्रवर्गातील आरक्षणानुसार नियुक्ती देण्याची कार्यवाही केली आहे.

अशी नियुक्ती करत असताना, ईडब्ल्यूएस आरक्षणासंदर्भातील याचिकेबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशासंदर्भात ज्येष्ठ विधितज्ञांकडून प्राप्त कायदेशीर अभिप्रायानुसार, ईडब्ल्यूएस प्रवर्गातील १० टक्के पदांचा निकाल राखून ठेवून या पदांवर नियुक्ती देण्यात आलेली नाही.

(५) प्रस्तुत प्रकरणी आयोगाने सन २०१९ मध्ये कर सहायक, लिपिक-टंकलेखक, दुय्यम निरीक्षक या ३ संवर्गासाठी परीक्षा घेतली. त्यानंतर आयोगाने या ३ संवर्गाचा निकाल दि.२८.०७.२०२० रोजीच्या शिफारसपत्राद्वारे संबंधित प्रशासकीय विभागांना कळविले होते.

तथापि मा.न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन आयोगाने सदर पदांकरीता सुधारित निकाल तयार करत असताना या ३ संवर्गांपैकी दुय्यम निरीक्षक या संवर्गाचा सुधारीत निकाल दि.१३.१०.२०२१ रोजी घोषित केला. सुधारित शिफारशी नुसार संबंधित प्रशासकीय विभागाकडून नियुक्तीची

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४३७९८ .....
श्री. दत्तात्रय भरणे .....
कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच लिपिक टंकलेखक व कर सहायक या दोन संवर्गाचा निकाल शिफारस पत्राद्वारे शासनास पाठविण्यापूर्वीच मा.उच्च न्यायालयाने शिफारसपत्रास स्थगिती दिली असल्याने आयोगाने अद्यापही या दोन संवर्गाचा सुधारीत निकाल घोषित केलेला नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. विनय कोरे : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न...

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सदर उत्तरामध्ये दुरुस्ती आहे. उप प्रश्न क्र. ५ च्या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, या ३ संवर्गापैकी दुय्यम निरीक्षक या संवर्गाचा सुधारित निकाल दि. १३.१०.२०२१. रोजी घोषित केला. या ऐवजी या ३ संवर्गापैकी दुय्यम निरीक्षक या संवर्गाची शिफारस आयोगाने दि. १३.१०.२०२१. रोजी शासनाकडे केली आहे, असे वाचावे

डॉ. विनय कोरे : अध्यक्ष महोदय, सन २०१९ मध्ये एमपीएससी परिक्षा घेण्यात आली. सन २०२० मध्ये निकाल लागला. मराठा आरक्षण, कोव्हिड यामुळे नेमणुका थांबवण्यात आल्या. या नंतर सुधारित निकाल प्रक्रिया पार पाडण्यात आली. सन २०१९ ते २०२२ पर्यंत साडे तीन वर्षे वाया गेली. यामुळे मुलांच्या आयुष्याशी खेळ चालवला आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. महाराष्ट्र शासनाच्या महावितरण कंपनीमध्ये जो एक नियम केला तो आपण मान्य केला. इडब्ल्यूएस १० टक्के बाजुला ठेवून भरती केली व या मुलांना न्याय दिला. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या भरतीमध्ये मात्र दुसरा न्याय दिला जात आहे, हे या मुलांवर अन्याय करण्यासारखे आहे. आपण त्यांना मराठा आरक्षण देऊ शकलो नाही, या बद्दल मुलांच्या मनात नैराश्याची भावना आहे. तसेच सामाजिक मागासप्रवर्ग टिकवू शकलो नाही, या बद्दलही मुलांच्या मनात भावना आहेच. इडब्ल्यूएसच्या माध्यमातून आपण जो प्रयत्न केला, तो देखील अपयशी ठरला

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४३७९८ .....
डॉ.विनय कोरे ....

आहे. जी मुले खुल्या प्रवर्गातून पास झालेली आहेत, जे नवीन निकालानुसार पास झालेले आहेत, त्यांना तरी न्याय द्यावा. मात्र शासन ते देखील करु शकत नसेल तर ते योग्य होणार नाही. दि. १३.१०.२०२१ रोजी नव्या निकालाची शासनाची शिफारस आली आहे. दि. १३.१०.२०२१ पासून मार्च २०२२ पर्यंत जर शासन हातावर हात ठेवून बसणार असेल तर ते योग्य नाही. हा कालावधी गेल्यामुळे काही मुले वयाच्या अटीमध्ये बसू शकणार नाहीत. एखादा मुलगा एमपीएससीच्या परिक्षेला बसतो तेव्हा संपूर्ण कुटुंबच त्यावर अवलंबून असते. या मुलांच्या आयुष्याशी चालवली जाणारी थट्टा कधी थांबवली जाणार आहे ? या मुलांना न्याय देण्यासाठी शासन काय करणार आहे, या बाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, या संबंधी माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. इसइबीसी आरक्षणाला स्थगिती दि. ९.९.२०२० रोजी मिळाली. सर्वोच्च न्यायालयाने दि. ५.५.२०२१ रोजी अंतिम निकाल दिला. दि. ५.७.२०२१ रोजीच्या जीआर नुसार एसईबीसी आरक्षण रद्द करुन अपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी असा जी आर काढला. एसईबीसी उमेदवारांना खुला प्रवर्ग व इडब्ल्यूएस हा पर्याय देण्यात आला. त्यानुसार निवड प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. दि. १५.७.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार, दि. ९.९. २०२० पूर्वी नियुक्त करण्याकरिता शिफारस करण्यात आली. दि.९.९.२०२० रोजी नियुक्ती दिलेल्या एसईबीसी मधील पदाना जाहिरातीमध्ये इडब्ल्यूएस आरक्षण नसल्यास इडब्ल्यूएस उमेदवारांना विकल्प घेऊन निवड यादी सुधारित केली.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४३७९८...

श्री.दत्तात्रय भरणे ...

दि.२०.१०२०१९ रोजी आपण म्हणालात त्या प्रमाणे दुय्यम निरीक्षकांची ३३ पदे, दि. ३.११.२०१९ रोजी कर सहाय्यकांची १२६ पदे, दि.१३.१०.२०१९ रोजी लिपिक-टंकलेखक अशा १७९ पदांचा सुधारित निकाल हा दि.१७.९.२०२१ व दि.२८.९.२०२१ रोजी जाहीर केला होता. आपण म्हणालात त्या प्रमाणे ३३ दुय्यम निबंधकांच्या पदाची शिफारस दि.१३.१०.२०२१ रोजी झालेली आहे. त्यामध्ये आपण १७ जणांना ऑर्डर दिली आहे. बाकीचे काम कोणाची जात पडताळणी किंवा बाकीच्या ज्या इतर गोष्टी, ऑफिशिअल प्रक्रिया असतात त्यामुळे बाकीच्या ज्या अपुऱ्या आहेत, त्या सर्वांच्या नियुक्त्या ताबडतोब दिल्या जातील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचा कर सहाय्यकांची १२६ पदे, लिपिक-टंकलेखकांची १७९ पदे याबाबतचा दुसरा विषय होता. त्यावर स्थगिती होती. आपल्याला माहिती आहे की, स्थगिती असल्यामुळे आपल्याला ती भरती करता आली नाही. परंतु, आनंदाची बातमी आपल्याला सांगण्यास हरकत नाही की, दि. ४.३.२०२२ रोजी ती स्थगिती उठलेली आहे. सदर पदाच्या शिफारशी आयोगाने काल दि.२१.३.२०२२ रोजी शासनाकडे केलेल्या आहेत. शासनाला आता जी पुढील भरती प्रक्रिया, निवड प्रक्रिया राबवायची आहे... त्यांच्या नियुक्त्या ताबडतोब ... कालच .... या १५ दिवसांमध्ये या सर्वांना नियुक्त्या दिल्या जातील.

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, या सभागृहामध्ये मी काल देखील स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून हा मुद्दा उपस्थित केला होता की, सन २०१८ साली मराठा समाजाला आरक्षण मिळाले. माननीय उच्च न्यायालयामध्ये ते टिकले. वर्षभर माननीय सर्वोच्च न्यायालयातून स्टे आला नाही. मग जवळजवळ दीड वर्षांनंतर माननीय सर्वोच्च न्यायालयाचा स्टे आला.

अध्यक्ष महोदय, या कालावधीमध्ये SEBC मधून मराठा समाजाच्या वेगवेगळया जागांसाठी परीक्षा झाल्या, तोंडी परीक्षा झाल्या, मेडिकल झाली, फक्त

ता.प्र.क्र. ४३७९८...

श्री.चंद्रकांत पाटील ....

अपॉईंटमेंट लेटर द्यायचे बाकी राहिले. त्या कालावधीतील अपॉईंटमेंट लेटर पेंडिंग ठेवण्याचे काही कारण नाही. असे असताना देखील शासनाने अनावश्यक कोर्टामध्ये विचारणा करण्यासाठी ज्याला आपण शासकीय भाषेत धारणा स्पष्ट करण्यासाठी असे म्हणतो त्याकरिता पाठविले आहे, हे खरे आहे काय, ती केस मेन्शन करुन सरकार लवकर स्पीडअप करणार आहे की नाही, मुळात इतका क्लिअर विषय असताना आपण तो कोर्टामध्ये जाऊन का लटकविला?

श्री.दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, आताच सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याला माहीत आहे की, याबाबतीत दोन्ही बाजूंनी विद्यार्थ्यांची नियुक्ती केली तरी, त्याला स्थगिती मिळत होती किंवा दोन्ही बाजूने असा विषय होता. SEBC चे आरक्षण माननीय सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्यामुळे या गोष्टी आपल्याला कराव्या लागल्या. विद्यार्थ्यांमध्ये खूप मोठ्या प्रमाणामध्ये काळजी होती की, आमची भरती कधी होणार. आपण सांगितल्याप्रमाणे काही लोकांच्या परीक्षा झाल्या होत्या. परीक्षा झाल्यानंतर निकाल देखील जाहीर झाला होता. परंतु, शेवटी सर्वांना माहीत आहे की, माननीय सर्वोच्च न्यायालय हे सर्वोच्च आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आपण SEBC ला EWS व खुला असा एक पर्याय दिला. त्या प्रमाणे आपण सर्वांच्या नेमणुका केलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मला आपल्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांना हे सांगावयाचे आहे की, एमपीएससीच्या बाबतीत निश्चित प्रकारे सर्वच विद्यार्थ्यांना... आता काही ठिकाणी असे होत आहे की, कुठलीही गोष्ट, कुठलीही निवड करताना कायदेशीर किंवा कोणी कोर्टात गेल्यास आम्हाला अडचणी येतात. परंतु, याबाबत मी निश्चितप्रकारे एवढेच सांगतो की, विद्यार्थ्यांच्या बाबतीत कुठेही कोणावरही अन्याय केला जाणार नाही. लवकरात लवकर पद भरती कशी होईल, यासाठी आमच्या सर्वांचा प्रयत्न चाललेला आहे.

ता.प्र.क्र. ४३७९८...

श्री.दत्तात्रय भरणे ...

अध्यक्ष महोदय, दुसरे असे आहे की, या ६ महिन्यांमध्ये एमपीएससीच्या माध्यमातून ३०० परीक्षांच्या जाहिराती दिल्या गेलेल्या आहेत. साधारणत: ७९०० च्या वर उमेदवारांची संख्या आहे. कदाचित हे रेकॉर्ड असावे की, ६ महिन्यांमध्ये आपण एवढ्या परीक्षा घेत आहोत. आपण एमपीएससीच्या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहोत.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, SEBC चे आरक्षण माननीय सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले. त्यानंतर एमएसईबीमध्ये भरती झालेल्या मुलांची अवस्था अत्यंत वाईट झाली. कोरोनाच्या कालावधीत देखील त्या सर्व मुलांनी आमच्याकडे, मंत्री महोदयांकडे, विधि तज्ज्ञांकडे सातत्याने धावपळ केली तरी देखील त्यामध्ये आवश्यक त्या पध्दतीचा निर्णय झाला नाही.

अध्यक्ष महोदय, माझी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती आहे की, एमएसईबीमध्ये SEBC मध्ये सिलेक्ट झाल्यानंतर माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या स्टे नंतर ज्या पध्दतीने या सर्व भरती प्रक्रियेमध्ये निर्णय व्हायला पाहिजे तो झालेला नाही. त्यानंतर तेथील एमएसईबीचे जे श्री.खंडाईत म्हणून अधिकारी आहेत, त्यांच्याशी मी स्वत: दोन-तीनवेळा बोललो. त्यांच्याबरोबर ए.जीं.समवेत आम्ही बोललो. फक्त ए.जीं.चे ओपिनियन घ्यायचे व आम्ही तुम्हाला नियुक्ती देतो असे आम्हाला सांगितले गेले.

अध्यक्ष महोदय, या घटनेला ७ ते ८ महिने झाले तरी, आजपर्यंत याबाबतीत काहीच कारवाई झाली नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, याबाबतीत हे अधिवेशन संपण्यापूर्वी ए.जीं.चे आणि कोणाचे मत घ्यायचे असेल ते घ्या. त्या मुलांना वाऱ्यावर सोडण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत आपण तत्काळ निर्णय घ्याल काय, हा माझा पहिला प्रश्न आहे.

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४३७९८......

श्री.प्रकाश आबिटकर ...

अशा पद्धतीचे प्रसंग सातत्याने येत आहेत. ४ वर्षापूर्वी आरटीओ कार्यालयाची भरती प्रक्रिया पार पाडण्यात आली होती व ८०० मुलांची निवड करण्यात आली होती. त्या मुलांनी भिक मांगो आंदोलन केले होते. कारण न्यायालयाच्या एकूण प्रक्रियेत उशिर झाला होता. मध्यंतरीच्या कालावधीत तहसिलदारांच्या संदर्भात अशीच अवस्था झाली होती. इडब्ल्यूएस, एसईबीसी या संवर्गास या सर्व बाबींमुळे त्रास होत आहे. शासन चांगल्या प्रकारे पद भरती करीत आहे. आता टार्गेटेड भरती करण्यात येत आहे, त्याची माहिती सभागृहाला द्यावी. भरती झालेल्या मुलांना होणारा त्रास खूप वाईट आहे. त्याबाबतीत काळजी घेण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येईल ?

श्री.दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी एमएसईबी मधील भरतीचा प्रश्न उपस्थित केला आहे. एमएसईबीमधील ५ हजार विद्युत सहाय्यक पदांच्या भरतीची जाहिरात देण्यात आली होती. तथापि, त्यास माननीय सर्वोच्च न्यायालाच्या निर्णयामुळे स्थगिती देण्यात आली होती. सदरहू निकाल प्रलंबित होता. एसईबीसी संवर्गातील उमेदवारांचा खुल्या वर्गात समावेश करुन ४,५३४ पदांचा निकाल जाहीर केला. माननीय उच्च न्यायालयामध्ये ईडब्ल्यूएस उमेदवारांनी दावा दाखल केला होता. त्याची आज सुनावणी आहे. या प्रकरणी माननीय उच्च न्यायलय ज्याप्रमाणे निर्णय देईल त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, राज्यात नोकर भरती करण्यात येते त्यावेळी रोस्टचा वाद निर्माण होतो व तो न्यायालयात जातो. त्यानंतर नोकर भरतीला स्थगिती मिळते. शासनाकडे विधि व न्याय विभाग, समाज कल्याण, आदिवासी विकास विभाग, इतर मागासवर्ग विभाग आहेत. या विभागांची मान्यता घेऊन पद भरती जाहिरात देण्यात येते. भरतीचे प्रकरण न्यायालयात जाते व त्याचे परिणाम परीक्षार्थी उमेदवारांवर होतात. शासन नोकर भरती करीत असताना त्यासंदर्भात कोणी

ता.प्र.क्र. ४३७९८...

श्री.नाना पटोले...

न्यायालयात धाव घेतली तरी शासनाकडे फुलप्रुफ व्यवस्था असली पाहिजे. उक्त व्यवस्थेच्या निर्णयास माननीय न्यायालयाने मान्यता दिली पाहिजे. अशा न्यायप्रविष्ठ प्रकरणांमुळे अनेक लोकांची वयोमर्यादा संपते. मंत्री महोदय यांनी यापूर्वीच कालबाह्य संदर्भात सांगितले आहे. आपल्याला ही सर्व सिस्टम बदलावी लागार आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात नोकर भरतीच्या संदर्भात होणाऱ्या गोंधळामुळे परीक्षार्थी उमेदवार व त्यांच्या पाल्यांना त्रास होतो. यामुळे काही उमेदवारांचे आयुष्य बर्बाद होते. भविष्यात परीक्षार्थी उमेदवारांमध्ये नैराश्याची भावना निर्माण होऊ नये याकरिता शासनाच्या वतीने कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत ?

श्री.दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात कायदेशीर सल्ला... (अडथळा)... आरक्षण व इतर बाबींमुळे हा विषय आता आला आहे, तो पूर्वी नव्हता. मराठा आरक्षण स्टे, अशा काही बाबी घडल्या आहेत. एमपीएससी परीक्षेच्या संदर्भात विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही यासाठी इतर बाबींचा कायदेशीर सल्ला घेऊ.

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, शासनाकडे विधि व न्याय विभाग, समाज कल्याण, आदिवासी विकास विभाग, इतर मागासवर्ग विभाग आहेत. या विभागांमध्ये आयएएस अधिकारी व इतर कर्मचारी कार्यरत आहेत. आपण पद भरतीची जाहिरात कायदेशीर बाबी तपासून काढतो, असा माझा समज आहे. तो खरा आहे काय ? आपल्याकडे सर्व तज्ज्ञ असताना अशा पद्धतीचे प्रकार घडण्याची कारणे काय ? रोस्टर व आरक्षण न तपासता पद भरती जाहिराती काढण्यात येतात काय ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४३७९८...

श्री.दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी सांगितल्यानुसार सर्व विभागांना एकत्र घेऊन विद्यार्थ्यांना भरती प्रकरणी न्यायालयामध्ये गेल्यामुळे त्रास होऊ नये यादृष्टीकोनातून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४३७९८......

श्री.दत्तात्रय भरणे......

आपणा सर्वांना माहिती आहे की, मराठा आरक्षणानंतर एस.ई.बी.सी व ई.डब्ल्यू.एस. यासारखे विषय आलेले आहेत. पूर्वी अशा प्रकारचे विषय नव्हते. यामध्ये कोणावर अन्याय झाला की, ते माननीय न्यायालयामध्ये याचिका दाखल करतात. परंतु आता यानंतर अशा प्रकारच्या बाबी होणार नाहीत, याची निश्चितपणे काळजी घेतली जाईल व सर्व अधिकाऱ्यांना तशा सूचना देखील दिल्या जातील.

श्री.योगेश सागर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सिव्हिल सर्व्हिस आणि पोलीस सर्व्हिस अशा दोन कॅटेगिरीमध्ये परीक्षा घेतल्या जातात.

अध्यक्ष महोदय, अधिकारी नियुक्त व्यवस्थेचा गैरउपयोग कसा केला जातो, याचे एक उदाहरण देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त पदावर थेट नियुक्तीसाठी पोलीस विभागामध्ये वरिष्ठ निरीक्षक या पदावर ५ वर्षे काम केल्यानंतर त्या अधिकाऱ्यांची नियुक्ती सिव्हिल सर्व्हिसमध्ये केली जाते.

अध्यक्ष महोदय, मी एका अधिकाऱ्याचे नाव घेऊन त्यांच्याबाबत माहिती देत आहे. त्यामुळे आपण उक्त प्रकरणाचा गांभीर्याने तपास करावा, अशी माझी मागणी आहे. प्रत्येक प्रभागामध्ये सहाय्यक आयुक्त या पदाच्या माध्यमातून सिव्हिल सर्व्हिसमध्ये घुसण्याची एक चांगली व्यवस्था निर्माण केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, श्री.मकरंद दगडखेर हे मागील तीन वर्षांपासून सहाय्यक आयुक्त पदांवर काम करीत आहेत. या अधिकाऱ्यांने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा केव्हा पास केली, पोलीस विभागामध्ये वरिष्ठ निरीक्षक या पदावर कोणत्या कार्यकाळामध्ये ५ वर्षे काम केले आहे, याबाबतची माहिती देण्यात यावी. जर संबंधित अधिकाऱ्यांनी वरील अटी पूर्ण केल्या नसतील तर आपण त्यांच्यावर निलबंनाची कारवाई करणार आहात काय?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४३७९८......

श्री.दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी याबाबतची सविस्तर माहिती दिली तर निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

----------

असुधारित प्रत

## लातूर जिल्ह्यात तहसिल कार्यालयांतर्गत असलेली सेतू सुविधा केंद्र बंद असल्याबाबत

**(२) * ४१९५६ श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात तहसील कार्यालयांतर्गत सुरु असलेले सर्वच एकात्मिक नागरी सेतू सुविधा केंद्र दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेतू सुविधा केंद्र बंद असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असून विविध प्रमाणपत्रांसाठी अन्य ई- सेवा केंद्रांकडून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक लूट करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांना सातबारा उतारा व इतर विविध प्रमाणपत्राच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सेतू सुविधा केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.दत्तात्रय भरणे, श्री.उद्धव ठाकरे यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे. लातूर जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्रांच्या कराराची मुदत दि.३१.१२.२०२१ रोजी संपुष्टात आल्यामुळे सदर सेतू केंद्रे दि.३१.१२.२०२१ पासुन बंद करण्यात आली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) लातूर जिल्ह्यातील सर्व तहसिलदारांना त्यांच्या तालुक्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्रचालकांची वेळोवेळी बैठक घेऊन सर्व प्रकारच्या सेवा विहीत कालावधीत व विहीत शुल्क आकारुन देण्याबाबत तसेच वेळोवेळी आपले सरकार सेवा केंद्रांची तपासणी करणेबाबत व नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांची दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.धीरज देशमुख : अध्यक्ष महोदय, लातूर जिल्ह्यात तहसील कार्यालयांतर्गत असलेली सेतू सुविधा केंद्र बंद असल्याबाबतचा मी प्रश्न उपस्थित केला होता. उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी

असुधारित प्रत

सदर टेंडरची
ता.प्र.क्र. ४१९५६......
श्री.धीरज देशमुख.......
मुदत संपल्यामुळे सदर सुविधा केंद्र बंद करण्यात आलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सेतू सेवा केंद्र हे ग्रामीण भागातील लोकांसाठी अत्यंत महत्त्वाची सुविधा केंद्र आहे. तहसील कार्यालय हे ग्रामीण भागातील लोकांसाठी अतिशय महत्त्वाचे एक कार्यालय आहे. या तहसील कार्यालयातील सुविधा केंद्रामध्ये ग्रामीण भागातील जनतेला सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात होत्या. आता सेतू सेवा केंद्र बंद झाल्यामुळे सदर काम खाजगी सुविधा केंद्रातून करुन पुन्हा ते कागदपत्रे सादर करण्यासाठी तहसील कार्यालयामध्ये यावे लागत आहे. त्यामुळे सेतू सुविधा केंद्राच्या कराराची मुदत संपली असली तरी पुन्हा याबाबत निविदा काढून सदर सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी मी विनंती करतो.

श्री.दत्तात्रय भरणे : लातूर येथील सतू सेवा केंद्राच्या कराराची मुदत संपलेली आहे. जिल्हाधिकारी, लातूर यांनी पुन्हा निविदा न काढता आपले सरकार यामाध्यमातून सेवा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु मी याबाबत सांगू इच्छितो की, याबाबतची निविदा प्रक्रिया लवकरच सुरु करण्यात येईल.

श्रीमती नमिता मुंदडा : अध्यक्ष महोदय, बीड जिल्ह्यामध्ये एकूण ११ तालुके आहेत. यापैकी एकाही तालुक्यांमध्ये सतू सेवा केंद्र सुरु नाही. सदर सेतू सेवा केंद्र बंद असण्याचे नेमके काय कारण आहे, सदर सेतू सेवा केंद्र पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाचे काय धोरण आहे आणि हे सेतू सेवा केंद्र किती दिवसांमध्ये सुरु करणार आहात?

श्री.दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न स्पकोपच्या बाहेरील असला तरी मी त्यांना सांगू इच्छितो की, मागील कोरोना काळामध्ये मुदत संपल्यानंतर देखील काही सेतू सेवा केंद्रांना मुदवाढ देण्यात आली होती. ज्या ज्या सेतू सेवा केंद्राच्या कराराची मुदत संपलेली आहे, अशा सर्व सेतू सेवा केंद्राची निविदा प्रक्रिया पुढील ३ महिन्यामध्ये पूर्ण करण्यात येईल.

श्री.राजेंद्र पाटणी : अध्यक्ष महोदय, सेतू सेवा केंद्र बंद होणे हा अतिशय गंभीर विषय आहे. कारण यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास होत

अग्रिम प्रत

आहे. कोणत्या सेतू सेवा केंद्राची केव्हा मुदत संपणार आहे हे संबंधित जिल्हाधिकारी

ता.प्र.क्र. ४१९५६......

श्री.राजेंद्र पाटणी......

यांना माहिती असते. मुदत संपण्यापूर्वी किमान ३ किंवा ६ महिने अगोदर निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु करणे आवश्यक होते. एका-एका कामासाठी लोकांना एक-एक दिवस फिरावे लागते. ज्या ज्या जिल्ह्यातील सेतू सेवा केंद्र बंद झालेले आहेत त्या त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यास जबाबदार नाहीत काय? याबाबत आपण कोणावरही जबाबदारी निश्चित करणार नाहीत काय? सदर सेतू सेवा केंद्र पुन्हा सुरु करण्यासाठी नवीन निविदा काढणे किंवा पूर्वीच्या कंत्राटदारास मुदतवाढ देणे यापैकी कोणतीही तरी एक जबाबदारी शासनाने किंवा प्रशासनाने पार पाडणे आवश्यक होते. ज्या अधिकाऱ्यांची जबाबदारी होती, त्या अधिकाऱ्यांनी ती जबाबदारी पार पाडली नाही, अशा संबंधित अधिकाऱ्यावर आपण काय कारवाई करणार आहात?

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४१९५६....

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रश्न लातूर जिल्ह्यासंदर्भातील आहे. सन्माननीय सदस्यांनी स्कोपच्या बाहेरील प्रश्न उपस्थित केला आहे. राज्यातील अकोला, बीड, बुलढाणा, गडचिरोली, जळगाव, जालना, हिंगोली, नांदेड, नंदूरबार, उस्मानाबाद, परभणी आणि वाशिम या जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्र बंद आहेत. हे सेतू सुविधा केंद्र बंद असल्यामुळे ज्यांनी कोणी कामचुकारपणा केला असेल त्यांना दाखवा नोटीस देऊन योग्यती कारवाई केली जाईल. तसेच सेतू सुविधा केंद्राची निविदा प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करण्यात येईल.

श्रीमती श्वेता महाले : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी बुलडाणा जिल्ह्याचाही उल्लेख उत्तरामध्ये केला आहे. मंत्री महोदय या अधिकाऱ्यांवर नेमकी कोणती कारवाई करणार आहेत व ती किती दिवसात करणार आहेत ? शेतकरी त्यांचे काम सोडून सेतू केंद्रावर दिवसभर बसलेले असतात. परंतु ते सेतू सुविधा केंद्र बंद असल्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर कधी कारवाई केली जाणार आहे ?

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या दुसऱ्या प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 'हे खरे नाही.' सन्माननीय सदस्य श्री. धीरज देशमुख यांनी 'आर्थिक लूट करण्यात येत आहे काय,' असा दुसरा प्रश्न विचारला आहे. त्यावर मंत्री महोदयांनी हे खरे नाही, असे सांगितले आहे. मंत्री महोदय मंत्रालयात बसून हे कशा प्रकारे ठरवित आहेत ? राज्यातील जनतेची लूट सुरु आहे. हे खरे असताना, ते खरे नाही, असे उत्तर मंत्री महोदय कशा प्रकारे देत आहेत ? चुकीचे उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. आपले सरकारच्या माध्यमातून राज्यातील जनतेची लूट होत आहे. मागील सात ते आठ महिन्यापासून सर्व सेतू सुविधा केंद्र बंद आहेत. संपूर्ण राज्याचा हा प्रश्न आहे. यावर निर्णय झाला पाहिजे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र पाटणी यांनी संपूर्ण राज्यासाठी प्रश्न विचारला होता. तो स्कोपच्या बाहेर नाही. सेतू सुविधा केंद्राची निविदा प्रक्रिया कधी करण्यात येणार आहे ? किती कालावधीत निविदा प्रसिद्ध केली जाईल ?

ता.प्र.क्र. ४१९५६....

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांच्या आणि सभागृहाच्या भावना लक्षात घेता ज्या ज्याठिकाणी सेतू सुविधा केंद्र बंद असतील तेथे तीन महिन्यांच्या आत निविदा प्रसिद्ध केल्या जातील. तसेच यात जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

डॉ. संजय रायमूलकर : अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागात ऑनलाईन सेतू सुविधा केंद्राचा अनेक ठिकाणी प्रश्न आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना वेळेत कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत. पर्यायाने त्यांना इतर अडचणींना सामोरे जावे लागते. मी मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. सेतू सुविधा केंद्रावर इंटरनेट किंवा इतर काही अडचण आली तर तेथे मॅन्युअली अर्ज स्वीकारण्यासाठी मंत्री महोदय निर्णय घेणार आहेत काय ?

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, होय.

ॲड. आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, सेतू सुविधा केंद्रामुळे लोकांची, जनतेची गैरसोय होत आहे. सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र पाटणी यांनी जो प्रश्न विचारला त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले नाही. मी देखील तोच प्रश्न विचारु इच्छितो. सेतू सुविधा केंद्राची मुदत संपल्याचे शासना माहित होते. प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून शासनाकडे विचारणा करण्यात आली की, ज्या सेतू सुविधा केंद्राची मुदत संपली आहे, त्यांना पुढे मुदतवाढ द्यावयाची किंवा कसे ? यावर शासनाकडून कोणतेही उत्तर दिले गेले नाही. यामुळे सामान्य माणसांची गैरसोय होत आहे. कोविड काळात सर्व प्रक्रिया ऑनलाईन करावी, अशी आपण मागणी करीत होतो. या केंद्रांची मुदत संपणार असल्याचे शासनास माहित होते. शासनाने त्यांना मुदतवाढ द्यावयास हवी होती किंवा त्यांची मुदत संपण्यापूर्वी निविदा प्रक्रिया करुन कार्यवाही करावयास हवी होती. प्रशासनाकडून याबाबत दिरंगाई झाली आहे. ही बाब आपणास मान्य करावी लागेल. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी मुदतवाढ देणे शक्य आहे तेथे मुदतवाढ देण्याची व्यवस्था मंत्री महोदय करणार आहेत काय ? दुसरे असे की, प्रत्येक लाभार्थ्यांना किंवा शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करण्यास

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४१९५६....

ॲड. आशिष जैस्वाल......

सांगितले जाते. खेड्यापाड्यात, दूर्गम आदिवासी भागतील लोकांना याचा त्रास होत आहे. प्रशासनातील अधिकारी अशा लोकांना ऑनलाईन अर्ज करण्यास सांगत असतात. त्यांचे ऑफलाईन अर्ज स्वीकारले जात नाहीत. संजय गांधी निराधार योजनेचेही अर्ज ऑफलाईन पद्धतीने स्वीकारले जावेत, याकरिता मी पाठपुरावा केला होता. नंतर त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाला होता. ऑनलाईन अर्जाची सुविधा लोकांसाठी आहे. परंतु एखाद्यास जर ऑफलाईन अर्ज करावयाचा असेल तर तो स्वीकारण्याबाबत मंत्री महोदय प्रशासनाला स्पष्ट निर्देश देणार आहेत काय ?

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४१९५६.....

श्री.राजेश पवार : अध्यक्ष महोदय, माझ्या नायगांव मतदारसंघातील अर्ध्यापेक्षा जास्त सेतू सुविधा केंद्र बंद आहेत. तसेच जे सेतू सुविधा केंद्र सुरु आहेत त्या ठिकाणी शेतकऱ्यांकडून अधिकचे पैसे घेतले जातात. त्यांच्यावर कारवाई करणार का ? तसेच सेतू सुविधा केंद्र बंद असल्यामुळे शेतकरी तहसिल कार्यालयात जातात. परंतु त्यांना कामासाठी अनेक चकरा माराव्या लागतात. कारण तेथील ५० टक्के कर्मचारी गायब असतात. तेथे शेतकऱ्यांना पिण्यासाठी पाणी नाही, प्रसाधनगृह नाही, बसण्यासाठी जागा नाही. याबाबत आपण विचार करणार आहात का ?

श्री.दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, आपणा सर्वांनाच माहिती आहे की, सेतू सुविधा केंद्रांची मुदत संपल्यानंतर आपण कोरोना काळामध्ये त्यांना दोन वर्षांची मुदतवाढ दिली होती. सेतू सुविधा केंद्र बंद करण्याचा निर्णय त्या-त्या जिल्हयातील जिल्हा सेतू समितीने कोणत्या परिस्थितीत घेतला याची चौकशी केली जाईल व दोषींवर कारवाई करण्यात येईल. तसेच मी पुन्हा सांगू इच्छितो की, तीन महिन्यांमध्ये याबाबतची टेंडर प्रक्रिया राबविली जाईल.

---------

असुधारित प्रत

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खाडीपट्टा भागातील गावांना जोडणारा पूल व जोडरस्त्याची झालेली दुरवस्था

**(३) *४३५७७ श्री.भास्कर जाधव (गुहागर)** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खाडीपट्टा भागातील सुमारे ५० गावांना जोडणारा कोटयवधी रूपये खर्च करून जगबुडी नदीवर देवणे येथे बांधण्यात आलेला पूल आणि जोडरस्त्याची एका वर्षातच अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलाचे काम सुरू असतानाच हे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निदर्शनास आणून देखील त्याची दखल न घेता संबंधित ठेकेदारास पाठिशी घालण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाचे काम ठेकेदाराने अदयापही अपूर्णावस्थेत ठेवले असल्याने संबधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण : (१) जुलै, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पुलाच्या जोडरस्त्याचे काम क्षतिग्रस्त झाले.

संबंधीत कंत्राटदाराकडून पोच मार्गाची दुरुस्ती करुन घेण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर मुख्य पुलाचे तसेच पूर्ण लांबीतील जोडरस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. पुलाचे रेलिंग व मोऱ्यांच्या भिंतीचे काम लवकरच पूर्ण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अस्थायी प्रत

ता.प्र.क्र.४३५७७.....

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सदर प्रश्नाच्या अनुषंगाने दिलेले उत्तर मला मान्य असून त्यामुळे माझे समाधान झालेले आहे. त्यामध्ये दिनांक २२ व २३ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीचा आधार अधिकारी व कंत्राटदारांनी घेतला आहे. परंतु आता काम पूर्वस्थितीत होत असल्यामुळे त्यावर माझा आक्षेप नाही.

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने मला मंत्री महोदयांना दुसरा प्रश्न विचारायचा आहे. कदाचित, मंत्री महोदय म्हणतील की मी विचारलेला प्रश्न मूळ प्रश्नाशी संबंधित नाही. परंतु मंत्री महोदय हे राज्याचे माजी मुख्यमंत्री आहेत व अतिशय अनुभवसंपन्न आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, दिनांक २२ व २३ जुलै रोजीच्या पुरामध्ये मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक-६६ ते गुहागर-विजापूर रस्ता जोडणारा चिपळूण शहरातील एनरॉन पूल बेअरींग तुटल्यामुळे खचला व दोन्ही बाजूचे स्लॅब खाली आले. तेव्हापासून तेथील पूर्ण वाहतूक बंद आहे. त्यानंतर आम्ही सर्वांनीच त्याबाबत पाठपुरावा केला. या पुलाच्या कामासाठी ८ कोटी रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती मला त्यावेळी मिळाली होती. तसेच तेथे ट्रायल बोअर देखील घेण्यात आली होती. अर्थात, मंत्री महोदयांकडे याचे उत्तर आता नसेल तर हरकत नाही आणि असल्यास त्यांनी ते द्यावे. मंत्री महोदयांनी सभागृहाला आश्वस्त करावे की, पावसाळा सुरु होण्यापूर्वी हा पूल अवजड वाहतुकीसाठी देखील पुर्णपणे सुस्थितीत होईल. आता या पुलावरुन हलक्या वाहनांची देखील वाहतूक सुरु नाही. मंत्री महोदयांकडे आता उत्तर नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांसह मला त्यांनी त्यांच्या दालनात बोलवावे व यातून मार्ग काढावा.

श्री.अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, मूळ प्रश्नाच्या उत्तराने सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव हे समाधानी असल्याचे ऐकून मला देखील समाधान वाटले.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला दुसरा प्रश्न पेढे-परशुराम बायपासच्या संदर्भातील आहे. हा विषय मूळ प्रश्नाशी संबंधित नसला तरीही सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव हे काय पोटप्रश्न विचारु शकतात याचा अंदाज घेऊन मी याची देखील माहिती घेतलेली आहे.

ता.प्र.क्र.४३५७७.....

श्री.अशोक चव्हाण.....

पेढे-परशुराम बायपास रस्त्यावरील एनरॉन पुलाच्या दुरुस्तीबाबतचा त्यांचा मुद्दा आहे. माझ्याकडील माहितीनुसार दिनांक २२ जुलै, २०२१ रोजी अतिवृष्टीमुळे या पुलाचा एक पिअर खचला व दोन स्लॅब क्षतीग्रस्त झाले. त्यामुळे पूल वाहतुकीस बंद झाला ही वस्तुस्थिती आहे. त्यानंतर सन २०२१-२२ च्या पूर हानी कार्यक्रमांतर्गत या कामासाठी ८ कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली आहे. संबंधित अधीक्षक अभियंता यांनी सदर ठिकाणी भेट देऊन स्थळ पाहणी केली आहे. याबाबतचा प्रस्ताव डिझाईन सर्कल स्तरावर आहे. अंदाजपत्रक व डिझाईन या तांत्रिक बाबीची पूर्तता करणे सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना मी सांगू इच्छितो की, मे, २०२२ अखेरपर्यंत या कामाचे टेंडर काढले जाईल. अर्थात, काम करण्यासाठी वेळ लागेलच त्यामुळे मी आता सांगू शकत नाही की लगेच काम पूर्ण होईल. परंतु मे, २०२२ पर्यंत टेंडर काढले जाईल हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

--------

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

## जत (जि.सांगली) शहरातील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(४) * ३९८९६ श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) शहरातील मुख्य बाजारपेठेतून जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाली असुन प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हे काम ठेकेदारानेही अपुर्णावस्थेत ठेवले असून केलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपूर्ण व निष्कृष्ट कामामुळे बाजारपेठेतून जाणाऱ्या वाहनांचे अपघात होण्याचे प्रमाण वाढले असून व्यापारीही त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरहू रस्त्याच्या कामाचा दर्जा तपासून या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदारांवर व या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदरील रस्त्याचे काम दर्जेदार होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) गुहागर- विजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ ई वरील जत शहरातील एक कि.मी. लांबीमध्ये कॉक्रिट रस्ता व गटर पर्यंत पेव्हिंग ब्लॉकच्या बाजूपट्टीचे काम ऑगस्ट २०२१ मध्ये पूर्ण झाले असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे. तसेच या ठिकाणच्या २० मीटर लांबीतील गटरचे काम वगळता ९८० मीटर लांबीतील गटरचे काम पूर्ण झाले आहे.

सदरहू २० मीटर लांबीमध्ये कबर होती, त्यामुळे या ठिकाणच्या गटरचे काम प्रलंबित राहीले. परंतु सद्यस्थितीत कबरचे अतिक्रमण काढण्यात आले असून प्रलंबित गटरचे काम पोलीस संरक्षण घेवून हाती घेण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रलंबित २० मीटरचे बंदिस्त R.C.C. गटरचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने कबरचे अतिक्रमण काढण्यात आले असून पुढील काम पूर्ण करणेसाठी पोलीस बंदोबस्तासाठी पोलीस अधीक्षक, सांगली यांना कळविण्यातआले आहे.

असुधारित प्रत

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ता.प्र.क्र.३९८९६...

श्री. विक्रमसिंह सावंत : अध्यक्ष महोदय, जत शहरामध्ये बऱ्यापैकी रस्त्यांची कामे झाली आहेत. पण ती कामे होत असताना ठेकेदाराने जी कामे केली ती निकृष्ट दर्जाची आहेत. या प्रकरणी क्वॉलिटी कंट्रोल विभागाकडून चौकशी करुन आपण त्यावर योग्य ती कार्यवाही करणार आहात काय, हा माझा पहिला प्रश्न आहे. जत शहरातून राष्ट्रीय महामार्ग गेलेला आहे आणि त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढली आहेत. जत शहरातील राष्ट्रीय महामार्गाचे काम अंतिम होत असताना तेथील आर.ओ.डब्ल्यू. साधारणपणे ३-४ वेळा बदलण्यात आला आहे. त्यामुळे या ठिकाणी जी अतिक्रमणे झाली आहेत ते काढण्यात येतील काय ?

श्री. अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न जत शहरातील कामासंदर्भात आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ हा जत शहरातून जात आहे. या कामासंदर्भात माझ्याकडे जी अद्ययावत माहिती आहे त्यानुसार १ कि.मी.च्या रस्त्याचे रुंदीकरणाचे आणि कॉंक्रीटीकरणाचे काम बऱ्यापैकी झाले आहे. यापैकी कॉंक्रीटीकरणाचे काम ४८ कि.मी. पूर्ण झाले आहे. लहान ६ पुलांची कामे पूर्ण झाली आहेत. स्लॅब आणि १२ ठिकाणी कल्व्हर्टची कामे पूर्ण झाली आहेत. मोऱ्यांची ५३ ठिकाणची कामे पूर्ण झाली आहेत. ३ ठिकाणी काही प्रश्न आहेत. त्यापैकी भूसंपादनाच्या प्रश्नामुळे काही काम विलंबित झाले आहे. या भूसंपादनाची २ ठिकाणी निवाडा स्तरावर म्हणजे अवॉर्ड घोषित करण्याच्या स्तरावर प्रक्रियेत आहे. तिसऱ्या प्रकरणात संयुक्त मोजणी होणे शिल्लक आहे. म्हणून मला सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, भूसंपादनाची संपूर्ण प्रक्रिया जून २०२२ अखेर पूर्ण होऊन उर्वरित काम सप्टेंबर २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचा शासनाचा मानस आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी गावामध्ये काही ठिकाणी अतिक्रमण असल्यामुळे अडचणी असल्याचे निदर्शनास आणले आहे. हा महामार्ग शहरातून

असुधारित प्रत

जात असल्यामुळे एका ठिकाणी कबर आणि एका ठिकाणी मंदिर मध्ये येत आहे.

ता.प्र.क्र.३९८९६...

श्री. अशोक चव्हाण...

पण ही दोन्ही अतिक्रमणे काढण्यात आली असून उर्वरित जे काम या अतिक्रमणामुळे अडलेले आहे ते पोलीस बंदोबस्तात पूर्ण करण्यात येईल. काम निकृष्ट असल्याची तक्रार माझ्याकडे आलेली नाही. पण सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली तर त्याची चौकशी चौकशी केली जाईल.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न सांगलीपुरता मर्यादित जरी विचारला असला तरी मी एवढ्याकरिता उभा आहे की, उत्तरामध्ये आपण गुहागर विजापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ असे म्हटले आहे. याचा अर्थ हा महामार्ग विजापूरला सुरू होऊन तो गुहागरला संपतो आणि गुहागर हा माझा मतदार संघ आहे. म्हणून मंत्री महोदयांना माझा प्रश्न असा आहे की, जेव्हा चिपळूण ते गुहागर असे जागेचे भूसंपादन झाले, रस्ता मंजूर झाला. त्यावेळी चिपळूण ते गुहागर या रस्त्याला जोडणारा बायपास मंजूर होता. त्याचे हस्तांतरण इकडे करण्यात आले. परंतु नंतरच्या काळात ते काही कारणास्तव रद्द झाले. हा बायपास पूर्णपणे खराब झाला होता. मध्यंतरी आम्ही सर्वांनी पाठपुरावा केला आणि त्यासाठी आपण ५ कोटी रुपयांचा निधी दिला. तो रस्ता आता सुटसुटीत होईल त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. पण त्याचबरोबर हा मूळ रस्ता १६६ महामार्गाला जोडलेला होता तो काढण्यात आला आहे. तो पुन्हा जोडण्याचा प्रस्ताव आम्ही तयार करुन शासनाकडे पाठविला आहे. त्याला चिपळूण शहरातील नागरिकांसाठी वॉकिंग ट्रॅकसह त्याला मंजुरी देण्याकरिता प्रशासकीय यंत्रणेने जवळ जवळ ते काम पूर्ण केले आहे. त्याला आपण लवकरात लवकर मंजुरी द्याल काय, आता आपल्याजवळ त्याचे उत्तर नसेल. परंतु आपण तसे उत्तर आता देऊ शकला नाहीत

असुधारित प्रत

तरी आपण त्याचा पाठपुरावा करुन तशा प्रकारचा हा बायपास राष्ट्रीय महामार्ग १६६ ला पूर्वीप्रमाणे जोडून वॉकिंग ट्रॅकसह मंजूर करणार आहात काय ?

**तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट) :** मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांना आपल्या दालनात बोलावून त्यांच्याशी चर्चा करुन हा प्रश्न मार्गी लावावा.

श्री. अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, हा पूर्णपणे वेगळा प्रश्न आहे. या ठिकाणी सर्वच गोष्टींची माहिती असणे अपेक्षित नाही. ही माहिती मी घेऊन आणि सन्माननीय सदस्यांना माझ्या कार्यालयामध्ये बोलावून घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल.

असुधारित प्रत

**मुंबईतील नवीन बांधकाम केलेल्या इमारतीचे सर्व देय कर विकासकाकडून वसूल करण्याबाबत**

**(५) * ३९६४५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लोअर परळ येथील फ्लोरेन्स टॉवर, परळ भोईवाडा जेरबाई वाडीया येथील मातोश्री संस्थेसहीत सहा इमारतींच्या गृहनिर्माण संस्थांना मालमत्ता कर, पाणीपट्टी, विद्युत देयक व इतर देय कर भरण्याबाबत मुंबई महानगरपालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागाने नोटीस पाठविली आहे. तथापि, बांधकाम प्रकल्पाच्या कामात कोट्यवधी रुपयांची थकविलेली देयके वसूल करण्याबाबत संबंधित विकासकास नोटीस न पाठविता सोसायट्यांना नोटीस पाठविण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने पार्ट ओसी असलेल्या परंतु, अंतिम ओसी प्राप्त नसलेल्या नवीन इमारतीतील ग्राहक तथा रहिवाश्यांना पाणीपट्टी, मालमत्ता कर तसेच मलनि:सारण कर आदि अतिरिक्त कर खर्चाचा परतावा विकासकाने रहिवाश्यांना करणे आवश्यक असल्याचा महत्वपूर्ण आदेश दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात नवीन इमारतींचे बांधकाम करुन पार्ट ओसीच्या ताबा दिलेल्या परंतु, अंतिम ओसी (Final OC) प्राप्त नसलेल्या इमारतींची संख्या किती आहे तसेच इमारतींचा एकूण महापालिकेला देय असलेला किती कर थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे,

(४) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उक्त थकीत कर नवीन इमारतींच्या गृहनिर्माण संस्थेकडून न घेता विकासकाकडून वसूल करण्याच्या दृष्टीने शासन तथा महापालिकेतर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) लोअर परेल येथील फ्लोरेन्स टॉवर व परेल भोईवाडा जेरबाई वाडिया मातोश्री संस्था प्रकरणी विकासकांनी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंतचा इमारतीच्या बांधकामाखालील जमिनीचा माहे मार्च, २०२२ पर्यंतचा संपूर्ण मालमत्ता कर बृहन्मुंबई महानगरपालिकेस अधिदानित केलेला आहे.

ता.प्र.क्र.३९६४५...

श्री.एकनाथ शिंदे...

बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधकामाखालील जमिनीचा मालमत्ता कर वसुलीकरिता इमारतींमधील रहिवाशांकडे मागणी नोटीसा पाठविलेल्या नाहीत.

(२) दिनांक १२.०१.२०२२ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या संकेतस्थळावर असा कोणताही आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) दिनांक १५.०५.२०१५ पासून मुंबई शहर व उपनगरात अंशत: भोगवटा प्रमाणपत्र दिलेल्या परंतु पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र देण्यात न आलेल्या इमारतींची संख्या ७२८ इतकी आहे.

सदर ७२८ इमारतींपैकी २८१ इमारतींचा विकासकाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस देय असलेला रु.१०१८.१५ कोटी इतका मालमत्ता कर थकीत आहे.

(४) व (५) उक्त थकीत कर विकासकाकडून वसूल करण्याकरिता मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २०२ ते २०६ नुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत/आली आहे:-

• मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २०३ अन्वये, २६ मालमत्तांवर जप्ती व अटकावणीची कारवाई पूर्ण करण्यात आली असून सदर प्रकरणी रु.१६.५० कोटी रक्कम वसूल करावयाची आहे.

• मा. उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रमांक २५९२/२०१३ मधील अंतरिम आदेशानुसार अधिदानीत रक्कमेपश्चात उर्वरित रु.६७८.१७ कोटी इतक्या थकीत रकमेच्या १२२ प्रकरणांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

• मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६२ अन्वये, तक्रार दाखल केलेल्या व कलम १६५ अन्वये सुनावणी प्रक्रिया सुरु असलेल्या २६ प्रकरणांमध्ये रु.१४८.९३ कोटी रक्कम वसूल करावयाची आहे. सदर प्रकरणी महानगरपालिकेच्या अन्वेषण अधिकाऱ्यांच्या सुनावणीअंती करदायित्व निश्चित झाल्यानंतर कर वसुलीची कार्यवाही करण्यात येणार आहे.

असुधारित प्रत

• मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २०२ अन्वये दंड आकारणी केलेल्या ७६ प्रकरणांमध्ये रु.१३०.४६ कोटी रक्कम वसूल करावयाची आहे.
ता.प्र.क्र.३९६४५...
श्री.एकनाथ शिंदे...

• परताव्याच्या समायोजनाच्या ७ प्रकरणांमध्ये रु.१०.९४ कोटी रक्कम समायोजित करावयाची आहे.
• नवीन करनिर्धारण व पुनर्करनिर्धारणामुळे सुधारित झालेल्या रु. ३३.१५ कोटी रकमेच्या २४ प्रकरणांमध्ये मालमत्ता देयकांचे देय दिनांक उलटून जाईपर्यंत अधिदान न केल्यास, देय दिनांकानंतर वसुलीची कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री. सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, लोअर परळ येथील फ्लोरेन्स टॉवर, परळ भोईवाडा जेरबाई वाडीया येथील मातोश्री संस्थेसहीत सहा इमारतींच्या संदर्भात जो प्रश्न विचारला होता त्यासंबंधी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या लोकांना आणि त्या व्यतिरिक्त जे रहिवाशी वर रहायला गेलेत त्यांना मालमत्ता कर भरण्याची खऱ्या अर्थाने विकासकाची जबाबदारी आहे. परंतु तेथील रहिवाशांवर हा मालमत्ता कर लावला गेला अशा प्रकारची बातमी वृत्तपत्रात आली होती आणि त्या आधारे मी हा प्रश्न विचारला होता.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी अशा प्रकारचा टॅक्स रहिवाशांवर लावण्यात आला नाही अशा प्रकारचे उत्तर दिले आहे. परंतु या प्रश्नाचे उत्तर देताना मंत्री महोदयांनी असे सांगितले आहे की, आजपर्यंत अशा प्रकारच्या ७२८ इमारती अशा आहेत की विकासकाकडून मुंबई महापालिकेची जवळपास १११८.१५ कोटी इतकी मालमत्ता कराची रक्कम येणे थकीत आहे. ही थकीत रक्कम वसूल करणे महापालिकेची जबाबदारी आहे. परंतु हा प्रश्न विचारण्यामागे मूळ गाभा असा आहे की, मुंबई शहरामध्ये अनेक इमारतींचा विकास होत असतो. संबंधित विकासक इमारत बांधल्यानंतर पार्ट भोगवटा प्रमाणपत्र घेतो आणि पार्ट ओ.सी. का दिली जाते तर मुंबई महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार जर एखादे सेटबॅक राहिले

असेल किंवा त्या इमारतीच्या बाजूने जाणारा एखादा नाला असेल तो पूर्ण करण्यासाठी तात्पुरती ती बाब बाजूला ठेऊन त्या विकासकाला पार्ट ओ.सी. ८ व्या

ता.प्र.क्र.३९६४५...

श्री.एकनाथ शिंदे...

किंवा १० व्या माळयापर्यंत दिली जाते. परंतु त्याच्या वरील बांधकाम संबंधित विकासाकडून त्याच पध्दतीने केले जाते आणि ८ व्या मजल्याचा आधार घेऊन ९ वा, १०, ११ वा, १२ आणि १३ माळयावर ज्या लोकांनी घरे विकत घेतली असतात त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार रहिवाशी रहायला जातात. त्या ठिकाणी रहायला गेल्यानंतर ८ व्या माळयापर्यंत जे कोणी निवासी भोगवटादार असतील त्यांनी तो मालमत्ता कर भरावयाचा असतो असा मुंबई महापालिकेचा नियम आहे. परंतु ९ व्या, १० व्या माळयावर जे लोक रहायला गेले आहेत त्यांचा असेसमेंट टॅक्स किंवा बांधकामाचा कर तेथे असणाऱ्या विकासकाने भरला पाहिजे, असा नियम आहे. परंतु सरसकट अशा पध्दतीने ज्या ज्या इमारतींमध्ये पार्ट ओ.सी. दिली आहे आणि वरच्या मजल्यावर लोक रहायला गेले आहेत किंवा बांधकाम सुरू असताना तो असेसमेंट कर लावला जातो तो सरसकट तेथे राहणाऱ्या नागरिकांवर लादला जातो. यासाठी एक कायदा होणे गरजेचे आहे. यासंबंधी सन १८८८ च्या कायद्यामध्ये बदल करुन तेथे राहणाऱ्या रहिवाशांना जो कर लावला जातो तो विकासकाने भरला पाहिजे यासाठी सक्तीचा कायदा करणे गरजेचे आहे. या दृष्टीने मंत्री महोदयांनी या सभागृहाला संबोधित करावे, असे माझे मत आहे.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी फ्लोरेन्स टॉवरमधील मालमत्ता करासंबंधी रहिवाशांना नोटीस पाठविल्याबद्दल प्रश्न उपस्थित केला आहे.

अध्यक्ष महोदय, या टॉवरच्या बाबतीत विकासकाने अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंत इमारतीच्या बांधकामासंबंधीचा जो जमिनीचा कर आहे तो मार्च २०२२ पर्यंतचा संपूर्ण मालमत्ता कर मुंबई महापालिकेला भरलेला आहे. तसेच

मुंबई महापालिकेने बांधकामाखालील जमिनीचा मालमत्ता कर वसुलीकरिता रहिवाशांकडे नोटीसा पाठविलेल्या नाहीत. तसेच सन्माननीय सदस्यांनी पार्ट

ता.प्र.क्र.३९६४५...
श्री.एकनाथ शिंदे...

ओ.सी.चा मुद्दा उपस्थित केला आहे. जेव्हा बांधकाम सुरू असते तोपर्यंत हा मालमत्ता कर संबंधित विकासकाने भरायचा असतो. परंतु पार्ट ओ.सी. मिळाल्यानंतर तेथे असलेल्या रहिवाशांना थेट मालमत्ता कराच्या नोटीसा मुंबई महापालिकेकडून जातात.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९६४५....

श्री. एकनाथ शिंदे....

त्यांच्याकडून तो भरणा करुन घेतला जातो. परंतु पार्ट ओसीपेक्षा जास्त जे मजले बांधलेले आहेत त्यामध्ये मुंबई महानगरपालिकेकडून पाणी कर आणि सिवरेज कर आकारला जातो. पार्ट ओसी मिळपर्यंतचा इमारतीतील मालमत्ता कर विकासकाने भरायचा आहे, असा दुसरा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे तर याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, हा कर भरलेला आहे. रहिवाशी इमारतीमध्ये राहायला आल्यानंतरचा मालमत्ता कर भोगवटाधारकांनी म्हणजे तेथील रहिवाश्यांनी भरायचा आहे. अशा प्रकारच्या नोटीस मुंबई महापालिकेने पाठवलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी असा मुद्दा मांडला की, ७२८ इमारतींपैकी ज्यांना अंतिम ओसी प्राप्त नाहीत त्यांच्या पैशाचा भरणा विकासकाने केला पाहिजे, या प्रकारचा काही कायदा करता येईल काय ? मुंबई महापालिका हद्दीमधील अशा प्रकारच्या इमारतींसाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल आणि या इमारतींची संख्या जास्तीची असू शकते. मग अशा प्रकारे ओसी नसल्यामुळे त्यांना पाण्याची बिले दुप्पट तसेच पाणी कर आणि सिव्हरेज कर देखील भरावा लागतात. त्यामुळे हा भुर्दंड आहे. काही ठिकाणी विकासक इमारती बांधून आणि विकूनही गेले आहेत. आता त्या ठिकाणी फक्त सोसायटी आणि रहिवाशी राहिलेले आहेत अशा परिस्थितीत ओसी नसल्यामुळे त्यांना खरेदी विक्री करता येत नाही. त्यांना पुनर्विकासाची अडचण येते तसेच बँक कर्जाची देखील अडचण येते. या सर्व बाबी या विषयामध्ये समोर येत आहेत. त्यामुळे याबाबत आपल्याला काही धोरणात्मक निर्णय करता येऊ शकतो काय ? काही ठिकाणी ओसी आणि पैसे भरायचे असतात परंतु विकासक पुढे येत नाहीत. मग अशा परिस्थितीत विकासक इमारत बांधून घेतल्यानंतर परंतु तिथे मध्यमवर्गीय रहिवाशी राहत आहेत. त्यासाठी आपल्याला काही ॲमिनेस्टी योजना लागू करता येईल काय ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९६४५....

श्री. एकनाथ शिंदे....

अध्यक्ष महोदय, हा प्रश्न स्कोपच्या बाहेरचा असू शकतो. तरी देखील या सर्व किती इमारती आहेत, याचे सध्याचे स्टेटस काय आहे, तिथे राहणाऱ्या रहिवाश्यांच्या डोक्यावरील टांगती तलवार दूर करता येते काय, याबबत आपण नक्की विचार करु.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी व्यापक उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे आणि ते या सर्व विषयाला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. परंतु स्थिती अशी आहे की, मुंबई किंवा ठाणे येथे राहणाऱ्या मध्यमवर्गीयांचा वाली कोणीच नाही. मी कोणाच्या विरोधात बोलत नाही. झोपडपट्टीमध्ये जो व्यक्ती राहतो त्याचा प्रॉपर्टी टॅक्सशी काही संबंधच नाही. गावठाण कोळीवाडयामध्ये ते मोफत करण्यासाठी आता आपण मागणी करीत आहोत. ५०० फुटाच्या जागेसाठी आपण कर माफ केला आहे. परंतु ज्याचा स्वत:चा काहीच गुन्हा नाही अशा मुंबईकरांची इमारत पुनर्विकसित झाली किंवा पुनर्बांधणी झाली. तेव्हा त्याने बिचाऱ्याने स्वत:चे हार्ड ॲन्ड मनी तिथे फ्लॅट घेण्यासाठी दिले. विकासकाने ओसी घेण्यापूर्वी काय काय करायला हवे ? रेरा कायदा तर नंतर आला आहे. परंतु या सर्व बाबी रेरा कायदा येण्यापूर्वीच्या आहेत. त्यामुळे विकासकाने ज्या ज्या बाबी पूर्ण करायच्या आहेत त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू यांनी केला आहे. नाला, रोड, स्ट्रक्चर किंवा इतर काही बाबी करायच्या असतील त्या विकासकाने केल्या नाहीत तर त्याने पार्ट ओसी घेतली. अंतरिम पार्ट ओसी घेऊन त्याने पझेशन दिले. त्यानंतर रहिवाशी तिथे राहायला गेले. आता ते वरच्या मजल्यावर राहणाऱ्यांचा काहीही गुन्हा नाही. त्यांनी पैसे भरून फ्लॅट घेतलेले आहेत. विकासक आता पळून गेलेला आहे. काही केसेसमध्ये १० ते १५ वर्ष झाली तरी तो विकासक सापडत नाही.ओसी घेण्यासाठी लागणारा खर्च आणि काम दुप्पट ते चौपट आहे त्यामुळे ते परवडू शकत नाही. मुंबई महानगरपालिकेच्या कायदा असा आहे की, आर्किटेक्ट बदलायचा असेल तर ओरिजनल आर्किटेक्टची एनओसी लागते. आता तो विकासक गेला आहे तर त्याचा आर्किटेक्ट कोण पकडणार आहे ?त्याची फीस

ता.प्र.क्र.३९६४५....

ॲड. आशिष शेलार....

सुद्धा विकासकाने दिली नसेल तर तो एनओसी देत नाही. त्यामुळे तो इथेही मार खातो आणि तिकडेही मार खातो त्यामुळे तो अडकला आहे. आता तो रहिवाशी स्वत:चे घर असल्यामुळे तिथे बसला तर त्याला पाणी आणि सिव्हरेजचे कर दुप्पट भरावे लागत आहेत. आम्ही देखील भुक्तभोगी आहोत. त्यामुळे ॲमिनेस्टी योजना म्हणत आहात तर सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू यांनी मांडल्याप्रमाणे माझा प्रश्न सरळ आहे की, आपल्याला एक योजना करावी लागेल आणि गरज असेल तर कायद्यामध्ये बदल करावा लागेल. शेवटी हे राज्य लोककल्याणकारी आहे. तो रहिवाशी विकत घेणारा माणूस आहे तो काही अनाधिकृत नाही. तो पैसे देऊन करार करुन त्या घरात बसलेला आहे. त्यामुळे पार्ट ओसी घेतल्यानंतर असलेल्या मजल्यावरील नागरिकांना ओसी मिळण्यासाठी, त्याची प्रकिया सहज करण्यासाठी पाणी कर, सिवरेज कर हे कमी करण्यासाठी आपण प्रयत्न करावे. तसेच काही ठिकाणी सोसायट्यामध्ये वादअसतात तर अशा वेळेला महापालिकेची योजना आहे की, प्रत्येक फ्लॅटधारकांचे इंडिव्हिज्युल टॅक्सेशन देखील करता येते. परंतु ओसी नसल्यामुळे महापालिका या केसमध्ये तसे करीत नाही आणि प्रलंबितआहे. त्यामुळे एखाद्या नागरिकाला स्वत:चा कर इंडिव्हिज्युल भरायचा असेल तर त्याची धोरणाप्रमाणे सोयी-सुविधा करण्यासाठी तसेच या तीनही बाबी करण्यासाठी नवीन पॉलिसी धोरण आणि आवश्यकता असेल तर कायद्यातील बदल करणार काय ?

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलारी यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे अशी खूप प्रकरणे असू शकतील. हा धोरणात्मक निर्णय आपल्याला घ्यावा लागेल. मुंबई महानगरपालीका कायद्याच्या कलम १४६ अनुसार अशा इमारतीमध्ये राहणारे हजारो रहिवाशी ओसी पासून वंचित असतील आणि कंप्लायन्स करण्यासाठी प्रिमियम पैसे भरण्यासाठी विकासक समोर येत नसतील तर अशा परिस्थितीमध्ये निर्णय घेऊन ते रहिवाश्यांना परवडणारे असले पाहिजे. कारण आपण

ता.प्र.क्र.३९६४५....

श्री. एकनाथ शिंदे....

जर प्रिमियमप्रमाणे निर्णय घेतला तर ते पैसे भरुच शकणार नाहीत. त्यामुळे आपल्याला याबाबतीत पॉलिसी करावी लागेल. शासन तसेच नगरविकास विभाग याबाबत सकारात्मक आहे. आपल्याला माहीत आहे की, मुंबई व उर्वरित महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात लोकांना सोयीचे ठरले पाहिजे असे अनेक निर्णय आपण नगरविकास विभागाच्या माध्यमातून घेतलेले आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मांडलेला मुद्दा अगदी योग्य आहे. यामध्ये आपण लोकांना मोठया प्रमाणावर रिलिफ देऊ शकतो. या विषयासाठी आपण एक समिती गठीत करु आणि त्याबाबत काय पॉलिसी करता येईल यासाठी आम्ही प्रयत्न करु. तसेच सोसायटीतील रहिवाश्यांना ते कंप्लायन्स करणे आणि प्रिमियम भरणे परवडले पाहिजे. असा व्यापक विचार करुन आपण त्याबाबत निर्णय घेऊ.

श्री. सदा सरवणकर : अध्यक्ष महोदय, या सोसायटीमधील विकासकांनी दंडापोटी किती रक्कम भरली हा माझा पहिला प्रश्न आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पार्ट ओसी घेऊन एखादा विकासक रहिवाश्यांना त्या इमारतीमध्ये राहण्यासाठी मजबूर करतो त्यावेळेला त्या इमारतीतील सर्व भाडेकरुंना साधारणत: मालमत्ता कर, मलनिस्सारण कर किंवा इतर सर्वच कर जवळपास दुप्पट भरावे लागतात. हा भुर्दंड सर्वसामान्य भाडेकरुवर जातो आणि तो विकासक पळून जाऊन दुसरे कुठेतरी इमारत बांधतो. माझा प्रश्न असाआहे की, पार्ट ओसी देऊन इमारतीमध्ये राहायला गेलेल्या भाडेकरुंना अंतिम ओसी देताना ती देण्याची जबाबदारी ही त्याच विकासकाची आहे हे ग्राह्य मानून ती ओसी दिल्याशिवाय दुसऱ्या इमारतीच्या प्रकल्पाला परवानगी दिली जाणार नाही, अशा प्रकारचा जाचक किंवा विकासकांवर बंधनकारक असणारा कायदा आपण करणार काय ?

यानंतर श्रीमती करंदीकर.....

ता.प्र.क्र. ३९६४५....

श्री. सदा सरवणकर ...

सन १८८८ च्या कायद्यान्वये केलेल्या नियम ३३ ( १०), ३३(७), ३३ (१२), ३३ (९), ३३ (१५) या पुनर्विकासाच्या योजना आहेत. या योजनांमध्ये आवश्यक तरतुदी शासन करणार काय ?

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सदा सरवणकर यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केलेला आहे. एखादा विकासक इमारत बांधतो व नंतर पार्ट ओसी घेतो. नंतर तेथे रहिवासी घर खरेदी करतात. पार्ट ओसी च्या वर जो भाग आहे, तेथे अनेक जण राहतात. यामुळे त्यांना मालमत्ता कर, पाण्याचे बिल, पाण्याचा कर, पाण्याचे चार्जेस दुप्पटीने भरावे लागतात. या संबंधी विकासकाला दुसरीकडे इमारत बांधतांना परवानगी देऊ नये, अशा सूचना केलेल्या आहेत. आपल्याला कायदेशीर बाबी तपासाव्या लागतील. आपले म्हणणे योग्य आहे. मुंबई महापालिका सन १८८८ कायद्यामधील कायदेशीर बाबी तपासून निर्णय घेता येईल.

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मैं सम्माननीय मंत्री महोदय श्री एकनाथ शिंदे जी को धन्यवाद देता हूं. मुंबई में जिन इमारतों को पार्ट ओ.सी. मिली है, उसके लिए एक समिति बनाकर, उन सोसायटी में रहने वाले लोगों को न्याय देने के बारे में एक बहुत ही बेहतरीन फैसला लिया गया. उसके लिए हम सभी विधायक स्वागत करते है. इसमें दो मुद्दे है. एक मुद्दा ऐसा है कि जो लिगली पार्ट ओ.सी. लेकर जो इमारते बनायी गई है, उसके बारे में निर्णय है. मेरा स्पेसिफिक प्रश्न यह है कि ऐसी कई इमारते है, विशेषकर मुंबई में "बी" और "सी" वॉर्ड में बिना परमिशन, बिना ओ.सी. और बिना सी.सी. के इमारते बनी हुई है. उस पर रोक लगाने के लिए मैं स्पेसिफिक प्रश्न पूछना चाहता हूं कि "बी" और "सी" वॉर्ड में जो इल्लीगल कन्स्ट्रक्शन का काम चलता है उस पर रोक लगाने के लिए नगर विकास विभाग क्या कदम उठाएगा ?

ता.प्र.क्र. ३९६४५....

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री अमिन पटेल यांनी दोन वॉर्ड संबंधी मुद्दा उपस्थित केला असून जी प्रकरणे असतील ती तपासून घेऊ.

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, सम्माननीय मंत्री महोदय, आप कह रहे है कि जो पुरानी इमारते बन गई है, उस पर इन्क्वॉयरी करेंगे. उस पर इन्क्वॉयरी करेंगे वह एक अलग इश्यू है. लेकिन जो नया कन्स्ट्रक्शन आज चालू है, जो एक माले की इमारत १० माले की बिना परमिशन के बन रही है, उस पर रोक लगाने के लिए तुरंत क्या कार्रवाई होगी?

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, ज्या जुन्या इमारती आहेत, तेथे ३३ (६), ३३(९) ३३ (१०) नुसार वाढीव एफएसआय दिला असून पुनर्विकासाच्या योजना सोप्या केल्या आहेत. जेथे अशा प्रकारे नवीन बांधकाम होत आहे, ते अजिबात होता कामा नये. या संबंधी कठोर कारवाई झाली पाहिजे. एक मजल्याच्या इमारतीवर ४-५ मजले बांधल्यानंतर त्या इमारती पडतात. अशा प्रकारे जर १०-१० मजले बांधले असतील तर या संबंधी आपण मला एक अर्ज द्यावा. या बाबत कारवाई करण्यास सांगण्यात येईल. या संबंधी कारवाई केली जाईल.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय सकारात्मक उत्तर देत असून याबाबत समिती तयार केली जाणार आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी समितीची आवश्यकता आहे. या समितीमध्ये अध्यक्ष गॅलरीमध्ये बसलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश असणार काय ? हा प्रश्न सोडवण्याकरिता गृह निर्माण विभाग, नगरविकास, वित्त विभाग व महसूल विभाग या ४ विभागांची आवश्यकता आहे. मुंबईतील सर्व पक्षीय आमदारांना घेऊन एक महिन्यात समितीची स्थापना करणार काय ? या करिता टर्म्स ऑफ रेफरन्स तयार केले जाणार काय ?

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर यांनी विचारलेला प्रश्न हा मोठा धोरणात्मक निर्णय आहे. धोरण तयार झाल्यानंतर त्याचा उपयोग रहिवाशांना झाला पाहिजे. या करिताआवश्यकता असल्यास कायद्यामध्ये

ता.प्र.क्र. ३९६४५....

श्री.एकनाथ शिंदे......

दुरुस्ती करावी लागेल. या संबंधी नगर विकास, गृह निर्माण, वित्त विभाग व संबंधित जे काही विभाग आहेत.... तसेच सर्व पक्षीय आमदार आहेत. मुंबईचा हा विषय महत्त्वाचा आहे. या बाबत विचार केला जाईल. समिती एका महिन्यात तयार केली जाईल.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, पार्ट ओसी, ओसी न मिळालेल्या इमारतींचा हा प्रश्न आहे. मुंबईत ओसी न मिळालेल्या सुमारे २१ हजार इमारती आहेत. त्यांना पाणी पुरवठा मानवतावादी तत्त्वावर, अन्य लोकांपेक्षा अधिक दराने केला जातो. तसेच त्यांना वाढीव पाणीपुरवठा देखील केला जात नाही. ओसी न मिळाल्यामुळे तेथील सोसायटीमध्ये राहणाऱ्या लोकांचा कोणताही दोष नसतो. यामुळे ज्या इमारतींना ओसी नाही, त्यांना पाणीपुरवठा नियमित दराने करण्याचे आदेश आपण देणार काय, तसेच वाढीव पाणीपुरवठा म्हणजे ६ इंचाची पाईपलाईन ९ इंच करणे, ९ इंचाची पाईपलाईन १२ इंच करणे हे तांत्रिकदृष्टया शक्य असते. मात्र ओसी नाही म्हणून ते केले जात नाही. दोन्ही प्रकारचे आदेश माननीय मंत्री महोदय मुंबई महापालिकेला देणार काय ?

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर यांनी मुद्दा मांडला आहे. ओसी घेणे हे बंधनकारक आहे. ओसी पेक्षा जास्तीचे बांधकाम झाले आहे, तेथे रहिवासी राहत आहेत. ही वस्तुस्थिती आहे की, वॉटर चार्जेस,वॉटर टॅक्सेस, सिव्हरेज चार्जेस व टॅक्सेस त्यांना द्यावे लागतात, हे कायद्यामध्येच आहे. यामुळे आपल्याला कायद्यामध्येच बदल करावा लागेल, सुधारणा करावी लागेल. सर्वात महत्त्वाचा मूळ प्रश्न ओसी न मिळालेल्या इमारती बाबत आहे. त्याला आपण हात घातला पाहिजे. हा विषय अतिशय जिव्हाळ्याचा आहे. मुंबई महापालिकेत अशा हजारो इमारती असतील, येथे हजारो रहिवासी राहत आहेत. मूळ प्रश्नाबाबत निर्णय घेतला तर सर्व लहान –लहान प्रश्न आपोआप सुटतील. या बाबत आपण लवकर निर्णय घेऊ.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३९६४५....

श्री. अजय चौधरी : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न माझ्या मतदारसंघातील आहे. मातोश्री डेव्हलपरने २२ मजल्याच्या ६ इमारती बांधल्या आहेत. मंत्री महोदयांनी या बाबत उत्तर दिले आहे की, जमिनीचा असेसमेंट टॅक्स भरलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. हा कर २०२२ पर्यंत भरलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी मूळ मुद्दा उपस्थित केला आहे. मात्र या इमारतंचा वॉटर टॅक्स भरलेला नाही. वीज पुरवठ्याचे पैसे भरलेले नाहीत. बेस्टने ६ इमारतीचे वीज कनेक्शन कापण्याचे तसेच महापालिकेने वॉटर कनेक्शन तोडण्याचे आदेश काढले होते. महापालिकेने सर्व पैसे भरले आहे, असा उल्लेख केलेला आहे. विकासकाने वीज चार्जेस, वॉटर चार्जेस भरलेले नाहीत. ही त्यांची जबाबदारी आहे. ६ इमारतींचा कॉर्पस फंड दिला गेलेला नाही. या संबंधी विकासकावर बंधन घातले जाणार काय ? हे सर्व पैसे भरण्यास प्रवृत्त करण्याकरिता निर्णय घेतला जाणार काय ?

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, ओसी मिळेपर्यंत जे पैसे भरायचे आहेत ते विकासकाने भरायचे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अजय चौधरी यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. पार्ट ओसी घेतल्यानंतर रहिवासी राहतात. या संबंधी बीमएमसीच्या कायद्यातील आर्टीकल १४६ मध्ये असे नमूद केले आहे की, "Property taxes shall be leviable primarily from the actual occupier to pay..". राहायला आल्यानंतर ते पैसे त्यांनी भरायचे आहेत. आपल्याला प्रत्येक प्रकरण तपासावे लागेल. राहायला आल्यानंतर किंवा राहायला येण्याआधी देय पैशा बाबत ग्राहकाची जबाबदारी नसेल तरी देखील त्यांना ते भरावे लागत असतील तर अशी प्रकरणे आपल्याला तपासावी लागतील. त्या नुसार या बाबत निर्णय घ्यावा लागेल. जेणेकरुन रहिवाशांवर कोणताही अन्याय होणार नाही.

श्री. सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, धोरण तयार करण्यासाठी समिती स्थापन केली जाणार आहे. यासाठी विशिष्ठ कालावधी असावा. आपण घोषणा केल्यानंतर समितीने कालमर्यादेमध्ये तत्काळ अहवाल द्यावा. मुंबईकरांना अनेक गोष्टी सहन

कराव्या लागत आहेत. म्हणून हा अहवाल कालमर्यादेत देण्यात यावा. या बाबत मंत्री महोदय काय कार्यवाही करणार आहेत ?

ता.प्र.क्र. ३९६४५....

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी हा प्रश्न मांडला असून तो अतिशय महत्त्वाचा आहे. सदनाने आपली मते मांडली आहेत. यावर एक महिन्याच्या आत समिती गठीत केली जाईल असा निर्णय घेतलेला आहे.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. संजय शिरसाट )** : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-------

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

**पृ.शी./ मु.शी.** : स्थगन प्रस्तावाच्या सूचना

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट)** : सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी "राज्यात एस.टी. महामंडळांच्या कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे. त्यावर त्यांना त्यांचे म्हणणे मांडावयाचे असल्यास ते थोडक्यात मांडावे.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत मी स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. राज्यामध्ये महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा अघोषित संप दि. २८ ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु आहे. आतापर्यंत जवळजवळ १०० कर्मचाऱ्यांचा आत्महत्येमुळे मृत्यू झाला आहे. या विषयाचे गांभीर्य आपण लक्षात घ्यावे.

अध्यक्ष महोदय, आपल्यासाठी सेवा करणारे, खऱ्या अर्थाने आपल्यासाठी आपल्यासारखे असलेल्या, आपले जीवलग असलेल्या जवळजवळ १०० कर्मचाऱ्यांनी आत्महत्या करुन स्वत:च्या मृत्यूला कवटाळले आहे. पाच – साडेपाच महिने झाले ते वणवण फिरत आहेत. त्यांची अशी मागणी होती की, आमचे वेतन तुटपुंजे आहे. हे तुटपुंजे वेतन देखील वेळेवर मिळत नाही. मग त्यांनी विलीनीकरणाची मागणी केली आहे. खरे तर हे वेतन देखील वेळेत व योग्य मिळाले असते तर, हे प्रश्न उभे राहिले नसते. वेतन करार कधी झाला नाही, ३०० ते ४०० रुपये भत्ता दिला, तो देखील मिळायचा बंद झाला. त्या कर्मचाऱ्यांनी जायचे कुठे?

अध्यक्ष महोदय, ते आंदोलनाला बसले तर दुर्दैवाने म्हणावेसे वाटते की, सत्ताधाऱ्यांकडून धमक्या देत आहेत की, तुम्ही उपोषण सोडा, तुम्हाला कामावरुन काढू. कुठे तरी संवेदनशीलता दाखविण्याची आवश्यकता आहे. तो कर्मचारी मृत्यूला कवटाळत आहे कारण एका अर्थाने तो उपोषणाला बसला, त्याचा पगार बंद झाला, त्याला सांगितले की, तुझी नोकरी जाणार. तेवढे कमी की काय म्हणून तुम्ही नवीन कंत्राटी कर्मचाऱ्यांची जाहिरात देखील काढली.

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार...

अध्यक्ष महोदय, वेठबिगारी, हमाल म्हणून आमचा हा एस.टी.चा कर्मचारी काम करीत आहे. त्याला पर्याय राहिला नाही म्हणून तो स्वत:चे घर चालविण्याकरिता ट्रक चालवित आहे. या विषयापेक्षा दुसरा गांर्भीयाचा विषय काय असू शकतो, आज या सदनामध्ये या विषयाला सोडून अन्य गांर्भीयाचा विषय काय असू शकतो?

अध्यक्ष महोदय, परीक्षा आल्या आहेत. आमचा विद्यार्थी परीक्षा केंद्रावर पोहोचू शकत नाही. आमच्या माता भगिनी आपल्या आवश्यक कामांसाठी गाव खेड्यातून दुर्गम भागातून एस.टी. उपलब्ध नाहीत म्हणून जाऊ शकत नाहीत. उपाध्यक्ष महोदयांसमवेत मी बोललो. त्यांच्या भागातच एस.टी. कर्मचाऱ्यांच्या या अवस्थेमुळे नाशिकमध्ये त्यांनी बसेस सुरु केल्या. काळी-पिवळी टॅक्सीचालक त्यामुळे संपावर गेले कारण त्यांच्या पोटावर पाय पडला. याचे अनेक परिणाम होत आहेत.

अध्यक्ष महोदय, कोर्टामध्ये तारखेवर तारीख पडत आहे. निर्णय काही होत नाही. १०० च्या वर कर्मचाऱ्यांनी आत्महत्या करुन मृत्यूला कवटाळले आहे. माझी विनंती आहे की, आज आपण या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेवर चर्चा घ्यावी. सर्व कामकाज बाजूला ठेवावे. किंबहुना आज सरकारने निवेदन करावे, असे तरी आपण आदेश दिले पाहिजेत. सरकारने या विषयाची नोंद घेऊन निवेदन करावे, अशी माझी विनंती आहे व त्याबाबतीत निर्णय द्यावा.

**तालिका सभाध्यक्ष** : आज मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी स्थगन प्रस्तावाच्या २ सूचना प्राप्त झाल्या आहेत. परंतु, आज सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (तिसरा दिवस) असल्यामुळे म.वि.स. नियम २५१ (२) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाहीत. अत: उक्त सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

.......

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये

येऊन एकत्रितरित्या घोषणा देतात.)

**पृ.शी./मु.शी. :** कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने

(क) मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे पन्नासावा व एकावन्नावा वार्षिक अहवाल,

(ख) सातारा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, सातारा यांचे सन २०११-२०१२, सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ चे वार्षिक अहवाल,

(ग) दि रेल्वे गुडस् क्लिअरींग अँड फॉरवर्डींग एस्टॅब्लिशमेंटस् लेबर बोर्ड, मुंबई यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे चाळीसावा, एकेचाळीसावा, बेचाळीसावा व त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल,

(घ) कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल,

(ड.) औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, औरंगाबाद यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे पंचवीसावा, सव्वीसावा, सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल,

(च) बीड जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, बीड यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा तेवीसावा वार्षिक अहवाल,

(छ) धुळे - नंदुरबार जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, धुळे यांचे सन २००९-२०१० ते सन २०१६-२०१७ या वर्षांचे अनुक्रमे एकवीसावा, बावीसावा, तेवीसावा, चोवीसावा, पंचवीसावा, सव्वीसावा, सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल,

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये

येऊन एकत्रितरित्या घोषणा देतात.)

श्री.हसन मुश्रीफ ....

(ज) अमरावती जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठावीसावा व एकोणतीसावा वार्षिक अहवाल,

(झ) कापूस बाजार कामगार मंडळ, बृहन्मुंबई, ठाणे व रायगड जिल्हयांकरिता यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल,

(ञ) धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळ, मुंबई यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल,

(ट) मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे चौतीसावा व पस्तीसावा वार्षिक अहवाल,

(ठ) नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल,

(ड) कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, कोल्हापूर यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ चे वार्षिक अहवाल

(ढ) नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल,

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये

येऊन एकत्रितरित्या घोषणा देतात.)

श्री.हसन मुश्रीफ ...

(ण) रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, रत्नागिरी यांचे सन २०१८-२०१९ ते सन २०२०-२०२१ चे वार्षिक अहवाल,

(त) दि क्लिअरिंग आणि फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळ यांचा सन २०१९-२०२० चा एकोणतीसावा वार्षिक अहवाल,

(थ) अकोला - वाशिम - बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अकोला यांचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल,

(द) माल वाहतुक कामगार मंडळ, बृहन्मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल,

(ध) चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चंद्रपूर यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा व सहावा वार्षिक अहवाल,

(न) अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, अहमदनगर यांचा सन २०१९-२०२० चा वार्षिक अहवाल,

(प) सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सांगली यांचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल,

(फ) सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चाळीसावा वार्षिक अहवाल,

(ब) नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल,

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये

येऊन एकत्रितरित्या घोषणा देतात.)

श्री.हसन मुश्रीफ ...

(भ) धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ (अंतर्गत जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्हे) जळगाव यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वैधानिक लेखापरिक्षण व कामकाज अहवाल,

(म) कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर यांचे सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

...........

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये

येऊन एकत्रितरित्या घोषणा देतात.)

**स्थगन प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, एवढा गंभीर विषय आहे. खरे तर आपण सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा केली पाहिजे. १०० लोकांनी आत्महत्या केली आहे. त्यामुळे आमची विनंती आहे. सरकारला किमान निवेदन करण्यास सांगावे. मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. मंत्री महोदयांना विनंती करावी की, त्यांनी या विषयावर निवेदन करावे.

**तालिका सभाध्यक्ष**: सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार आपण सर्व सन्माननीय सदस्यांना जागेवर बसण्यास सांगावे. माननीय संसदीय कामकाज मंत्री या विषयावर उत्तर देत आहेत. आपण जागेवर बसावे.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, एस.टी. च्या संदर्भात सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी स्थगन प्रस्तावाच्या सूचनेच्या माध्यमातून जो मुद्दा मांडला आहे, त्या बाबतीत सरकारचे धोरण ... अधिवेशन संपण्याच्या अगोदर या सभागृहात सविस्तर निवेदन मांडले जाईल.

............

असुधारित प्रत

**पृ. शी. :** मौजे साखरीआगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मच्छीमारांना मुलभूत सुविधा व मासेमारी जेटी उभारणेसाठी रु.२.९७ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दिनांक १५ डिसेंबर, २०११ रोजी शासनाने दिलेली असणे

**मु. शी. :** मौजे साखरीआगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मच्छीमारांना मुलभूत सुविधा व मासेमारी जेटी उभारणेसाठी रु.२.९७ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दिनांक १५ डिसेंबर, २०११ रोजी शासनाने दिलेली असणेया संबंधी श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. भास्कर जाधव (गुहागर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मत्स्य व्यवसाय मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे साखरीआगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मच्छीमारांना मुलभूत सुविधा व मासेमारी जेटी उभारणेसाठी रु.२.९७ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दिनांक १५ डिसेंबर, २०११ रोजी शासनाने दिलेली असणे, त्यानुसार कामाची निविदा प्रसिध्द होऊन प्रत्यक्षात सन २०१२ मध्ये हे काम सुरू झालेले असणे, परंतु काम सुरू होवून आणि त्यावर रु.१६.२५ लक्ष इतका खर्च झाल्यानंतर सन २०१४ पासून हे काम पूर्णपणे बंद

श्री.भास्कर जाधव ....

अवस्थेत असून ठेकेदाराने या कामाकडे पूर्णतः दुर्लक्ष केलेले असणे, काम अपूर्ण अवस्थेत असल्याने साखरीआगर व परिसरातील किनारपट्टीच्या गावांमधील मच्छीमारांची खूप मोठी गैरसोय होत असणे, बर्फ, पाणी, डिझेल नौकेवर चढवणे ही कामे करताना त्यांचे खूप हाल होत असणे, आधीच मत्स्यदुष्काळ, वादळ, पाऊस यामुळे अडचणीत असलेला मच्छीमार जेटीच्या सुविधेअभावी अधिकच संकटात सापडलेला असून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झालेला असणे, हे काम पूर्णत्वास जाण्याच्या दृष्टीने अनेकदा मंत्रालय स्तरावर बैठका होऊन, त्यात ठोस निर्णय होऊनदेखील वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांची अडवणुकीची व असहकार्याची भूमिका यामुळे कोणतीही कार्यवाही होत नसल्याने मच्छीमारांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण असणे, सदर जेटीचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे

असुधारित प्रत

याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.अस्लम शेख (मत्स्य व्यवसाय मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..............

असुधारित प्रत

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी सूचना या सभागृहामध्ये येण्यापूर्वी ही लक्षवेधी सूचना केवळ या सभागृहात येऊन या मच्छीमार बांधवांना न्याय मिळावा, याकरिता ही लक्षवेधी सभागृहात आता मांडण्यात आलेली नाही. मी आपल्याला थोडासा इतिहास सांगतो तो कृपया ऐकावा.

अध्यक्ष महोदय, मौजे साखरीआगर ता. गुहागर येथे मच्छीमारांकरिता जी जेटी आहे ती, सन २०११-२०१२ ला मंजूर झाली. सन २०१२-२०१३ ला त्याला वर्कऑर्डर दिली. सन २०१३-२०१४ मध्ये प्रत्यक्षपणे कामाला सुरुवात झाली. मंत्री महोदयांना मला सांगितले पाहिजे की, आपले निवेदन आणि मी करीत आहे ते निवेदन यातील तफावतीची आपण कृपया नोंद घ्यावी. कारण हा मतदारसंघ माझा आहे. मी स्वत: या सर्व गोष्टींच्या बाबतीत पाठपुरावा करणारा सदस्य आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०१४ मध्ये कॉंट्रॅक्टरने काम बंद केले. आज या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनामध्ये मंत्री महोदयांनी असे नमूद केले आहे की, ज्यावेळेस ह्या जेटीची वर्कऑर्डर दिली त्यावेळेस एमसीझेडएमएची म्हणजे सीआरझेडची परवानगी घेतली नव्हती. परंतु, मंत्री महोदय आपल्याला अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर खोटे आहे.

अध्यक्ष महोदय, ज्यावेळेस वर्कऑर्डर दिली त्यावेळेस अशा पध्दतीने अशा मच्छीमारांकरिता जेटी बांधण्याकरिता सीआरझेडची परवानगी घ्यावी, अशी कायद्यामध्ये तरतूदच नव्हती. तरतूद नसताना वेळ मारुन नेली ती आपल्या कशी अंगलट येईल याकरिता अधिकाऱ्यांनी दिलेले हे उत्तर आहे, याची मंत्री महोदयांनी नोंद घ्यावी.

अध्यक्ष महोदय, तत्कालीन मंत्री श्री.महादेव जानकर यांच्याकडे दि. २४ जून, २०१९ रोजी हा जेटीचा प्रश्न सुटावा याकरिता बैठक झाली. त्यानंतर सातत्याने संबंधित खाते, संबधित अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार झाला. त्यानंतर दि. ७ जुलै, २०२१ रोजी राज्याचे उप मुख्यमंत्री माननीय श्री.अजित पवार यांच्या उपस्थितीत त्यांच्या दालनात बैठक झाली. ती बैठक होत असताना शेवटचा मास्टर स्ट्रोक व

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव ....

रामबाण उपाय व निश्चित स्वरुपी येथील काम मार्गी लागेल या उद्देशाने त्या दिवशी आपण बैठक लावली.

अध्यक्ष महोदय, त्या बैठकीचे संपूर्ण प्रोसिडिंग माझ्याकडे आहे. त्या प्रोसिडिंगबाबत सांगून मी आता वेळ घेत नाही. त्या बैठकीमध्ये सर्व ऐकून घेतल्यानंतर माननीय उप मुख्यमंत्री यांनी निर्णय दिला की, आता हे काम होण्याकरिता म्हणून आपण एकतर डीपीसी, सागरमाला योजना, आरकेव्हीवाय योजना किंवा राज्य शासनाच्या बजेटमधून ही जेटी बांधून घ्यावी, अशा प्रकारचा तेथे निर्णय झाला.

अध्यक्ष महोदय, मी आज येथे जाहीरपणे जबाबदारीने विधान करीत आहे. ही बैठक संपली आणि मी खाली आलो. मी नाव घेऊन सांगतो की, त्यावेळेस मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव श्री.अतुल पाटणे यांनी तेथेच थोड्याफार विरोधाची भूमिका घेतली होती.

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव...

श्री.अजित पवार यांनी सांगितले तरी मी पैसे देणार नाही, असे श्री.अतुल पाटणे यांनी मला स्पष्ट विधान करुन सांगितले. मला लोकांचे काम करावयाचे होते. सदरहू अधिकारी यांनी "राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सांगितले तरी", असा आदरार्थी शब्दप्रयोग केला नाही. आपण नेहमी म्हणत असतो की, अधिकाऱ्यांशी प्रेमाने वागा, गोड बोला व त्यांचेकडून काम करुन घ्या. आम्ही त्यांचेकडून आमच्या घरचे काम करुन घेत नाहीत. आमच्या भागातील मच्छीमार यांना ज्या ठिकाणी होडी पार्क करतात त्यास नांगरणे म्हणतात. त्या होडी जयगडमध्ये ठेवाव्या लागतात. त्या ठिकाणी त्यांना बर्फ, जाळी व माणसे घेऊन जाण्याकरिता त्रास होतो.

अध्यक्ष महोदय, जेएसडब्ल्यूच्या बोटीने ठोकर दिल्याने सदरहू गावातील ७ माणसे मयत झाल्याची चर्चा आहे. ते बोटी आणण्यासाठी गेले होते. एवढा कालावधी जाऊनही सदरहू जेट्टीचे काम झाले नाही. सदरहू जेट्टीचे काम २.९६ कोटी रुपयांचे होते, ते १२ वर्ष झाले तरी पूर्ण झाले नाही. यामुळे त्या भागातील लोकांनी सन २०१९ मधील लोकसभेच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता. आणखी त्यांनी काय केले पाहिजे ? या प्रकरणी मंत्री महोदयांकडे बैठका घेण्यात आल्या आहेत. सदरहू जेट्टी होऊ नये, अशी अधिकाऱ्यांची नकारात्मक भूमिका का आहे, हे सभागृहाला समजले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये कोकणातील व मच्छीमारांचे प्रश्न चर्चेला नसतात. आज याप्रकरणी मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरातून न्याय मिळणार नाही. बांधकाम विभागाचे प्रश्न सोडविले त्याप्रमाणे हा प्रश्न सोडविला असता तर मी बोललो नसतो. मंत्री महोदयांनी सदरहू जेट्टीच्या कामासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ५ कोटी रुपये निधी देण्यात येईल, असे सांगितले. आम्ही ही लक्षवेधी सूचना जिल्हा नियोजन समितीमधून पैसे मिळण्यासाठी मांडलेली नाही.

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव...

जिल्हा नियोजन समितीमधून पैसे देण्याचा मंत्री महोदयांना हक्क आहे काय ? पालक मंत्री जिल्हा नियोजन समितीमधून पैसे देणार असतील तर त्यासाठी या सर्वोच्च सभागृहामध्ये हा मुद्दा मांडला नाही.

अध्यक्ष महोदय, सदरहू जेट्टीच्या कामकाचे अंदाजपत्रक आजच्या नवीन डीएसआर दरानुसार ८.४३ कोटी रुपये इतके झाले आहे. माननीय उप मुख्यमंत्री यांनी सांगितले आहे की, आता दरसूची बदलली आहे, डीएसआरचे दर बदलले आहेत, आपणास जेवढे काम होईल तेवढे करावे उर्वरित कामासाठी पैसे देण्यात येतील. यासंदर्भात आजतागयात निर्णय झाला नाही.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे की, आरकेव्हीवाय योजना केंद्र शासनाने सन २०२२-२०२३ मध्ये बंद करण्यास सांगितले आहे. आर्थिक वर्ष संपण्यासाठी आणखी १० दिवसांचा कालावधी आहे. सदरहू प्रकरणी माहे जुलै मध्ये बैठक झाली तेव्हा निर्णय घेतला असता तर अशा पद्धतीचे उत्तर आज मंत्री महोदयांनी दिले नसते. यास यंत्रणा संपूर्णपणे जबाबदार आहे. त्यांच्यावर कारवाई करा किंवा करु नका, त्यामध्ये मला रस नाही. आपण त्यांना पदोन्नती द्या, मखरामध्ये बसवा, बिन कामाचे वेतन वाढवून द्या, माझे काही म्हणणे नाही.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय यांनी उत्तर द्यावे की, सदरहू कामासाठी ८.४३ कोटी रुपये इतका संपूर्ण निधी केव्हा वितरित करण्यात येईल ? मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये नमूद केले आहे की, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीमध्ये बैठक घेण्यात येईल. सदरहू बैठक अधिवेशन संपण्यापूर्वी घेण्यात येईल काय ? पुढील १५ दिवसांच्या कालावधीत उक्त कामासाठी ८.४३ कोटी रुपये रक्कम वितरित करुन निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल काय ?

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी सांगितलेली बाब खरी आहे की, सन २०११ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत उक्त कामाच्या

असुधारित प्रत

श्री.अस्लम शेख...

२.९६ लाख रुपयांच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे. सन २०१२ मध्ये उक्त काम करण्यास सुरुवात करण्यात आली होती. परंतु त्या ठिकाणी काम सुरु करीत असताना तेथील लोकांनी त्यास तीव्र विरोध केला, आंदोलने करण्यात आली. त्यामुळे सदरहू काम थांबविण्यात आले. त्यानंतर सदरहू काम पश्चिम बाजूला ८० मीटर अंतरावर स्थलांतरित करण्यात आले. ज्या ठिकाणी सदरहू काम करण्यास मंजुरी देण्यात आली होती तेथे मऊ रेती होती व ज्या ठिकाणी काम स्थलांतरित करण्यात आले त्या भागामध्ये खडक होता. त्यामुळे पायलिंग करावे लागत असल्याने कामाचा स्कोप बदलला. त्यामुळे सदरहू कामाच्या मान्यतेसाठी CWPR कडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास मान्यता मिळाली व १६ लाख रुपयांपर्यंतचे वॉटर बॅकींगचे काम सुरु झाले. सीआरझेड कायदा सन १९८५ मध्ये लागू करण्यात आला आहे. सदरहू काम सन २०११ मधील असल्याने त्यास उक्त कायद्यान्वये नोटीस दिल्यामुळे काम थांबविण्यात आले. त्यानंतर सीआरझेडच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला. सदरहू कामास मंजुरी देण्यापूर्वी सीआरझेडची मान्यता घेण्यात आली असतील तर ते थांबविण्याची आवश्यकता भासली नसती. उक्त कामास सन २०२० मध्ये सीआरझेडची मान्यता मिळाली. त्यावेळचे डीएसआर दर व १० वर्षानंतरच्या डीएसआरच्या दरामध्ये फार मोठा बदल झाला. उक्त काम सुरुवातीस २.९६ कोटी रुपयांचे होते ते आता ८.४३ कोटी रुपयापर्यंत पोहोचले आहे. अशी कामे थेट करण्यासाठी विभागाकडे लेखाशिर्ष नाही, ही बाब खरी आहे. त्यामुळे याप्रकरणी अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर एक आठवड्याच्या आत माननीय वित्त मंत्री यांचेकडे बैठक घेऊ व विचारविनिमय करु. आता आपल्याकडे डीपीआर तयार आहे, सीआरझेडची एनओसी आली आहे, त्यामुळे अधिक वेळ लागणार नाही. माझे बोलणे पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य यांनी हरकत घ्यावी.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझी मंत्री महोदयांच्या उत्तरास हरकत आहे. मंत्री महोदय यांनी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये नमूद केले आहे की, जिल्हा

श्री.योगेश सागर...

नियोजन समितीच्या निधीतून उक्त काम करण्यात येईल. उक्त निधी सदरहू कामासाठी वापरावयाचा असेल तर वेळ लावण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांचे म्हणणे खरे आहे की, सदरहू काम विभागाच्या माध्यमातून झाले पाहिजे. कारण मंत्री महोदयांना जिल्हा नियोजन समितीमधून निधी देण्यासाठी शिफारस करण्यापुरताच अधिकार आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी स्पष्ट प्रश्न विचाराले आहेत की, सदरहू कामाच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री यांचे समवेत अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक घेऊन विभागाच्या माध्यमातून उक्त कामासाठी निधी देऊन तो खर्च करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल काय ? या प्रश्नांची उत्तरे न देता मंत्री महोदय त्याच बाबी पुन्हा सांगत आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य यांचे समाधान होत नाही, हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, आपण हरकतीच्या मुद्यावर रुलींग द्यावे. सभागृहामध्ये सर्व वरिष्ठ मंत्री उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जावध यांनी उपस्थित केलेला विषय गंभीर आहे. त्यांनी या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री यांचे समवेत बैठक घेतली आहे. या विषयाचा निपटारा करण्याचा प्रयत्न माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी केला आहे. सदरहू बैठक झाल्यानंतर विभागाचे एक अधिकारी त्यांना म्हणतात की, श्री.अजित दादा पवार यांनी सांगितले तरी मी एक रुपया निधी देणार नाही. मंत्री महोदय आपल्या उत्तरामध्ये सांगत आहे की, उक्त कामासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी देऊ. याचा अर्थ त्या अधिकाऱ्याने जे सांगितले ते मंत्री महोदय खरे करण्यास निघाले आहेत. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीची पळवाट काढण्यात येत आहे. याचा अर्थ अधिकाऱ्याचा तोरा मोठा आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांचा उल्लेख आम्ही सन्माननीय असा करतो. कारण या सदनाचे सदस्य म्हणून त्यांचा व माझा अधिकार एक आहे. माननीय उप मुख्यमंत्री यांनी बैठक घेतल्यानंतरही विभागाच्या माध्यमातून उक्त कामासाठी पैसे खर्च करणार नाही, असे तो अधिकारी म्हणतो. त्याची भूमिका मंत्री महोदय मांडत आहेत. हे त्यांचे उत्तर आम्हाला मान्य नाही.

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार...

अध्यक्ष महोदय, आपण या प्रकरणी निर्देश द्यावेत. या सभागृहातील एक सन्माननीय सदस्य यांनी कोकणातील ७ लोक मयत झाल्याचे सांगितले आहे. त्यानंतरही १२ वर्षे प्रलंबित प्रश्नाच्या संदर्भात अधिकारी सांगतो तेच खरे होणार असेल तर या सदनामध्ये बसण्याचा काही अर्थ राहणार नाही.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार....

अध्यक्ष महोदय, आपण आमचे रक्षक आहात. त्यामुळे आपण मंत्री महोदयांना निदेश दिले पाहिजे. विभागाच्या निधीतून सदर काम किती दिवसांमध्ये करणार असा प्रश्न आपण विचारणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, माझे पूर्ण उत्तर ऐकले असते तर असा प्रसंग उद्भवला नसता. सद्य:स्थितीत सदर कामासाठी ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सदर कामाची किंमत २ कोटी ९६ हजार पासून ८ कोटी ४३ लाख रुपयांपर्यंत वाढलेली आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांना सांगू इच्छितो की, आपण मला उत्तर देऊ द्यावे. त्यानंतर आपणास प्रश्न विचारण्यासाठी संधी दिली जाईल. मला माझे उत्तर तरी पूर्ण करु द्यावे.

अध्यक्ष महोदय, पूर्वी मत्स्य कामासाठी डीपीडीसीच्या माध्यमातून ३० लाख रुपये उपलब्ध करुन देता येत होते. परंतु आता त्यात वाढ करुन ५ कोटी रुपयांपर्यंत निधी उपलब्ध करुन देता येतो. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांच्या मतदारसंघातील कामासाठी ८ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी लागणार आहे. त्यामुळे मी सांगितले की, याबाबत माननीय अर्थ मंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन डीपीडीसीच्या....

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष महोदय, मी उत्तर देत आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांच्या मते माननीय श्री.अजित पवार यांच्यासोबत बैठक घेतली आणि संबंधित अधिकाऱ्यानी

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष.......**

पूर्वीप्रमाणेच भूमिका घेतली तर या सर्व प्रक्रियेला काहीही अर्थ राहणार नाही. त्यामुळे आपल्याकडून त्यांना ठोस निर्णयाची अपेक्षा आहे.

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सांगितलेल्या अधिकाऱ्याची १०० टक्के दोन महिन्यांच्या आत चौकशी करुन.....

**तालिका सभाध्यक्ष :** एका अधिकाऱ्याची चौकशी करण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी कशासाठी लागतो? मंत्री महोदय आपण सन्माननीय सदस्यांच्या भावना समजून घ्याव्यात. असे उत्तर देऊन चालणार नाही.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, संबंधित अधिकाऱ्याची अधिवेशनानंतर सात दिवसांमध्ये चौकशी करुन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. मला उत्तर देऊ द्यावे. कारण यामध्ये जेटीचा मुद्दा खूप महत्त्वाचा आहे. सदर कामासाठी ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची आवश्यकता असल्यामुळे याबाबत माननीय अर्थ मंत्री यांच्यासोबत बैठक घेऊ. उक्त बैठकीसाठी जिल्हाधिकारी यांना देखील पाचारण करण्यात येईल. कोणत्याही प्रकरच्या emergency कामासाठी विभागाकडे निधी उपलब्ध नसतो. उक्त प्रकरणी माननीय अर्थ मंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन १५ दिवसांच्या आत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : संबंधित अधिकाऱ्यावर काय कारवाई करावयाची आहे ती आपण करावी, अशी माझ्यासह सभागृहाची भावना आहे. त्या अधिकाऱ्यांना प्रमोशन द्यावे, त्यांना पालखीमध्ये बसवावे, असे सांगितले आहे. त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणीच केली नाही. मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न सोडविणे हे आमच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. मंत्री महोदय, सभागृहाची दिशाभूल करीत आहेत किंवा त्यांना संबंधित अधिकाऱ्यांने व्यवस्थित ब्रिफिंग केलेली नाही, असे मला वाटते.

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव......

अध्यक्ष महोदय, सदर रकमेस अधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता देखील दिलेली नाही. माहे जुलै, २०२१ मध्ये माननीय श्री.अजित पवार यांनी बैठक घेतली होती. तरी देखील सदर कामास अद्याप मान्यता दिलेली नाही. उक्त बैठकीचे कार्यवृत्त माझ्या हातामध्ये आहे. सदर रकमेस प्रशासकीय मान्यता देखील देण्यात आलेली नाही. मी पैसे देणार नाही, असे श्री.अतुल पाटने यांनी सांगितले आहे. मी त्यांचे नाव देखील सांगत आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेला विषय महत्त्वाचा आहे. आपण अधिकाऱ्यांचा शब्द खरा करणार आहात की सदर कामासाठी निधी उपलब्ध करुन देऊन सरकार म्हणून आम्ही सांगू ते होईल, हे सिद्ध करणार आहात?

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, मी मघाशीच सांगितले आहे की, १५ दिवसांच्या आत माननीय अर्थ मंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन उक्त प्रकरणी योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मी ट्रेझरी बेंचचा सदस्य असून देखील मी मागणी करतो की, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी. एका कामासाठी १२-१२ वर्षे संघर्ष करावा लागत असेल तर ही गंभीर बाब आहे. ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, उक्त प्रकरणी पुन्हा बैठक घेण्यात येईल, असे मंत्री महोदय उत्तर देत आहेत. परंतु या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी नमूद केले आहे की, "प्रशासकीय मान्यतेमधील नमूद जेटीवर असलेले शिल्लक काम वगळता उर्वरित मंजूर बाबींसाठी इतर योजनांमधून निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, असे आदेश माननीय उप मुख्यमंत्री यांनी दिले."

अध्यक्ष महोदय, आदेश दिले. त्यानंतर बैठक देखील घेण्यात आली. हे अधिवेशन संपल्यानंतर पुढील आठवड्यामध्ये बैठक घेण्यात येईल, असे मंत्री महोदय उत्तर देत आहेत. परंतु उक्त विषयाच्या संदर्भात एक बैठक घेतलेली आहे.

असुधारित प्रत

श्री.योगेश सागर.......

त्यामुळे आता आपण स्थानिक नागरिकांना न्याय देणार आहात काय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, मी स्पष्ट उत्तर दिले आहे की, माननीय उप मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे पुढील दोन महिन्यांच्या आत सदर कामाचा निकाल लावण्यात येईल.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये धाकटी डहाणू येथील जेटीमध्ये सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी १० कोटी रुपयाचे टेंडर काढण्यात आले होते. त्यानंतर अडीच वर्षानंतर मत्स्य विभागाकडून असे सांगण्यात आले आहे की, सीआरझेडची परवानगी नाही म्हणून आम्ही तेथे कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देऊ शकत नाही. आपण मच्छीमार लोकांची का फसवणूक करीत आहात? जर सीआरझेडची परवानगी नव्हती तर आपण १० कोटी रुपयांचे टेंडर का काढण्यात आले होते? तेथील मच्छीमार लोकांचे प्रचंड हाल होत आहेत.

अध्यक्ष महोदय, हा मच्छीमार लोकांचा विषय आहे. मला बोलण्याची संधी द्यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने प्रश्न उपस्थित करावा.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, मी मच्छीमार लोकांचाच प्रश्न उपस्थित करीत आहे.

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, मागील सरकारच्या किंवा त्यापूर्वीच्या सरकारच्या काळामध्ये अशा प्रकारचा प्रस्ताव तयार करताना सीआरझेची परवानगी घेतली जात नव्हती. म्हणून आम्ही देखील consultancy hire केलेली आहे. आता जेवढे प्रस्ताव प्राप्त होतील, त्या सर्व प्रस्तावास consultancy ने एनओसी दिल्यानंतर पुढील कार्यवाही करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांचा प्रस्ताव

श्री.अस्लम शेख.......

देखील या बाबीमुळेच प्रलंबित राहिलेला आहे. टेंडर काढण्यापूर्वी सीआरझेची परवानगी घेतली असती तर उक्त प्रकल्प प्रलंबित राहिला नसता.

श्री.भास्कर जाधव : मंत्री महोदयांच्या पुन्हा-पुन्हा लक्षात आणून देऊ इच्छितो की, सीआरझेची परवानगी घेणे हे तेथील मच्छीमार लोकांचे काम नाही. हे मत्स्य विभागाचे काम आहे. उक्त प्रस्तावास सीआरझेची परवानगी नव्हती तर आपण टेंडर का काढले ? सीआरझेची परवागनी घेण्याचा प्रश्न आपल्या विभागाचा आहे. तो प्रश्न मच्छीमार लोकांकडे देऊ नका, अशी मी विनंती करतो. मी आता या संदर्भात जास्त बोलू इच्छित नाही. माननीय श्री.अजित पवार आता सभागृहामध्ये उपस्थित आहेत. तसेच माननीय मत्स्य विकास मंत्री देखील सभागृहामध्ये उपस्थित आहेत.

अध्यक्ष महोदय, मागील सरकारमधील मत्स्य विकास मंत्री महोदयांकडे देखील बैठक घेतली होती. उक्त कामासाठी मी अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहे. याबाबतचे सर्व पुरावे माझ्याकडे उपलब्ध आहेत. आता शेवटचा मास्टरस्ट्रोक म्हणजे माननीय श्री.अजित पवार यांच्यासोबत बैठक घेणे. सदर प्रश्न आज सुटला नाही तर हा प्रश्न पुन्हा कधीही सूटणार नाही, असे तेव्हाच्या बैठकीमध्ये माननीय श्री. अजित पवार यांना सांगितले होते. बैठक घेऊन देखील हा प्रश्न सूटला नसल्यामुळे मी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. हा माझा वैयक्तिक प्रश्न नाही. मी ट्रेझरी बेंचचा सदस्य असलो तरी मी विनंती करीत आहे की, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी. अन्यथा सदर मच्छीमारांना न्याय देऊ शकत नाही, असे स्पष्ट सांगावे. असे सांगितले तरी माझी काहीही हरकत नाही. परंतु आपण पुन्हा बैठक घेऊ असे उत्तर देत असाल तर ते मला मान्य नाही. मला सभात्याग करावा लागेल.

श्री.अजित पवार : उक्त विषयासंदर्भात माझ्या दालनामध्ये बैठक झाली होती. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सांगितलेल्या सर्व बाबी बरोबर आहेत. त्याबद्दल दुमत असण्याचे कोणतेही कारण नाही.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

श्री. अजित पवार....

माननीय मंत्री श्री. अस्लम शेख, माननीय पालकमंत्री ॲड. अनिल परब यांच्यासोबत मी एक बैठक आयोजित करतो. त्याबैठकीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनाही बोलविण्यात येईल. तसेच संबंधित आयुक्तांनाही या विषयाबाबत शांतपणे समजावून सांगण्यात येईल. त्यांनी जर ऐकले नाही तर त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविले जाईल. याबाबत कोणतीही हयगय केली जाणार नाही. समजावून सांगून हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल. मी सांगू इच्छितो की, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गतचा निधी पालकमंत्र्यांना विचारल्या शिवाय देता येत नाही. तरीही एकत्र बसून यातून मार्ग काढला जाईल. तसेच याकरिता कोठून निधी उपलब्ध करुन देता आला नाही तर राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

-----

असुधारित प्रत

**माहितीच्या मुद्द्याबाबत**

श्री मंगलप्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फोर्मेशन है.

अध्यक्ष महोदय, कल सम्माननीय शिक्षण मंत्री जी ने कहा कि हम महाराष्ट्र में शिक्षा के कुछ अध्याय में परिवर्तन कर रहे है. मेरा सरकार से निवेदन है कि क्या श्रीमद् भगवत गीता शिक्षा में शाामिल किया जाने वाला है? श्रीमद् भगवत गीता केवल एक धार्मिक ग्रंथ नहीं है. जीवन का सार है. सारे भारत में उसको शिक्षा में शामिल किया जा रहा है. सरकार से मेरा निवेदन है कि महाराष्ट्र के एज्युकेशन सिस्टम में भी श्रीमद् भगवत गीता का अध्याय डाला जाए.

-------

असुधारित प्रत

पृ.शी. : भा.दं.वि. कलम ३३२ व ३५३ चा गैरवापर होत असल्याबाबत

मु.शी. : भा.दं.वि. कलम ३३२ व ३५३ चा गैरवापर होत असल्यासंबंधी ॲड. आशिष जयस्वाल, डॉ. बालाजी किणीकर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड. आशिष जैस्वाल (रामटेक) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यात शासकीय अधिकाऱ्यांकडून मोठया प्रमाणात भा.दं.वि. कलम ३३२ व ३५३ चा गैरवापर होत असल्याच्या घटनेत वाढ होत असल्याचे उघडकीस येणे, कोणाचाही वाद झाल्यास किंवा कुठल्याही कर्मचाऱ्यांना विचारणा केल्यास शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याची तक्रार देऊ, अशी धमकी दिली जाणे व खोट्या तक्रारी होणे, पोलीसांनी तात्काळ दखल व अटक करणे, परिणामी सामान्य जनतेची होत असलेली पिळवणूक, कायद्यात झालेली सुधारणा ही ढाल म्हणून वापरण्याऐवजी त्याचा शस्त्र म्हणून वापर होणे, मागील हिवाळी अधिवेशनात मा. मंत्री (गृह) यांनी या कायद्याचा गैरवापर होत असल्याचे मान्य करून कायद्यात सुधारणा करण्याचे आश्वासन देवूनही त्याची पुर्तता न होणे, कायदा पारित करतानाही याचा गैरवापर झाल्यास पुनर्विचार करून सुधारणा करू असेदेखील आश्वासन दिले असताना याबाबत आढावा न घेतल्यामुळे राज्याच्या जनतेची होत असलेली कुचंबणा, लोकप्रतिनिधी व सर्व स्तरावरून मागणी होत असताना याबाबत शासनाने निर्णय घेण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

श्री. दिलीपराव वळसे-पाटील (गृह मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**(प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

ॲड. आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षासोबत कोणत्याही प्रकारे चर्चा न करता तत्कालीन शासनाने या कायद्यात दुरुस्ती केली आहे. एखादा गुन्हेगार सुटला तरी हरकत नाही, परंतु निरपराध व्यक्तीला शिक्षा होऊ नये, असे आपल्यात कायद्यात आहे. या कायद्याची अंमलबजावणी करीत असताना या संदर्भात वारंवार चर्चा झालेली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनीही याबाबत पुनर्विचार करण्यात येईल, असे आश्वासन एक वर्षापूर्वी दिले होते. विद्यमान मंत्री महोदयांनीही याबाबत आश्वासन दिले होते. आज राज्यात ग्रामसेवक, तलाठी भा.दं.वि. कलम ३५३ अन्वये गुन्हा दाखल केला जाईल, अशा प्रकारे लोकांना धमकावत आहेत. निरपराध माणसांना शिक्षा होत आहे. या कायद्याचा गैरवापर होत आहे. सर्वांना कायद्याचे संरक्षण मिळाले पाहिजे. गंभीर दुखापत करणे हा गुन्हा आहे. तो कोणीही केला तरी त्यांना शिक्षा झाली पाहिजे. परंतु या कायद्याला सेशन ट्रायल करुन शिक्षा वाढवावी. यात कोणतीही अडचण नाही. माननीय न्यायालय गुन्हेगारास जी शिक्षा देईल ती त्याने स्वीकारली पाहिजे. परंतु अनेक प्रकरणात खोटे गुन्हे दाखल केले जातात. त्या प्रकरणात जामिन मिळण्यासाठी लोकांना एकेक महिना चकरा माराव्या लागतात. यात सामान्य माणसांना त्रास सहन करावा लागत आहे. यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे आणि तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान मंत्री महोदयांनी आश्वासन दिले आहे. जामिन मिळू नये म्हणून या कायद्यात सुधारणा करुन सेशन ट्रायल केले आहे. निरपराध लोकांनाही जामिन मिळत नाही. यात गंभीर दुखापत असली पाहिजे. मारहाण झाली नसेल, कॉलर पकडली नसेल तरीही कलम ३५३ अनुसार खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. त्यामुळे गंभीर दुखापत झालेल्या प्रकरणातच हे गुन्हे दाखल केले जातील काय आणि चुकीच्या सुधारणांचा पुनर्विचार करुन त्या बदलण्यात येणार आहेत काय ?

श्री. दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी या कायद्याबाबत भावना व्यक्त केल्या आहेत. सन २०१८ मध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री. सुनिल प्रभू आणि राधाकृष्ण विखे-पाटील यांनी हा प्रश्न हक्कभंगाच्या माध्यमातून उपस्थित केला होता. सभागृहात कलम ३५३ बाबत चर्चा झाली होती. त्यावेळेस याकरिता एक समिती गठीत करण्याचा निर्णय झाला होता. तत्कालीन

असुधारित प्रत

श्री. दिलीपराव वळसे-पाटील .....

मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५ जानेवारी, २०१९ रोजी समिती स्थापन झाली होती. तद्नंतर या समितीची कोणतीही बैठक झाली नाही. यावर्षी सुद्धा सन्माननीय सदस्य ॲड. आशिष जैस्वाल यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. काही कारणामुळे त्या समितीची पुनर्रचना करण्याचे राहिले आहे. ती केल्यानंतर या कायद्याचे लवकरात लवकर पुनर्निरिक्षण करुन सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

डॉ. संजय कुटे : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेनिमित्ताने अतिशय महत्त्वाच्या विषयाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. जानेवारी, २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन झाल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. त्यानंतर एकही बैठक झालेली नाही. आता मंत्री महोदयांनी सांगितले की, सुधारणा करण्यात येईल, सदस्य घेण्यात येतील. परंतु याकरिता दोन वर्षाचा विलंब झाला आहे. या विलंबाची कारणे काय आहेत ? तसेच सदर समितीमध्ये काही सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले. परंतु या समितीची बैठक झालेली नाही, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. असे असेल तर या सुधारणा कोणी प्रस्तावित केल्या आहेत ? बैठक झाली नसेल तर या सुधारणा कशा झाल्या आहेत ? यात विसंगती आढळून येत आहे. यात कोणत्या सुधारणा केल्या आहेत ? हे सभागृहाला समजले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, कलम ३५३ चा गैरवापर कसा होतो, हे मी सांगू इच्छितो. छत्रपती संभाजी महाराजांचे आझाद मैदान येथे उपोषण सुरु होते. त्यावेळेस माननीय ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत हे काही कामानिमित्त शेगाव येथे आलेले होते. तेथे श्री. अमित जाधव व त्यांच्या १२ वर्षाच्या मुलाने छत्रपती संभाजी महाराजांच्या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी प्रयत्न केला होता. त्यावेळेस त्यांच्यावर कारवाई झाली होती. चुकीचे झाले असेल आणि कारवाई झाली असेल तर त्याबाबत आमचा आक्षेप नाही. परंतु दीड महिन्यानंतर त्यांच्यावर कलम ३५३ चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा घडल्यानंतर लगेच गुन्हा दाखल केला तर आपण समजू

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे .....

शकतो. परंतु दीड महिन्यानंतर गुन्हा दाखल करण्याचे कारण काय ? याबाबत मी माहिती घेतली होती. त्यावेळेस मला अधिकाऱ्यांनी ऑन रेकॉर्ड सांगितले की, माननीय मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी पाठपुरावा करुन पत्र दिले की, मराठा समाजाच्या व्यक्तीवर पोलिसांनी साधा गुन्हा दाखल केला आहे. त्या व्यक्तीवर कलम ३५३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा, असे त्यांनी त्यात सांगितले. पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या निर्देशानुसार आम्ही त्या प्रकरणी कलम ३५३ चा गुन्हा दाखल केला आहे, असे त्यांनी मला सांगितले. हा गुन्हा दीड महिन्यानंतर दाखल करण्यात आला आहे. आंदोलन केल्यानंतर त्यांच्यावर कारवाई केली असेल तर त्याबाबत दूमत नाही. मंत्री महोदयांना अडविणे हा गुन्हा आहे. परंतु दीड महिन्यानंतर कलम ३५३ चा गुन्हा कशा प्रकारे दाखल करता येतो ? मी विनंती करतो की, या प्रकरणात दाखल करण्यात आलेला कलम ३५३ अन्वयेचा गुन्हा मागे घेण्यात यावा. तसेच लक्षवेधी सुचनेच्या निवेदनात शेवटी सांगितले आहे की, समितीमध्ये काही सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. या सुधारणा कोणत्या आहेत ? कलम ३५३ मध्ये सुधारणा करुन जनतेला आणि लोकप्रतिनिधींनाही संरक्षण मिळाले पाहिजे. यातील सुवर्णमध्य राज्य सरकार कशा प्रकारे काढणार आहे ?

श्री. दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, या कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भात आणि विचारविनियम करण्यासंदर्भात समिती गठीत केली होती. सुरुवातीला या समितीच्या बैठका होऊ शकल्या नाहीत. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर समितीच्या रचनेत बदल करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला होता. त्या समितीला मान्यता मिळू शकली नाही. मी सांगू इच्छितो की, हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे ज्या सुधारणा करावयाच्या असतील त्या करण्याच्या दृष्टीकोनातून जे स्टेक होल्डर्स असतील त्यांची मते समजून घेतली जातील. हे अधिवेशन संपण्यापूर्वी विरोधी पक्षाच्या आणि सत्तारुढ पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांची एक बैठक आयोजित करण्यात येईल. त्या बैठकीत याबाबत विचार केला जाईल व पुढील दिशा ठरविण्यात येईल. मी सांगू इच्छितो की, कायद्यामध्ये सुधारणा

श्री. दिलीपराव वळसे-पाटील ....

सुचविलेल्या नाहीत. समितीच्या रचनेमध्ये सुधारणा करण्यासंदर्भातील तो प्रस्ताव होता.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

श्री.दिलीपराव वळसे-पाटील.....

अध्यक्ष महोदय, कुठलाही गुन्हा दाखल झाल्यानंतर तो मागे घेण्याबाबत ठराविक प्रक्रिया आहे... (अडथळा...) बरोबर आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर तो मागे घेण्याबाबतची प्रक्रिया ठरलेली आहे. त्याचा विचार करुनच निर्णय घेता येईल. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेल्या प्रकरणाची सविस्तर माहिती मला द्यावी. मी त्याबाबत माहिती घेऊन आवश्यक त्या सुधारणा करण्याचा प्रयत्न करीन.

श्री.नितेश राणे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय अतिशय सकारात्मक उत्तर देत आहेत. तसा विचार केला तर आम्ही सर्वजण फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५३ अन्वयेच्या गुन्हयाचे लाभार्थी आहोत. त्यातल्या त्यात आम्ही तर उठल्या-सुटल्या लाभार्थी आहोत. यामध्ये सत्ताधारी किंवा विरोधक हा मुद्दा नाही. आपण दोन-दोन तीन-तीन लाख लोकांमधून निवडून येणारे लोकप्रतिनिधी आहोत. आपण कुठल्याही अधिकाऱ्याकडे घरचे काम घेऊन जात नाहीत. तरीही अधिकारी ज्या पध्दतीने वागतात त्या परिस्थितीनुसार आम्हाला तशी भूमिका घ्यावी लागते. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, यासंदर्भात आपण जी समिती गठीत करणार आहात ती लवकरात लवकर करावी. कारण एक-दोन महिन्यांमध्ये या गुन्हयाचे आणखी तीन-चार लाभार्थी वाढतील. हा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही वारंवार हा विषय मांडत आहोत. काही अधिकारी चांगले आहेत व ते चांगले काम करतात त्याबद्दल दुमत नाही. परंतु अनेक जण या कायद्याचा गैरफायदा उचलत आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे की, यामध्ये आपण लक्ष घालून लवकरात लवकर निर्णय घ्यावा. तसे मंत्री महोदय करणार का ?

श्री.दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला नम्रपणे सांगू इच्छितो की, फौजदारी प्रक्रिया संहितेमधील कलम ३५३ हे केवळ लोकप्रतिनिधींपुरतेच मर्यादित नसून लोकसेवकांना देखील लागू आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये कर्मचारी व डॉक्टरांवर बऱ्याचदा हल्ले होतात, सरकारी कार्यालयांमध्ये हल्ले होतात या सर्व बारीक गोष्टींचा विचार केला पाहिजे. केवळ लोकप्रतिनिधींवरच कलम ३५३ अन्वये गुन्हे दाखल होतात असे मानण्याचे

श्री.दिलीपराव वळसे-पाटील.....

काहीही कारण नाही. त्यामुळे यासंदर्भात सर्वंकष विचार केल्याशिवाय निर्णय घेणे उचित होणार नाही. लवकरात लवकर यासंदर्भात बैठक घेऊन मार्ग काढण्याचा आपण प्रयत्न करु.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, या विषयासंदर्भात यापूर्वी देखील दोन-तीन वेळा सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. तत्कालीन सन्माननीय सदस्य व आताचे माननीय मंत्री श्री.बच्चू कडू यांच्यावर कलम ३५३ अन्वये गुन्हा दाखल झाल्यानंतर या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आम्ही सभागृहाचे कामकाज बंद पाडून तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती. कधी-कधी सभागृहामध्ये आपण नेमके कोणते कायदे पारित करीत आहोत याचे गांभीर्य लक्षात येत नाही त्याचा हा पहिला फटका आहे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी दिलेलेच उत्तर आताचे माननीय गृह मंत्री देखील देत आहेत. हा कायदा लोकप्रतिनिधींसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीच्या वायरमनला जरी आपण काही बोललो तरीही या कायद्यानुसार गुन्हा दाखल होतो. गावात वेळेवर पाणी आले नाही म्हणून ग्रामपंचायतीतील एखाद्या कर्मचाऱ्याला काही बोलले तरीही हा कायदा लागू होतो. त्यामुळे हे लोकशाहीचे राज्य आहे की अधिकाऱ्यांचे आहे, असा प्रश्न पडतो. कारण सामाजिक कार्यकर्त्यांनी एखाद्या चुकीच्या गोष्टीविरुध्द आवाज उठवायचा म्हटले तरीही हा कायदा त्यांच्यासाठी मोठा अडथळा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष जैस्वाल यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून अतिशय महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. परंतु मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये "लवकरात लवकर" असा शब्दप्रयोग केला आहे. लवकरात लवकर या शब्दप्रयोगाची या सभागृहाला एवढी सवय लागली आहे की त्यांना माहिती आहे याबाबत पुढील अधिवेशनापर्यंत देखील कार्यवाही होणार नाही. त्यामुळे यासाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित केला पाहिजे. तसे केले नाही तर उद्या अशी अवस्था होईल की गावामध्ये पाणी आले नाही म्हणून सरपंचाला पाणी

असुधारित प्रत

श्री.प्रकाश आबिटकर.....

सोडणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यालाही काही बोलता येणार नाही. सामान्य माणसांसाठी देखील या कायद्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. यामध्ये केवळ शिक्षा कमी करण्यात आलेली आहे. इतर सर्व तरतुदी तशाच आहे. डॉक्टरांसाठी हा कायदा असल्याचाही आपण उल्लेख केला. डॉक्टरांसाठी आपण अनेक कायदे केले आहेत व अजूनही करु. शेवटी चांगले कायदे होऊन त्यांचा धाक बसला पाहिजे हे जेवढे खरे आहे तेवढाच त्यांचा गैरवापर देखील होता कामा नये या उद्देशाने याकडे पाहून कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, कलम ३५३ चा पोलिसांच्या माध्यमातून कसा गैरवापर होतो याची वस्तुस्थिती अनेक सन्माननीय सदस्य मांडत आहेत. माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले आहे की, अधिवेशन संपण्यापूर्वी सर्वपक्षीय नेत्यांची बैठक घेऊन यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये शिवसेना पक्षाचे २२ नगरसेवक आहेत. या शहरामध्ये आदरणीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कलादालन व्हावे यासाठी स्थायी समितीची बैठक सुरु असताना त्यांनी आंदोलन केले. त्या दरम्यान फक्त माईकची तोडफोड झाली. त्यामुळे त्यांच्यावर इतर काही कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला तो त्यांना मान्य आहे परंतु कलम ३५३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्यामुळे या सर्व नगरसेवकांना ठाणे न्यायालयात जाऊन न्याय मागावा लागला. त्यांना न्यायालयाने अद्यापपर्यंत अंतरिम जामीन दिलेला आहे ती त्यातल्या त्यात दिलासा देणारी बाब आहे. परंतु आता एका आठवडयात या गुन्हयाचे चार्जशीट दाखल होणार आहे. त्यानंतर त्यांना अटक झाली तर सर्व २२ नगरसेवकांना अटक करावी लागेल. माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक घेऊन निर्णय घेऊ, कायद्यामध्ये बदल करु. परंतु त्यासाठी काही कालावधी लागणार आहे. डॉक्टरांवर हल्ले झाले असतील, शासकीय अधिकाऱ्यांवर हल्ले झाले असतील व कलम ३५३ अन्वये गुन्हे दाखल झाले असतील तर हरकत नाही.

श्री.प्रताप सरनाईक.....

असे गुन्हे सिध्द होऊन संबंधितांना शिक्षा देखील झाली पाहिजे. परंतु चुकीच्या पध्दतीने राजकीय द्वेशातून काही लोकप्रतिनिधींवर या कायद्यान्वये गुन्हे दाखल झालेले असतील तर आपण आजच्या आज राज्यातील सर्व पोलीस अधीक्षक व पोलीस आयुक्तांना जाणिवपूर्वक दाखल करण्यात आलेले गुन्हे रद्द करण्याबाबत निर्देश देणार का ?

श्री.दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या प्रकरणाची माहिती मागवून घेऊन वस्तुस्थिती तपासून आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.

श्री.श्यामसुंदर शिंदे : अध्यक्ष महोदय, माझा अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. माझ्या मतदारसंघात लिंबोटी धरण आहे. धरणाच्या आसपासच्या शेतकऱ्यांना एका बाजुवरुन दुसऱ्या बाजुवर जाण्यासाठी सुमारे २५ किलोमीटर अंतर पार करावे लागते. त्यामुळे माननीय मंत्री श्री.अस्लम शेख यांना माझा प्रश्न आहे की, सदर ठिकाणी जेट्टी बांधून द्याल का ?

श्री.मंगेश चव्हाण : अध्यक्ष महोदय, एखाद्या लोकसेवकाला त्याचे कर्तव्य बजावताना काही अडथळा आणला तर लोकप्रतिनिधीवर कलम ३५३ अन्वये गुन्हा दाखल केला जातो. परंतु एखादा लोकप्रतिनिधी मोर्चात्मक स्वरुपात एखाद्या अधिकाऱ्याकडे काही मागणी घेऊन जातो त्यावेळी देखील त्याच्यावर कलम ३५३ अन्वये गुन्हा दाखल होतो व त्याचा पीडित मी स्वत: आहे. महावितरणशी संबंधित प्रश्न घेऊन शेतकऱ्यांच्या आंदोलनामध्ये मी सहभागी झालो त्यावेळी माझ्यासह ३० लोकांना या सरकारने तुरुंगात डांबले. या सरकारने आमच्यावर १२ दिवस अमानुषपणे अत्याचार केले. २ नंबरच्या गुन्हेगार लोकांना पंचतारांकित सुविधा दिल्या जातात परंतु आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना जेवण देखील दिले गेले नाही. कायदा सर्वांसाठी सारखा आहे ही बाब मला मान्य आहे. आमच्या एखाद्या मागणीसंदर्भात ज्यावेळी आम्ही लोकसेवकाकडे मोर्चात्मक स्वरुपात जातो व आम्ही देखील कलम १९ अंतर्गत त्याच संज्ञेत मोडत असताना आमच्यावर

श्री.मंगेश चव्हाण.....

गुन्हे कसे दाखल होऊ शकतात, हा माझा माननीय गृह मंत्र्यांना प्रश्न आहे. ज्याप्रमाणे लोकसेवक त्याचे कर्तव्य बजावत असतो त्याप्रमाणे आम्ही देखील लोकप्रतिनिधी म्हणून आमचे कर्तव्य बजावत असतो. असे असताना लोकप्रतिनिधीवर गुन्हा दाखल होऊ शकतो का ? जर अशा प्रकारचे खोटे गुन्हे दाखल झाले असतील तर आपण ते मागे घेणार का ?

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)**

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या अंतर्गत जे जे गुन्हे आहेत त्या गुन्ह्यांच्या संदर्भात अशा प्रकारची कोणतीही घटना घडली तर त्यासंबंधी गुन्हा दाखल करण्याचा संपूर्ण अधिकार आहे. त्यामध्ये लोकप्रतिनिधी आहे किंवा अन्य कोण आहे, अशा कोणालाही सवलत नाही.

अध्यक्ष महोदय, मी या सभागृहाच्या लक्षात आणून देतो तसेच ही बाब मी यापूर्वी सुध्दा लक्षात आणून दिलेली आहे. ते म्हणजे नुकतेच आता सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात निर्णय दिला आहे की, आमदार, खासदार, माजी आमदार, माजी खासदार किंवा मंत्री यांच्यावर दाखल झालेले गुन्हे न्यायालयाच्या परवानगीशिवाय मागे घेता येणार नाहीत. आपल्या प्रत्येकाच्या बाबतीत काही ना काही घटना घडली असेल. त्याचे आपण कितीही वर्णन केले तरी त्याचे उत्तर या ठिकाणी नाही असे आहे आणि ते यासाठी आहे की आपल्याला कायद्याची प्रोसेस पूर्ण केल्याशिवाय त्यातून मार्ग काढता येणार नाही. म्हणून मी सांगितले की, या संदर्भात अधिवेशन संपण्यापूर्वी संबंधितांची बैठक घेतो. त्यानंतर पुढील निर्णय घेऊन आणि सर्व स्टेक-होल्डर्सचे म्हणणे समजून घेऊन एका विशिष्ट कालावधीत यासंबंधीचा अंतिम निर्णय आपण घेऊ.

ॲड आशिष जयस्वाल : अध्यक्ष महोदय, या सभागृहाची भावना लक्षात घेता मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते सकारात्मक आहे. या संदर्भात माझी एवढीच विनंती आहे की, जे कोणी स्टेक-होल्डर्स असतील त्यांचे मत पुढील १ महिनाभरात विचारात घ्यावे. पुढील अधिवेशनामध्ये कायदा करण्यासाठी तो विषय विधानसभेमध्ये चर्चेला आणावा आणि पुढील विधानसभेच्या अधिवेशनात अंतिम निर्णय करावा, एवढीच माझी विनंती आहे. या संदर्भात शासन निर्णय घेऊन पुढील अधिवेशनात तसा कायदा आणणार आहे काय ?

असुधारित प्रत

श्री. दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, मी याबाबतची भूमिका अतिशय स्पष्ट केली आहे की, हे अधिवेशन संपल्यापूर्वी त्यासंबंधीची बैठक घेऊन पुढील योजना आखली जाईल.

असुधारित प्रत

**पृ. शी.:** मुंबई उपनगर जिल्ह्यातील अनेक गृहनिर्माण संस्थांना महसूल विभागाने अकृषक आकारणीच्या नोटीसा पाठविणे.

**मु. शी.:** मुंबई उपनगर जिल्ह्यातील अनेक गृहनिर्माण संस्थांना महसूल विभागाने अकृषक आकारणीच्या नोटीसा पाठविणे यासंबंधी सर्वश्री. ॲड आशिष शेलार ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. पराग शाह, श्रीमती विद्या ठाकूर, श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. हिरामण खोसकर, संग्राम थोपटे, कुणाल पाटील, झीशान सिदिद्की, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. धिरज देशमुख, सुरेश वरपुडकर, विकास ठाकरे, अमित झनक, लहू कानडे, सुभाष धोटे, विक्रमसिंह सावंत, बळवंत वानखडे, अमित साटम, अतुल भातखळकर, डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई उपनगरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना महसूल विभागाने अकृषक कराच्या नोटीसा बजावलेल्या असणे, मुंबई उपनगरातील सुमारे २० हजार गृहनिर्माण सोसायट्यांना दरवर्षी अकृषिक कर आकारण्यात येत असणे, ज्यावेळी या सोसायट्यांची बांधकामे झाली त्यावेळी त्यांनी हा कर भरलेला असणे, तसेच मुंबई शहर विभागातील सोसायट्यांना हा कर भरावा लागत नसताना उपनगरातील सोसायट्यांना हा कर भरावा लागत असणे, सन २००८ पासून कर भरण्यासाठी ज्या नोटीस बजावण्यात आल्या होत्या त्याला या अगोदर तत्कालीन महसूलमंत्री यांनी स्थगिती दिलेली असणे, परंतु आता पुन्हा राज्य सरकारच्या महसूल विभागाने या नोटीसा बजावल्या असून याबाबत सोसायट्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होणे, याबाबत

ॲड. आशिष शेलार...

लोकप्रतिनिधींनी पत्राव्दारे ही बाब शासनाच्या लक्षात आणून दिलेली असणे, कोरोनामुळे आधीच सोसायट्यांना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून त्यातच आता या अवाजवी कराचा बोजा आल्याने सोसायट्या अडचणीत आलेल्या असणे, तरी मुंबई उपनगरातील गृहनिर्माण सोसायट्यांना बजावलेल्या सदर अकृषीक कर नोटीसांना त्वरित स्थगिती देण्याबाबत व मुंबई उपनगरातील लावण्यात येत असलेला हा अकृषीक कर कायमस्वरूपी रद्द करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट) :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मुंबईतील नागरिकांसाठी अतिशय महत्त्वाचा हा प्रश्न आहे. विशेषत: मुंबई उपनगरातील नागरिकांसाठी हा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. मला कल्पना आहे की, या सत्तारुढ पक्षाने जो प्रस्ताव मांडला आहे त्यामध्ये सुध्दा या विषयाचा समावेश आहे. या सदनामध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना या विषयावर राजकारण करण्याची इच्छा नसून मुंबईकरांना न्याय मिळावा, अशी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या हातामध्ये दिनांक १.११.२०२१ रोजीची नोटीस आहे. मे.श्रीमती व्ही.एफ.एक्सप्रेस, रिबेलो रोड, बांद्रा यांना आलेली आहे. दुसरी नोटीस सुध्दा दिनांक १.११.२०२१ रोजीची आहे आणि ती नोटीस सेंट सेबेस्टीअन सोसायटी यांना पाठविलेली आहे. तिसरी नोटीस सांताक्रुझ सारस्वत कॉलनी आणि ४ थी नोटीस सालसेट सोसायटी, बांद्रा यांना आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघातील जवळपास ५० टक्क्यांपेक्षा अधिक नागरिकांना या अकृषिक कर आकारणीच्या नोटीस आल्या आहेत. हा विषय वारंवार या सभागृहात चर्चेला येत असतो. माझे असे मत आहे की, या विषया प्रशासकीय स्तरावरील अधिकारी हे निवडून आलेल्या किंवा नियुक्त झालेल्या जनप्रतिनिधींचे म्हणणे ऐकायला तयार नाहीत. मग सरकार तुमचे असो की आमचे असो. तसेच मंत्री महोदयांनी घेतलेल्या निर्णयाला सुध्दा एका अर्थाने बाजूला सारण्याचे काम हे प्रशासकीय अधिकारी करतात.

अध्यक्ष महोदय, यामध्ये लोकांची मागणी काय आहे तर मुंबई उपनगरात जे ६० ते ७० टक्के लोक त्यांच्या विकसित झालेल्या इमारती, बंगले, चाळी आणि इतर अशा जमिनी जेव्हा विकसित करावयाच्या होत्या त्यावेळी त्यांनी कृषीचे क्षेत्र अकृषिक करण्याची परवानगी त्यांनी घेतली आहे. असा एन.ए. करताना त्यांनी महसूल विभागाला योग्य तो कर भरला आहे. त्यानंतर विकसित झालेल्या अशा मिळकतींना मुंबई महानगरपालिकेला मालमत्ता कर लागू झाला. त्यामध्ये पाणीपट्टी

ॲड. आशिष शेलार..

आणि इतर सर्व कर लागू झाले. आता त्यांना २०-२०, ३०-३० किंवा ५०-५० वर्षे झाल्यानंतर आपण पुन्हा या एन.ए. कराच्या नोटीस पाठविता.

अध्यक्ष महोदय, पूर्वी अशा एन.ए. कराचे पुनर्विलोकन करण्याचा कालावधी ५ वर्षाचा होता. तत्कालीन महसूल मंत्री यांनी हा पुनर्विलोकन कालावधी १० वर्षे केला होता. त्याचा उल्लेख या उत्तरामध्ये नाही. पण मी त्या बैठकीला उपस्थित होतो. म्हणून माझे म्हणणे आहे की, या प्रकरणी प्रशासकीय अधिकारी मानायला तयार नाहीत, अशा पध्दतीचे चित्र आहे. ३ टक्क्यांच्या पुनर्विलोकनचा कराचा जो दर होता तो .०५ इतका केला ते उत्तरामध्ये नमूद आहे.

अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे की, आपण या नोटीसेसमधून जो रेट वाढलेला आहे तो जवळपास १५०० टक्क्यांनी वाढला आहे. पूर्वी गृहनिर्माण संस्थांना येणारी एन.ए. कराची नोटीसमधून जो दर दिसत होता तो कमी होता. आता त्यामध्ये लक्षणीय वाढ करुन १५०० टक्क्यांनी ती वाढ केली आहे. सुरूवातीला ज्यांना ४.८२ रुपये लागायचे त्यांना आता ७३.८० रुपये दराच्या नोटीस रहिवाशांना मिळू लागल्या आहेत. म्हणून माझी मागणी आहे की, कोरोनाचा काळ आणि या काळात नागरिकांची झालेली गैरसोय आणि त्यांना सोसावा लागलेला भूर्दंड आणि परिणामी मुंबईतील उपनगरातील रहिवाशांना या कोरोना कालावधीत जास्त मार पडला. त्यामुळे तातडीने आपण दिलेल्या या नोटीसेसना आपण स्थगिती द्यावी.

अध्यक्ष महोदय, दुसरे म्हणजे एका शहरामध्ये एका करासाठी २ वेगळे न्याय असता कामा नये. मुंबई शहर आणि मुंबई उपनगर यामध्ये २ वेगवेगळ्या पध्दतीचा न्याय केला आहे. माझ्या हातामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४७ (अ) (२) मध्ये मुंबई शहर जिल्ह्याला आपण अकृषिक करातून आपण सूट दिली आहे तर मुंबई उपनगराने कोणते पाप केले आहे ? त्यामुळे आपण महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४७ (अ) (२) मध्ये आणि

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार..

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ११४ मध्ये बदल करण्याची सरकार भूमिका घेणार आहे काय, हा माझा दुसरा प्रश्न आहे. त्यामुळे या नोटीसेसना आधी "स्टे" द्यावा, अशी पहिली मागणी आहे आणि उपनगरवासियांसाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४७ (अ) (२) व कलम ११४ मध्ये सुध्दा बदल करण्याची भूमिका सरकार घेईल काय, अशी माझी दुसरी विनंती आहे.

श्री. बाळासाहेब ठाकरे : अध्यक्ष महोदय, आता बिनशेती म्हणजे अकृषक कराच्या आकारणीमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता आहे आणि तशा तक्रारी येतात, ही वस्तुस्थिती आहे. परंतु मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन २०९१७ पूर्वी सुध्दा अशी वसूल सुरू ओती. त्याबद्दल फारशी तक्रार नव्हती. आपण सन २०१७ मध्ये काही बदल केले आणि सन २०१८ मध्ये तशा प्रकारचा शासन निर्णय केला. आता त्या शासन निर्णयाची आम्ही आता फक्त अंमलबजावणी करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, या विषयावर राजकारण करायचे नाही म्हणून आमचे म्हणणे असे आहे की, आपल्या शासनाने सन २०१८ मध्ये जो निर्णय केला होता त्याची अंमलबजावणी आता सुरू आहे आणि राज्याला देखील आर्थिक बळ येण्यासाठी कर मिळण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे लोकांनी हा कर भरला तर मदत होईल, असे मला वाटते.

श्री. सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न संपूर्ण मुंबईतील सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या मध्यमवर्गीय लोकांचा अत्यंत महत्त्वाचा आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण मागील काळात देखील सातत्याने प्रयत्न केले होते. यासाठी जी समिती नियुक्त केली होती त्या समितीच्या बैठका सुध्दा झाल्या. पण आपण अंतिम निर्णयापर्यंत पोहोचलो. मग ती मुदत संपल्यानंतर व्याजासह तो

श्री. सुनील प्रभू...

अकृषिक कर आकारला गेला. तो जाचक असा कर आहे. म्हणून मंत्री महोदयांना आमची विनंती आहे की, मुंबईतील सर्वच लोकप्रतिनिधींच्या मतदार संघातील हा प्रश्न आहे. प्रत्येकाकडे नागरिक येऊन तक्रारी करीत असतात. याबाबत शिवसेनेच्या आमदारांनी माननीय मुख्यमंत्र्यांना ८ दिवसांपूर्वी यासंबंधी निवेदन सुध्दा दिले होते.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. सुनील प्रभू ....

या ठिकाणी जो जाचक कर लावला आहे तो कायमस्वरुपी रद्द करणे याचा निर्णय कॅबिनेट घेईल. नंतर त्यावर पॉलिसी ठरेल. परंतु माननीय महसूल मंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपण त्यासाठी तात्काळ स्थगिती देऊन नागरिकांना दिलासा दिला पाहीजे.

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मुंबई उपनगर, नई मुंबई, थाना, पुणे और हर जगह का यह इश्यू है.......

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वीच आपण सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांना बोलण्याची संधी दिली आहे. आपण हे सभागृह चालवता. परंतु माननीय मंत्र्यांनी सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांना बोलण्याची संधी द्या असे सांगितले की आपण त्यांना बोलण्यासाठी उभे केले...(अडथळा)... माझा हेत्वारोप नाही.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण)** : सन्माननीय सदस्य आपण अशा प्रकारचा हेत्वारोप करणे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांनी हात वर केला होता म्हणून मी त्यांना संधी दिली आहे. मी आपल्यालाही संधी देईल.

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मुंबई उपनगर, नई मुंबई, थाना, पुणे और हर जगह का यह इश्यू है. सब का इश्यू कॉमन है. पिछले कई सालों से मुंबई में पश्चिम उपनगर हो या पूर्व उपनगर हो, यह इश्यू केवल दक्षिण मुंबई का इश्यू नहीं है. यह पूरे महाराष्ट्र का इश्यू है. इसमें अधिकारियों की मनमानी हो रही है. एक आदमी जाता है, तो उसको कुछ रुपयों का टैक्स लगाकर दे दिया जाता है. ये टैक्स फौरन अबॉलिश होना चाहिए. उसकी वजह भी है. कई दिनों से लोकप्रतिनिधी बार बार माननीय मंत्री महोदय से मिलते है और अनुरोध करते है. मैंने भी माननीय मंत्री महोदय के साथ बैठक ली है. मुंबई कॉंग्रेस के साथ भी बैठक ली है, अन्य लोगों ने भी बैठक ली है. हमारा स्पेसिफिक प्रश्न यह है कि अधिकारियों की यह जो मनमानी चल रही है, किसी भी आदमी को आँख बंद करके कितना भी टैक्स लगाया जा रहा है. सबसे पहले इस

श्री अमिन पटेल....

बारे में आज के आज, अभी के अभी माननीय मंत्री महोदय ने हमारी विनती को मानना चाहिए और इसको स्टे देना चाहिए. दूसरी बात ऐसी है कि इसको धोरण में बिठाकर इसको अबॉलिश करना चाहिए, ऐसी मेरी दो मांगे है. मेरी विनती है कि इस बारे में माननीय मंत्री महोदय ने जवाब देना चाहिए.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविल्याप्रमाणे नियम २९३ च्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात येणार आहे. याबाबत मला सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यायचे होते. परंतु सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू आणि सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांचे म्हणणे होते की, लक्षवेधी सूचनेवर चर्चा करुन आम्हाला त्यावर उत्तर पाहिजे. त्यामुळे आता आपण लक्षवेधी सूचना घेत आहोत. साधारणत: सर्वांचे सूत्र लक्षात घेऊन आणखी कोणाला आपले म्हणणे मांडायचे असेल तर आपण त्यांना संधी द्या मग नंतर मी एकत्रित उत्तर देतो.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, या कराला तातडीने स्थगिती दिली पाहिजे, असा मूळ मुद्दा आहे. याचे कारण असे आहे की, आधीच कोरोनामुळे लोकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा काळात लोक कोरोनाच्या परिस्थितीतून सावरत असताना हा एक नवीन जिझिया कर लावून काही वर्षाचा परतावा घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे कोरोनाची परिस्थिती लक्षात घेता याला तात्काळ स्थगिती दिली पाहिजे, ही आमची पहिली मागणी आहे. दुसरा मुलभूत मुद्दा असा आहे की, हा कर किंवा कायदा अनएथिकल आहे. कारण जेव्हा एखादा प्लॉट नॉन ॲग्रीकल्चर होतो आणि एखादी इमारत बांधली जाते तेव्हा आम्ही त्याचे पैसे भरतो. त्यानंतर पुढे आयुष्यभर नॉन ॲग्रीकल्चर कर भरत राहायचा. मी स्वत: या संदर्भातील खाजगी विधेयक मांडले होते. एवढेच नव्हे तर सध्या मंत्री असतलेले माननीय श्री. छगन भुजबळ यांनी सुद्धा मागच्या काळात हा कर रद्द करण्यासाठी खाजगी विधेयक मांडले होते. त्यामुळे या कराला तात्काळ स्थगिती देण्यात यावी

असुधारित प्रत

श्री. अतुल भातखळकर....

आणि हा कायदा कायमस्वरुपी रद्द करण्यासाठी सरकार काही विचारविनिमय करणार काय दोन प्रश्नांची माननीय मंत्र्यांनी उत्तरे द्यावीत.

श्रीमती विद्या ठाकूर : अध्यक्ष महोदय, इस लक्षवेधी के माध्यम से मैं यह प्रश्न पूछना चाहती हूं कि यह कोई ब्रिटिश राज नहीं है. जब कि मुंबई शहर के लोग कोविड के समय में इतने परेशान है और उसके बावजूद जब एक बार डेव्हलपमेंट आता है तो वन टाईम एन.ए. टैक्स भरा जाता है. लेकिन उसके बावजूद जो अधिकारी सोसायटी में जाकर लोगों को इतनी तकलीफ दे रहे है, लोगों को हैरान कर रहे है, उनको १०-२० लाख रुपये भरने के लिए कहा जा रहा है. मेरा पहला प्रश्न ऐसा है कि आप इसको रद्द किजिए. क्या आप इसको रद्द करेंगे ? मेरा दूसरा प्रश्न ऐसा है कि यदि इसको तुरंत रद्द नहीं कर पा रहे है, तो उसको ५-१० साल की मुदतवाढ दीजिए. क्योंकि लोग पैसा नहीं भर पायेंगे. लोगों की हालत खराब है. मेरा कहना है कि आप इसको रद्द किजिए. मुदतवाढ नहीं चाहिए. आप इसको रद्द किजिए, स्टे दीजिए.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, नियम २९३ च्या अनुषंगाने देखील या विषयावर चर्चा होणार आहे. ज्या ठिकाणी जमीन असेल त्या जमिनीवर बांधकाम केले जाते तिथे नॉन ॲग्रीकल्चर हा कर लावला जातो. पूर्वी हा कर ३ टक्के होता त्यावरून १.५ टक्क्यांवर आला तरी देखील लोक तो कर भरण्यास तयार नव्हती. त्यानंतर तो कर ०.०५ टक्के करण्यात आला त्या अनुषंगाने लोकांनी तो भरण्यास सुरु केला. परंतु त्याला देखील त्यावेळच्या माननीय मंत्र्यांनी एकदा नाहीतर दोन ते तीन वेळा स्थगिती दिली. हा जिझिया कर आहे असे मला देखील म्हणावे लागेल. माझ्या क्लबचे उदाहरण मी देतो की,२० हजार स्क्वेअर फुटाची जागा असताना त्यातील ६७ टक्के जागा आपण ओपन ठेवतो आणि ३३ टक्क्यांमध्ये आपण १५ टक्के बांधकाम करतो. खरे म्हणजे या १५ टक्क्यांवर त्यांनी अकृषिक कर लावायला पाहिजे होता. या बाबतीत मला अधिकाऱ्यांचे देखील उदाहरण द्यावे लागेल कारण ते ऐकणे गरजेचे आहे. अधिकाऱ्यांनी सरसकट २० हजार स्क्वेअर फुटवर कर लावलेला आहे. माननीय मंत्र्यांनी माझी विनंती आहे की, आपण तात्काळ या कराला

श्री. रविंद्र वायकर...

स्थगिती द्यावी. एकाच शहरामध्ये मुंबईसाठी आणि उपनगरासाठी असे वेगवेगळे कायदे करण्याचा निर्णय आपण तात्काळ बदलून तो मंत्रीमंडळासमोर आणून हा कर रद्द करावा.

**तालिका सभाध्यक्ष :** आता सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर हे शेवटचा प्रश्न विचारतील कारण सर्वसाधारपणे सर्व सन्माननीय सदस्यांचे प्रश्न सारखेच आहेत. ही काही नियम २९३ अन्वयेची चर्चा नाही.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, सदरचा प्रश्न हा मुंबई शहरासाठी महत्त्वाचा आहे. महत्त्वाचे म्हणजे मुंबई शहरात अधिवेशन आहे. माननीय मंत्र्याची तीन वेळा भेट घेऊन मी सुद्धा हा प्रश्न तीन वेळा त्यांच्या निदर्शनास आणून दिला होता. आज काय परिस्थिती आहे याचा उल्लेख सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी केला आहे. आमची भूमिका काय आहे हे त्यांना कळले पाहिजे. कारण माननीय मंत्री हे उत्तर कसे देतील यासाठी त्यांच्या छापील उत्तरातून आम्हाला त्याची मानसिकता कळते.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर मी आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय मंत्री हे छापील उत्तर देणार नाहीत. कारण त्यांनी आपले सर्व म्हणणे ऐकून घेतले आहे.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, ज्या ठिकाणी शेती केली जाते तेथील हा प्रश्न नाही. मुंबई शहर हे सात बेटांचे शहर आहे. त्या छोटया छोटया बेटांचे फिलिंग करुन मुंबई शहर तयार केले आहे. या ठिकाणी शेती कुठे होत होती हे कोणीही सांगू शकत नाही. अकृषिक कर लावण्यात आला तिथे इमारत उभी राहिली. महानगरपालिकेने लाखो रुपयांचा प्रॉपर्टी कर लावला. याचा अर्थ जवळपास १२ ते १६ हजार कोटी रुपयांचे उत्पन्न या करातून येते. आज आपण जो अकृषिक कर लावत आहात त्यातून दोन हिस्से होत आहेत. एक म्हणजे मुंबई शहराला त्यातून माफी आणि उपनगरासाठी हा कर लावण्यात येत आहे. हे जे शिघ्रगणक मोजले जात

असुधारित प्रत

श्री. योगेश सागर....

आहे ते पूर्वलक्षी प्रभावाने मोजत आहेत. या कराची सुरुवात ३ टक्क्यांनी केली होती तर ०.०५ टक्केपर्यंत आलेले आहे. जिथपर्यंत ०.०५ टक्केचा भरणा सुरु होता तिथपर्यंत सर्व ठीक होते. अध्यक्ष महोदय, भूमिका काय आहे ते आपण मला सांगू द्या. आज परिस्थिती अशी आहे की, तहसिलदारामार्फत सोसायटीची बँक अकाऊंट सिल केले आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. योगेश सागर ...

जर २० लाख रुपयांची नोटीस दिली असेल तर जोपर्यंत सरकारकडे त्या खात्यातून तेवढी रक्कम जात नाही तोपर्यंत ते अकाऊंट नॉन आपॅरेटींग राहते. ही कोणती मोगलाई आहे ? सोसायटीच्या अकाऊंटमध्ये सिंकींग फंड, मेन्टेनन्स, पगाराचे पैसे असतात. वीज बिल, वॉटर चार्जेस या करिताचे पैसे असतात. माझी मागणी आहे की, बँक अकाऊंट सीज करण्याबाबत किंवा बँक अकाऊंट इंटरप्ट करण्याबाबत तातडीने तलाठींना सूचना दिल्या आहेत त्या संबंधी आताच्या आता सदनात स्थगिती देण्याची आवश्यकता आहे. आता जो कर लावला आहे त्याला आजच्या आज सदनात स्थगिती जाहीर केली पाहिजे. दुसरा मुद्दा असा आहे की, ज्या सोसायट्यांना अकृषिक कर लावला आहे तेथे या पुढे हा अकृषिक कर लावला जाणार नाही, असा कायद्यात बदल करणार काय ?

काही सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ....

**तालिका सभाध्यक्ष** : आता मी दोन सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देतो. ही लक्षवेधी सूचना आहे. या नंतर मंत्री महोदय उत्तर देतील. सर्वांना मी संधी देऊ शकत नाही. नाव असले तरी संधी द्यावी, असा नियम नाही.

श्री. अमित साटम : अध्यक्ष महोदय, या विषयासंबंधी माझा एकच प्रश्न आहे. या लक्षवेधी सूचनेच्या पहिल्या परिच्छेदामध्येव संपूर्ण उत्तर दिले आहे. मी जेव्हा एखादी जमीन विकत घेतो त्याकरिता एकदाच पैसे देतो. या जमिनीचे पैसे दर वर्षाला पुन्हा पुन्हा भरले जात नाहीत. एकदा इमारत बांधली, एनए टॅक्स भरला की तेथेच एनए कराचा विषय संपला पाहिजे. या ठिकाणी कायद्यातील तरतूद दाखवली जात आहे. मुंबई- पुणे महापालिका व ब नगरपालिका क्षेत्रांकरिता महाराष्ट्र जमीन महसूल, जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी नियम सन १९६९ मध्ये महापालिका व नगरपालिका क्षेत्रामध्ये एनए कर पूर्णपणे वगळण्याची तरतूद करणार काय ?

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, आज नियम २९३चा प्रस्ताव असून या विषयावर चर्चा होणार आहे. सन्माननीय सदस्यांचा लक्षवेधी संबंधी आग्रह होता. सदनाची भावना लक्षात आलेली आहे. हे खरे आहे. मी सांगू इच्छितो की, सन २०१७ मध्ये कायद्यात बदल केला, सन २०१८ मध्ये निर्णय लागू केला व त्याची अंमलबजावणी आपण करीत आहोत. अंमलबजावणी सुरु झाली तेव्हा जे आकडे असतील...

ॲड पराग अळवणी : अध्यक्ष महोदय, माझी उत्तराला हरकत आहे. मंत्री महोदयांकडून या ठिकाणी वारंवार असे सांगितले जात आहे की, कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी केली जात आहे. कायद्यामध्ये असा अकृषिक कर मुंबईसाठी लागू नाही, अशीच तरतूद आहे. महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू कोडचे टायटल वाचले तर त्यात असे नमूद केले आहे की, City of Mumbai करिता हा कर नाही. सन २०१४ साली याच सदनात आपण या कायद्यामध्ये एक सुधारणा केली. सेक्शन ४२ (अ) अंतर्गत ज्या शहरात विकास आराखडे झाले आहेत त्या ठिकाणी अकृषिक कर लावायचा नाही असे नमूद केले नाही, मात्र या बाबत नियोजन प्राधिकरण ठरवेल. कायद्यातील तरतूद मी सांगत आहे. हा बदल का केला, सुधारणा का केली याचे कारणअसे की, विकास आराखड्यांतर्गत नियोजन प्राधिकरण जमिनीचा वापर ठरवत असते. यामध्ये शेती देखील आहे. सेक्शन ४२ (अ ) चा अर्थ असा आहे की, जर विकास आराखड्यामध्ये एखाद्या जमिनीचा जर कृषी वापर असेल तर तरच अकृषिक कर लागू होतो. विकास आराखड्यामध्ये निवासी किंवा अन्य वापर असेल तर तेथे आपण अकृषिक कर मागू शकत नाही.

अध्यक्ष महोदय, मी दुसरे एक उदाहरण सांगतो. नागरी क्षेत्र घोषित केलेली आहे. तेथे एखाद्या जमिनीवर कोणी शेती करीत असेल. महसुलाच्या योजना, कर्जमाफीची योजना इ. योजनांचा लाभ , तेथील शेतकऱ्यांना दिला जात नाही. तेव्हा असे सांगितले जाते की, तुम्ही नागरी भागात शेती करीत आहात.यामुळे

असुधारित प्रत

ॲड पराग अळवणी ....

तुम्हाला योजनेचा लाभ मिळणार नाही. सरकारने काही द्यायचे आहे तेव्हा नागरी क्षेत्र आहे म्हणून शेतकऱ्यांना लाभ दिला जात नाही. नागरी क्षेत्रामध्ये अकृषिक कर कसा काय लागू शकतो ? आपले धोरण व कायद्यामध्ये हीच तरतूद आहे. हा कर मुंबई शहराला लागू करता येणार नाही. याकरिता स्थगित द्या व अभ्यास करा. हा अकृषिक कर रद्द केला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, खूप मोठया प्रमाणात आमच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांचे शिष्टमंडळ मला भेटले. तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनील प्रभू, योगेश सागर, झिशान सिद्दिकी माझ्याकडे आले होते. जेथे मला भेटतील तेथे या गोष्टीची चर्चा होते. सर्व सन्माननीय सदस्यांचा सूर माझ्या लक्षात येत आहे. या संबंधी तात्पुरती स्थगिती दिली जात आहे. जे मुद्दे मांडले आहेत ते मुंबई शहराला लागू नाहीत. जे काही आहेत त्या सर्वांचा विचार केला जाईल.

ॲड आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी स्थगिती दिली आहे, त्याकरिता त्यांचे धन्यवाद व्यक्त करतो. आज नियम २९३ च्या प्रस्तावाच्या वेळी पुढे चर्चा करु. येथे तांत्रिक व कायदेशीर मुद्दे चर्चेला आले आहेत. आपण या संबंधी सर्व पक्षांची एक समिती तयार करावी. यामध्ये मुंबई व उपनगर मधील आमदारांची समिती करा. आमचे म्हणणे ऐकून हे रद्द करण्याबाबत विचार करावा.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, आज नियम २९३ अन्वये या विषयावर पुन्हा चर्चा होणार आहे.

--------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : जालना जिल्ह्यातील बदनापूर, बावणे पांगरी व भोकरदन तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत भरपाई देणे

**मु. शी. :** जालना जिल्ह्यातील बदनापूर, बावणे पांगरी व भोकरदन तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत भरपाई देणे,या संबंधी श्री.नारायण कुचे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. नारायण कुचे ( बदनापूर ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

“जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील बावणे पांगरी व भोकरदन तालुक्यातील राजूर या महसुली मंडळात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणे, नैसर्गिक नुकसानीमुळे शासनाने तातडीने बाधित शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई अद्यापही न देणे, त्यामुळे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने आर्थिक मदत तातडीने करावी व बाधितांना दिलासा द्यावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माननीय मुख्यमंत्री महोदय यांना दिनांक ९ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्या दरम्यान जावक क्रमांक २०२१-२०२२/०८० या पत्राव्दारे तसेच कृषी मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री व संबंधित अधिकारी यांना लेखी विनंती केलेली असणे, परंतु शासनाने शेतकऱ्यांना अनुदान मिळणेसाठी अद्यापही कोणत्याच उपाययोजना केल्या नसणे, परिणामी स्थानिक लोकप्रतिनिधींसह बाधित

असुधारित प्रत

श्री. नारायण कुचे ......

शेतकऱ्यांच्या समवेत दिनांक १२ नोव्हेंबर रोजी वा त्या दरम्यान लाखोच्या संख्येने

ट्रॅक्टर आक्रोश मोर्चा काढणे, सदर नुकसानीला अनेक महिने उलटूनही कोणतीही कारवाई होत नसणे, तसेच पांगरी व राजूर महसूल मंडळातील अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे व फळबागांचे पंचनामे ७ महिन्यापूर्वी झालेले असणे, तसेच जिल्हाधिकारी जालना यांनी सदर दोन्ही तालुक्यातील बदनापूर, बावणे पांगरी व भोकरदन तालुक्यातील राजूर महसूल मंडळात नुकसान झालेल्या क्षेत्राचा पाहणी दौरा केलेला असणे, जिल्हाधिकारी, जालना यांनी शेतकऱ्यांच्या पिकांचे व फळबागांचे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबतचा सविस्तर प्रस्ताव महसूल व पुनर्वसन विभाग, मंत्रालय यांच्याकडे सादर करणे, जिल्हाधिकारी, जालना यांनी नुकसानग्रस्त शेतकरी यांना अनेकदा आर्थिक मदत देण्याचे आश्वासन देऊनही अद्यापही बाधित गरीब शेतकऱ्यांना मदत दिलेली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना मोठया आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असणे, शासनाच्या उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येणे, त्यामुळे सामान्य गरीब शेतकरी यांच्यात शासनाच्या विरोधात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

श्री. विजय वडेट्टीवार ( मदत व पुनर्वसन मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. *

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. दीपक चव्हाण )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. नारायण कुचे : अध्यक्ष महोदय, जालना जिल्ह्यामध्ये या वर्षी पावसाळ्यात एकूण ११०० मिमी पाऊस पडला. यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. कापूस द्राक्ष, मका, बाजरी, सोयाबीन, मोसंबी अशा पिकांचे व फळबागांचे नुकसान झाले. दि. २० सप्टेंबर २०२१ रोजी रात्री ढगफुटीसारखा जालना येथे पाऊस झाला. येथे अतिवृष्टी झाल्या नंतर दुसऱ्या दिवशी जिल्हाधिकारी, जालना यांना मी स्वत: घेऊन पूर्ण तालुक्यात फिरलो. तेव्हा त्यांनी कृषी विभाग व महसूल विभाग यांना पंचनामा करण्याबाबत आदेश दिले. पंचनामे आले. या नंतर जालना जिल्ह्यामध्ये अनुदान आले. जालना जिल्ह्यात ४९ महसूल मंडळ आहेत. त्यातील ४७ महसूल मंडळांना निधी आला. २ मंडळे वगळण्यात आली. याचे असे कारण सांगितले गेले की, सततच्या पावसामुळे नुकसान झाले, त्याला अनुदान देता येत नाही. हा प्रस्ताव मदत व पुनर्वसन विभागाला आम्ही पाठवला. मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ४९ महसूल मंडळापैकी ४७ महसूल मंडळामध्ये २० सप्टेंबरच्या रात्री ३४२ मिमी पाऊस पडला, ही कृषी विभागाची नोंद आहे. दि. २१ ते ३० सप्टेंबरमध्ये पडलेल्या पावसाची नोंद मी आपल्याला वाचून दाखवतो. दि. २१ सप्टेंबर रोजी २० मिमी, २२ सप्टेंबर रोजी ५१ मिमी, २३ सप्टेंबर रोजी ३७ मिमी, २४ सप्टेंबर रोजी २० मिमी, २५ सप्टेंबर रोजी ३६ मिमी, २६ सप्टेंबर रोजी १५ मिमी, २८ सप्टेंबर रोजी ४५ मिमी व २९ सप्टेंबर रोजी ४२ मिमी अशा प्रकारे दररोज पाऊस पडलेला आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.नारायण कुचे ....

जिल्हाधिकाऱ्यांची मी दि. २८ ऑक्टोबर रोजी भेट घेऊन सांगितले की, जिल्हाधिकारी महोदय आमच्या येथे निधी आलेला नाही. आम्ही आपल्याला निवेदन देत आहोत. मी शेतकऱ्यांना सोबत घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी आम्हाला सांगितले, माझ्याकडे जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र आहे....

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)** : सन्माननीय सदस्य आपण प्रश्न विचारावेत.

श्री.नारायण कुचे : अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांचा प्रश्न आहे. आपण जरा समजून घ्यावे. मी पार्श्वभूमी समजावून सांगत आहे. मदत व पुनर्वसन विभागाला आम्ही पत्र पाठविले. आम्ही सतत पडलेल्या पावसाने झालेल्या नुकसानाबाबतची मदत मिळण्याकरिता १७ कोटी रुपये व काही पैशांची मागणी केली. परंतु, अद्यापपर्यंत काही तो पैसा आलेला नाही.

अध्यक्ष महोदय, त्यानंतर आम्ही पालक मंत्री महोदयांना देखील निवेदन दिले. माननीय श्री.राजेश टोपे यांना सांगितले. मी मंत्री महोदयांना भेटलो, मी मुख्यमंत्री महोदयांना देखील निवेदन दिले. आम्ही मोर्चे काढले ... भर दिवाळीच्या दिवशी ४० ते ४५ गावांतील शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाकरिता बसले. जिल्हाधिकाऱ्यांनी आम्हाला लेखी निवेदन दिले की, ८ ते १० दिवसांत आम्ही तुम्हाला या सतत पडणाऱ्या पावसामुळे जे नुकसान झाले त्याकरिता निधी उपलब्ध करुन देतो. माझ्याकडे त्यांचे लेखी निवेदन आहे. त्यावेळेस आम्ही उपोषण सोडले.

अध्यक्ष महोदय, आतापर्यंत तो निधी आला नाही. मी मोर्चा काढला. यामध्ये राजकारणाचा काही विषय नाही. परंतु, मला आपल्या माध्यमातून हा प्रश्न विचारावयाचा आहे की, ४९ मंडळ.. बांधाला बांध... समजून घ्या. माझ्या बाजूला बांध आहे, तेथे शेतकऱ्यांना पैसे मिळत आहेत. शेजारच्याला मिळतात व बाकीच्यांना मिळत नाहीत, हे दुर्दैव आहे.

असुधारित प्रत

श्री.नारायण कुचे ....

अध्यक्ष महोदय, बदनापूर तालुक्यामध्ये बावनेपानी व भोकरदन तालुक्यातील राजुरा या दोन्ही महसूल मंडळातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे अनुदान का दिले नाही, ते केव्हा देणार? कृषी विभागाच्या पर्जन्यमान मापक यंत्रणेबाबत मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनामध्ये सांगितले आहे की, अतिवृष्टीची नोंद झालेली नाही. परंतु, कृषी विभाग एकीकडे असे सांगत आहे की, ३४० मी.मी. पाऊस झाला. एकीकडे ते असे म्हणतात की, झाला नाही. माझे असे म्हणणे आहे की, हे पर्जन्यमान मापक यंत्र त्यावेळेस बंद होते काय, याची चौकशी करणार काय, तसेच जो अधिकारी जबाबदार असेल त्याची चौकशी होणार काय?

अध्यक्ष महोदय, विशेष बाब म्हणून मंत्रिमंडळात यासाठी .... राज्यामध्ये काही ठिकाणी अवेळी पाऊस झाला असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. बऱ्याच लोकप्रतिनिधींच्या बोलण्यात देखील हा प्रश्न आला आहे. माझे असे म्हणणे आहे की, सततच्या पावसामुळे नुकसान झाले असेल व ते नियमात बसत नसेल तर त्याकरिता आपण राज्यभर काही पॉलिसी करणार आहात काय? सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करावा. हे शेतकऱ्यांचे मायबाप आहेत. काबाडकष्ट करणारा शेतकरी असतो. त्याचे मायबाप सरकार असते, त्यांना आपण मदत करावी, अशी आपल्याला विनंती आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, खरे तर मागील वर्षी अतिवृष्टी, अवेळी पाऊस, गारपीट, महापूर अशी संकटे आली. संपूर्ण राज्यभर ती परिस्थिती होती. त्यामध्ये तौक्ते चक्रीवादळ होते. माहे फेब्रुवारी, मार्चमध्ये ... आपल्याला माहीत आहे की, एप्रिल, २०२१ मध्ये गारपीट झाली. मार्च, एप्रिल, मे २०२१ या कालावधीत गारपीट व अवेळी पाऊस आला.

अध्यक्ष महोदय, जुलै, २०२१ मध्ये अतिवृष्टी झाली. ऑगस्ट ते सप्टेंबरमध्ये राज्यामध्ये विविध जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाली. सततच्या पावसामुळे विशेष करुन मराठवाड्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सन्माननीय सदस्य श्री.नारायण कुचे यांनी हे प्रश्न उपस्थित केले आहेत. आपल्याला एकूण सर्व परिस्थिती माहिती

असुधारित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार ....

आहे की, जालना जिल्ह्याला ऑगस्ट ते सप्टेंबरमध्ये जी काही अतिवृष्टी झाली, जो सततचा पाऊस झाला त्यामध्ये ४६४ कोटी रुपये वितरित केले. जालना जिल्ह्यात त्याचे वाटप देखील झाले आहे.

अध्यक्ष महोदय, हे वाटप होत असताना त्यांनी सांगितल्याप्रमाणे ४७ मंडळे आहेत, त्या सर्वांमध्ये जे निकषाप्रमाणे बसत होते तेवढे सर्व पैसे आपण त्या ठिकाणी वितरित केले आहेत. ३ मंडळांचा विषय राहिला होता. मी जिल्हाधिकाऱ्यांकडून परत खात्री करुन घेतली. एसडीआरएफ व स्टेट डिझास्टरचे नियम आम्ही तपासले. ६५ मी.मी. पेक्षा अधिक पाऊस व ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान हे दोन्ही निकष जे पूर्ण करीत असतील, त्या सर्व शेतकऱ्यांना ....आतापर्यंत राज्यामध्ये केवळ पाहिले तर ५६... ५५ लाख ७० हजार हेक्टर जमिनीला मदत केली गेली म्हणजे जवळपास ५६ लाख हेक्टर जमिनीला मदत केली गेली.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या शेतकऱ्यांच्या प्रती ज्या भावना आहेत, त्या तुम्हा-आम्हा सर्वांच्या भावना आहेत. परंतु, याला कुठे तरी निकष लावला पाहिजे. ६५ मी.मी. पावसाचा निकष आहे. एकच निकष नाही. आता सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ३४२ मी.मी. पाऊस झाला. परंतु, त्यांनी कधी २० मी.मी., कधी ४० मी.मी., कधी ६० मी.मी., कधी ५० मी.मी. अशी त्याची फोड करुन देखील रोज किती पाऊस झाला ते सांगितले. याला कुठे तरी एक नियम लावून आपण मदतीचा निर्णय घेत असतो. उद्या जर ६४ मी.मी. पाऊस झाला तर त्यांच्याकडून देखील मागणी येईल.

अध्यक्ष महोदय, मी माहिती पाहिली आहे. आमच्या बाजूला सन्माननीय श्री.सुनील केदार आहेत. वर्धा जिल्हा आहे. वर्धा जिल्ह्यात ४५ ते ५९ मी.मी. पाऊस झाला. मी माहिती घेतली. एका आठवड्यामध्ये दर दिवसाचा ॲव्हरेज काढला तर ४५ ते ५९ मी.मी. इतका पाऊस झाला. यवतमाळ जिल्हा बाजूला आहे. यवतमाळ जिल्ह्याला साडेपाचशे कोटी रुपयांची मदत केली. कारण तेथे ६५ मी.मी.च्यावर पावसाची नोंद झाली आणि ३३ टक्क्यांच्यावर नुकसान झाले. परंतु,

असुधारित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार ...

वर्धा जिल्ह्यात ते निकष पूर्ण झाले नाहीत. आम्ही दोन बैठका घेतल्या. त्यांनी आग्रह केला. परंतु, ते पैसे देता आले नाहीत कारण निकषात बसत नाही. हे निकष पैशांसह बदलावेत. आम्ही एसडीआरएफचे निकष बदलण्यासाठी केंद्र सरकारला पत्र लिहिलेले आहे. आम्ही त्यांच्याकडे वेळ मागितली आहे. सर्वच राज्यांनी लिहिले आहे. कारण जुने निकष आहेत. ते बदलले पाहिजेत. खरे तर ३ दिवसांची सरासरी काढून ३ दिवसांत.... आता २४ तासात ६५ मी.मी. पाऊस पडला पाहिजे असे निकष असतील तर, ३ दिवसांमध्ये किमान सव्वाशे मी.मी. पावसाची नोंद झाली तर ते ग्राह्य धरता येईल काय, याचा देखील आम्ही अभ्यास करीत आहोत. या दृष्टीने देखील ती मदत केली गेली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, हा सर्व आकडा काढला गेला तर आम्हाला अतिरिक्त १४०० कोटी रुपये द्यावे लागतील. द्यायला हरकत नाही. परंतु, एसडीआरएफच्या निकषात बसत नाही. मग राज्य सरकारने हा निर्णय घेतला पाहिजे, अशी जर भूमिका असेल तर, त्या संदर्भात आम्ही नक्की चर्चा करु. कारण हा अवेळी पाऊस किंवा सततच्या पावसामुळे हे दोन्ही निकष पूर्ण न केल्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतून ही मागणी होत आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही जर ४६४ कोटी रुपये ४७ मंडळांना देऊ शकतो तर, १७ कोटी रुपये देणे हा काही अडचणीचा विषय नाही. त्यामध्ये मराठवाड्याला ३८८५ कोटी रुपये या सततच्या पावसामुळे मागच्या वेळेस शेतीचे जे नुकसान झाले, त्याचे निकष पूर्ण झाल्याने वाटप केले. आपण पाहिले तर जालना जिल्हा येथे ५१८ कोटी रुपये म्हणजे एकूण आकड्याच्या १५ टक्के मदत दिली. मग या २-३ ठिकाणी देण्यास काहीच अडचण नव्हती. परंतु, तुमची भावना लक्षात घेतली तरी ते निकषात बसत नाही, जर या ३ मंडळांना दिले तर, महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातून निकषाच्या बाहेर जाऊन ही मागणी येईल. त्यामुळे हा एक निर्णय होत असताना आम्ही चर्चा करीत आहोत. पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना यावर काही निर्णय

श्री.विजय वडेट्टीवार ....

होण्याची अपेक्षा आहे. त्यावेळेस एकत्रितरित्या हा निर्णय नक्की घेऊ किंवा त्या दृष्टीने विचार करु असे मी या ठिकाणी सांगत आहे.

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी जालना जिल्ह्याला किती पैसे दिले, मराठवाड्याला किती पैसे दिले, अतिवृष्टीबाबत सर्व उत्तर दिलेले आहे. मराठवाडा सतत २ महिने पाण्यात होता. शेती व शेतकरी उद्ध्वस्त झाला. आष्टी पोलीस स्टेशनच्या हद्दीत २ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. एक दिवसाआड २ आत्महत्या झाल्या. माझ्या मतदारसंघातील ४ माणसे वाहून गेली, असे असतानाही फळबागांना मदत मिळाली नाही.

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.बबनराव लोणीकर....

तहसिलदार व कृषि विभाग एकमेकांवर चुका ढकलत आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी यांच्या दालनात १०० शेतकऱ्यांनी उपोषण केले होते. कोणाची चूक आहे हे त्यांनी तपासावे. माझ्या मतदारसंघातील संपूर्ण तालुक्यामध्ये मोसंबी, डाळींब अशा वेगवेगळ्या प्रकारच्या फळबागा आहेत. त्यांना नुकसान भरपाईची एक रुपया मदत मिळाली नाही. जिल्हाधिकारी यांनी याप्रकरणी गठीत केलेल्या चौकशी समितीने मागील ४-६ महिन्यांत काही काम केले नाही. एका पोलीस स्टेशनच्या हद्दीत दोन आत्महत्या झाल्या आहेत, ४ लोक पुरामध्ये वाहून गेले, अतिवृष्टीमुळे सर्व फळबागा उद्ध्वस्त झाल्या. परंतु अद्यापही मदत देण्यात आली नाही. मंत्री महोदय त्यांच्या स्तरावर निर्णय घेऊन फळबाग शेतकऱ्यांना मदत करतील, अशी माझी अपेक्षा आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, मी सांगितल्यानुसार ४७ मंडळांमध्ये ५१८ कोटी रुपये मदत केली आहे. याची सन्माननीय सदस्य यांनी खात्री करुन घ्यावी. सदरहू रकमेतील ९७ टक्के रक्कम संबंधितांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. २-३ टक्के रक्कम काही किरकोळ कारणांमुळे जमा करण्यात आली नाही, त्याची माहिती माझ्याकडे आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नाराणराव केचे यांनी सांगितले की, तीन मंडळे वगळण्यात आली आहेत. ते निकषामध्ये बसत नसल्याने वगळले गेले आहेत. कोणत्या जिल्ह्याला किती मदत केली, याची माहिती मी सांगितली आहे. बीड जिल्ह्यासाठी ६४४ कोटी रुपये या वर्षाच्या कालावधीत मदत दिली आहे. मी सन्माननीय सदस्य यांच्या भावनेशी सहमत आहे. त्यासाठी निकष बदलावे लागतील. खरीपाचे निकष बदलावे लागते. सन्माननीय सदस्य यांनी सांगितल्यानुसार जिल्हाधिकारी यांनी गठीत केलेल्या समितीच्या कामाची माहिती त्यांचेकडून घेऊन ती तपासून घेण्यात येईल. उक्त समितीने एक महिन्याच्या आत तपासणी करावी. सदरहू प्रकरणी कोणी हयगय केल्याने शेतकऱ्यांचे नुकसान केल्याचे आढळले तर

अप्रकाशित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार...

त्यांना माफ करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. कोणाच्या चुकीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, त्यांना भरपाई मिळाली नसेल तर ही अक्षम्य चूक आहे, असे मी मानतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांच्या भावना लक्षात घेऊन पुढील खरीप हंगामापासून निकषामध्ये बदल करावे लागतील. केंद्र शासनाला दोन पत्रे पाठवून एसडीआरएफच्या निकषामध्ये बदल करण्यास सांगितले आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापनाच्या काही अटी व नियम आहेत. त्याबाबत आम्ही प्रयत्न करीत आहोत. या विषयाची व्याप्ती वाढत आहे. उक्त निकषात बदल केल्यानंतर ५० मी.मी. पावसाचा निकष लावला तर एखाद्या भागामध्ये ४८-४९ मी.मी. पाऊस झाला तर तेथील शेतकरी नुकसान भरपाईची मागणी करण्यास सुरुवात करतील. शासनाचे धोरण सर्वव्यापी असते व सर्वांच्या हिताच्या दृष्टीकोनातून निर्णय घेण्यात येत असतात. पुढील खरीप हंगामापासून निकषामध्ये बदल करण्याचे सरकारचे धोरण असून हा बदल नक्की करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जिल्हाधिकारी यांनी पाठविलेल्या प्रस्तावातील ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचा एक निकष पूर्ण होईल. परंतु २४ तासांच्या आत ६५ मी.मी.पाऊस झाला असल्याच्या नोंदीचा दुसरा निकष पूर्ण होत नाही. सदरहू दोन्ही निकष पूर्ण झाले तरच मदत करता येते. आपल्या प्रस्तावाप्रमाणे वर्धा, नागपूर अशा अनेक जिल्ह्यांचे प्रस्ताव आहेत. आपल्याला नियमांच्या पलिकडे जाऊन मदत करता आली तर आनंदाची बाब आहे. आगामी खरीप हंगामापासून निकषामध्ये बदल करण्याची सरकारने पूर्ण तयारी केली आहे. त्या दृष्टीने पाऊल टाकण्यात आले आहे. सदरहू प्रकरणातील सर्व शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी एकूण आर्थिक बोजा लक्षात घेऊन राज्य सरकारकडून काही मदत देता येईल का, याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत

श्री.हरीभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना अधिकाऱ्यांनी जसे सांगितले त्यानुसार त्यांनी उत्तर दिले आहे. परंतु वस्तुस्थिती वेगळी आहे.

अध्यक्ष महोदय, ६४ मी.मी.पाऊस पडला तरी मदत देता येत नाही, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. ६० मी.मी., ६४ मी.मी. पाऊस झाल्यानंतर पुन्हा ३० तासांनी ३० ते ४० मी.मी. पाऊस पडला त्यानंतर पुन्हा ४० तासांनी ३० ते ४० मी.मी.पाऊस पडला तर तो पिकांसाठी पोषक आहे की मारक आहे ? याकरिता पावसाचे मोजमाप लक्षात घेऊ नये. शेतकऱ्यांच्या पिकांचे अतिवृष्टीने ३३ टक्के नुकसान झाले, ते पाहण्याठी कोणी गेले नाही. तहसिलदार यांना या नुकसानीचे फोटो शेतकऱ्यांनी आणून दिले तरी ते विचारात घेतले नाही. पावसाचे मोजमाप यंत्र प्रत्येक गावात नसून मंडळाच्या ठिकाणी आहे. मंडळ व गाव यांमधील अंतर २० ते २५ कि.मी. असू शकते व मंडळाच्या ठिकाणी पडलेल्या पावसाची नोंद करण्यात आली. सतत पडणाऱ्या पावसामुळे पिकांना वापसा होत नाही, ऑक्सिजन मिळत नाही. त्यामुळे झाडे वाळतात, कपाशीचे झाड तर लवकर वाळून जाते. पिकांना १५-१५ दिवस वापसा झाला नाही तर त्यांना ऑक्सिजन कोठून मिळेल, याचा विचार करण्यात करण्यात येत नाही. हा विचार करण्यासाठी शासनाकडे सक्षम यंत्रणा आहे की नाही, हे माझ्या लक्षात येत नाही.

अध्यक्ष महोदय, केवळ पाऊस मोजण्याच्या यंत्रावरुन ६५ मी.मी.पाऊस झाला की नाही, हे तपासण्यात येते व त्यावरुन नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेण्यात येतो. ६५ मी.मी.पाऊस झाला नसल्याच्या कारणास्तव पिकांची नुकसान भरपाई देण्याचे नाकारले, अशी राज्यात खूप गावे आहेत. या संदर्भात मंत्री महोदयांनी अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्याने अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचे, पीक वाळल्याचे किंवा पिवळे पडल्याचे फोटो काढून दिले तर त्यांच्या नुकसानीचे पंचनामे केले पाहिजेत. परंतु ते कोठेही करण्यात आले नाहीत. अशा शेतकऱ्यांना सरसकट मदत करावयास पाहिजे होती, निकष लावायला नको होता.

असुधारित प्रत

श्री.हरीभाऊ बागडे...

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना शेडनेट अनुदानावर दिले असले तरी त्यामध्ये शेतकऱ्याने स्वत:च्या हिश्श्याचे पैसे दिलेले असतात. त्याचे अतिवृष्टीने नुकसान झाल्यास त्यांना मदत केली पाहिजे, ती करण्यात येत नाही.

अध्यक्ष महोदय, ज्या मंडळामध्ये अनुदान देण्यात येईल, असे सांगितले होते तेथील सर्व शेतकऱ्यांना ते मिळाले नाही. फुलंब्री व बदनापूर तालुक्यातील गावे शेजारी शेजारी आहेत. त्यांच्या शिवाचे अंतर ३३ फुट इतके आहे. ६५ मी.मी. सतत पाऊस झाला तर त्याचा शासन विचार करुन भरपाई अनुदान देईल काय, शेडनेट नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल काय, ज्या गावातील नुकसानग्रस्तांना अद्याप काही मदत देण्यात आली ती देण्यासाठी शासन पुनर्विचार करणार आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हरीभाऊ बागडे यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांना मागील सरकारच्या काळात या सभागृहाच्या सर्वोच्च स्थानावरुन शेतकऱ्यांसाठी निर्देश देताना आम्ही पाहिले आहे, ऐकले आहे. त्यानुसार निकषाच्या बाहेर जाऊन सरसकट मदत दिल्याची माझ्याकडे माहिती नाही. आपण सर्व शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहोत.

अध्यक्ष महोदय, एका लक्षवेधी सूचनेच्या उप प्रश्नांना उत्तर देताना मी पर्जन्यमापक यंत्रणेच्या संदर्भात सांगितले आहे की, प्रत्येक ग्रामपंचायतनिहाय पर्जन्यमापक यंत्र यावर्षीपासून बसविण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतला आहे. मंडळस्तरावरील पर्जन्यमापक यंत्रावरुन त्या भागातील अंतर लक्षात घेऊन पर्जन्य सरासरी काढताना चूक होते आणि त्यामुळे शेतकऱ्यांना मदत करण्यास अडचण निर्माण होते.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.विजय वडेट्टीवार.....

त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी दिलेला सल्ला चांगला असल्यामुळे आम्ही तो स्वीकारलेला आहे. त्याप्रमाणे पुढील वर्षापासून कार्यवाही करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, शेडनेटला इन्शोरन्स असते. त्यामुळे एसडीआरएफच्या निकषामध्ये नेटसेटला मदत देय नाही. सन्माननीय सदस्य श्री.बबनराव लोणीकर यांनी सांगितल्याप्रमाणे फळबागांना मदत देय आहे. मदत करण्याचे कोठे राहून गेले असेल तर ते माझ्या निदर्शनास आणून द्यावे. त्यानंतर शासनाच्या माध्यमातून संबंधितांना त्वरीत मदत उपलब्ध करुन देण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हरिभाऊ बागडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंदर्भात सांगू इच्छितो की, निकषानुसार ६५ मिलोमीटर आणि ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देता येते. परंतु आपण सर्वजण शेतकरी प्रतिनिधी म्हणून येथे आलो आहोत. त्यामुळे आपल्या भावना लक्षात घेऊन सतत तीन दिवस पडलेल्या पावसाची १०० मिलीमीटर नोंद झाली तर उक्त निकषामध्ये घेऊन संबंधित शेतकऱ्यांना मदत करणे अपेक्षित आहे. त्यामुळे आमचे सरकार त्यादृष्टीने उपाययोजना करीत आहे. पुढील खरीप हंगामापासून हा नियम लागू करणे आवश्यक आहे. सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. सततच्या पावसामुळे सोयाबीनचे पीक लवकर उद्धवस्त होते. कापूस पिकाचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान होते आणि ही बाब सर्वांना माहिती आहे. हे नियम आज तयार केले नसून अनेक वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेले आहेत. अशा प्रकारची मागणी पूर्वी करण्यात आली होती. परंतु मागील सरकारने या निकषामध्ये कोणताही बदल केलेला नाही. एनडीआरएफच्या निकषानुसार केंद्र सरकार निधी उपलब्ध करुन देते आणि राज्य सरकार त्यामध्ये आपला हिस्सा टाकून तो पैसा शेतकऱ्यांना वितरीत करीत आहे. मागील काळामध्ये निकषामध्ये बदल करुन शेतकऱ्यांना मदत केलेली आहे. निकषानुसार जिरायत शेतीसाठी ६ हजार ८०० रुपये देय होते. परंतु महाविकास आघाडी सरकारने १० हजार रुपये मदत केलेली आहे.

असुधारित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार.....

कारण तेवढी मदत करण्याची आवश्यकता होती. तेव्हा राज्य सरकारने अतिरिक्त निधीचा वाटा उचलला होता. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे एकत्रिकरण करुन विशेष बाब म्हणून माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्यासोबत चर्चा करुन राज्यातील शेतकऱ्यांना मदत देण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

श्री.नारायण कुचे : अध्यक्ष महोदय, उक्त प्रश्नासंदर्भात मंत्री महोदयांनी सकारात्मक विचार केल्याबाबत मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु पर्जन्यमापक यंत्रणा ही २२-२३ किलोमीटर इतकी बाजूला लावली जाते. मी आपणास सांगू इच्छितो की, माझ्या मतदारसंघामध्ये एकाच दिवशी ३४० मिलीमीटर पाऊस पडलेला आहे. ज्यावेळी जास्त पाऊस पडत होता, तेव्हा पर्जन्यमापक यंत्रणा बंद होती. बदनापूर तालुक्यातील भावनेपूर महसूल सर्कल आणि भोकरदन मधील राजूर महसूल सर्कलमधील पर्जन्यमापक यंत्रणा बंद होती. यासंदर्भात मी जिल्हाधिकारी यांना देखील माहिती दिलेली आहे. उक्त प्रकरणी चौकशी करणार आहात काय?

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील लाभापासून वंचित राहिलेल्या गावांना आता आपण मदत करणार आहात काय?

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, मी वारंवार तेच उत्तर देत आहे. ज्या ठिकाणचे पर्जन्यमापक यंत्रणा बंद होती परंतु त्या ठिकाणी ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले असेल अशा ठिकाणचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडून त्वरीत मागविण्यात येईल व योग्य ती मदत करण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** बार्टी संस्थेच्या धर्तीवर अमृत योजनेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन रिक्त सर्व पदांची भरती करण्याबाबत

**मु.शी.:** बार्टी संस्थेच्या धर्तीवर अमृत योजनेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन रिक्त सर्व पदांची भरती करण्याबाबत या संबंधी श्री. इंद्रनील नाईक, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. इंद्रनील नाईक (पुसद) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी "अमृत" (AMRUT-Academy of Maharashtra Research, Upliftment and Training) संस्थेला निधी व कर्मचारी पदाधिकारी देण्याबाबत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी "अमृत" ही संस्था ऑगस्ट, २०१९ मध्ये स्थापन करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, यापूर्वी अनुसूचित जातीतील तरुण व तरुणींसाठी त्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने बार्टी ही संस्था स्थापन करण्यात येणे, त्याच धर्तीवर खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांचा शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी "अमृत" ही योजना शासनाने मंजूर करणे, परंतु, सुमारे २ वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनसूध्दा या संस्थेला कार्यालयासाठी जागा तसेच त्याठिकाणी अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक न करणे तसेच त्यांना आर्थिक निधीसूध्दा अद्याप देण्यात न आल्यामुळे या संस्थेचे काम ठप्प असणे, त्यामुळे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांच्या शैक्षणिक व त्यांना मार्गदर्शन प्रशिक्षणही न मिळणे, त्यामुळे या प्रवर्गात पसरलेला तीव्र असंतोष, "अमृत" या संस्थेला कार्यालयासाठी जागा तसेच त्या संस्थेसाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

श्री. इंद्रनील नाईक.......

ही योजना प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत

श्री. विजय वडेट्टीवार ( इतर मागास बहुजन कल्याण मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितर ीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. इंद्रनील नाईक : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेवरील उत्तर मला १५ मिनिटांपूर्वीच प्राप्त झालेले आहे. याबाबत मी पुन्हा बोलणार आहे. परंतु त्यापूर्वी उक्त लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी "अमृत" (AMRUT-Academy of Maharashtra Research, Upliftment and Training) संस्थेची स्थापना माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये करण्यात आली आहे. केंद्र सरकारने खुल्या प्रवर्गातील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या लोकांसाठी १० टक्के आरक्षण दिले आहे. या आरक्षणाचा लाभ शैक्षणिक संस्थाच्या प्रवेशामध्ये व नोकरीमध्ये मिळत आहे. परंतु होतकरु उमेदवारांना मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळत नाही.

अध्यक्ष महोदय, मला सांगताना आनंद होत आहे की, अनुसूचित जातीतील तरुण व तरुणींसाठी त्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने बार्टी ही संस्था स्थापन करण्यात आली आहे. ही संस्था अतिशय चांगले काम करीत आहे. मागास प्रवर्गातील मराठा समाजासाठी छत्रपती शाहू महाराजांच्या नावे सारथी संस्था स्थापन करण्यात आली आहे. ही संस्था देखील अतिशय चांगले काम करीत आहे. बहुजन दुर्बल आणि वंचित घटकांसाठी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावे महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेची (महाज्योती) स्थापना करण्यात आली आहे. ही संस्था अत्यंत चांगले काम करीत आहे. अमृत या संस्थेची सन २०१९ मध्ये स्थापना करण्यात आली. परंतु आजपर्यंत या संस्थेमध्ये अधिकारी/कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली नाही. या संस्थेचे कार्यालय देखील बांधण्यात आले नाही. तसेच संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत.

अध्यक्ष महोदय, खुल्या प्रवर्गातील तरुण-तरुणींचे सशक्तीकरण करणे हे अमृत स्थंस्थेचे उद्दिष्ट आहे, असे या संस्थेची स्थापना करताना सांगितले होते. परंतु आज ही संस्था कार्यान्वित नाही. म्हणजे सद्य:स्थितीत ही संस्था कोमामध्ये गेलेली आहे. त्यामुळे या संस्थेला कोमामधून बाहेर काढणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत

श्री. इंद्रनील नाईक.......

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेचे उत्तर १५ मिनिटांपूर्वीच प्राप्त झालेले आहे. या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये १७ पॉईंटस् आहेत. यामधील पहिल्या पॉईंटमध्ये असे उत्तर दिले आहे की, "जिल्हाधिकारी व समाज कल्याण अधिकारी यांच्या जिल्हा कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे." माझ्या जिल्ह्यातील उक्त कार्यालयामध्ये आजपर्यंत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार झालेला नाही. सदर पत्रव्यवहार लवकरात लवकर करुन याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मी विनंती करतो. तसेच आपण १७ व्या पॉईंटमध्ये असे नमूद केले आहे की, सन २०२२-२३ साठी ई-रुपे शिलेदार योजनेसाठी बजेटमध्ये ५० कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आले आहेत. या योजनेची सर्व माहिती प्रसारित करावी व या योजनेची जाहिरात करावी.

अध्यक्ष महोदय, जीएसटी संदर्भातील प्रश्नाचा पाठपुरावा लवकरात लवकर करावा, अशी मी विनंती करतो. तसेच सदर संस्था केव्हा कार्यान्वित करणार आहत काय आणि यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखणार आहात काय?

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व सामाजिक विकास करण्यासाठी अमृत या संस्थेची दिनांक १ ऑक्टोबर, २०१९ रोजी स्थापना करण्यात आली आहे आणि दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी स्ट्रस्ट ॲक्टमध्ये या संस्थेचे रजिस्ट्रेशन देखील करण्यात आले आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. विजय वडेट्टीवार....

याकरिता एक कोटी रुपयांची तरतूद केली गेली. भाड्याची इमारतही याकरिता घेण्यात आली आहे. सुरुवातीला या संस्थेचे मुख्यालय पुणे येथे करण्याचे ठरले होते. परंतु नंतर मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन हे मुख्यालय नाशिक येथे करण्याचा निर्णय घेतला गेला. यासाठी मान्यता देण्यात आली होती. तसेच या संस्थेकरिता ३ नियमित पदे आणि १७ कंत्राटी पदांनाही मान्यता मिळाली आहे. सचिवांच्या उच्चस्तरीय समितीने याकरिता मान्यता दिली आहे. विभागाने यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये ५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यात काही किरकोळ बाबी राहिलेल्या आहेत. जसे की, जीएसटी क्रमांक घेणे. मध्यंतरी एक मागणी समोर आली होती. ही संस्था सोसायटी ॲक्टमध्ये नोंदणी झाली असून ती कंपनी ॲक्टमध्ये नोंदणीकृत करावी, अशी ती मागणी होती. अनेक संस्थांची नोंदणी पूर्वी सोसायटी ॲक्टमध्ये होत असे. नंतर ती कंपनी ॲक्टमध्ये केली जात असे. पूर्वी बार्टीसंदर्भातही असाच निर्णय घेण्यात आला होता. आता तो कायमचा राहिला आहे. सारथी आणि महाज्योती या संस्थेची नोंदणी सुरुवातीला सोसायटी ॲक्टमध्ये झाली होती. त्यानंतर त्यांचे रुपांतर कंपनी ॲक्टमध्ये करण्यात आले. याबाबत शासन विचाराधीन होते. या वर्षीच्या शैक्षणिक सत्रात ही संस्था कार्यान्वीत करण्यासाठी एक महिन्याच्या आत त्रुटींची पूर्तता केली जाईल. मी याबाबत आधीच सांगितले आहे की, याबाबतचा आढावा घेण्याचे काम विभागाकडून यापूर्वीच सुरु झाले आहे. पदांनाही मान्यता देण्यात आली आहे. मध्यंतरी दोन वर्षे कोविड – १९ मुळे ही संस्था पुढे नेत असताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. ही संस्था नवीन असल्यामुळे सुरुवातीला आर्थिक तरतूद करता आली नाही. परंतु टोकन तरतूद एक कोटी रुपयांची केली होती. आता मात्र याकरिता ५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या संस्थेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण देण्याचा मानस सरकारचा आहे. आयआयटी, आयआयएम या नामवंत संस्थांसोबत करार करण्यात येणार आहे. याकरिता विभागाने पत्र व्यवहार सुरु केला आहे. मला सभागृहाच्या निदर्शनास एक गोष्ट आणून द्यावयाची आहे. समाजकल्याण विभागाने नाशिक येथे कार्यालयाच्या इमारतीकरिता जागा उपलब्ध करुन द्यावी, याकरिता पत्र पाठविण्यात आले आहे. ती जागा लवकरच

असुधारित प्रत

श्री. विजय वडेट्टीवार....

विभागाच्या ताब्यात येईल आणि नाशिक येथे या संस्थेचे मुख्यालय सुरु होईल. कोणत्याही परिस्थितीत ते यावर्षापासून कार्यान्वीत केले जाईल. विद्यार्थ्यांना नामवंत संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था उपलब्ध करुन दिली जाईल.

डॉ. राहुल पाटील : अध्यक्ष महोदय, शासनामार्फत अमृत (AMRUT-Academy of Maharashtra Research, Upliftment and Training) संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. महाज्योती, सारखी किंवा TRTI यासारख्या संस्था स्थापन होऊन दोन वर्षाचा कालावधी होत आहे. परंतु या संस्थांचे कार्यालय कोठे आहे हे अद्यापपर्यंत कोणालाही महित नाही. याकरिता जनजागृती झाली पाहिजे. मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, दोन कर्मचारी नियुक्त केले आहेत. यात लेखा अधिकारी आणि रजिस्ट्रार यांचा समावेश आहे. विभागीय कार्यालयात मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत. तेथे अनेक वर्षापासून पदभरती झाली नाही. अशा वेळेस तेथील अधिकारी, कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कार्यभार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक जिल्ह्यात या संस्थांची कार्यालये कधीपर्यंत सुरु करण्यात येणार आणि विभागीय कार्यालय, जिल्हा कार्यालयात वर्ग – ३ व वर्ग – मधील कर्मचाऱ्यांची नियुक्ती कधीपर्यंत करण्यात येणार आहे ? दुसरे असे की, या संस्थेशी आयआयटी, आयआयएम संस्था संलग्न केली जाणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाची एक संस्था या माध्यमातून तयार करण्यात येणार आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, याकरिता एक समिती गठीत करावी. तसेच राज्यातील पारंपारीक विद्यापीठ, कृषि विद्यापीठ यांना एकत्र करुन अभ्यासगट निर्माण केला जाणार काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, या संस्थेचा तोच उद्देश आहे. खुल्या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचा किंवा ज्या घटकांचा समावेश बार्टी, सारथी, महाज्योती या संस्थांमध्ये नाही ते सर्व घटक यामध्ये आहेत. याच उद्देशाने या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. यात पॅन, टॅनकरिता जवळपास साडेतीन महिन्यांचा कालावधी लागतो. याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे. जीएसटीकरिता कागदपत्रांची

असुधारित प्रत

श्री. विजय वडेट्टीवार....

पूर्तता करण्यात आली आहे. ते देखील लवकरच उपलब्ध होणार आहे. १७ कंत्राटी अधिकारी आणि ३ नियमित अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. यात प्रकल्प संचालक, संशोधन अधिकारी, सहायक संशोधन अधिकारी यासह इतर सर्व पदांची पदभरती केली जाईल. ही नवीन संस्था असल्यामुळे तिचा विस्तार लगेच जिल्हास्तरावर करणे शक्य होणार नाही. या संस्थेचे कामकाज सुरु झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने विभागीय स्तरावर व जिल्हा स्तरावर या संस्थेचा विस्तार करण्याचे नियोजित आहे. यादृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे.

श्री. राजेश पवार : अध्यक्ष महोदय, अमृत ही संस्था खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासाच्या विविध योजना राबविण्यासाठी स्थापन केली आहे. आर्थिक दूर्बल घटकामध्ये मराठा समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. मागील सरकारच्या काळात मराठा समाजासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये हॉस्टेल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. माझ्या माहितीप्रमाणे त्याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही. मराठा समाजाचे मिळालेले आरक्षण या सरकारच्या निष्काळजीपणामुळे गेले आहे. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला आहे. मराठा समाजाकरिता प्रत्येक जिल्ह्यात किती दिवसात हॉस्टेल उभारण्यात येणार आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या लक्षवेधी सूचनेशी संबंधित नाही. हा प्रश्न स्कोपच्या बाहेरच्या असला तरीही त्याला उत्तर देणे अपेक्षित आहे. सध्या सारथी ही संस्था नियोजन विभागाकडे आहे. माननीय छत्रपती संभाजी राजे हे उपोषणाला बसले होते. त्यावेळेस निर्णय झाला होता. महसूल मंत्री महोदयांनी तातडीने जमीन देण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिक येथील शासकीय इमारती भाड्याने घेऊन तेथे हॉस्टेल सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे येथे इमारत बांधण्यासाठी ६८ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. विभागीय स्तरावर ६ वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय झाला आहे. ते वसतीगृह या सत्रापासून सुरु होणार आहेत. जिल्हास्तरावर जागा उपलब्ध

असुधारित प्रत

श्री. विजय वडेट्टीवार....

झाल्यानंतरही याबाबतचा निर्णय घेतला जाईल. याकरिता आवश्यक निधी या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये उपलब्ध करुन दिला आहे. सारथी, बार्टी, महा ज्योती संस्थेकरिता प्रत्येकी २५० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. यातून सर्व यंत्रणा उभी करण्याचे ठरले आहे.

**उपाध्यक्ष :** आता विशेष बैठकीतील अनुक्रमांक २ वरील लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** राज्यातील पत्रकारांच्या विविध समस्यांबाबत
**मु.शी. :** राज्यातील पत्रकारांच्या विविध समस्या यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.रोहित पवार, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रोहित पवार (कर्जत जामखेड) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यातील पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास किंवा मृत्यू झाल्यास त्यांना मदत करण्याच्या उद्देशाने शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीची स्थापना शासनाने १ ऑगस्ट, २००९ रोजी केलेली असणे, सदरील निधीतून मिळणाऱ्या मदतीच्या रकमेत शासनाने सन २०१६ नंतर वाढ केलेली नसणे, सदरील निधीतून केवळ अधिस्वीकृतीधारक पत्रकारांनाच मदत मिळत असणे, शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात दरवर्षी रुपये १० कोटीची कायम निधीची तरतूद करण्याची मागणी पत्रकारांची असणे, या योजनेअंतर्गत पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांना मदतीस पात्र असलेल्या आजारांची संख्या वाढ करण्याची आवश्यकता असणे, पत्रकार संरक्षण कायद्याची अंमलबजावणी राज्यात कठोरपणे होत नसणे, ग्रामीण व शहरी पत्रकारांना अपघात विमा व आरोग्य विम्याची सुविधा नसणे, महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून सरसकट सर्व पत्रकारांना दीड लाखांपर्यंत मोफत उपचाराची सोय उपलब्ध नसणे, या सर्व प्रश्नांची तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.

श्रीमती आदिती तटकरे (माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उपाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**(प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री. रोहित पवार : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेमधील विषय अतिशय महत्त्वाचा आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ मिडिया आणि पत्रकारिता आहे. याबाबत बोलत असताना आपण याकडे एका वेगळ्या दृष्टीकोनातून पाहत असतो. एक वेगळे परसेप्शन यामध्ये असते. मिडीयाबाबत सांगावयाचे झाले तर आपणास केवळ संपादक किंवा टी.व्ही. वर बातम्या सांगणारे अँकर दिसत असतात. त्यांच्याकडे पाहून आपणास असे वाटते की, सर्वच पत्रकार, मिडिया, टी.व्ही. कॅमेरामन व इतरांची परिस्थिती चांगली आहे. परंतु याबाबत मी माहिती घेतली आहे. राज्यात किती वर्तमानपत्रांची नोंदणी झाली आहे, याची मी माहिती घेतली आहे. त्यावरुन राज्यात १,८०० वर्तमानपत्रांची नोंदणी झाल्याचे समजले. अधिकृत वृत्तपत्रामधील कर्मचाऱ्यांची संख्या जवळपास १८ हजार आहे. यात प्रिंट मिडिया, मिडिया, प्रोफेश्नल मिडिया यामध्ये अंदाजे पाच लाखांपेक्षा अधिक लोक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष काम करीत असतात.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित

श्री.रोहित पवार.....

कोरोना काळात अडचणीत असणाऱ्या अनेक पत्रकारांचे आम्हाला देखील फोन येत होते. सुमारे ५ हजारांपेक्षा जास्त पत्रकारांना कोरोनाची लागण होऊन सुमारे १५० जणांचे दुर्दैवाने निधन झाले. परंतु कोरोना हा एकच मुद्दा नाही. या पत्रकारांवर कामाचा देखील प्रचंड ताण असतो. बातम्या मिळाल्या पाहिजेत, एखादी घटना घडल्यानंतर तेथे गेले पाहिजे, कोरोना असो चक्रीवादळ असो किंवा काहीही असो पत्रकारांना आपले कर्तव्य बजवावे लागते. अशा परिस्थितीतच काही दुर्दैवी प्रकार घडल्याचे ऐकायला मिळते. जसे की, सोलापूर येथील पत्रकार श्री.प्रकाश जाधव यांनी औषधोपचारासाठी पैसे जमत नसल्याने दुर्दैवाने स्वत:चा जीव संपवला. परभणी येथील श्री.अरुण हिंसवणकर यांनी देखील असाच निर्णय घेऊन स्वत:चे जीवन संपविले. त्या-त्या परिस्थितीत त्यांनी हे निर्णय घेतले असले तरीही त्यामुळे त्यांचे कुटुंब अडचणीत येते.

अध्यक्ष महोदय, या सर्व बाबी पाहता पत्रकारांना आपल्याला कसे सहकार्य करता येईल याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. याच उद्देशाने दिनांक १ ऑगस्ट, २००९ रोजी शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. हा अतिशय चांगला निर्णय आहे. त्यावेळी यासाठी ५ कोटी रुपये देण्यात आले होते. नंतर सन २०१६ मध्ये त्यामध्ये १० कोटी रुपयांपर्यंत वाढ करण्यात आल्याची माहिती मला मिळाली आहे. अगोदरच्या सरकारने निवडणुकांच्या तोंडावर या निधीमध्ये आणखी ५ कोटी रुपयांची भर घातली. स्वागत करण्यासारखी बाब अशी की, माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार आणि माननीय मंत्री श्रीमती आदिती तटकरे यांनी गेल्या दोन वर्षांमध्ये हा निधी ५० कोटी रुपयांवर नेला आहे. परंतु तरीही काही महत्त्वाचे प्रश्न आमच्या सर्वांसमोर आहेत. ते आपल्या माध्यमातून मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

अध्यक्ष महोदय, शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीसाठीच्या समितीची नियुक्ती झालेली आहे किंवा कसे

असुधारित प्रत

श्री.रोहित पवार.....

हे मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगावे. जर नियुक्ती झाली नसेल तर कधीपर्यंत करण्यात येईल, हेही सांगावे.

अध्यक्ष महोदय, सरकारने आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना आणलेली आहे. यासाठी शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या व्याजाची रक्कम वापरली जाते. परंतु यामध्ये अनेक किचकट अटी टाकण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे अनेक मोठया पत्रकारांना देखील या निधीचा फायदा झाला नाही. उदाहरण द्यायचे झाले तर स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी सुरु केलेल्या मार्मिक या मासिकाचे कार्यकारी संपादक श्री.पंढरीनाथ सावंत यांना देखील काही अडचणी आल्या. त्यामुळे या किचकट अटी शिथिल केल्या जातील का, असा माझा या निमित्ताने प्रश्न आहे. तसेच ३० वर्षांची अनुभवाची अट २५ वर्षे केली जाईल का ?

अध्यक्ष महोदय, अधिस्विकृतीधारक पत्रकारांची संख्या केवळ ३ हजार एवढी आहे. त्यांना महात्मा फुले जीवनदायी योजनेंतर्गत आरोग्य विषयक मदत मिळते. परंतु असे अनेक पत्रकार असे आहेत की ते अधिस्विकृतीधारक नाहीत. मी मघाशीच श्री.प्रकाश जाधव यांचे देखील उदाहरण दिले. तसेच कॅमेरामन, छोटे पत्रकार, फ्रेशर्स, यांना देखील ही मदत मिळत नाही. त्यामुळे उर्वरित पत्रकार व पत्रकारितेशी संलग्न लोकांना ही मदत करता येईल का, हा माझा सरकारला प्रश्न आहे. तांत्रिकदृष्टया तशी मदत देणे शक्य नसल्यास अधिस्विकृतीधारक पत्रकारांची संख्या वाढविता येईल का?... (अडथळा...)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, पत्रकारांच्या विषयावरील ही महत्त्वाची लक्षवेधी सूचना आहे. त्यामुळे कृपया आपण खाली बसावे.

श्री.रोहित पवार : अध्यक्ष महोदय, यानंतर अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. सदर चर्चेसाठी तीन तासांची वेळ ठरवून देण्यात आली असेल व विरोधी पक्षाच्या वाटयाचा दीड तासांचा वेळ संपला असेल तर... (अडथळा...)

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना मी पुन्हा सांगू इच्छितो की, पत्रकारांच्या महत्त्वाच्या विषयावरील ही लक्षवेधी सूचना आहे. त्यामुळे आपण खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.रोहित पवार यांनी आपले प्रश्न विचारावेत.

श्री.रोहित पवार : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना वाटत असेल की हा महत्त्वाचा विषय नाही तर त्यांनी तसे सांगावे... (अडथळा...) अध्यक्ष महोदय, मला संरक्षण द्यावे... (अडथळा...)

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने शेवटचा प्रश्न विचारत आहे. पत्रकारिता संरक्षण कायदा आपल्या राज्यामध्ये लागू झाला आहे का व झाला असल्यास त्याअंतर्गत कोणत्या पत्रकाराला मदत झाली आहे का ?

श्रीमती आदिती तटकरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रोहित पवार यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाने हाती घेतलेल्या योजनांच्या अनुषंगाने तीन-चार प्रश्न विचारलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी योजना सन २००९ मध्ये सुरु करण्यात आली. ऑक्टोबर, २०११ मध्ये या योजनेचे निकष ठरविण्यात आले. त्यानुसार अधिस्विकृतीधारक पत्रकारांचाच या योजनेत समावेश करण्यात आला व त्यांनाच या योजनेंतर्गत लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानंतर यामध्ये वेळोवेळी बदल करण्यात आले व त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली आहे. सन २०११ मध्ये या योजनेसाठी २ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली. त्यानंतर सन २०१३ मध्ये ३ कोटी व सन २०१५ मध्ये ५ कोटी रुपये प्राप्त झाले. मी सभागृहाला सांगू इच्छिते की, सदर १० कोटी रुपयांचा निधी राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेव स्वरुपात ठेवण्यात आला व त्यातून मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेतून सदर योजना गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे.

असुधारित प्रत

श्रीमती आदिती तटकरे.....

अध्यक्ष महोदय, कालांतराने पत्रकार समित्यांनी मागणी केली की, या योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या वाढविण्यात यावी. त्यानुसार केवळ अधिस्विकृतीधारक पत्रकारांचा नव्हे तर त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांना देखील या योजनेचा लाभ देण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला. सद्यस्थितीत या योजनेसाठी गुंतविण्यात आलेल्या रकमेतून मासिक ६ लाख रुपये व्याज मिळते परंतु प्रत्यक्ष गरज १८ लाख रुपये प्रति माह एवढी आहे. त्यामुळे या रकमेत वाढ करण्याबाबत आम्ही दरम्यानच्या काळात माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे विनंती केली. कारण व्याजापोटी मिळणारी रक्कम मर्यादित असून अधिस्विकृतीधारक पत्रकारांची संख्या वर्षानुवर्षे वाढत आहे. सुमारे साडे तीन ते चार हजार अधिस्विकृतीधारक पत्रकार असून गेल्या तीन-चार वर्षांमध्ये ६९१ पत्रकारांची यामध्ये वाढ झालेली आहे. यातून मिळणाऱ्या व्याजातूनच आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना चालते. आम्ही केलेल्या विनंतीवरुन मुख्यमंत्री महोदयांच्या सूचनेनुसार माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी गेल्या वर्षी व यावर्षी दोन्ही वर्षात मिळून सुमारे २५ कोटी रुपये रकमेची अर्थसंकल्पात तरतूद करुन उपलब्ध करुन दिली. त्यामुळे आता ३५ कोटी रुपये रकमेच्या व्याजातून या योजनांचा लाभ देण्यात येतो.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित

श्रीमती आदिती तटकरे...

ज्याचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केला की यामध्ये मर्यादित संख्या आहे. पण ती अधिस्वीकृतीधारक जे पत्रकार आहेत त्यांची संख्या असल्यामुळे त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना या अंतर्गत लाभ मिळतो. आरोग्य विभागाची जी महात्मा ज्योतिबा फुले जनकल्याण योजना आहे त्यामध्ये जे केशरी किंवा पिवळे कार्डधारक किंवा तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला ज्यांच्याकडे असतो त्या सर्वांना लाभ मिळतो. त्यामध्ये खासकरुन फक्त पत्रकार नाहीत. ज्यांच्याकडे उत्पन्नाचा दाखला असेल त्या सर्वांनाच तो लाभ मिळतो. कारण त्या योजनेचा विस्तार मोठा आहे. म्हणून शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी योजना आहे त्यात जास्तीत जास्त अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना लाभ मिळावा हा शासनाचा मानस आहे, विभागाचाही हा मानस आहे. त्यामुळे हे होत असताना आता निधीची कमतरता जाणवणार नाही. कारण गेल्या २ वर्षामध्ये भरीव तरतूद आम्हाला बजेटमधून मिळाली असल्यामुळे महिन्याला जितकी मागणी येईल तितका पुरवठा करण्याची क्षमता आता विभागाकडे निश्चितपणे उपब्ध झाली आहे.

अध्यक्ष महोदय, काही वेळेस वृत्तपत्रामध्ये एखादी बातमी आली की, या पत्रकारांना अनेक दुर्घटनांना सामोरे जावे लागते. त्यांच्यावर हल्ला होतो किंवा कोणत्या तरी प्रकारचा अतिप्रसंग होतो. याबाबत जी कार्यवाही केली पाहिजे किंवा त्या पत्रकारांना संरक्षण दिले पाहिजे त्याबाबत सुध्दा जवळपास २०१९ पासून जी तरतूद शासनाने मंजूर केली आहे त्यातून २९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. याबाबतची सविस्तर माहिती गृह विभागाकडून प्राप्त करुन सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल. पण आमचा जास्तीत जास्त असा प्रयत्न आहे की, या दोन्ही योजनांमधून पत्रकारांना जास्तीत जास्त लाभ मिळावा. या व्यतिरिक्त त्यांनी जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला की, याबाबत अधिस्वीकृती समितीची मुदत ऑगस्ट २०१८ मध्ये संपली आहे. त्यानंतर नव्या समितीची स्थापना करण्याबाबतचा प्रस्ताव आम्ही शासनाकडे पाठविला आहे. पण जरी ती समिती स्थापन होणे शिल्लक असले तरी देखील अधिस्वीकृतीचे काम कुठेही थांबलेले नाही. या कालावधीत सुध्दा

असुधारित प्रत

श्रीमती आदिती तटकरे...

जवळपास २५० ते ३०० पत्रकारांना अधिस्वीकृतीचे कार्ड देण्यात आले आहे. त्यामुळे ती समिती जरी गठीत नसली तरी हे कामकाज कुठेही थांबलेले नाही. शासन स्तरावर तो प्रस्ताव आहे. ती समिती लवकरात लवकर गठीत करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे, अशी माहिती मला आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना द्यायची आहे.

अध्यक्ष महोदय, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार योजनेंतर्गत जो लाभ पत्रकारांना दिला जातो आणि त्यासाठी जी ३० वर्षाची अट घातली आहे ती कमी करण्यासाठी शासन स्तरावर विचार सुरू आहे. तसे झाल्यास अधिकाधिक पत्रकारांना त्याचा लाभ मिळेल. पण ज्यांच्याकडे अधिस्वीकृती कार्ड नसेल. पण ३० वर्षाचा अनुभव असेल त्यांना अशा प्रकारचा लाभ दिला जातो. अनेक पत्रकारांना तो दिला आहे. काही जणांकडे ३० वर्षे पत्रकारिता केल्याचे पुरावे नसतात. त्यांच्या काही तांत्रिक अडचणी समोर आल्या आहेत. पण त्या सोडविण्याचा आमच्या विभागाचा प्रयत्न निश्चितपणे आहे.

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रोहित पवार यांनी अतिशय चांगल्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले आहे.

अध्यक्ष महोदय, यामध्ये २ योजनांचा समावेश आहे. एक आजारावरील उपचाराची तर दुसरी पेन्शनची योजना आहे. आजारासंबंधीच्या योजनेमध्ये फक्त २८ आजारांचा समावेश आहे. परंतु त्यामध्ये आजारांच्या संख्येमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन सर्व आजारांना यामध्ये कव्हर करता येईल. सलग ३० वर्षे पत्रकारिता करण्याची एक अट आहे आणि पेन्शनसाठी ६० वर्षे वय पूर्ण केले पाहिजे अशी अट आहे. पण अशी अट असता कामा नये. कारण अनेक वृत्तपत्रांचे पत्रकार आपल्या महाराष्ट्रात आहेत की ते शेवटच्या श्वासापर्यंत काम करीत असतात. त्यामुळे त्यांच्यासाठी आपण कोणत्या उपाययोजना करणार आहात. तसेच आपण निवृत्तीचे वय ६० वर्षे केले आहे ते देखील असता कामा नये. कारण पत्रकार हा शेवटच्या श्वासापर्यंत काम करीत असतो. अशा पध्दतीने काम करणारे अनेक

असुधारित प्रत

श्री. अभिमन्यू पवार...

वृत्तपत्रांचे मालक आहे. त्यामुळे त्यांचा सुध्दा यामध्ये विचार व्हावा, अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

श्रीमती आदिती तटकरे : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्यावेळी ही योजना जाहीर झाली त्यावेळी यामध्ये कमी आजारांच्या संख्येचा समावेश होता. मघाशी माझ्या उत्तरामध्ये मी सांगितले की, टप्प्याटप्प्याने यामध्ये वाढ झाली आहे. पूर्वी ती संख्या १० इतकी होती. त्यानंतर २२ झाले आणि आता २८ आजारांचा यामध्ये समावेश आहे. आता त्यामध्ये आणखी काही वाढ निश्चितपणे केली जाईल. कारण ती गरज सुध्दा आहे. याशिवाय आपण ३० वर्षे अनुभव किंवा ६० वर्षाच्या सेवानिवृत्तीच्या कालावधीनंतर पेन्शन योजना लागू आहे. कारण शासनाच्या इतर विभागामधील सुध्दा तो निकष आहे. त्यामुळे ६० वर्षे वयापेक्षा जास्त असलेले जे पत्रकार असतील किंवा सेवानिवृत्तीला आलेले जे पत्रकार असतील त्यांच्या बाबतीत सुध्दा या विभागाच्या माध्यमातून शासन स्तरावर त्याबाबतचा सकारात्मक प्रस्ताव दिला जाईल.

श्री. रोहित पवार : अध्यक्ष महोदय, मला मंत्री महोदयांना विनंती करायची आहे की, महात्मा फुले जीवनदायी योजनेमध्ये जे पत्रकार येत नाहीत किंवा ज्यांची अधिस्वीकृती पत्रकार म्हणून ज्यांची नोंदणी झालेली नाही त्या पत्रकारांसाठी आरोग्य विषयक काही तरी अडचण आली तर आकस्मिक घटनेबाबत आपल्याला सोय करता यावी किंवा यासाठी काही तरी वेगळा निधी अथवा यामधून काही तरी वेगळे करता आले तर त्याचा फायदा अशा पत्रकारांना नक्कीच होऊ शकतो आणि सरकारने ती बाब विचाराधीन ठेवावी.

श्रीमती आदिती तटकरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रोहित पवार यांनी सूचित केल्याप्रमाणे महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेमध्ये जे अधिस्वीकृतीधारक पत्रकार नसतील किंवा ज्यांच्याकडे तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला नसेल अशा पत्रकारांना लाभ घेण्यात यावा, याबाबतचा सकारात्मक प्रस्ताव आरोग्य विभागाकडे दिला जाईल आणि त्याला आरोग्य विभाग निश्चितपणे मान्यता

श्रीमती आदिती तटकरे...

देईल, अशी विनंती आम्ही त्या विभागाकडे करु. त्यामुळे या योजनेमध्ये जास्तीत जास्त पत्रकारांना आरोग्य विषयक कसा लाभ मिळेल यासाठी हा विभाग प्रयत्नशील राहील.

श्री. राजेश पाटील : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, सीमा भागातील मराठी भाषिक पत्रकारांना सुध्दा या योजनेचा आपण लाभ देणार आहात काय, ज्यांनी गेली ६३ वर्षे मराठी भाषेचा जागर त्या सीमा भागामध्ये जीवंत ठेवलेला आहे. त्यामुळे अशा पत्रकारांना ही योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले योजनेचा लाभ मिळवून द्यावा, अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

श्रीमती आदिती तटकरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना आपल्या माध्यमातून मी माहिती देऊ इच्छिते की, सीमा भागात जे पत्रकार आहेत त्यांनाही मधल्या काळात आम्ही अधिस्वीकृती पत्रक दिले आहे. जे त्यांना बऱ्याच वर्षापासून मिळाले नव्हते. गेल्या दीड दोन वर्षात ते दिले आहे. पण आपल्या आरोग्य विभागाची योजना व्यापक प्रमाणात असल्यामुळे त्यामध्ये सीमा भागातील पत्रकारांना जास्तीत जास्त कसा लाभ देता येईल याबाबतचा सविस्तर प्रस्ताव करण्यात येईल. त्या संदर्भातील प्रस्ताव माहिती व जनसंपर्क विभागाच्या माध्यमातून सार्वजनिक आरोग्य विभागाला येत्या महिनाभरात पाठविण्यात येईल.

श्री. हरिभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, अनेक पत्रकारांना स्वत:ची घरे नाहीत आणि जी असतील ती देखील अत्यंत जुनी झालेली व मोडकळीस आलेली आहेत. माझा प्रश्न असा आहे की, आपण बँकांच्या मार्फत पत्रकारांना कर्ज देण्याच्या सूचना करणार आहात काय आणि त्या कर्जाची हमी शासन घेणार आहे काय ?

श्रीमती आदिती तटकरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी सूचना केली आहे त्याबाबत सविस्तर प्रस्ताव मागवून तो विभागामार्फत शासन स्तरावर प्रस्तावित करण्यात येईल आणि त्यामध्ये पत्रकारांना अधिकाधिक कोणते

असुधारित प्रत

श्रीमती आदिती तटकरे...

सहाय्य देता येईल आणि त्याबाबतचा जो फिजिबिलीटी अहवाल असेल तो किंवा त्यासाठी कोणत्या अटी व शर्ती आपण लावू शकतो त्याचा एक अहवाल आम्ही शासन स्तरावर सादर करु. त्याला शासन स्तरावर कसा सकारात्मक प्रतिसाद मिळेल त्यासंबंधी विभाग निश्चितपणे प्रयत्न करील.

श्री. हरिभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. सर्व गरीब पत्रकारांना त्याचा लाभ होणार आहे. विशेषत: ग्रामीण भागात तालुका स्तरावर किंवा जिल्हा स्तरावर असे पत्रकार आहेत त्यांना याचा लाभ होईल. आपण अनेक कारखान्यांची हमी घेतोच. त्यामुळे आपण अशा पत्रकारांच्या घरासंबंधी कर्जाची हमी घेणार आहात काय ?

श्रीमती आदिती तटकरे : अध्यक्ष महोदय, मी आपल्याला माहिती देऊ इच्छिते की, मी सुरूवातीलाच शंकरराव चव्हाण या योजनेची माहिती दिली आहे. २००९ मध्ये ही योजना जाहीर झाली. सन २०११ मध्ये याचे निकष निश्चित करण्यात आले असून जे अधिस्वीकृती पत्रकार असतील त्यांचाच या योजनेमध्ये समावेश करण्यात यावा, असा निर्णय झाला आहे. त्यामुळे आज सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यासंबंधी विभाग कोणत्या अटी व शर्ती लावू शकतो, कोणते निकष ठरवू शकतो या संदर्भात आमचा विभाग संपूर्णपणे अभ्यास करेल आणि सकारात्मक प्रस्ताव शासनास सादर करील.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.:** "राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत" या विषयावर गठीत करण्यात आलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री. दत्तात्रय भरणे (वने राज्यमंत्री तथा समिती प्रमुख): अध्यक्ष माहेदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम १८३ च्या पोटनियम (१) अन्वये, "राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत" या विषयावर गठीत करण्यात आलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्याची मुदत पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत वाढवून देण्यात यावी, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-------

असुधारित प्रत

**माहितीच्या मुद्याबाबत**

प्रा. डॉ. अशोक उईके : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. महाराष्ट्र शाासनाने दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी एक शासन निर्णय काढलेला आहे. त्या शासन निर्णयामुळे महाराष्ट्रातील आदिवासी युवकांवर अन्याय होणार आहे. त्याचा उद्देश आणि हेतू असा आहे की, यामुळे अनेक आदिवासी युवक नोकरीला लागणार नाहीत. त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी काढलेला शासन निर्णय आपण आपल्या माध्यमातून रद्द करणार काय ? त्या शासन निर्णयाला आपण स्थगिती देणार काय ? आपण जर असे केले नाही तर महाराष्ट्रातील १ कोटी ३५ लाख आदिवासी बांधवांवर अन्याय होणार आहे. त्यामुळे या सर्वांचे लक्ष सभागृहाकडे लागलेले आहे. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिनांक २९ मे, २०१७ रोजी जो शासन निर्णय काढला होता त्याच्या अधीन राहून वर्ग ३ आणि वर्ग ४ ची बिंदूनामावली प्रमाणित करण्याच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेऊन आपण तशा सूचना द्याव्यात, अशी माझी अपेक्षा आणि विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, या शासन निर्णयाला तात्काळ स्थगिती मिळाली नाही तर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील विभागाने जाहिराती दिलेल्या आहेत आणि त्या जाहिरातीच्या अधीन राहून मुलाखती सुद्धा घेण्यात येणार आहेत. या मुलाखती नंतर विद्यार्थ्यांची निवड झाली आणि त्यांना नियुक्ती पत्र दिले तर ते विद्यार्थी भविष्यात न्यायालयात जातील. त्यानंतर आपल्याला कल्पना आहे की, जसे अनुसूचित जमातीचे अवैध प्रमाणपत्र घेऊन वैधता सिद्ध करण्यासाठी त्यांना जो संघर्ष करावा लागला ती वेळ आता येणार नाही. यासाठी मी विनंती करीत आहे की, दिनांक २९ मे, २०१७ च्या शासन निर्णयाच्या अधीन राहून भविष्यात वर्ग ३ आणि वर्ग ४ ची नियुक्ती आणि पदभरती सरळसेवा भरतीच्या माध्यमातून करणार काय ? दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी काढलेला शासन निर्णयाला आपण स्थगिती द्यावी, अशी मी विनंती करतो.

**उपाध्यक्ष :** ही बाब गंभीर आहे. सरकारने त्याची दखल घ्यावी.

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.डॉ. अशोक उईके यांनी आपल्यासमोर खूप महत्त्वाचा विषय उपस्थित केला आहे. अनेकवेळा आपण काही गंभीर विषयावर निर्देश देता की, बाब गंभीर आहे, सरकारने त्याची नोंद घ्यावी. परंतु एकही माननीय मंत्री कधी उभे राहत नाहीत किंवा नोंद घेत नाहीत. अनेक विषय "नोंद घ्यावी" या शब्दाखाली दबून, संपून जातात. परंतु हा विषय महत्त्वाचा आहे. माननीय राज्यमंत्री श्री. दत्तात्रय भरणे हे अतिशय अभ्यासपूर्ण अशा विषयावर उत्तर देतात. त्यांनाही माझी सूचना आहे की, नोकर भरतीच्या संदर्भात आज राज्य शासनामध्ये इतकी गुंतागुंत आहे ती सोडविणे कठीण झाले आहे. शासन निर्णयावर शासन निर्णय काढले जातात. परंतु यातून नोकरभरती होत नाही, आदिवासी बांधवांवर अन्याय होत आहे. साधारणत: ११ हजार ४०० पदे भरण्याच्या दृष्टीने विशेष अभियान राबविण्याची घोषणा सभागृहात करण्यात आली. परंतु ही गुंतागुंत संपल्यानंतरच हे विशेष अभियान राबविले जाईल. फक्त नोंद घेऊ नका. कारण आपण काल सविस्तर चर्चा केली आहे तर यातून काही फार निष्पन्न झाले असे मला वाटत नाही. कारण अडीच तास चर्चा झाल्यानंतर सुद्धा बैठकीमध्ये प्रत्येकांनी जी मते त्यातून आदिवासी बांधवांना न्याय प्राप्त होईल काय, याबाबत मी शंकास्पद आहे.

अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आदिवासी आमदार तसेच काही पक्षाचे प्रमुख यांना बोलावून पुन्हा एकदा ही बैठक घ्यावी. कारण या अमृत महोत्सवी वर्षात म्हणजे ७५ वर्षानंतर सुद्धा आपण जर इथेच अडकत असू आणि आपण माननीय अध्यक्ष असताना सुद्धा आदिवासी बांधवांना न्याय मिळणार नसेल तर ही बाब अतिशय वाईट होईल. काल अडीच तास चर्चा होऊनही काहीही निष्पन्न झालेले नाही. आपल्याला माझी विनंती आहे की, आपण पुन्हा एकदा मोठी बैठक आयोजित करुन त्यांना न्याय द्यावा. कारण सरकार नोंद घेईल या भाबडया अपेक्षेमध्ये आपण राहू नका. कारण सरकार कोणत्याही बाबीची नोंद घेत नाही. 'नोंद' शब्दाचा तिथे दबून मृत्यू होतो. आपण बैठक घ्यावी,एवढीच माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. या माध्यमातून आपल्याकडून आमच्या दोन अपेक्षा आहेत. एक म्हणजे आपण नोंद घेण्याच्या ऐवजी शासनाला निवेदन करायला सांगा. यामुळे काहीतरी रेकॉर्डवर येईल आणि अधिवेशनानंतर या विषयासाठी एखादी बैठक आयोजित केली तर त्यांना न्याय मिळू शकेल.

**उपाध्यक्ष** : मंत्री महोदय, आपण या विषयावर व्यवस्थित अभ्यास करुन माहिती घेऊन उद्या सभागृहात निवेदन करावे.

------

असुधारित प्रत

**पृ. शी.:** अनुदानाकरिता मागण्या

**मु. शी.:** सन२०२२-२०२३च्या अनुदानाकरिता मागण्या:

१) महसूल व वन विभाग

२) जलसंपदा विभाग

३) उद्योग , ऊर्जा व कामगार विभाग

४) ग्रामविकास विभाग

५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

६) सार्वजनिक आरोग्य विभाग

**उपाध्यक्ष** : आता १) महसूल व वन विभाग २) जलसंपदा विभाग ३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग ४) ग्रामविकास विभाग ५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ६) सार्वजनिक आरोग्य विभाग म्हणजे मागण्या क्रमांक सी-१, सी-२, सी-४, सी-५, सी-६, सी-७, सी-९, सी-१०, सी-१२, आय-२, आय-३, आय-४, आय-५, आय-७, के-१, के-३, के-५, के-६, के-७, के-८, के-९, के-१०, के-११, के-१३,एल-२, एल-३, एल-४, एल-५, एल-७, एल-८, एम-१, एम-२, एम-३, एम-४, एम-५, एम-६, आर-१, आर-२, आर-३, आर-४ चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे.

( **प्रेस** : येथे सोबत जोडलले मागण्यासंबंधीचे जोडपत्र छापावे )

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष**: आता १) महसूल व वन विभाग २) जलसंपदा विभाग ३) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग ४) ग्रामविकास विभाग ५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ६) सार्वजनिक आरोग्य विभाग या विभागांच्या मागण्या चर्चेला घेण्यात येतील. विभागांच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे मा. मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे मी गृहीत धरतो. या चर्चेसाठी तीन तास वेळ देण्यात येईल. या तीन तासापैकी सत्तारुढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील, अशी मी अपेक्षा करतो. आता चर्चेला सुरुवात होईल.

असुधारित प्रत

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : अध्यक्ष महोदय, महसूल व वन विभाग जलसंपदा विभाग, उद्योग , ऊर्जा व कामगार विभाग, ग्रामविकास विभाग अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग या विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर आपले लक्ष वेधण्यासाठी मी उभा आहे. राज्याचा अर्थसंकल्प मांडताना माननीय वित्त मंत्री तथा उप मुख्यमंत्री यांनी विकासाची पंचसुत्री मांडली आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, अनुदानाच्या मागण्या हा महत्त्वाचा विषय आहे. कारण यापेक्षा मोठे कामकाज दुसरे कोणतेही नाही. माननीय जलसंपदा मंत्री सभागृहामध्ये आले आहेत. परंतु माननीय महसूल किंवा माननीय महसूल राज्यमंत्री देखील सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. आम्ही चर्चा सुरु ठेवतो कारण आम्हाला काही कामकाज थांबवायचे नाही. परंतु आपण त्यांना निरोप देऊन सांगितले पाहिजे की, अनुदानाच्या मागण्या हे महत्त्वाचा कामकाज आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी पंचसुत्री कार्यक्रम मांडला आहे. महाविकास आघाडी सरकारचा किमान विकास कार्यक्रम आपण गुंडाळून ठेवता आता पंचसुत्री कार्यक्रमावर आला आहात. खरे म्हणजे माननीय जलसंपदा मंत्र्यांकडून आमच्या खूप मोठया अपेक्षा होत्या.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. राधाकृष्ण विखे –पाटील....

दुष्काळी भागातील प्रकल्पाकरिता या अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली जाईल अशी आम्हाला माननीय जलसंपदा मंत्री यांच्याकडून अपेक्षा होती. मी या ठिकाणी गोदावरी खोऱ्याच्या पाणी प्रश्नावर व २-३ महत्त्वाच्या विषयांवर बोलणार आहे. दुष्काळी भागाला वरदान ठरलेल्या निळवंडे प्रकल्पाच्या पूर्ततेकरिता आवश्यक ती तरतूद करणे गरजेचे आहे. मंत्री महोदयांनी जिल्ह्याचा दौरा केला होता. तेव्हा त्यांनी सांगितले की, सन २०२२ पर्यंत पाणी उपलब्ध करुन देऊ. या धरणाच्या कामासाठी जेवढी तरतूद केली आहे त्यामध्ये सन २०२४ पर्यंत देखील काम पूर्ण होऊ शकणार नाही. माजी मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्र फडणवीअसताना माननीय श्री. मधुकर पिचड यांच्या विशेष पुढाकाराने धरणाचे २१ कि.मी. चे काम सुरु केले. २१ कि.मी चे पहिले काम जेथून उजवा व डाव्या कालव्याच्या कामाला सुरुवात होते त्या कामाला सुरुवात होत नव्हती. माजी मुख्यमंत्री माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी या कामाला चालना दिली. धरणग्रस्तांच्या, प्रकल्पग्रस्तांच्या अडचणी आहेत. आमच्या आमच्या जिल्ह्याचे मंत्री स्वत: फ्लेक्स बोर्ड छापून, त्यावर सही करुन, सन २०२२ पर्यंत पाणी देणार असे सांगून स्वत:ची पाठ थोपटून घेत आहेत. २ हजार २२३ कोटी रुपयांची सुप्रमा देण्यात आली आहे. आता केवळ २९५ कोटी रु. एवढी तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. मंत्री महोदयांनी सन २०२३ मध्ये पाणी मिळेल असे स्वप्न आम्हाला दाखवले आहे. मात्र या धरणाच्या, कालव्याच्या कामासाठी केवळ २००, ३०० कोटी रुपये तरतूद केली तर हे काम १० वर्षात देखील पूर्ण होणार नाही. या कालव्यातून पाणी मिळेल याची खात्री राहिलेली नाही.

अध्यक्ष महोदय, माजी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी असा निर्णय केला होता की, सन २०२२ पर्यंत या धरणाकरिता आवश्यक ती तरतूद करुन डिसेंबर, २०२२ पर्यंत दुष्काळी भागाला पाणी देऊ. माझी मंत्री महोदयांकडून अपेक्षा आहे. या धरणातून लोकांना कधी पाणी मिळेल याचा निश्चित कालावधी आपण सांगावा. आज या धरणाच्या कामाला जवळजवळ २५ ते २७ वर्षे झाली आहेत. धरण पूर्ण झाले आहे. मात्र कालव्यातून पाणी मिळत नाही. शासनाने घोषणा

श्री. राधाकृष्ण विखे –पाटील....

करण्यापेक्षा दुष्काळी भागाकरिता शासनाचे काय धोरण राहणार आहे, या बाबत स्पष्टता आणावी.

अध्यक्ष महोदय, नाशिक, नगर व मराठवाडा येथे पाणी वाटपाचा प्रश्न असल्यामुळे प्रत्येक वर्षी मोठा संघर्ष उभा राहतो. पाऊस जादा झाला तर पाणी धरणाच्या वरच्या भागातून सोडण्याचा प्रश्न निर्माण होतो. सन २००५ मध्ये पाणी वाटप कायदा आला. मात्र सन २०१३ पर्यंत त्याची अंमलबजावणी झाली नाही. दुष्काळाची तीव्रता वाढत चालली त्यामुळे धरणाच्या वरच्या भागातून जायकवाडी धरणामध्ये पाणी सोडण्याचा प्रश्न निर्माण झाला. आता नवीन पाणी उपलब्ध करण्याबाबत विचार व्हायला पाहिजे. या बाबत मागील शासनाने विचार केला. नारपार खोरे, दमणगंगा या खोऱ्यातून १२० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये आणण्याबाबत नेमलेल्या पोईरकर समितीने अहवाल दिलेला आहे. केंद्र शासनाने माननीय प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या पुढाकाराने नदी जोड प्रकल्प राबविण्याकरिता विशेष पुढाकार घेतला आहे. या अर्थसंकल्पात गोदावरी खोऱ्यात कसे पाणी आणले जाणार आहे, याबाबत खुलासा केलेला नाही. माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी नारपार खोऱ्याबाबत अनेक वेळा उल्लेख केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाडा ,खानदेश या भागाला पाणी दिले पाहिजे. काही पाणी तापी खोऱ्यामध्ये दिले जाणार आहे. पाण्याची तूट भरुन काढण्याकरिता कोणती योजना राबवणार आहात, किती कालावधी लागणार असून त्यासाठी किती निधी निधी दिला जाणार आहे याचा उल्लेख अर्थसंकल्पात केलेला नाही. माझी मंत्री महोदयांकडे मागणी आहे. या पश्चिम वाहिन्यांचे पाणी युद्ध पातळीवर गोदावरी खोऱ्यात कसे आणता येईल व समन्यायी पाण्याच्या वाटपासंबंधी कायमस्वरुपी जो संघर्ष उभा राहिलेला आहे तो संपुष्टात कसा आणता येईल, याचा विचार केला पाहिजे. मराठवाडा ग्रीड प्रकल्पही गुंडाळून ठेवलेला आहे. गोदावरी खोऱ्यात

अप्रकाशित प्रत

श्री. राधाकृष्ण विखे –पाटील....

पाण्याची उपलब्धता करताना निश्चित धोरण मंत्री महोदय जाहीर करतील काय ? वळण बंधारे आपण करणार आहोत, वळण बंधाऱ्यातून पाणी आणले जाणार आहे, असे सांगितले गेले.

अध्यक्ष महोदय, कृष्णा खोऱ्यात पाणी अडवण्याकरिता व पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता प्रयत्न केले पाहिजे. लवादाकडे हा विषय होता. या करिता अधिकचा निधी देणे गरजेचे होते. गोदावरी खोऱ्याला मंत्री महोदयांनी प्राधान्य द्यावे अशी मागणी आहे. नगर जिल्ह्याच्या दुष्काळी भागाकरिता कुकडी हा वरदान ठरणारा प्रकल्प होता. पुणे जिल्ह्यातील माणिकडोह, येडगाव, डिंबे, पिंपळगावजोग या धरणातून दुष्काळी भागाला पाणी दिले जाते. तसेच नगर जिल्ह्यातील पारणे, कर्जत, श्रीगोंदा, नगर तालुका येथे पाणी देण्याकरिता या प्रकल्पाची आखणी करण्यात आली होती. आज येथे काय परिसिथती आहे ? १८०० क्युसेक्सचा कुकडीचा डावा कालवा असून आज तेथे केवळ १३०० क्युसेक्स पाणी आहे. सन १९९५ मध्ये राज्यात युती सरकार सत्तेत आले. तेव्हा कुकडी धरणाच्या कालव्याच्या कामाला सुरुवात झाली. १० वर्षात १० कि.मी कालवा पूर्ण झाला. युती शासनाच्या काळात माननीय स्व. मुंडे यांच्या पुढाकारामुळे ४ वर्षात १५० कि.मी कालव्याचे काम पूर्ण झाले. पुणे जिल्ह्यातून नगर जिल्ह्याला पाणी येऊ द्यायचे नाही, हा भाग कायमस्वरुपी दुष्काळी राहिला पाहिजे अशी भूमिका होती. मधल्या काळात १५० कि.मी कालव्याचे काम झाल्यानंतर कुकडी कालव्याची वाहन क्षमता १८०० क्युसेक्स असताना तो कधी १२०० क्युसेक्सच्या पुढे जात नाही. या कालव्याची प्रकल्प आराखडा प्रमाणे आखणी झालेली आहे, त्या प्रमाणात कुकडी धरणाला पाणी दिले जाणार आहे काय ? डिंबे धरणातून बोगद्यामधून माणिकडोहामध्ये पाणी आणले आहे. यामुळे दुष्काळी भागाला साडे ६ टीएमसी अतिरिक्त पाणी मिळणार आहे. मागच्या शासनाने त्यास मान्यता दिली. निधीची तरतूद करण्यात आली. या

असुधारित प्रत

श्री. राधाकृष्ण विखे –पाटील....

शासनामधील मंत्रिमंडळातील माननीय मंत्री या बोगद्याला विरोध करीत आहेत. माणिकडोहामध्ये पाणी येऊ द्यायचे नाही, या करिता ते विरोध करीत आहेत. यामुळे दुष्काळी भागाला पाणी कधी मिळणार आहे ? एफआरएल लेव्हल आहे, त्यानुसार माणिकडोहाचे काम होत आहे. यामधून मिळणारे पाणी कुकडी कालव्यात आल्यानंतर नगरच्या दुष्काळी भागाला मिळणार आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ...

नगरचा संपूर्ण दक्षिण भाग दुष्काळमुक्त होण्याकरिता या कुकडी प्रकल्पातून त्याला पाणी मिळणे गरजेचे आहे. पुणे जिल्ह्याकडून विशेष करुन काही लोकांकडून सातत्याने होणारा जो अन्याय आहे की, तेथे पाणीच येऊ द्यायचे नाही. हा अन्याय दूर करण्यासंदर्भात आपण काही पावले उचलणार आहात का, नाही तर पुन्हा एकदा महाराष्ट्र वॉटर रेग्युलेटरी ऑथॉरिटीकडून (एमडब्ल्यूआरए) त्यासाठी पुन्हा एकदा नवीन न्यायालयीन लढाई उभी करावी लागेल. कुकडीचे हक्काचे पाणी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आम्हाला लढा करावा लागेल.

अध्यक्ष महोदय, पिंपळगाव जोगा धरण असेल. आज पिंपळगाव जोगा धरणाचे पाणी देखील पारनेर या दुष्काळी तालुक्याला मिळत नाही. फक्त एकाच कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम शिल्लक राहिले आहे. त्याला आपण जर आता २० कोटी रुपये देऊ शकलात तर मला असे वाटते की, पारनेर तालुक्यातील दुष्काळी भागाला देखील पिंपळगाव जोगा धरणाचे पाणी मिळू शकते. मंत्री महोदय याबाबतीत विशेष करुन काही पुढाकार घेतील का, हा खरा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण विकास विभागाच्या बाबतीत, जलसंपदा विभागाच्या बाबतीतील विषय मी मांडलेले आहेत. विशेष करुन गोदावरी कालव्याचा प्रश्न आता तेवढाच गंभीर होत चाललेला आहे. गोदावरी कालव्याला १०० वर्षांपेक्षा जास्त वर्षे झालेली आहेत. त्या गोदावरी कालव्याच्या नुतनीकरणाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत.

अध्यक्ष महोदय, गोदावरी डाव्या व उजव्या कालव्यातून शेतकऱ्यांना आता पाणीच मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये बिगर सिंचनाचे आरक्षण हे ५२ टक्क्यांपेक्षा जास्त झाल्यानंतर आता पाणी उपलब्ध होत आहे. परंतु, मला असे वाटते की, हे कालवे आता जीर्ण झाल्यामुळे, त्या कालव्यांतून आता पाणी मिळत नाही. गोदावरी कालव्याच्या नुतनीकरणाकरिता जलसंपदा खात्याकडून तातडीने भरीव निधी मिळण्याची अपेक्षा आहे. मंत्री महोदय ही मागणी पूर्ण करतील, अशी अपेक्षा आहे.

असुधारित प्रत

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ...

अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे अनेक विषयांबाबत या ठिकाणी बोलता येईल. विशेष करुन ग्रामविकासच्या बाबतीत चर्चा करीत असताना आज मोठ्या प्रमाणावर ग्राम पंचायतींच्या निधीमध्ये कपात करण्याचे धोरण या महाविकास आघाडी सरकारने स्वीकारलेले आहे. पथ दिवे, पाणी पुरवठ्याची बिले असतील या सर्व बिलांची वसुलीच मुळात ग्राम पंचायतीला मिळणाऱ्या वित्तीय अनुदानातून करण्याचे धोरण देखील सरकारने घेतलेले आहे. त्यामुळे ग्राम पंचायतींच्या विकासाची कामे पूर्णपणे ठप्प झालेली आहेत.

अध्यक्ष महोदय, चौदाव्या वित्त आयोगातून परस्पर पैसे वळते करण्याचा अधिकार सरकारला नसताना ग्रामविकास खात्याने ते पैसे वळते करुन घेतले. केंद्राचा पैसा आपण वापरता. केंद्राने आपल्याला अधिकार दिलेले नाहीत. केंद्र सरकारच्या नावाने फक्त टीका करायची....

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येत आहे. महाविकास आघाडी शासनाने वित्त आयोगाचा पैसा वळता करुन घेतला नाही. गेल्या शासनाच्या काळात तो वळता झाला आहे. या काळात काही झालेले नाही.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी आता याबाबत सांगितले आहे. त्यांनी त्यांच्या उत्तरामध्ये याबाबत सांगावे. मुळातच चौदाव्या वित्त आयोगाचा पैसा आपण वळता करुन ॲम्ब्युलन्स घेतल्या. ॲम्ब्युलन्स घेण्याची गरज होती. परंतु, केंद्राच्या पैशांतून घेतलेल्या ॲम्ब्युलन्सबाबत केंद्र सरकारच्या निधीतून या ॲम्ब्युलन्स मिळाल्या आहेत, हे तरी किमान मान्य करा. केंद्राचा पैसा वापरायचा आणि केंद्राच्या कुठल्याही योजनेचे ... केंद्र सरकारचे आभार मानायचे नाहीत, हा आपल्या महाविकास आघाडी सरकारचा एक धर्म झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास खात्याने आता या रिक्त पदांच्या कामामध्ये देखील लक्ष देण्याची गरज आहे. आज जिल्हा परिषदेमध्ये ग्राम विकास खात्यातील ४५ टक्के पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमध्ये वैद्यकीय अधिकारी आहेत, फार्मासिस्ट

असुधारित प्रत

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ...

आहेत, ग्राम सेवक आहेत. आपल्या खात्यामध्ये आज अशी ४५ टक्के पदे रिक्त आहेत.

अध्यक्ष महोदय, पशुसंवर्धन खाते जिल्हा परिषदेंतर्गत येते. त्यामध्ये देखील मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषदेचा कृषी विभाग आपण गुंडाळून टाकला आहे, अशा प्रकारची आज महाराष्ट्राची अवस्था आहे. मंत्री महोदय, जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणारे सर्व शाळांच्या खोल्यांच्या बांधकामाचे प्रश्न, शाळांच्या खोल्यांचे नवीन बांधकाम होत नाही, कामामध्ये कुठल्याही प्रकारची गुणवत्ता नाही. जिल्हा परिषदेच्या कामकाजावर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण नाही. त्यामुळे या बाबतीत खरे तर ग्रामविकास खात्याचे पदोपदी समोर येणारे जे अपयश आहे, त्याबाबतीत अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. विशेष करुन ग्रामीण भागामध्ये ज्या शाळा खोल्यांची मोठ्या प्रमाणात पडझड झालेली आहे. त्या शाळा खोल्या दुरुस्तीकरिता विशेष निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात ग्रामीण विकास खात्याने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. आमची याबाबत मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना मला हे सांगावयाचे आहे की, मुळातच या महसूल खात्याला वाळू माफियांनी पूर्ण ग्रासलेले आहे. आज महसूल खात्यावर वर्चस्व कोणाचे आहे? जिल्ह्या-जिल्ह्यांमध्ये वाळू माफियांचे नियंत्रण या खात्यावर आलेले आहे. किती तरी उदाहरणे देता येतील. परंतु, वाळूबाबतच्या धोरणाबाबत मागणी करुनही हे सरकार घेण्यास तयार नाही.

अध्यक्ष महोदय, पूर्वी तर हंगामाप्रमाणे बिले व्हायची. आता तर आपल्या सरकारने वाळूच्या संदर्भात ३ ते ५ वर्षांचे धोरण घ्यायचे ठरविले आहे. मला असे वाटते की, दोन महिन्यांपूर्वीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये आता रात्रीसुध्दा वाळू वाहण्याची परवानगी देण्यात यावी, अशा प्रकारचे धोरण आपण ठरविले. २४x७ वाळू वाहण्याचा पूर्ण कार्यक्रम सुरु आहे.

असुधारित प्रत

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ...

अध्यक्ष महोदय, या संपूर्ण प्रकारामध्ये कोट्यवधी रुपयांचा व्यवहार होतो. आज ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्थेचा सर्वात मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. या वाळू माफियांमुळे कायद्याचे रोज धिंडवडे निघत आहेत, या निमित्ताने सरकारचे गौण खनिजच्या बाबतीतील धोरण काय आहे, हे एकदा महाराष्ट्राला समजले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या संपूर्ण कामामध्ये स्वत:चे हितसंबंध असणारी जी माणसे आहेत, कोणत्याही धरणामध्ये, कोणत्याही वाळूच्या ठेक्याचा आपण विचार करा. तेथे कोणकोण लोक आहेत, त्याची यादी माझ्याकडे आहे. त्या यादीतील कंत्राटदाराबरोबर कोण भागीदारी करते, त्याची माहिती आमच्याकडे आहे. या निमित्ताने मला मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, आपले जे काही पाठीराखे आहेत, त्यांच्यावर आपण कधी नियंत्रण आणणार आहात की नाही, की खुले आम आपण राज्याला लुटण्याची परवानगी दिलेली आहे? खुलेआम वाळू माफियांच्या माध्यमातून हा जो काही पैसा उभा करुन राज्यामध्ये गुंडगिरी वाढत आहे. त्या निमित्ताने यावर काही नियंत्रण करण्याच्या संदर्भात आपण काही प्रयत्न करणार आहात की नाही?

अध्यक्ष महोदय, मध्यंतरीच्या काळात कोविडच्या नावाखाली मुंबईच्या बिल्डर लॉबीकरिता रेडिरेकनरचा मुद्दा या ठिकाणी उभा राहिला. मुद्रांक शुल्क कमी करुन त्या ठिकाणी ...... त्या मधल्या दोन वर्षांच्या काळामध्ये जमावबंदी आयुक्त कोण होते, त्यावेळेस ठराविक सर्व्हे नंबरचे रेडिरेकनर कमी करायचे, त्यांचे मुल्यांकन २० ते २५ टक्के कमी केले म्हणजे शासनाला किंवा महापालिकेला कमी प्रिमियम भरावा लागतो. याच ठिकाणी बिल्डरांना बांधकामाचे परवाने देताना मुळातच रेडिरेकनरचे मुल्यांकन कमी केल्याने त्यांना प्रिमियम कमी भरावा लागतो कारण प्रिमियम हा रेडिरेकनरशी निगडित आहे. मुंबई महानगरपालिकेचे किती उत्पन्न त्यामुळे कमी झाले, तर जवळजवळ १६ हजार कोटी रुपयांनी मुंबई महानगरपालिकेचे उत्पन्न कमी झाले.

अ[illegible]

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ...

अध्यक्ष महोदय, या रेडिरेकनरचा फायदा मुंबईच्या बिल्डरना देताना घरांचे भाव कमी होतील, अशी अपेक्षा होती. या निर्णयामुळे मुंबईतील घरांच्या किंमती किती कमी झाल्या, बिल्डरनिहाय किती लोकांना याचा फायदा मिळाला? माझी अशी माहिती आहे की, महसूल खात्याच्या या निर्णयामुळे २० हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाला, अशा प्रकारचा आमचा आरोप आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय मघाशी लक्षवेधी सूचनेवरील चर्चेमध्ये सांगत होते की, एनएचे अकृषीक दर कमी करण्यासंदर्भात शासनाला महसूल उत्पन्न मिळेल. परंतु, एका बाजूला असे सांगायचे व दुसऱ्या बाजूला सर्रासपणे मुद्रांक शुल्काच्या नावाखाली राज्याची लूट करायची व बिल्डरांच्या घशात प्रिमियम घालायचा अशा प्रकारचा सर्व प्रताप महसूल खात्यामध्ये सुरु आहे.

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)**

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ...

यासर्व प्रकरणांची चौकशी करणे आवश्यक आहे...(अडथळा)... मी कोणा व्यक्तीबाबत बोलत नाही. राज्याचा २० हजार कोटी रुपये महसूल बुडाला असल्याबाबत मी सांगत आहे. हे मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्या फायद्यासाठी सांगत आहे. त्यांचा महसूल बुडविण्यात आला आहे. याचे त्यांना दु:ख आहे की नाही, मला माहिती नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य मागील सरकारच्या काळात विरोधी पक्ष नेते होते त्यावेळी त्यांनी सराव केला व आता त्यांच्या वक्तव्याला धार आली आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, स्टॅम्प ड्यूटीच्या माध्यमातून मुंबईतील मालमत्तांचे दर किती कमी झाले, किती बिल्डरांना फायदा झाला, त्यांनी तो किती ग्राहकांना मिळवून दिला, यासंदर्भात सरकारने श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी. आपण घोटाळा केला नसेल तर पारदर्शकपणे लोकांना समजू द्या की त्यांना किती फायदा झाला आहे. याची माहिती सभागृहाला जाणून घ्यावयाची आहे. ओशिवरा बिल्डर, ओबेरॉय रिॲलिटी अशी अनेकांची माहिती माझ्याकडे आहे. ती मी मंत्री महोदयांना देईन. माननीय वित्त मंत्री यांना माहिती आहे, परंतु ते आता बोलत नाहीत. कारण त्यांना एकत्र रहावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, मागील आठवड्यात आदिवासी जमिनी बिगर आदिवासींना देण्यासंदर्भात चर्चा झाली आहे. अशा जमिनींच्या व्यवहारांची यादी माझ्याकडे आहे. सन २०२० मध्ये श्री.राकेश कुमार जैन, श्री.अरविंद कांतीलाल शहा, पुन्हा श्री.राकेश कुमार जैन, साईसिद्धम रियल इस्टेट या बिगर आदिवासींनी आदिवासी जमिनी खरेदी केल्या आहेत. आदिवासी जमिनी मुंबईतील बिल्डरांच्या घशात घालण्याचे काम कोण करीत आहे ? ग्रामसभेच्या ठराव घेऊन आदिवासींच्या जमिनी देण्यासंबंधीच्या

असुधारित प्रत

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ...

निर्णयासाठी ट्रायबल रेग्युलेटरी अथॉरिटी मागील सरकारने नियुक्त केली होती. १६९ प्रकरणांतील आदिवसी जमिनी बिगर आदिवासींना देण्याचा निर्णय या सरकारमधील महसूल विभागाने घेतला आहे. याची चौकशी करण्यात यावी, अशी आमची मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल मंत्री महोदय यांनी आताच सांगितले आहे की, मागील सरकारच्या काळात मी विरोधी पक्ष नेता होतो. आता माझ्या वक्तव्यास धार आली आहे. त्यांनी अजून आमची धार पाहिलीच नाही.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या माध्यमातून रेडीरेकनर घोटाळा करण्यात आला आहे. त्यामधून मुल्यांकन शुल्क आकारण्यासंदर्भात सिलेक्टीव्ह काम झाले आहे व त्याचा फायदा बिल्डरांना झाला आहे. मी या अगोदर सांगितले आहे की, २० हजार कोटी रुपये राज्याचा महसल बुडाला आहे, त्याची चौकशी करण्यात यावी. बिगर आदिवासींना आदिवासी जमिनी देतांना प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे, त्याची चौकशी करण्यात यावी. या संदर्भातील वस्तुस्थिती महसूल विभागाने सादर करावी. त्यांच्याकडे या प्रकरणांची कोणतीही माहिती नसेल तर त्यांनी मागील सरकारवर ही जबाबदारी ढकलून हा विषय टाळण्याचा प्रयत्न करु नये. उक्त माहिती सभागृहाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना दिली नाही तर सभागृहाबाहेर प्रसंगी न्यायालयीन लढाई करावी लागली तर करण्यात येईल, असा इशारा मी देतो.

अध्यक्ष महोदय, मी या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर नापसंती वक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

--------------

असुधारित प्रत

ॲड.आशिष जैस्वाल (रामटेक) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग, ग्रामविकास विभाग, अन्न, नागरी पुरवठा विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर माझे मत मांडण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाच्या निर्णयामुळे सामान्य जनतेला वेगवेगळे प्रश्न भेडसावत आहेत, त्यांचा उल्लेख मी करु इच्छितो. राज्य शासनाला प्रमुख खनिज व गौण खनिजच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होते. या शासनाला नागपूर, चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातून प्रमुख खनिज व गौण खनिजच्या माध्यमातून सर्वाधिक उत्पन्न प्राप्त होते.

अध्यक्ष महोदय, मी २०-२५ वर्षापासून मागील अनेक अधिवेशनांमध्ये पाहत आहे की, कोणत्याही पक्षाचे सरकार सत्ते आले तरी प्रत्येक लोकप्रतिनिधी वाळूमुळे हैरान आहे. माननीय महसूल मंत्री यांनी मागील अधिवेशनामध्ये सभागृहात आश्वासन दिले होते की, या प्रकरणी बैठक घेऊन चर्चा करण्यात येईल. मी शासनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, एका बाजूला शासनाच्या रोजच्या खर्चामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे उत्पन्नात वाढ करणे खूप आवश्यक आहे. वाळू मधून ५०० कोटी रुपये उत्पन्न मिळत असेल तर २,५०० कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. राज्यात आज कोणतेही बांधकाम थांबलेले नाही. प्रत्येक शासकीय प्रकल्पाला कशा अडचणी येतात, याचा उल्लेख मी करु इच्छित आहे.

अध्यक्ष महोदय, मागील सरकारने दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी अधिसूचना काढली होती. त्यामाध्यमातून गौण खनिजावरील दंडाची शास्ती खूप मोठ्या प्रमाणात वाढविली. त्यानुसार अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरसाठी ७ हजार रुपयांवरुन १ लाख रुपये इतकी दंडाची रक्कम वाढविली, ट्रकसाठी २ लाख रुपये, पोकलँडसाठी ५ लाख रुपये व जेसीबीसाठी १० लाख रुपये दंड केला आहे. गोरगरीब जनता स्वत:च्या घरकुलासाठी किंवा घर बांधकामासाठी वाळू घेऊन जाते त्यावेळी त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. परंतु प्रत्येक रेती घाटातून अमर्यादित वाळू उपसा करण्यात येत आहे. त्यामधून राज्यात वाळू माफिया तयार झाले आहेत.

ॲड.आशिष जैस्वाल...

बोगस रॉयल्टी संदर्भातील प्रकरण नागपूर जिल्ह्यात घडले आहे. दरवर्षी एक घोटाळा संपण्यापूर्वी दुसऱ्या वर्षी दुसरा घोटाळा होतो. तिसऱ्या वर्षी तिसरा घोटाळा होतो. बोगस रॉयल्टी पासेस छापण्यात येतात. ही प्रकरणे आता उघडकीस आली आहेत. दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजीच्या अधिसूचनेनंतर दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ रोजी एक अधिसूचना काढण्यात आली होती. त्यानंतर माझी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांचे समवेत एक बैठक झाली होती. राज्यात जेवढ्या लोकांना घर बांधावयाचे असेल त्यांना मोफत वाळू देण्याचे धोरण सरकारने केले होते.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

ॲड.आशिष जैस्वाल......

ज्यांना घरकुल मंजूर नसेल तर त्यांनी तहसीलदार यांच्याकडे अर्ज केल्यानंतर ४०० ते ६०० रुपये ब्रास या दरामध्ये त्यांना रॉयल्टी पास देण्यात येईल, अशीही व्यवस्था करण्यात आली होती.

अध्यक्ष महोदय, माननीय महसूल मंत्री यांनी या विषयाकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कारण राज्यातील कोणत्याही जिल्ह्यामध्ये या योजनेची अंमलबजावणी होत नाही. मी पुढाकार घेऊन माझ्या मतदारसंघामध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करतो. परंतु या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकाऱ्यांच्या जीवावर येते. शुन्य रॉयल्टी पास देण्यास त्यांना खूप त्रास होतो. कारण त्यांना गरीब लोकांच्या गाड्या पकडून त्यांच्याकडून पैसे वसूल करावयाचे आहेत. पैसे दिले नाही तर त्यांच्या गाड्या जप्त करावयाच्या आहेत. जे लोक मोठ्या प्रमाणावर वाळुची वाहतूक करता ते अधिकाऱ्यांना पैसे देखील देतात. परंतु गरीब व्यक्तीची वाहने पकडून तहसील कार्यालयामध्ये ठेवली जातात. सदर वाहने सोडवून घेण्यासाठी त्या लोकांकडे पैसे देखील राहत नाहीत. यामाध्यमातून सामान्य माणसांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक होत आहे. त्यामुळे या विषयाकडे सरकारने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याच्या एका निर्णयामुळे राज्यातील सर्व जनता सुखावली पाहिजे. त्यामुळे सर्वसामान्य जनता सुखावेल असा परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे मी सादर केला आहे. मागील अधिवेशनामध्ये देखील याबाबत सांगितले आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने वेळोवेळी जे निदेश दिले आहेत, त्या सर्व निदेशाची सुसंगत धोरण कसे असावे, अशा पद्धतीचा परिपूर्ण प्रस्ताव वारंवार राज्य शासनाकडे सादर केलेला आहे. परंतु राज्य शासन त्यावर कोणत्याही प्रकारचा निर्णय घेत नाही, हे अतिशय खेदाने सांगावे लागत आहे.

अध्यक्ष महोदय, दिनांक २८ मार्च, २०२० रोजी केंद्र सरकारने नवीन अधिसूचना निर्गमित केली. कायद्याचे किती misinterpretation होत आहे,

असुधारित प्रत

असुधारित प्रत

ॲड.आशिष जैस्वाल......

याकडे माननीय अर्थ मंत्री यांचे लक्ष वेधू इच्छितो. गावांमध्ये घरांसाठी किंवा रस्त्यांसाठी जे गौणखनिज लागते, त्यास पर्यावरण विभागाच्या मान्यतेची गरज नाही, असे केंद्र सरकारने स्पष्ट सांगितले आहे. याबाबत महसूल विभागाकडे पाठपुरावा करुन राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना पत्र पाठविले आहे. तरी देखील पर्यावरण विभागाच्या मान्यतेसाठी लोकांची अडवणूक केली जाते. ज्या बाबींसाठी पर्यावरण विभागाच्या मान्यतेची गरज नाही, त्या बाबींसाठी देखील लोकांना थांबवून ठेवले जात आहे. यामुळे शासनाच्या महसुलाचे किती नुकसार होत आहे, याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, काही विषयांकडे पुन्हा मंत्री महोदयांचे लक्ष वेधायचे आहे. सर्व प्रथम प्रत्येक जिल्ह्यांचा डिमांट सप्लाय रेशिओ निर्धारीत करणे आवश्यक आहे. आपण Ease of doing business करावे. कोणत्याही कामासाठी कोणताही माणूस सरकारी कार्यालयामध्ये गेला तर त्याचे काम अतिशय सुलभ पद्धतीने झाले पाहिजे आणि त्या कामाची काल मर्यादा निश्चित केली पाहिजे. राईट टू इन्फॉर्मेशन ॲक्टनुसार विहित कालावधीमध्ये कार्यवाही केली नाही तर प्रतिदिन दंड आकारला जातो. सेवा हमीचा कायदा किंवा महाराष्ट्र सरकारी कर्मचाऱ्यांने कर्तव्य पार पाडण्यास होणारा विलंब प्रतिबंध अधिनियम हा या विधानसभेने संमत केलेला आहे. परंतु राज्यातील एकूण प्रकरणाचा अभ्यास केला तर कोणत्याही अधिकाऱ्यावर कारवाई होत नाही. कारण त्यांना या कायद्यांची भीती राहिलेली नाही. एखाद्या प्रकरणी तक्रार प्राप्त होते, ज्या प्रकरणामध्ये हेतूपुरस्सर दिरंगाई करण्यात आली, ज्या प्रकरणामध्ये malafide intention ने लोकांच्या नस्ती थांबविल्या जातात, अशा प्रकरणामध्ये शासनाने कारवाई केली नाही तर विधानमंडळाने संमत केलेल्या कायद्याला कोणताही अर्थ राहणार नाही. या

अध्यक्ष महोदय, या राज्यातील बहुतांश प्रकल्पाला वाळुची गरज आहे. आमदार निधीतून किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या रस्त्यांसाठी बेकायदेशीरपणे वाळुचा वापर केला जात आहे.

ॲड.आशिष जैस्वाल......

सर्वसामान्य माणसाची वाळुची गाडी पकडली तर १ लाख रुपये दंड आकारला जातो. ट्रक पकडला तर २ लाख रुपये दंड आकारला जातो. पकडलेल्या गाडीतील ४०० रुपये प्रमाणे रॉयल्टी वसूल करण्यात यावी, असे कोणत्याही कार्यकारी अभियंता यांना राज्य शासनाने सांगितले नाही. शासन रॉयल्टी वसूल करीत आहे. परंतु ती रॉयल्टी बाजारभावाप्रमाणे वसूल न करता शासनाच्या नोटिफाईड दरानुसार रॉयल्टी वसूल केली जाते. गौण खनिजावर आकारण्यात येणारा १० टक्के कर देखील वसूल केला जात नाही. आमदार निधीतून किंवा कोणत्याही सरकारी योजनेच्या कामासाठी संबंधित कंत्राटदाराने रॉयल्टी लावलेली नाही. कारण रॉयल्टी उपलब्ध नाही. ज्या जिल्ह्यामध्ये ५ लाख ब्रास वाळुची गरज आहे, त्या जिल्ह्यामध्ये १ लाख ब्रास देखील वाळू उपलब्ध नाही. जर त्या जिल्ह्यामध्ये ५ लाख ब्रासचे काम झाले असेल तर ४ लाख ब्रास वाळुचा अवैध उपसा करण्यात आला हे सिद्ध होते. अवैध उपसा केलेल्या वाळुची वाहतूक कोणत्या गाडीतून करण्यात आली, त्या गाडीला का पकडण्यात आले नाही, त्या भागामध्ये कोण तहसीलदार होते, या सर्व बाबींची चौकशी करणार आहात की नाही? म्हणून माझी सरकारला विनंती होती की, जोपर्यंत आपण जिल्ह्याचा डिमांड सप्लाय रेशिओ निर्धारीत करणार नाही, तोपर्यंत अवैध वाळुचा उपसा होणारच आहे. गरजेपेक्षा जास्त वाळुचा पुरवठा केला तर वाळुचे दर कमी होतात आणि गरजपेक्षा कमी पुरवठा केला तर वाळुचे दर वाढतात. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्याचा डिमांड सल्पाय रेशिओ निर्धारीत करण्याबाबत केंद्र सरकारने निदेश दिलेले आहेत. मागणी जास्त असेल पुरवठा कमी असेल तर अशा वेळी काय पर्याय आहे? अशा वेळी दगडापासून तयार होणारी वाळू उपलब्ध करुन दिली पाहिजे. अन्यथा वाळू चोरीच्या प्रमाणावर वाढ झाल्याशिवाय राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, मागील आश्वासनाप्रमाणे आफसेट प्राईस हा शासनाने नोटिफाय केल्याप्रमाणे निश्चित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. कारण प्रत्येक जिल्ह्यामध्ये लिलावाचा दर वेगवेगळा होता. या निर्णयामुळे ज्या वाळू घाटाचे दर विनाकारण वाढविले होते ते दर कमी होतील.

ॲड.आशिष जैस्वाल......

वाळू घाटाचे दर वाढविल्यामुळे ते घाट लिलावामध्ये जात नव्हते. जर एखादा घाट लिलावामध्ये गेला नाही तर त्या घाटातील वाळूची सर्रास चोरी केली केली जाते. राज्य शासनाने घेतलेल्या या निर्णयाबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो. या निर्णयाप्रमाणे राज्य शासनाकडून अजून अनेक निर्णय अपेक्षित आहेत, ते सर्व निर्णय लवकरात लवकर करावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, प्रत्येक जिल्ह्याच्या शासकीय कामांमध्ये किती वाळू ही मॅन्युफॅक्चर सँड असली पाहिजे, याबाबत देखील निर्णय घेणे आवश्यक आहे. यामध्ये वेगवेगळे क्रशर्स आहेत. त्यामध्ये ८० एमएम, ४० एमएम काढल्यानंतर डस्ट निर्माण होते त्याचा वापर पॅरॉमिटर नुसार शासकीय कामांमध्ये वापर केला... कारण आज एम सँडबाबतीत कोणत्याही प्रकारचे धोरण नाही. त्यामुळे मी सरकारला वारंवार विनंती करीत आहे की, मॅन्युफॅक्चर सॅन्डवर शासनाने धोरण निश्चित करावे. या वाळुचे दर वेगळे निश्चित करण्यात यावेत. जेणेकरुन या वाळुला प्रोत्साहन मिळेल. त्यामुळे नदी पात्रातील वाळुचा उपसा कमी होईल. यासंदर्भात शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, एकूण वाळुच्या ८० टक्के वाळू ही सरकारी कामासाठी लागत आहे. सरकार किती मोठी चूक करीत आहे, हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सरकार प्रथम वाळू घाटांचा लिलाव करते आणि शासकीय कामासाठी लिलाव केलेली वाळू पुन्हा विकत घेत आहे. म्हणजे लिलावामध्ये २ हजार रुपये ब्रासने वाळू विकली जाते आणि ८ हजार रुपये ब्रास प्रमाणे विकत घेतली जात आहे. ही सरकारची खूप मोठी चूक आहे. सरकारी कामासाठी जेवढी वाळूची आवश्यकता आहे तेवढे वाळूचे घाट आरक्षित ठेवण्यात यावेत. या वाळूचे उत्खनन करण्याचे देखील धोरण निश्चित करण्यात यावे. मेकॅनिकल मायनिंग बॅन करण्यात आलेली आहे. विदर्भातील कोणत्याही घाटातून ४० ते ४५ डिग्रीच्या तपामानामध्ये वाळुचा उपसा करा असे लोकांना सांगितले तर ते प्रॅक्टिकली शक्य नाही. महाराष्ट्रामध्ये कोठेही शक्य होत नाही.

असुधारित प्रत

ॲड.आशिष जैस्वाल......

पर्यावरण विभागाने रेतीचे उत्खनन करण्याची अट टाकल्यामुळे मोठी अडचण होत आहे. आपण संबंधित कंत्राटदाराकडून बँक गॅरटी घेतो आणि मेकॅनिकल मायनिंग करु नका, असे सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात कोठेही याचे पालन होत नाही प्रत्येक ठिकाणी मेकॅनिक मायनिंग केली जात आहे, जेसीबी, पोकलेन चा वापर करुनच वाळू उत्खनन होत आहे. याकडे कोणीही लक्ष देत नाही. मेकॅनिक मायनिंग करायची नाही, असा पर्यावरण विभागाने कायदा पारित केला. त्यामुळे आपण ती अट ॲग्रीमेंटमध्ये टाकलेली आहे. परंतु या नियमाच्या प्रत्यक्षात कोठेही अंमलबजावणी होत नाही. स्वत: च्या वाळुचा कॅपटीव्ह वापर करावयाचे असेल तर त्यास पर्यावरण विभागाच्या मान्यतेची गरज नाही. लिलाव करावयाचा असेल तर पर्यावरण विभागाच्या मान्यतेची गरज आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, शासन लिलाव कशासाठी करीत आहे? शासनाने लिलाव केला नाही तर आता एकावर्षामध्ये जेवढा महसूल प्राप्त होत आहे, त्यापेक्षा ५ पट जास्त महसूल प्राप्त होईल. हे मी अतिशय जबाबदारीने सांगत आहे. या राज्यामध्ये किती व कोठे बांधकाम केले जात आहे, याबाबतची सर्व माहिती शासनाकडे असते. बांधकाम परवाना देण्याबाबत कायदा करण्यात यावा.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

ॲड. आशिष जैस्वाल......

परवानगी न घेता बांधकाम केले असेल तर त्यांच्या करामध्ये वाढ करण्यात यावी. त्या बांधकामासाठी जेवढी वाळू लागत असेल तेवढ्या वाळूचे पैसे त्यांच्याकडून वसूल करण्यात यावे. परंतु राज्यातील काही तहसिलदार, एसडीओ, खनिकर्म अधिकारी यांच्याकडून मोठ्या प्रमाणत लूट केली जाते. मी राज्य सरकारच्या विरोधात बोलत नसून सामान्य जनतेच्या व्यथा मी मांडत आहे. जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभागाचा कंत्राटदार किंवा सामान्य माणसांच्या जिवनातील त्रास दूर करणे, ही शासनाची जबाबदारी आहे. मंत्री महोदयांनी यासंदर्भात ठोस निर्णय घेऊन लवकरात लवकर धोरणात्मक बदल केला पाहिजे. अन्यथा याचा मोठा फटका राज्य सरकारला बसेल. लोकांच्या मनात आज चिड आणि आक्रोश निर्माण होत आहे. तो आक्रोश कोणत्याही माध्यमातून व्यक्त केला जात आहे. लोकांची कामे शासकीय अधिकाऱ्यांनी विहित वेळेत केली पाहिजेत. असे काम जर विहित वेळेत केले नसेल तर राज्य सरकारच्या नियमानुसार तो अधिकारी जबाबदार असतो. अशा जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करता येते. अशी कारवाई काही प्रकरणात राज्य सरकारने करावी.

अध्यक्ष महोदय, अशी कारवाई केली नाही तर या कायद्यांचा कोणालाही धाक राहणार नाही. निवडक प्रकरणात कारवाई केली तर राज्यातील कायद्यांचा धाक सर्वांच्या मनात निर्माण होईल. अन्यथा या विधानसभेत पारित केलेल्या कायद्यांना कोणताही अर्थ राहणार नाही. मला वाटते की, यासंदर्भात एक नवीन धोरण तयार करण्याची आवश्यकता आहे. हे धोरण तयार करीत असताना ज्यांचा या क्षेत्रामध्ये अभ्यास आहे, ज्यांना या क्षेत्राची माहिती आहे, त्यांच्यासोबत एक बैठक घ्यावी. आज राज्यातील जनतेची लूट सुरु आहे. अनेकदा वाळुच्या ट्रॅक्टरचा एकही रुपया शासनाला मिळत नाही. माझ्या मतदारसंघाचे मी उदाहरण देईल. राज्यातील आज कोणत्याही घराचे बांधकाम थांबलेले नाही. या बांधकामासाठी त्या घरमालकाने वाळू कोठून आणली, यासाठी त्याला किती लोकांना पैसे द्यावे लागले, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. राज्यकर्त्यांना याचा विचार करुन धोरण तयार करावे

ॲड. आशिष जैस्वाल......

लागेल. राज्य सरकारचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडत आहे. आज जेवढा महसूल मिळत आहे, त्याच्या पाच पटीने महसुलात घट होत आहे. मी सांगू इच्छितो की, या सूचनेचा आणि पर्यावरण ना हरकतीसाठी ज्या मार्गदर्शक सूचना आहेत, त्यांचे प्रामाणिकपणे पालन केले पाहिजे. शासनाने वाळुच्या लिलावाकरिता कायदे केलेले आहेत. लोकांच्या घरगुती वापरासाठी, समाज मंदिर बांधण्यासाठी किंवा इतर कोणत्याही कामासाठी एसईची आवश्यकता नाही. परंतु राज्यातील या अडचणीकडे आपणस लक्ष देण्याची वेळ आली आहे. याबाबतच्या कायद्याचा गैरअर्थ काढून सामान्य लोकांची होणारी पिळवणूक थांबली पाहिजे. मला विश्वास आहे की, यासंदर्भात राज्य सरकार योग्य निर्णय घेईल. सरकारी रुग्णालय, समाजमंदिर बांधावयाचे असेल तर शासन दुसऱ्याकडून वाळू विकत घेत असते. हे चुकीचे आहे. मी याबाबत अधिकचे बोलणार नाही. यासर्वांसाठी मला अधिक वेळ पाहिजे होता. राज्यातील जनतेच्या हिताच्या दृष्टीने राज्य सरकार लवकरात लवकर निर्णय करेल, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, मी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. कोविड काळात सामान्य जनता त्रस्त झाली होती. दररोजचे कमावून खाणाऱ्या लोकांच्या आयुष्यामध्ये उपासमारीची वेळ आली होती. याकरिता राज्य सरकार आणि केंद्र सरकारने काही निर्णय घेतले होते. यात अप्राधान्य गटातील लोकांनाही धान्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. यासाठी मी शासनाचे अभिनंदन करतो. संकटाच्या काळात शासनाने त्या लोकांना दिलासा देण्याचे काम केले आहे. मी या विषयासंदर्भात दोन ते तीन मुद्दे मांडणार आहे. प्रत्येक लोकप्रतिनिधींना मी विनंती करतो. गावातील प्राधान्य गट आणि अप्राधान्य गटाची यादी ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर लावली पाहिजे. तसेच तिचे वाचन ग्रामसभेमध्ये करणे आवश्यक आहे. मी माननीय ग्राम विकास मंत्र्यांचेही याकडे लक्ष वेधू इच्छितो. राज्यातील २७ हजार ९०२ ग्रामपंचायतींपैकी एकाही ग्रामपंचायतीमध्ये ही यादी उपलब्ध नाही. शासनाने प्रसिद्ध केलेल्या सर्व शासन

अमुद्रित प्रत

ॲड. आशिष जैस्वाल......

निर्णयांचा मी अभ्यास केला आहे. परंतु त्या शासन निर्णयांची अंमलबजावणी दुर्दैवाने होत नाही. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी त्यांच्या गावातील अंत्योदय गट, प्राधान्य गट, अप्राधान्य गटाचे लाभार्थी तपासावेत. संजय गांधी योजनेतील लाभार्थ्यांचे नाव अंत्योदय गट, प्राधान्य गटामध्ये नाही. ते लाभार्थी अजुनही एनपीएसमध्ये आहेत. परंतु शासनाच्या रेकॉर्डवर ते संजय गांधी योनजेतील लाभार्थी दिसून येत आहेत. मी माननीय मंत्री श्री. धनंजय मुंडे यांच्यासोबत बैठक घेतली होती. ज्या अर्थी तो लाभार्थी संजय गांधी योजनेतील आहे त्याअर्थी तो गरीब, दिव्यांग आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** आता सन्माननीय सदस्य श्री. सुनिल शेळके यांनी भाषण करावे. (...अडथळा...) मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, वेळेचे नियोजन केले पाहिजे. एकास एक सदस्यांना बोलण्याची संधी दिली तर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची बोलण्याची वेळ संपून जाईल. नंतर केवळ सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना भाषण करण्यास वेळ मिळेल. त्यामुळे सत्ताधारी पक्षाचे दोन सन्माननीय सदस्य झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या एका सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाईल. दोन सदस्य सत्ताधारी बाजुचे आणि एक सदस्य विरोधी पक्षाच्या बाजुचा, असा बोलण्याचा क्रम राहील. आपण सांगत आहात तसे केले तर विरोधी पक्षाचा वेळ संपेल. त्यांना मग सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांची भाषणे ऐकवी लागतील. यासाठी दोन/एक असा क्रम ठेवला तर वेळेचे नियोजन व्यवस्थित होईल.

ॲड.आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, मी शेवटचे मुद्दे मांडणार आहे. दिनांक ४ जून, २०२१ रोजी शासनाने पत्र देऊन मला सांगितले की, (....अडथळा....) या व्यवस्थेमध्ये कोणत्या सुधारणा व्हावयास पाहिजेत, याची माहिती मी दिली होती. यावर मला सरकारने पत्राद्वारे सांगितले की, आपल्या चारही सूचना विचारात घेण्यात येत आहेत. परंतु या सूचना माननीय उच्च न्यायालयाच्या शपथपत्रानंतरही विचारात घेतल्या गेल्या नाहीत. यामुळे राज्यातील दुकानामध्ये जे गैरव्यवहार होत आहेत ते

ॲड. आशिष जैस्वाल......

थांबू शकले नाहीत. प्रत्येक गरीब व्यक्तीला त्याच्या हक्काचे अन्न उपलब्ध करुन देणे ही आपली जबाबदारी आहे. परंतु दुर्दैवाने ते होत नाही. यात पावती दिली पाहिजे. त्या व्यक्तीकडे कोणते कार्ड आहे, त्याचा आरसी नंबर लिहिला जात नाही. यात ज्या ज्या सुधारणा करण्याची आवश्यकता आहे त्या कराव्यात. स्व. राजीव गांधी म्हणत असत की, एक रुपया पाठविला तर त्यातील १० पैसे लाभार्थ्यांपर्यंत पोहचत असतात. त्यामुळे केंद्र सरकारने पाठविले धान्य प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे, यासाठी गावपातळीवर दक्षता समिती सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी शासनाने करावी व राज्यातील जनतेला न्याय द्यावा. आपल्या राज्यात देशातील इतर राज्यांपेक्षा अधिक चांगले काम झाले आहे, असे चित्र निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

धन्यवाद !

-------

असुधारित प्रत

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** सर्व सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सत्ताधारी पक्षातील दोन सदस्य व विरोधी पक्षातील एक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिल्यास वेळेचा समतोल साधला जाईल. अर्थात, दोन्ही बाजूच्या एकेक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी अशी आपली मागणी असेल तर तसे करण्यासही माझी हरकत नाही. असे करताना एक गोष्ट लक्षात घ्यावी की, आपल्या पक्षाची वेळ संपल्यानंतर उर्वरित सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार नाही. आता सन्माननीय सदस्य डॉ.संजय कुटे यांनी भाषणास सुरुवात करावी.

डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे... (अडथळा...) अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी चर्चेविषयी जी पध्दत ठरवून दिली आहे त्यानुसार चर्चा सुरु ठेवावी अशी आमची विनंती आहे. त्यामध्ये दररोज बदल करु नये.

अध्यक्ष महोदय, महसूल व वन विभागाच्या मागण्यांवर मी बोलत आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष जैस्वाल यांनी रेती धोरणाविषयी अतिशय चांगली भूमिका मांडली आहे. मी मागील वेळी देखील या मुद्यावर बोललो होतो. त्यामध्ये मी केवळ दोन मुद्दे जोडणार आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल, पोलीस, आर.टी.ओ. या विभागांच्या माध्यमातून रेतीच्या अवैध उत्खननातून राज्यभर मोठया प्रमाणात पैसा कमविण्याचा प्रकार सुरु आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे. मुंबई महानगर परिसरातील रायगड, ठाणे, पालघर या जिल्हयांमधील माहिती घेतली तर असे दिसून येते की, तलाठी, मंडळ अधिकारी हे देखील वीस-वीस तीस-तीस लाख रुपये किमतीच्या गाडया घेऊन रेतीचे ट्रक आणि होडया पकडण्यासाठी फिरतात. महाराष्ट्र राज्यातील ही स्थिती आहे. मी याबाबतचे एक उदाहरण देतो.

डॉ.संजय कुटे.....

कल्याण खाडीतून मोठया प्रमाणात अवैध मार्गाने रेती उत्खनन केले जाते. तलाठी, तहसिलदार, प्रांताधिकारी हे सर्वजण यामध्ये गुंतलेले आहेत. यासंदर्भात चौकशी करुन सरकारला खरोखर काही कारवाई करायची असेल तर मी एक नाव सांगतो. शेकप भाई नावाचा एक इसम आहे. आपण जिल्हाधिकारी कार्यालयातील सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे फुटेज काढून पाहावे की या व्यक्तीची कोणासोबत उठ-बस आहे. रेतीचे रॅकेट कशा प्रकारे चालते हे यावरुन आपल्या लक्षात येईल. सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांकडून प्रत्येक वेळी रेतीचा विषय उपस्थित केला जातो. कारण याचा सर्वात जास्त त्रास लोकप्रतिनिधींना होतो. याचा कार्यकर्ता, त्याचा कार्यकर्ता, हा फोन करणार, तो फोन करणार व या सर्वांमध्ये आमची पंचाईत होते. काही लोकप्रतिनिधीच यामध्ये सामील असतात ही गोष्ट वेगळी आहे. परंतु आमच्यासारख्यांना या सर्व गोष्टींचा अतिशय त्रास होतो.

अध्यक्ष महोदय, मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, तेलंगणा, कर्नाटक या राज्यांनी रेतीसंदर्भात वेगळे धोरण अवलंबिले आहे. गुजरात राज्यामध्ये देखील पर्यावरण व इतर काहीही अडथळे नाहीत. आपल्या माननीय महसूल मंत्र्यांशी मी चर्चा केली त्यावेळी त्यांनी सांगितले की, "आपल्याला पर्यावरणाचा फार अडथळा आहे. ते आपल्याला असे करु देत नाहीत." माझा मुद्दा असा आहे की, ज्यावेळी रेती घाटांची हराशी केली जाते त्यावेळी त्यासाठी पर्यावरण विभागाची परवानगी असते. कर्नाटक, तेलंगणा या राज्यांनी स्वत:चे रेती महामंडळ तयार केले आहे. तेथे शासनाकडूनच रेती ऊपसा करुन गोदामांमध्ये साठवून लोकांना विकली जाते. महसूल अधिकारी, पोलीस अधिकारी किंवा आर.टी.ओ. यांचा यामध्ये काहीही संबंध येत नसल्यामुळे भ्रष्टाचारही होत नाही. तसेच अवैधरित्या रेती ऊपसा देखील होत नाही. मला कल्पना आहे की, याबाबत लगेच कार्यवाही होणार नाही परंतु किमान राज्याचे यासंदर्भातील धोरण ठरविण्यासाठी या विषयातील तज्ञ आमदार व अधिकाऱ्यांची एखादी समिती स्थापन केली पाहिजे. राज्याचा सर्वाधिक महसूल रेतीमुळे बुडत आहे.

डॉ.संजय कुटे.....

माझ्या जळगाव जामोद मतदारसंघातील चार किंवा पाच रेती घाट हराश केले जातात. परंतु केवळ २० टक्के रेती वैधरित्या ऊपसली जाते. उर्वरित ८० टक्के रेतीचा ऊपसा अवैध मार्गांनीच केला जातो. यामध्ये शासनाचा महसूल बुडून केवळ अधिकाऱ्यांचे भले होते. त्यामुळे याबाबत गांभिर्याने विचार केला पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी वन विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. या ठिकाणी माननीय वन मंत्री उपस्थित नाहीत. परंतु मी सांगू इच्छितो की, उमरेड, जि.नागपूर येथे उमरेड-कऱ्हांडला हा व्याघ्र प्रकल्प आहे. सदर व्याघ्र प्रकल्प क्षेत्रामध्ये शिकारीचे प्रमाण अतिशय वाढले आहे. श्री.राजीव भेंडे यांच्या मालकीच्या वीट भट्टीवर मजूर रानडुकराची शिकार करायला बसलेले असताना विजेचा शॉक लागून वाघाचा मृत्यू झाला. या प्रकरणी मजुरांना अटक झाली परंतु त्यांना शिकार करायला सांगणाऱ्यास अद्यापही अटक झाली नाही किंवा कोणतीही कारवाई झाली नाही.

अध्यक्ष महोदय, कापसी-खुर्द वन विभागामध्ये वाघाचे कातडे विकणारी एक आंतरराष्ट्रीय टोळी सक्रीय झाली असून ही बाब वन विभागासाठी अतिशय गंभीर आहे. वाईल्डलाईफ कंट्रोल ब्युरो आणि वन विभागाने संयुक्त मोहिम राबविली त्यामध्ये बिबटयाच्या कातडीसह काही लोकांना पकडण्यात आले. त्या लोकांनी जबाबामध्ये सांगितले की, "या भागातील काँग्रेस पक्षाच्या जिल्हा परिषद सदस्यांनी आम्हाला हे वाघाचे कातडे विकलेले आहे व हा त्यांचा व्यवसाय आहे." त्यांनी हा जबाब दिल्यापासून वन विभाग व पोलीस खाते मध्य प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वदूर त्याचा शोध घेत आहेत. परंतु सदर व्यक्ती सत्तारुढ पक्षाचा पदाधिकारी आहे. त्याचे मोबाईल लोकेशन ट्रॅक केले त्यावेळी दिसून आले की, तो शहरातीलच एका मोठया नेत्याच्या घरात बसलेला आहे. परंतु त्यानंतर माहिती मिळताच मोबाईल बंद करुन आरोपी फरार झाला. अशा प्रकारे वाघाची कातडी विकणारी आंतरराष्ट्रीय टोळी सक्रीय असेल व सरकारमध्ये सामील असलेल्या पक्षाचेच पदाधिकारी त्यामध्ये असतील तर महाराष्ट्रामध्ये वन विभाग

डॉ.संजय कुटे.....

सुरक्षित राहणार नाही, असे मला वाटते. त्यामुळे या दोन्ही प्रकरणांची उच्चस्तरीय चौकशी करुन यातील खरे सुत्रधार जनतेसमोर आणणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मी जलसंपदा विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. माननीय जलसंपदा मंत्री देखील या ठिकाणी उपस्थित नाहीत. मी आतापर्यंत बोललेल्या तिन्ही विभागांचे मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

अध्यक्ष महोदय, अलीकडेच आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री महोदय येऊन गेले. माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यासह माननीय श्री.शरद पवार व महाविकास आघाडीच्या महत्त्वाच्या नेत्यांना भेटून त्यांनी पत्रकार परिषद देखील घेतली. मुंबई-हैद्राबाद दरम्यान बुलेट ट्रेन सुरु करण्याचा देखील आपला प्रयत्न सुरु आहे. कारण आपल्याला त्यांच्याशी चांगले संबंध प्रस्थापित करायचे आहेत. परंतु हे करीत असतानाच तेलंगणा राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडून जे शिकण्यासारखे आहे ते आपण विसरलो. केवळ राजकीय पोळया कशा भाजायच्या व केंद्र सरकारला विरोध करण्यासाठी गठबंधन कसे करायचे हे आपण त्यांच्याकडून शिकत आहोत.

अध्यक्ष महोदय, तेलंगणा सरकारच्या जलसंपदा विभागात गेल्या पाच-सात वर्षांमध्ये केलेल्या कामाची माहिती घेऊन, त्याचा अभ्यास करुन आपल्या राज्याचा जलसंपदा विभाग त्या मार्गाने पुढे जाणार आहे का हा माझा प्रश्न आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपल्या विभागातील काही महत्त्वाचे अधिकारी व आपण स्वत: जाऊन तेलंगणा सरकारने मागील पाच-सात वर्षांमध्ये धरणांची कामे कशी पूर्ण केली हे पाहिले पाहिजे. तेलंगणा राज्य सुजलाम सुफलाम कसे झाले आहे त्या पध्दतीचे अवलोकन आपण केले पाहिजे. पन्नास-पन्नास हजार कोटी रुपयांचे प्रकल्प त्या राज्यामध्ये उभे राहिले आहेत. तेलंगणा हे राज्य आपल्या राज्यापेक्षा चार पट लहान आहे. आम्ही तेलंगणा राज्यामध्ये जाऊन आलो आहोत. त्या राज्यामध्ये अप्रतिम प्रकल्प उभे राहिले आहेत. त्यासाठी त्यांनी कुठून पैसे आणले हे पाहिले पाहिजे. पैसा उपलब्ध करण्याचे अनेक मार्ग आहेत.

डॉ.संजय कुटे.....

त्या राज्यामध्ये शेतकऱ्यांसाठी झालेले हे महत्त्वाचे काम शिकण्यासारखे आहे. आपण शिकलेले नाहीत किंवा आपल्याला समजत नाही असे मी मुळीच म्हणणार नाही परंतु अशा प्रकल्पांसाठी निधी कसा उभारायचा हे आपल्याला शिकता येईल. मागील काळात आपण काही प्रकल्प प्राधान्याने हाती घेतले होते. त्यापैकी काही प्रकल्प बळीराजा योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आले होते तर काही प्रकल्प राज्य सरकारने हाती घेतले होते. ६० टक्के, ७० टक्के, ५० टक्के काम पूर्ण झालेल्या प्रकल्पांचे काम अगोदर पूर्ण करायचे व त्यानंतर इतर प्रकल्पांचे असा प्राधान्यक्रम आपण ठरविला होता. परंतु महाराष्ट्र राज्याचे दुर्दैव असे की, जे प्रकल्प ठरविले गेले त्यामध्ये देखील गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये पाहिजे तशी प्रगती झालेली दिसत नाही. अर्थात, यासाठी कर्ज काढायचे असेल तर त्याला कोणाचाही विरोध नाही. मागील सरकारच्या काळात ठरले होते की, जलसंपदा विभागाला आंतरराष्ट्रीय स्तरावरुन ५० हजार कोटी रुपयांचे कर्ज मिळवायचे. त्यासंदर्भातील प्रस्ताव देखील तयार झाला होता. परंतु त्याचे पुढे काय झाले हा माझा माननीय जलसंपदा मंत्री श्री.जयंत पाटील यांना प्रश्न आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे...

कारण आमच्या शेतकऱ्याला जर पाणी मिळाले तर महाराष्ट्रातील शेतकरी इतका सक्षम आहे की, तो सरकारच्या दारी कधीच येणार नाही. शेतकऱ्याला शाश्वत पाणी मिळाले तर तो कधीच आपल्या दारात मदतीसाठी येणार नाही. म्हणून शेतकऱ्याच्या शेतीला पाणी मिळाले पाहिजे. आज आपल्या महाराष्ट्रात मोठमोठे सिंचन प्रकल्प आहेत. पण ते कधी पूर्ण होणार आहेत, त्यासाठी आपण काही कालमर्यादा निश्चित केली आहे काय? आमच्या बुलढाणा जिल्ह्यातील जिगांव प्रकल्पाचे मी उदाहरण देतो. एक लाख हेक्टर जमिनीचे सिंचन करणारा हा प्रकल्प आहे. सन १९९५-९८ पासून या प्रकल्पाला मंजुरी मिळाली. पण अजूनही त्याचे काम सुरू आहे. मागच्या वेळी आम्ही हा प्रकल्प पूर्ण करण्याचे ठरविले होते. पण आता आपण तो प्रकल्प पूर्ण करावा अशी आमची विनंती आहे. तो प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आता १० हजार कोटी रुपये लागणार आहेत. त्यापैकी २ हजार कोटी मागील २ वर्षात खर्च झाले आहेत. त्यामुळे आजही त्याला प्रकल्पाच्या कामाला ८ ते ९ हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. आता आपण बजेटमध्ये ९०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. आम्ही मागच्या वेळेस असे प्लॅनिंग केले होते की दरवर्षी या प्रकल्पाला २ हजार कोटी रुपये द्यायचे. बळीराजा योजनेमधून सुध्दा तो प्रकल्प पूर्ण होऊ शकतो. केंद्र शासनाकडून त्यासाठी काही निधी मिळू शकतो. असे करुन दरवर्षी २ किंवा अडीच कोटी हजार कोटी रुपये जर या प्रकल्पासाठी दिले तर पुढील ४ वर्षात हा प्रकल्प पूर्ण होईल. आम्ही ठरविले होते की, येणाऱ्या पुढच्या टर्ममध्ये पाच वर्षात हा जिगांव प्रकल्प परिपूर्ण होईल आणि त्यातून १ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येईल.

अध्यक्ष महोदय, दरवर्षी या प्रकल्पाची किंमत वाढत आहे. आपण जितका उशीर करणार आहात तितकी या प्रकल्पाची किंमत वाढणार आहे. आधी हा प्रकल्प १ ते दीड कोटी रुपयांचा होता आणि आता साडे तेरा हजार कोटींवर तो गेला आहे. शेवटी यामध्ये शासनाचाच निधी जातो त्यामुळे कुठे तरी कालमर्यादेत हा प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे. त्यामुळे ९०० कोटींऐवजी दरवर्षी २ हजार कोटी त्या प्रकल्पासाठी दिले तर... कर्ज काढून द्यावेत किंवा इतर कुठूनही द्यावेत. आपण ५०

डॉ. संजय कुटे...

हजार कोटी रुपयांचे कर्ज काढावे. परंतु हा प्रकल्प पूर्ण झाला तर १ लाख हेक्टर जमीन सिंचित होणार आहे. यामधून शेतकऱ्यांचे भूसंपादनाचे मोबदल्याचे पैसे देणे शिल्लक आहेत. आपण या ९०० कोटींमध्ये काय करणार आहात. जर आपण दरवर्षी २ हजार कोटींचे टार्गेट दिले तर येणाऱ्या ४ वर्षात तो प्रकल्प पूर्ण होऊ शकतो. अन्यथा आजही मी आपल्याला सांगतो की, आपण असे ९०० कोटी रुपये देत राहिले तर तो प्रकल्प अजूनही २० वर्षे पूर्ण होत नाही. आता आपण पहिल्या टप्प्यात २०२३-२४ मध्ये पाणी अडवू असे ठरविले आहे. परंतु दुसरा टप्पा, तिसरा टप्पा व त्यामधून लोकांच्या शेती घेणे व पुनर्वसन करणे हे काम जवळपास १५ वर्षे चालेल.

अध्यक्ष महोदय, आम्ही गोसी खुर्द प्रकल्प अनुभवला आहे. तो प्रकल्प पूर्ण झाला. पण शेतकऱ्यांना अजूनही त्यांचा मोबदला रक्कम मिळालेली नाही. तसंच याही प्रकल्पात होईल. म्हणून या कामासाठी मोठी आर्थिक तरतूद झाली पाहिजे. आता पुनर्वसनाचे काम सुरू आहे. पण ते लवकरात लवकर झाले पाहिजे. शेतकऱ्याच्या बुडीत क्षेत्रातील कामे करावे लागतात. शेतकऱ्यांची जमीन संपादित करताना किती त्रास होतो. आपले अधिकारी इतके निगरगट्ट आहेत की, तुम्ही आदेश दिले, तुम्ही शासन निर्णय निर्गमित केले. जलसंपदा सचिव असतील, पुनर्वसन सचिव असतील, जिल्हाधिकारी यांनी देखील संपूर्ण जिल्ह्यामध्ये अमुक याप्रमाणे यंत्रणा राबवावी, असे आदेश दिले. पण या अधिकाऱ्यांनी ऐकले नाही. कारण आपल्या बुलढाणा जिल्ह्यातील मदत पुनर्वसन विभागातील एक छोटासा क्लार्क हे पूर्ण काम करते. तो पुनर्वसन अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनाही तोच सर्व सांगते. शेवटी बऱ्याच शेतकऱ्यांनी कंटाळून जे व्हायचे ते होईल असा विचार करुन... लोकांना समजले की, हे आपले "ड" मान्य करीत नाहीत. मग काय करायचे, म्हणून लोकांनी विरोध करुन ती प्रकरणे लॅप्स करायला लावली. आता असे झाले की ती प्रकरणे लॅप्स झाल्यानंतर आजच्या स्थितीत त्या मिळकतीवर जे काही असेल त्यासंबंधी नवीन जेएमआर करावा लागत आहे. म्हणजे नवीन जेएमआरमध्ये जे उपलब्ध आहे ते सर्वच आपल्याला मोबदला म्हणून देणे लागू झाले आहे. मग तेव्हा ते "ड" मान्य

डॉ. संजय कुटे...

केले असते तर एका एका गावाचे जवळपास ५० कोटी रुपये वाचले असते. त्यावेळी आम्ही ओरडू ओरडू आणि आकांताने सांगत होतो. पण आपण ऐकायला तयार नव्हते आणि आपले अधिकारीही ऐकत नव्हते. आज शासनाचे यामधून हजारो कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. म्हणून आम्ही या विषयासंबंधी बैठक घ्यावी अशी विनंती केली होती. कारण यामध्ये शासनाचे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांचे नुकसान होत नाही. शेतकऱ्यांना या ना त्या मार्गाने पैसा मिळणार आहे. आपण "ड" केले नाही म्हणून लोकांनी कोर्टातून तो पैसा मिळविला. परंतु हजारो लोकांनी कोर्टातच जायचे काय, मग शासन कशासाठी आहे. प्रत्येकाला जर कोर्टाच्या दारी जावे लागत असेल तर शासन काय काम करते, आपण कशासाठी आहोत आणि म्हणून पर्यायाने आपण शासनाचे नुकसान करुन घेतले आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०१९९ मध्ये संग्रामपूर तालुक्यातील आरकचेरी प्रकल्प, आलेवाडी प्रकल्प असेल, यासंबंधी सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची फाईल माननीय जलसंपदा मंत्री यांच्याकडे किती तरी दिवसांपासून प्रलंबित आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये ती सुप्रमा मिळण्यासाठी पाठवायची आहे. या दोन्ही लघु प्रकल्पांना मान्यता देण्यासाठी संबंधित फाईल्स किती तरी महिन्यांपासून आपल्याकडे प्रलंबित आहेत. आपल्या अधिकाऱ्यांना आणि आपल्याला एकच विषय १०-१० वेळा सांगण्यास आम्हालाही योग्य वाटत नाही. कारण जे करणे आहे ते आज करायचे आहे, उद्याही करायचेच आहे आणि शेवटी करणे तर आहेच. पण ते गतीने झाले पाहिजे. एखाद्या प्रकल्पात निधीअभावी विलंब होत असेल हे समजू शकतो. पण या दोन्ही प्रकल्पासाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे. पण तरी ते प्रकरण पुढे जात नाही.

अध्यक्ष महोदय, जळगाव खांदेश तालुक्यातील कुऱ्हा वडोदा इस्लामपूर ही एक योजना गेल्या अडीच वर्षापासून या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. सुमारे ९० टक्के या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. हे धरण ९० टक्के बांधून पूर्ण आहे. पण गेल्या अडीच वर्षापासून या प्रकल्पाचे काम शिल्लक आहे.

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे...

अध्यक्ष महोदय, त्यावेळी आपण पर्यावरण विभागाची मान्यता घेतली नव्हती, हे दुर्दैवाने घडले. त्यानंतर त्या प्रकल्पाचे काम सुरू राहिले. त्यानंतर केंद्रीय पर्यावरण विभागाकडे हे प्रकरण पाठविले आहे. आम्ही त्याचा पाठपुरावा करतो आहोत. केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री भूपेंद्र यादव यांच्याशी आम्ही चर्चा केली आणि त्यांना पत्रही दिले आहे. त्यांची परवानगी मिळून जाईल. पण ९०-९० टक्के प्रकल्प पूर्ण झाले असताना त्याच्या प्रायॉरिटी लक्षात घेतल्या पाहिजेत. त्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत याबाबत तासा-तासानंतर आढावा घेतला गेला पाहिजे. शेतीच्या पाण्यावर महाराष्ट्राचे भाग्य अवलंबून आहे. शेतीला जर पुरेसे पाणी असले तर शेतकरी इतका क्षमतावान आहे की, तो भविष्यात आपल्या दारात येणार नाही आणि त्यातून छोटे छोटे प्रक्रिया उद्योग उभे राहतील. त्यामुळे महाराष्ट्रात औद्योगिक क्रांती या पाण्यावर होणार आहे. म्हणून यामध्ये सारासार विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास विभागावर मी त्या दिवशी बोललो होतो. आता मी माननीय ग्रामविकास मंत्री महोदयांना इतकीच आठवण करुन देणार आहे की, "उमेद"चा जो विषय आहे त्यासाठी पुरेसा निधी आहे. पण आपली प्रकरणे पुढे जात नाहीत. अधिकारी आणि प्रधान सचिव यांच्यामध्ये ताळमेळ बसत नाही. आपला एक अधिकारी जागतिक बँकेकडे दुसराच प्रस्ताव पाठवितो. त्यामुळे आपण कधी तरी यामध्ये लक्ष घालणार आहात काय, दोन अधिकाऱ्यांच्या भांडणामध्ये जर संपूर्ण महाराष्ट्राची उमेद खाली जात असेल तर त्या "उमेद" प्रकल्पाचे काय करायचे ? म्हणून ग्रामविकास मंत्री महोदयांनी यामध्ये गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. काय करायचे असेल ते करा. पण तो प्रकल्प पुढे गेला पाहिजे. तो महिलांच्या स्वयंस्हाय्यता उन्नतीचा तो प्रकल्प आहे. आपण त्याकडे लक्ष देत नाहीत हे दुर्दैव आहे. रस्त्यांच्या विषयावर मी त्या दिवशी बोललो आहे. त्या अनुषंगाने मी फक्त एक सूचना करणार आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा आता आपण दुसरा टप्पा सुरू केला आहे. मागच्या काळात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे जेव्हा काम करण्याचे ठरविले होते तेव्हा प्रत्येक जिल्ह्याला टार्गेट देण्यात आले होते. लोकसंख्या

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे...

आणि तालुक्याची भौगोलिक परिस्थितीत विचारात घेऊन सर्वांना समान वाटप करण्यात आला. त्यामध्ये कुठेही भेदभाव झाला नाही. या योजनेला मुख्यमंत्र्यांचे नाव असल्यामुळे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अंतर्गत भेदभाव होता कामा नये. जी भौगोलिक परिस्थिती असेल, जितकी लोकसंख्या असेल, त्यानुसार जितके कि.मी.चे रस्त्या ज्या तालुक्याला बसतील मग तो कोणताही तालुका असो, त्याला समान वाटप झाले पाहिजे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाबतीत माझा छोटासा विषय आहे. आमचे सन्माननीय सदस्य आकाशजी फुंडकर यांच्या भाषणातून तो विषय मांडतील. फक्त मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधतो की, आपण बायो डिझेलचे प्रकरण अत्यंत शांतपणे घेतले आहे. आपण त्यात गंभीर नाहीत. नाशिकमध्ये आपण ते गांभीर्याने घेतले व बायो डिझेलवर बंदी आणली. अहमदनगरमध्ये पोलीस विभागाने स्वयंअधिकारात गुन्हे दाखल केले. मोकोकासारखी कलमे लावली. बुलढाणा, अकोला, वाशिम या जिल्ह्यात अजूनही बायो डिझेल विक्री सुरू आहे. केंद्र शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत की बायो डिझेल विकण्यास देशात परवानगी नाही. मग आपल्या महाराष्ट्रात बायो डिझेल कसे विकले जाते. आपले जर सर्व अधिकारी त्यामध्ये मिळालेले असतील तर लोकांमध्ये गैरसमज पसरला की त्याचे धोगेदोरे तुमच्यापर्यंत पोहोचलेले आहेत तर ते अत्यंत दुर्दैव आहे. त्यामुळे आपल्याला कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे. आपण महाराष्ट्रात इतर भागात हे प्रकार बंद केले आहेत. नाशिकमध्येही आपण ते बंद केले आहे. कारण बायो डिझेल विक्रीस परवानगी नाही. ही अवैध विक्री होत आहे. मग आपल्या बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यामध्ये यावर का कारवाई होत नाही. महसूल विभाग, पोलीस विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांच्यापैकी कोणीच कारवाई करीत नाही. याबाबत कोणाचा दबाव आहे. आपण जर हे प्रकरण आज निपटले नाही तर किती तरी नुकसान होणार आहे. काही पेट्रोलपंप धारकांकडे तर ते ऑथराईज्ड आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे....

कधी एखादी चार्जशिट बोलवा. त्या तीन जिल्ह्यामधील लोकांना अवैध बायोडिझेलमुळे किती मोठया प्रमाणात फटका बसत आहे. त्यामुळे राज्य शासनाचा महसूल जात आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी ऐकावे की, पेट्रोल आणि डिझेलच्या प्रमाणात बायोडिझेलचा महसूल कमी होत आहे. याचा कधीतरी आपण गांभीर्याने विचार करा. या विषयावर सन्माननीय सदस्य श्री. आकाश फुंडकर बोलतील. आपण त्यांच्यासोबत एक बैठक घेऊन सर्व कागदपत्रे केंद्र शासन तसेच राज्य शासन आणि त्यांचे काय कायदे आहात हे सर्व पाहून त्यावर तातडीने निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी आरोग्य विभागाच्या विषयावर दोनच मिनिट बोलणार आहे. कोरोनाच्या काळात मोठया प्रमाणावर साहित्य खरेदी झाली आणि त्याबाबत बरेच आरोप प्रत्यारोप करण्यात आले. त्याबाबत चौकशी कुठपर्यंत गेली आहे, असे मी माननीय मंत्री श्री. राजेश टोपे यांना विचारु इच्छितो. आज किंवा उद्या असे कधीतरी महाराष्ट्राला स्वच्छ प्रतिमेने आपल्याला उत्तर द्यावे लागेल. त्यामुळे आपण आपल्या भाषणामध्ये कुठेतरी त्याचा उल्लेख करावा. प्रत्येक जिल्ह्यामध्ये काहीतरी घोटाळे झाले आहेत. तर याची उत्तरे सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला कळली पाहिजेत. कोरोनाच्या काळात डॉक्टर्स, सिस्टर्स, आशा वर्कर किंवा अंगणवाडी सेविका यांनी मोठ्या प्रमाणात काम केल्यानंतर देखील चार-चार महिने त्यांचे पगार होत नाहीत. कोरोनाच्या परिस्थितीत कोणी काम करायला तयार नव्हते तर आपण ज्यांना कंत्राटी पद्धतीने काम करण्यासाठी घेतले परंतु नंतर त्यांना काढून टाकून त्यांच्यावर अन्याय केला आहे. नंतर कुठेही त्यांचे नामोनिशान नाही. पद भरती बाबत जो घोटाळा झाला आहे त्याची चौकशी सुरु आहे तर त्यातून काय निष्पन्न झाले हे देखील आपण जनतेसमोर येऊ द्या. तसेच जागा केव्हा भरण्यात येतील हे देखील माननीय मंत्र्यांनी सांगावे. आज वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या १५०० ते २००० जागा रिक्त आहेत. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांच्या १० ते २० हजार जागा रिक्त आहेत. मग महाराष्ट्रातील आरोग्य विभागाचा कारभार कसा चालणार आहे ? माननीय वित्त

असुधारित प्रत

डॉ. संजय कुटे....

मंत्र्यांनी आरोग्य विभागासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली आहे त्याचा काय उपयोग होणार आहे ? जळगाव जिल्ह्यात तज्ञ अधिकारी, अधिक्षक नाहीत किंवा वैद्यकीय अधिकारी देखील नाहीत. त्यामुळे या जागा तातडीने भरल्या गेल्या पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, शहरामध्ये तरी डॉक्टर्स, स्पेशालिस्ट उपलब्ध होत असतात. परंतु ग्रामीण भागाची अवस्था अशी आहे की, तिथे डॉक्टर्स येत नाहीत. मग ग्रामविकास विभाग, आरोग्य विभाग किंवा कोणताही विभाग असला तरी ग्रामीण भाग किंवा ग्रामीण रुग्णालये ही वाऱ्यावर सोडलेली आहेत. सर्व काही शहराकडे नेले जात आहे. मला वाटते की, शहराला काही विरोध नाही. परंतु ग्रामीण भाग मजबूत झाला तरच शहरावरील भार कमी होईल. त्यामुळे या पायाभूत सुविधा वाढविल्या पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, मी शेवटी एकच सूचना करतो आणि बोलणे थांबवितो. जळगाव-जामोद या ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणी मोठा आदिवासी भाग आहे. यासाठी आम्ही बऱ्याच दिवसापासून पाठपुरावा करुन पत्र देखील दिलेले आहे. त्याला उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊन त्याचा दर्जा वाढ करावा, अशी आमची विनंती आहे. संग्रामपूर तालुक्याच्या ठिकाणी आपण मोठे ग्रामीण रुग्णालय बांधलेले आहे. परंतु अजूनही तिथे पद भरती नाही किंवा कोणतेही साहित्य नाही. त्यामुळे अजून ते रुग्णालय सुरु झालेले नाही. माननीय मंत्री श्री. राजेश टोपे यांना माझी विनंती आहे की, या दोन्ही विषयावर तातडीने एखादी बैठक घेऊन ते मार्गी लावावे. आपण प्रयोगशाळा, एक्स-रे असे सर्व साहित्य देतो. परंतु टेक्निशियन कुठे आहे ? जळगाव मध्ये प्रयोगशाळा किंवा एक्स रे मशिन पडलेली आहे परंतु तिथे टेक्निशियन नाही. त्यामुळे ही पदभरती लवकरात लवकर करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, संशोधनासाठी केंद्र शासनाची योजना आहे. पुणे जिल्ह्यात मोठा सेटअप तयार करण्यासाठी आपण विचार करीत आहोत. संसर्गजन्य रोग येत असल्यामुळे आपली स्वत:ची संशोधनाची प्रयोगशाळा किंवा त्या प्रकारचे संसाधन

डॉ. संजय कुटे....

उपलब्ध असले पाहिजे. मला वाटते की, हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे लवकरात लवकर पाठवून त्यांच्याकडून मान्यता घेऊन महाराष्ट्रात पुणे जिल्हाच नाहीतर प्रत्येक विभागात संशोधनासाठी एक प्रयोगशाळा कशी तयार होईल हे आपण पहावे. मग कोणताही संसर्गजन्य रोग आला तरी देखील एम्सला किंवा इतर ठिकाणी पाठवण्यापेक्षा आपल्या प्रयोगशाळा सुसज्य असल्या पाहिजे. यासाठी केंद्र शासनाचे पैसे उपलब्ध आहेत. त्यामध्ये आपण लक्ष द्यावे,एवढीच मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो धन्यवाद !

-------

असुधारित प्रत

श्री. सुनील शेळके (मावळ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. महसूल व वन विभागाच्या माध्यमातून मी आपले लक्ष वेधू इच्छितो की, पर्यावरणाचा ऱ्हास होता कामा नये, जैवविविधता कुठेही कमी होता कामा नये, निसर्गाचा समतोल राखणे, वृक्ष संवर्धन व संगोपन करणे ही खऱ्या अर्थाने काळाची गरज आहे. हे काम वन विभागाच्या माध्यमातून आपल्या राज्याचे वन विभागातील अधिकारी व कर्मचारी तत्परतेने आपले कर्तव्य बजावत असतात. आमचा मावळ तालुका हा डोंगरी भाग आहे. या डोंगरी तालुक्यामध्ये वाडा, वस्त्या, डोंगर, दऱ्या असून आदिवासी, कातकरी, ठाकर समाजाचे बांधव राहतात. या परिसरात राज्य शासनाच्या माध्यमातून मुलभूत सुविधा पोहोचल्या पाहिजे. रस्ते, वीज आणि पाणी मिळाले पाहिजे यासाठी शासनाच्या वेगवेगळ्या विभागाकडून तरतुदी केल्या जातात. परंतु वन विभागाच्या अत्यंत किचकट अशा अटी आणि शर्तींना आपल्याला सामोरे जावे लागते. ज्या अटी, शर्ती आणि निर्बंधघालून दिलेले आहेत याची आपल्याला पुर्तता केलीच पाहिजे. परंतु ही पुर्तता करीत असताना एखाद्या रस्त्याचे काम करायचे असले तरी देखील त्याचा संपूर्ण प्रस्ताव तयार करुन डीएफओ आणि आरएफओकडे द्यायचा. तिथून तो प्रस्ताव नागपूर, भोपाळ येथे जातो. त्या प्रस्तावाला मंजुरी मिळण्यासाठी ४ किंवा ५ वर्ष जातात. अशावेळेला त्या रस्त्यांची अवस्था अत्यंत वाईट असते. त्या रस्त्यावरुन जाणे-येणे प्रवास करणे कोणालाही शक्य होत नाही. आपल्या माध्यमातून शासनाला माझी मागणी आहे की, ग्रामीण भागातील किंवा आदिवासी वाडया वस्त्यांतील डोंगर भागात राहणाऱ्या सर्व नागरिकांना मुलभूत सुविधा देण्यासाठी ज्या अटी शर्ती आहेत त्या शिथिल करण्यात याव्यात.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा महसूल विभागाकडे कोणतीही जागा नाही. परंतु वन विभागाची जागा आहे ती आम्ही स्मशानभुमीसाठी, पाण्याच्या टाकीसाठी, सभागृह बांधण्यासाठी मागतो तरी देखील आम्हाला ती जागा लगेच मिळत नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा आदिवासी विभागाने त्याचा प्रस्ताव तयार केला पाहिजे. परंतु गेल्या अनेक वर्षापासून तो प्रस्ताव केला जात नाही. यासाठी देखील एका वेळेची मर्यादा आपण घालून दिली

श्री. सुनील शेळके....

पाहिजे. आदिवासी भागात किंवा वन विभागात राहणारे माझ्या बांधवांना आपण गेल्या अनेक वर्षापासून मुलभूत सुविधांपासून वंचित ठेवतो. या बांधवांना आणि इथे राहणाऱ्या नागरिकांना खऱ्या अर्थाने या सुविधा मिळाल्या पाहिजे. त्यामुळे आपल्याकडे माझी मागणी आहे की, आपण रस्त्याच्या संदर्भात राज्य शासनाच्या माध्यमातून तात्काळ धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. मुलभूत सुविधांसाठी जागेची उपलब्धता मिळाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, एक लोकप्रतिनिधी या नात्याने काम करीत असताना सर्व समाजाला बरोबर घेऊन जाणे ही आमची जबाबदारी आहे. त्यामुळे वन विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना तसेच माननीय मंत्र्यांना माझी विनंती आहे की, पुढच्या काळात मुलभूत सुविधांसाठी असणाऱ्या अटी शर्ती शिथिल करुन तेथील आदिवासी बांधवांना थोडा दिलासा द्यावा.

अध्यक्ष महोदय, दुसऱ्या एका विषयाचा मी आवर्जून उल्लेख करु इच्छितो की, माझ्या मतदारसंघामध्ये पौड कोळवण, इंदूरी जांभोडे, नवला कुंभरे हे रस्ते वन विभागाच्या क्षेत्रातून जातात. चार वर्षापूर्वी हायब्रीड ॲन्युईटीचा प्रकल्प आला आणि त्या हॅम प्रकल्पातून या रस्त्यांची सुरुवात झाली. पूर्वीचे जे रस्ते होते त्यावर ३.५ किवा ५.५मीटरचे रस्त होते ते काही ठिकाणी ७.५ मीटर करण्याचे ठरविले. ते रस्ते खोदले, खडीकरण केले आणि डांबरीकरणाच्या वेळी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ते काम बंद केले. आमच्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने परवानगी घेतलेली नाही तुम्ही बंद करा, असे सांगितले. याचा सर्वसामान्य कुटुंबांना किंवा तिथे राहणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. दोन वर्षापासून काही कुटुंब अक्षरश: धुळीमध्ये कुपाटयामध्ये आपले घरदार तिथेच असल्यामुळे संपूर्ण संसार त्याच रस्तत्यावर आहे. तेथील डांबरीकरण आणि मजबुतीकरण करण्याचे काम लवकर व्हावे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. सुनील शेळके....

माझ्या भागात जवळपास २०-२२ कि.मी अंतरावर लोक राहतात. हा भाग लवकर दुरुस्त केला जाईल, अशी मी आशा व्यक्त करतो. मी पाण्याच्या संबंधी, पर्यटनाच्या संबंधी या ठिकाणी उल्लेख केला. राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत. मावळच्या जनतेच्या वतीने मी आपले मनापासून आभार व्यक्त करतो. वन विभागाच्या माध्यमातून लोणावळा शहराच्या लगत टायगर- लायन पॉईंट तयार करण्यात आला आहे. येथे अनेक पर्यटक मुंबई - पुणे येथून येतात. त्या पर्यटनाला चालना मिळावी, या करिता स्काय वॉकची निर्मिती करण्याचे अधिवेशनात जाहीर केले आहे. स्काय वॉकमुळे पर्यटनाला चालना मिळेल, स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार मिळेल. मी माझ्या जनतेच्या वतीने मंत्री महोदयांचे आभार व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाबात मी बोलू इच्छितो. मावळ तालुक्यात शासनाची ५ ते ६ धरणे असून पवना, वडिवळे, आंध्रा ही काही महत्वाची धरणे आहेत. वडिवळे धरणावर मागील १२ वर्षापूर्वी उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून ६किमी बंद पाईपलाईन व ६ कि.मी चा कॅनल तयार केला होता. ही लहान कामे होती. काही ठिकाणी दुरुस्तीचे काम होते, कोठे वॉल्व्ह बसवणे, गेट तयार करण्याचे काम होते. १२ वर्षापासून बंद असलेला प्रकल्प माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांनी सुरु केला. हा प्रकल्प सुरु झाल्यानंतर २२०० एकर जमीन ओलिताखाली आली असून शेतकऱ्यांना पाणी मिळाले आहे. अध्यक्ष महोदय, माननीय जलसंपदा मंत्री यांना माझी विनंती आहे. या परिसरात पवने धरणाच्या खाली मौजे डोणे, आडले खुर्द, आडले बुद्रुक, पाचाणे, पुचाणे ही गावे डोंगराने वेढलेली असून या गावांकरिता उपसा सिंचन योजनेचा प्रकल्प राबवला तर ही सर्व गावे पाण्याखाली येतील. वडिवळे येथील प्रकल्प आपण सुरु केला तशाच प्रकारे पवना धरणाच्या खाली उपसा सिंचना योजना राबवली तर जवळपास ४ हजार एकर जमीन बागायती होईल. माननीय मंत्री महोदयांकडे मी मागणी करतो की, माझ्या पवना धरणाच्या खालच्या बाजुच्या गावांना उपसा सिंचन योजने मधून प्रकल्प राबवावा.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाची अनेक धरणे आहेत. माझ्याकडे ही आकडेवारी नाही. जी धरणे आहेत त्यातील काही धरणांवर वीज निर्मिती केली जाते. मागील काही वर्षापूर्वी ज्या धरणांवर वीज तयार केली जाते तेथे काही अपघात झाल्यामुळे बोटींग प्रकल्प बंद केले गेले. माझी मागणी आहे की, स्थानिक भूमिपुत्रांकरिता रोजगाराची निर्मिती करायची असेल तर ज्या धरणांवर वीज निर्मिती केली जाते तेथील काही भाग सोडून इतर भागात बोटींगला परवानगी द्यावी. पर्यटन हा महत्त्वाचा उद्योग आहे. पर्यटनाला चालना देणे महत्त्वाचे आहे. बोटींग सुरु केले तर ४ ते ५ हजार कुटुंबांची उपजीविका सुरु होईल. या संबंधी मी मंत्री महोदयांकडे मी प्रस्ताव दिला होता. या बाबत विचार करावा अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून २५१५, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून माझ्या मतदारसंघात अनेक कि.मी. ची कामे सुरु आहेत. तिसरा टप्पा देखील सुरु होणार आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. येथील सा.बा. विभागाचे किंवा जे कोणी अधिकारी असतील त्यांनी कामाच्या दर्जावर लक्ष दिले पाहिजे. हा जनतेचा निधी असून तो आणण्याकरिता आम्ही प्रयत्न करतो, आपण देखील आम्हाला प्रतिसाद देता. सार्वजनिक कामासाठी हा निधी वापरला जातो तेव्हा त्या कामाचा दर्जा राहिला पाहजे. २० वर्षाकरिता तरी रस्ता टिकला पाहिजे. एक पाऊस पडला की लगेच १-२ वर्षात रस्त्याची दुरुस्ती करावी लागते. दुरुस्ती करताना कंत्राटदार काही तरी कारणे दाखवून आढेवेढे घेतात व निघून जातात. असे होता कामा नये. करोडो रुपयांचा निधी रस्त्याच्या कामाकरिता दिला जातो, तेव्हा त्या कामाचा दर्जा देखील चांगला राहिला पाहिजे. ते टिकले पाहिजेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या संबंधी मी सूचना करु इच्छितो. मी मंत्री महोदयांना विनंती करु इच्छितो. अनेक रेशन दुकानदारांबाबत स्थानिक पातळीवर तक्रारी होतात. जिल्हाधिकारी किंवा अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी येतात. ज्या रेशन दुकानदारांच्या तक्रारी आलेल्या आहेत त्यांचे लायसन्स काढून वाटपाचे काम महिला बचत गटाला दिले तर ते काम सुरळित होईल. सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळेल.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाबाबत मी थोडक्यात बोलणार आहे. माननीय आरोग्य मंत्री श्री. टोपे येथे आहेत. मावळ तालुक्यातील परिस्थिती पाहिली तर मागील २० वर्षात येथे कोणतीच सुविधा नव्हती. कोरोना महामारीने आपल्याला बरेच काही शिकवले. सरकार या काळात सक्षमपणे जनतेच्या मागे उभे राहिले. आपण आरोग्यामध्ये कोठेही कमी पडलो नाही. प्रत्येकाला उपचार मिळाले पाहिजे या करिता माझ्या मतदारसंघात दोन उपजिल्हा रुग्णालय सुरु केले आहे. माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, माननीय आरोग्य मंत्री यांचे मनापासून मी आभार व्यक्त करतो. ज्या वेळेला एक लोकप्रतिनिधी मत मागायला जातो तेव्हा लोकांना वीज, पाणी, आरोग्य सुविधा देऊ असे सांगितले जाते. प्रत्यक्षात माझ्या भागात रुग्णालयांची उभारणी होत आहे या बद्दल जनता समाधान व्यक्त करीत आहे. मला आरोग्य विभागाकडून मदत व निधी देण्याचे काम माननीय आरोग्य मंत्री यांनी व या शासनाने केले आहे. माझ्या मतदारसंघात उप केंद्राकरिता काही प्रस्ताव दिले आहेत ते लवकरात लवकर मंजूर करावेत. लोणावळा व काणे या ठिकाणी डॉक्टर , कर्मचारी यांच्या निवासस्थानाकरिता प्रस्ताव दिलेला आहे, त्याला मान्यता द्यावी एवढी मागणी करतो. माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री महोदयांचे आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

श्रीमती माधुरी मिसाळ ( पर्वती ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२ – २०२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता उभी आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाचा एक चांगला निर्णय घेण्यात आला. सन १९६१ मध्ये पूरग्रस्त सोसायट्या स्थापन झाल्या. जवळजवळ ५० ते ५५ वर्षे आपण त्यांना न्याय देऊ शकलो नाही. माजी मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांचे सरकार होते तेव्हा दि. ८ मार्च, २०१९ रोजी माननीय माजी महसूल मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांनी या सोसायट्यांना त्यांच्या जमिनी मालकी हक्काने देण्याचा प्रस्ताव मान्य केला. तो प्रस्ताव मुदतवाढीकरिता शासनाकडे आलेला आहे. माननीय पालक मंत्री

असुधारित प्रत

श्री. अजित पवार यांनी ३ वर्षाची मुदतवाढ दिली. मी या करिता अभिनंदन करते. याची अंमलबजावणी लवकरात लवकर व्हावी, या करिता मदत करावी. १०३ सोसायट्या झाल्या असून महसूल विभागाचा २७सोसायट्यांचा निर्णय अद्याप शिल्लक आहे. आपल्याद्वारे मी शासनाला विनंती करते की, २७ सोसायट्यांचा निर्णय लवकरात लवकर घ्यावा.

अध्यक्ष महोदय, राज्यात रजिस्टर ऑफिसकडून सर्वात मोठा महसूल गोळा होतो. या कार्यालयाची अवस्था अतिशय वाईट असते. दर अधिवेशनामध्ये मी हा मुद्दा मांडत असते.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्रीमती माधुरी मिसाळ ...

त्या रजिस्ट्रेशन कार्यालयांची अवस्था अतिशय वाईट आहे. तेथून आपला महसूल गोळा होतो. आपण अर्थसंकल्पामध्ये त्या कार्यालयांकरिता काही तरी तरतूद केली पाहिजे. जो नागरिक आपल्याला कर देतो तो त्या कार्यालयामध्ये जात असतो. त्याचे एक कागदपत्र रजिस्टर करण्यासाठी तो स्टॅम्प ड्यूटी भरतो, रजिस्ट्रेशन फी भरतो. त्याला आपण तेथे साधी पाण्याची सुविधा देखील देऊ शकत नाही. साधी बाथरुमची सुविधा देऊ शकत नाही. तेथे अतिशय घाण असते. मला असे वाटते की, शासनाने यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करुन ही कार्यालये प्रथम सुधारली पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, भाजपाचे सरकार असताना गिफ्ट डिड करताना टॅक्स लावायचा नाही, याबाबत एक धोरणात्मक निर्णय झाला होता. त्यामध्ये असा निर्णय झाला होता की, आईने मुलांना दिले तरच आपण गिफ्ट डिडमध्ये स्टॅम्प ड्यूटी माफ करीत होतो. अध्यक्ष महोदय मी आपल्या माध्यमातून विनंती करु इच्छिते की, भावाने बहिणीला दिले, बहिणीने भावाला दिले, रक्ताच्या नात्यामध्ये दिले तर त्या गिफ्ट डिडमध्ये या सर्वांची स्टॅम्प ड्यूटी रद्द व्हावी.

अध्यक्ष महोदय, आम्ही शहरी भागातील आमदार आहोत. आम्हाला शहरी भागामध्ये कुठल्याही प्रकारचा निधी उपलब्ध नसतो. आमच्या भागात जे सोसायटीधारक आहेत, ते आपल्याला कर देतात, फ्लॅट घेताना स्टॅम्प ड्यूटी भरतात. रजिस्ट्रेशन फी भरतात. परंतु, जे आपल्याला जास्त महसूल देतात त्यांच्या सोसायटीच्या भागात आम्हाला खर्च करता येत नाही. तेथे खर्च करण्यास शासन विरोध करते. त्या सोसायटीच्या आवारात कचऱ्याचे प्लँट पुरविणे, त्यांना सोलर प्लँट पुरविणे, त्यांना रेन वॉटर हार्वेस्टिंग पुरविणे अशासाठी एक विशेष धोरण म्हणून शासनाने या गोष्टीला देखील मान्यता द्यावी कारण ते देखील करदाता आहेत. सर्वात जास्त महसूल त्यांच्याकडून गोळा होतो.

अध्यक्ष महोदय, वन विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, माझ्या भागात जवळजवळ ७५० एकरचे फॉरेस्ट आहे. मी त्या फॉरेस्टच्या निधीसाठी वारंवार मागणी करते कारण खूप मोठे फॉरेस्ट आहे, त्याला बांधणे, त्याची

असुधारित प्रत

श्रीमती माधुरी मिसाळ ...

देखभाल करणे हे खूप अवघड काम आहे. परंतु, राज्याचा निधी कधीही मिळत नाही. यावेळेस आम्हाला निधीची तरतूद झाली. अध्यक्ष महोदय, आपल्याला अतिशय आश्चर्य वाटेल की, आम्हाला सांगितले की, ६ कोटींचा निधी तुमच्या वन विभागासाठी वितरित झाला. कोरोनाच्या काळात मी जवळजवळ वर्ष, दीड वर्ष त्याकरिता प्रयत्न करीत होते. निधी वितरित झाला. परंतु, वन मंत्री महोदयांनीच त्यांचा कार्यक्रम तयार केला व त्या निधीतून काय कामे करावयाची हे देखील वन मंत्री महोदयांनी ठरवून त्याचे टेंडर, वर्क ऑर्डर करुन ते मोकळे झाले. आम्हाला त्याबाबत कुठल्याही पध्दतीने सांगण्यात आले नाही. मला असे वाटते की, विकासाच्या कामामध्ये राजकारण न आणता विकासाची कामे करावीत. अध्यक्ष महोदय, यापुढे असे काही घडणार नाही, असे आश्वासन आपल्या माध्यमातून मिळावे, अशी मी अपेक्षा करते.

अध्यक्ष महोदय, आपल्या आरोग्याविषयी बोलताना आपण आता कोविडच्या काळात पाहिले की, आपण सर्व सिस्टिम उभी करताना जी महानगरपालिकेची शहरी गरीब योजना होती, त्या योजनेमध्ये कार्ड दिले तर रुग्णांचे एक लाख रुपये हॉस्पिटलमध्ये भरले जातात. मला असे वाटते की, राज्याने देखील अशी एखादी योजना केली पाहिजे. त्या योजनेंतर्गत राज्याचे कार्ड काढल्यानंतर एक ते दीड लाख रुपयांपर्यंतची मदत आपण रुग्णांना करू शकलो पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री सहायता निधीतून मागच्या ५ वर्षांमध्ये आम्ही खूप रुग्णांना मदत करु शकलो. आपण मुख्यमंत्री सहायता निधीतून पैसे देण्याचे का बंद केले, हे समजत नाही. एखादा माणूस लोअर मिडल क्लास असला तरी, अचानक १०-१२ लाखांचे ऑपरेशन करायचे असेल तर त्याच्याकडे काहीच नसते. तो दारिद्र्यरेषेखाली येत नाही व एवढा खर्च करण्याची त्याची ऐपतच नसते. अशावेळेस मुख्यमंत्री सहाय्यता निधीची खूप मदत होत होती. पुन्हा एकदा ते सुरु करावे. वर्षाला साधारणपणे ६०० ते ते ७०० कोटी रुपये जरी त्यामध्ये टाकले तरी देखील आपण बऱ्याच रुग्णांना ती सेवा देऊ शकतो.

असुधारित प्रत

श्रीमती माधुरी मिसाळ ...

अध्यक्ष महोदय, आता आपण पाहिले तर कॅन्सर व किडनीच्या आजारावरील उपचार अतिशय महाग आहेत. सर्वच वर्गाला त्या आजारावर पैसे खर्च करणे अतिशय अवघड जाते. राज्याने जर अशी काही विमा योजना त्यासाठी आणली व त्यामध्ये औषधांचा देखील समावेश केला तर, मला असे वाटते की, आपण खूप रुग्णांना त्यामध्ये दिलासा देऊ शकू.

अध्यक्ष महोदय, जेव्हा कोरोनाचा कालावधी होता, त्यावेळेस आपण हॉस्पिटल उभारली. त्यावेळेस डायलिसीस, व्हेंटिलेटर, ऑक्सीजन बेड वगैरेसाठी आपल्याला टेक्नीशिअन खूप कमी पडत होते. आपण त्यावेळेस असे म्हणत होतो की, होमिओपॅथीचे डॉक्टर काम करतील. परंतु, लेग वर्क करायला कुठलेही डॉक्टर तयार होत नाहीत. मी या निमित्ताने एक सूचना करु इच्छिते. आपण जसे नर्सिंग कॉलेज काढतो, मेडिकल कॉलेज काढतो, तसे या टेक्नीशिअनसाठीचे एक कॉलेज काढणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या येथे कामगार विभागाची जवळजवळ १५ एकरची जागा आहे. आम्ही तेथे हॉस्पिटलसाठीचा प्रस्ताव दिलेला आहे. त्या जागेवर कोविडच्या वर्षात व त्याच्या मागच्या वर्षात आतापर्यंत १०० बेड्सचे हॉस्पिटल तयार झाले आहे. आपल्याला अजून २५० ते ३०० बेड्सची परवानगी आहे. कोविडच्या काळात ते हॉस्पिटल आपल्याला खूपच उपयोगी पडले. कारण पुणे शहर व पुणे शहराभोवतीचा जो सर्व ग्रामीण भाग आहे, त्या सर्वांचा भार केवळ ससूनवर पडतो. खूप गावांतून, बाजूच्या जिल्ह्यातील लोक ससूनमध्ये येतात. पुण्यासारख्या शहरामध्ये दुसरे कुठलेही जनरल हॉस्पिटल नाही.

अध्यक्ष महोदय, मी आपल्याद्वारे ही मागणी करते की, असे एक जनरल हॉस्पिटल व त्याच बरोबर टेक्नीशिअनसाठीचे कॉलेज याचा प्रस्ताव शासनाने लवकरात लवकर करुन तो मार्गी लावला तर, माझ्या येथे १५ एकर जागेची उपलब्धता आहे.

असुधारित प्रत

श्रीमती माधुरी मिसाळ ...

अध्यक्ष महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे आपण अन्नधान्य सुरक्षेंतर्गत आता धान्य वितरित करतो. मला असे वाटते की, ज्यांचे शिक्के असतात त्या साधारण २० ते २५ टक्के लोकांना आपण त्याद्वारे धान्य देऊ शकतो. आता कोविडच्या काळात केंद्राने जवळजवळ १०० टक्के लोकांना धान्य दिले. परंतु, आपण २०-२५ टक्क्यांच्यावर जाऊ शकत नाही. सन २०११ मध्ये जी जनगणना झाली, त्यामध्ये देखील खूप चुका आहेत. मला असे वाटते की, परत एकदा जनगणनेनुसार आपण जर दुर्बल घटकांची यादी तयार केली तर, आपण जवळजवळ १०० टक्के लोकांना अन्नधान्य पुरवठा करु शकू. सन २०११ च्या यादीमध्ये खूप बोगस नावे आहेत. ती काढली तर, आपण १०० टक्के लोकांना याचा लाभ देऊ शकू.

अध्यक्ष महोदय, ई-पॉसच्या व्यवस्थेमध्ये खूप त्रुट्या आहेत. त्या त्रुट्या असल्याने आज जवळजवळ १५ मार्चपर्यंत देखील आपण अन्न वितरित करु शकलो नाही. कार्डधारकांना व दुकानदारांना देखील या सर्वांचा खूपच त्रास होतो. इरिगेशन विभागाच्या ज्या जागा आहेत आता सन्माननीय सदस्य श्री.सुनील टिंगरे यांनी देखील याबाबत सांगितले की, त्या जागेवर जर आम्हाला रस्ते करावयाचे असतील, सायकल ट्रॅक करावयाचे असतील किंवा ट्रान्सफॉर्मर, डी.पी. बसवायचे असतील, अशी लोकोपयोगी कामे करावयाची असतील तर, त्याकरिता प्रत्येक वेळेस इरिगेशन विभाग खूप अडवते. रस्ते करण्याची परवानगी आल्यानंतर ते काम अडवले जाते. मग त्या कामाचे पैसे वाढतात. कुठल्याही गोष्टीमध्ये त्यांचे सहकार्य मिळत नाही.

अध्यक्ष महोदय, माझ्या येथे कालव्याची खूप मोठी दुर्घटना घडली होती. आज त्या दुर्घटनेला जवळजवळ ४ वर्षे पूर्ण झाली आहेत. दरवेळेस मी मागणी करते. त्या कालव्याची दुरुस्ती करणे गरजेचे आहे. कारण दोन्ही साईडला खूप मोठी लोकवस्ती तेथे आहे. त्या कालव्याच्या दुरुस्तीचा देखील विचार झाला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, पुणे शहरामध्ये बीडीपीचे आरक्षण आहे. त्यामध्ये जवळजवळ ५०० ते ६०० हेक्टरवर बीडीपीचे आरक्षण आहे. आज बीडीपीबाबत निर्णय न झाल्यामुळे जवळजवळ निम्म्या जागांवर झोपडपट्टी झालेली आहे. इरिगेशन

श्रीमती माधुरी मिसाळ ...

विभाग त्या जागेवर झोपडपट्टी रोखू शकत नाही. त्या जागा संरक्षित करण्यासाठी आम्ही तेथे काही लोकोपयोगी कामे सुचविली तर ती करण्यासाठी मात्र विरोध होतो. तेथे दोन्ही साईडला आज झोपडपट्टीचे साम्राज्य उभे राहिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, शेवटची गोष्ट सांगते. ज्यावेळेस अर्थसंकल्प मांडण्यात येतो त्यावेळेस शहरी भागातील आमदार म्हणून आम्ही प्रथम असा विचार करतो की, आमच्या मतदारसंघाला काय मिळणार, पुण्याला काय मिळणार. मी शहरी भागातील सर्व आमदारांच्यावतीने एक खंत व्यक्त करते. आम्हाला सांगितले जाते की, आम्हाला फक्त नाविन्यपूर्णमध्ये थोडेफार पैसे मिळतात व दलित वस्तीमध्ये मिळतात. ते देखील महानगरपालिकेला जातात. आम्हाला सांगितले जाते की, आम्ही महानगरपालिकेला निधी देतो, तो तुम्हाला तेथून वितरित होईल.

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्रीमती माधुरी मिसाळ...

पुणे महानगरपालिकेचे बजेट ६ हजार कोटी रुपये असून त्यामधील २,४०० कोटी रुपये प्रशासन व वेतनावर खर्च होतात, ९०० कोटी रुपये नगरसेवकांच्या सहयादीसाठी देण्यात येतात, उर्वरित १,६०० कोटी रुपयांमधून कोणतीही मोठी विकास कामे होऊ शकत नाहीत. याकरिता आरोग्य, नदी सुधार अशा बाबींसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. महानगरपालिका क्षेत्रातील शहरी आमदार महोदयांना निधीची आवश्यकता नाही, या भावनेतून निधी उपलब्ध करुन देण्यात येत नाही. महानगरपालिकेच्या निधीतून आम्हाला विकास कामे करता येत नाहीत. सदरहू महानगरपालिका क्षेत्रातील नागरीक हे राज्याचेही नागरीक आहेत. त्यांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीकोनातून शहरी आमदार महोदयांनाही बजेटमध्ये सामावून घेण्यात येईल, अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करते.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

---

**तालिका सभाध्यक्ष :** प्रत्येक पक्षाचे पहिले वक्ते बोलले आहेत, त्यांना थांबविण्यात आले नाही. त्यामुळे पुढील वक्त्यांनी वेळेची मर्यादा पाळून आपले भाषण करावे.

असुधारित प्रत

श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभाग – अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या १० लाखापर्यंत पोहोचली आहे. अमरावती शहर महानगरपालिका व तहसिल कार्यालय एकच आहे. लोकसंख्या वाढल्याने या भागातील नागरीकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे सदरहू तहसिल व महानगरपालिका विभाग वेगळे करुन महानगरपालिका क्षेत्रातील लोकांना न्याय द्यावा, अशी मी शासनाला विनंती करते.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभाग – माझ्या विधानसभा मतदारसंघातील अमरावती शहराचा वाढता विकास लक्षात घेऊन ऊर्जा विभाागच्या माध्यमातून काही विकास कामे करणे गरजेचे आहे. शहराच्या वाढत्या विस्तारानुसार वीज वितरण कंपनीचे इन्फ्रास्ट्रक्चर वाढविणे गरजेचे आहे. अमरावती मतदारसंघामधील गाडगे नगर व कडदी बाजार या क्षेत्रातील वीजेचा भार लोकसंख्या वाढीमुळे वाढला आहे. त्यामुळे अमरावती शहराची वीज ६ ते ८ तास खंडित होते. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात. सदरहू ठिकाणी नवीन फिडर देऊन लोकांची गैरसोय दूर करावी. तसेच महाराष्ट्र वीज वितरण कंपनीला टीपीआर प्लॅन पाठविला आहे. तो लवकरात लवकर मंजूर करुन त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. शहरातील अनेक वीजेचे खांब वाकले असल्याने वीजेच्या तारा खाली आल्या आहेत. अमरावती शहरामध्ये अंडरग्राउंड लाईटची कामे सुरु करण्यात आली होती. मागील अडीच वर्षापासून ती थांबलेली आहेत. सदरहू कामे त्वरीत सुरु करावीत. यामुळे मध्यंतरीच्या काळात जे अपघात झाले होते ते पुढील काळात होणार नाहीत, जीवीत हानी होणार नाही. याकरिता ऊर्जा विभागाने आम्ही पाठविलेल्या प्लॅनला मंजुरी देऊन त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी ऊर्जा मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य – अमरावती सामान्य रुग्णालयातील खाटांची संख्या ३७९ एवढी आहे व सदरहू रुग्णालय ९० वर्ष जुने आहे, त्याची इमारत जुनी झाली आहे आहे. सन २०११ मधील जनगणनेनुसार अमरावती जिल्ह्याची

असुधारित प्रत

श्रीमती सुलभा खोडके...

लोकसंख्या २८,२८,४४५ इतकी आहे. त्यावेळी अमरावती रुग्णालयाच्या खाटसंख्येचे श्रेणीवर्धन करण्यासाठी कार्यालयीन पत्र जा.क्र.सार्व/नियोजन/श्रेणीवर्धन/२२२३३-३४/१७, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. तो अद्यापही प्रलंबित आहे. सदरहू रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन खाटांची संख्या ७५० इतकी करण्याच्या व टप्प्याटप्प्याने सर्व विभागांची उभारणी करण्यासाठी रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या प्रस्तावास मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी आरोग्य मंत्री महोदयांना अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, अमरावती जिल्ह्यामध्ये मेळघाट सारखा दुर्गम भाग आहे. या ठिकाणचे रुग्ण अमरावती येथील रुग्णालयामध्ये उपचारासाठी येतात. अनेक गरीब व गरजू लोकांना उपचार घेण्यासाठी केवळ ४०० खाटा असून ८०० रुग्ण ॲडमीट असतात. त्याकरिता आम्ही रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन ७५० खाटांची मागणी केली आहे. उक्त प्रस्तावासही आरोग्य मंत्री यांनी मान्यता द्यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील अमरावती व नाशिक या दोन ठिकाणी विभागीय संवर्ग रुग्णालयांची स्थापना करण्यात आली होती. अमरावती येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु असून तेथे विशेष तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा घेण्यात येत आहे. परंतु त्यांना दोन दोन वर्षे वेतन देण्यात येत नाही. रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यासाठी उक्त तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा घ्यावयाची असेल तर त्यांना वेळेवर वेतन देण्याची आवश्यकता आहे. याकरिता त्यांच्या १ वर्षाच्या वेतनाची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात यावी. जेणेकरुन उक्त रुग्णालयाच्या माध्यमातून लोकांना चांगली सेवा देता येणे शक्य होईल. सदरहू रुग्णालयामध्ये नवीन वैद्यकीय अधिकारी यांनी नियुक्ती देण्यात आली आहे. त्यांना मागील १ वर्षापासून वेतन मिळत नाही. सदरहू ठिकाणच्या वेतनाच्या

अप्रकाशित प्रत

श्रीमती सुलभा खोडके...

सिस्टमकडे लक्ष देण्यात यावे. जेणेकरुन रुग्णांना चांगली सेवा मिळू शकेल, त्यांच्यावर चांगले उपचार होतील, औषधांची व्यवस्था करता येईल. यासाठी सदरहू डॉक्टरांच्या वेतनाकडे लक्ष दिल्यास चांगल्या पद्धतीने रुग्णालय चालू राहू शकेल.

अध्यक्ष महोदय, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय टप्पा २ च्या १०० खाटांच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. कार्डियालॉजी, कार्डियाक सर्जरी, ॲन्कलॉजी, ॲन्को सर्जरी, न्युरॉलॉजी व न्युरो सर्जरीसाठी तीन मजली इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. सदरहू इमारत उभारल्यानंतर कर्मचारी यांची भरती करण्यात आली नाही. केवळ वर्ग ४ ची पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत. डॉक्टर तसेच वर्ग २ व वर्ग ३ ची पदे लवकरात लवकर भरावेत. जेणेकरुन सदरहू रुग्णालय सुरु होईल. त्यामुळे कॅन्सर, न्युरो, कार्डियालॉजी उपचार उपलब्ध करुन दिले तर आमच्या विभागातील गरीब व गरजू रुग्णांना त्याचा फायदा होईल. सदरहू रुग्णालयास काही प्रमाणात उपकरणे मिळाली असून काही हाफकीन स्तरावर प्रलंबित आहेत. उक्त सर्व सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करुन द्याव्यात, अशी माझी आरोग्य मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, या भागातील रुग्णालय कोविड सेंटर म्हणून उपयोगामध्ये आणण्यात येत आहेत. त्याकडे लक्ष देण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, जिल्हा स्त्री रुग्णालय हे १७९ खाटांचे मंजूर करण्यात आले होते. त्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २००९ मध्ये ४०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. सदरहू रुग्णालयाची इमारत लवकरात लवकर तयार होणार आहे.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्रीमती सुलभा खोडके.......

अध्यक्ष महोदय, मी आता अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मागण्यावर बोलणार आहे. कोरोनाच्या काळामध्ये शिवभोजन योजनेच्या माध्यमातून कष्टकरी लोकांना मदत झालेली आहे. मी अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांना विनंती करते की, माझ्या अमरावती मतदारसंघामध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, स्त्री रुग्णालय व श्री संत अच्युत महाराज हर्ट हॉस्पिटल आहे. त्या ठिकाणी बाहेरगावाहून अनेक रुग्ण येत असतात. सदर ठिकाणी त्यांना जेवनाची व्यवस्था नसल्यामुळे मी आपणाकडे शिवभोजन योजनेचा प्रस्ताव पाठविलेला आहे. सदर प्रस्तावाला आपण मान्यता द्यावी. ग्रामीण भागातील, मेळघाटातील अनेक लोक या ठिकाणी येतात त्यांना शिवभोजन योजनेच्या माध्यमातून मदत होईल, यासाठी मी आपणास विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मी आता ग्रामविकास विभागाच्या मागण्यावर बोलणार आहे. दिनांक १६.०९.२०१० पासून जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ज्या ग्रामपंचायतींच्या जन सुविधेच्या कामांना मंजुरी द्यायची असते, त्यासाठी त्या ग्रामपंचायतीचा तसा ठराव असणे आवश्यक आहे. जन सुविधेच्या कामांना मंजुरी देण्यासाठी जिल्हा परिषदेनी काही ग्रामपंचायतींकडून तसा ठराव मागविण्यात आले व तसे ठराव देखील देण्यात आहे. परंतु ग्रामपंचायतींने दिलेले ठराव डावलून जिल्हा परिषदेने आराखड्यामध्ये इतरांना मंजुरी दिलेली आहे. शासन नियमाविरुद्ध हा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे अमरावती जिल्हा परिषदेने केलेल्या सर्व कामांची चौकशी करावी, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये "क" वर्गातील तिर्थक्षेत्र आहे. सन २०१८-१९ आणि सन २०२०-२१ मध्ये जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जवळपास १४ तीर्थक्षेत्रांसाठी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. जिल्हा परिषदेने श्री क्षेत्र असा उल्लेख करुन ५८ प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत. ज्या तीर्थक्षेत्राला "क" वर्गाचा दर्जा दिलेला आहे, त्या तीर्थक्षेत्रासंदर्भात शासने

असुधारित प्रत

श्रीमती सुलभा खोडके.......

नियमावली निश्चित केलेली आहे. ज्या ठिकाणी यात्रा भरते किंवा मोठ्या प्रमाणावर भाविक दर्शनासाठी येतात, अशा ठिकाणाला शासन तीर्थक्षेत्र म्हणून जाहीर करते. परंतु ज्या गावांमध्ये तीर्थक्षेत्र नाही अशा १४ गावांमध्ये जिल्हा परिषदेने निधी वितरीत केलेला आहे. याबाबत मी जिल्हा परिषदेला पत्र देखील दिलेले आहे. परंतु उक्त पत्राच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करावी, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास विभागाच्या लेखाशीर्ष ३०५४ व लेखाशीर्ष २५१५ अंतर्गत केलेल्या कामांमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे. म्हणून ज्या कामांची निवड झालेली आहे, ती कामे प्राधान्यक्रमाने प्रथम झाली पाहिजेत. सदर प्रकरणी मी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद यांना विचारले असता, तेव्हा त्यांनी असे सांगितले की, PCI 1 चे काम पूर्ण न करता PCI 2 व 3 ची कामे हाती घेतलेली आहेत. या कामांमध्ये देखील अनियमितता झालेली आहे. म्हणून सदर कामांची आपण चौकशी करावी, अशी माझी विनंती आहे. जी कामे नियमानुसार होत असतील तर शासनाने त्या कामास सहकार्य करावे. अध्यक्ष महोदय, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिकारक्षेत्रात जिल्हा नियोजन समिती काम करीत असते. त्यामुळे वरील सर्व प्रकरणांची त्यांच्याकडून माहिती घेऊन त्या अनुषंगाने योग्य ती कारवाई करावी, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, जिल्हा परिषद किंवा ग्रामपंचायतींच्या कामांसाठी आमदार, जिल्हा परिषद सदस्य यांना पाचारण करणे आवश्यक आहे. परंतु संबंधितांना नियमाप्रमाणे बोलाविले जात नाही. प्रत्येक जण आपापल्या परीने कार्यक्रम घेत असतो. म्हणून मी आपल्याला विनंती करते की, यानंतर शासनाची जी काही कामे असतील त्या ठिकाणी संबंधित आमदार, जिल्हा परिषद सदस्य, ग्रामपंचायतीचे सरपंच यांना बोलावण्यात यावे. यासाठी जबाबदार असणारे संबंधित

अप्रकाशित प्रत

अधिकारी यांना निर्देश दिले जावेत, अशी मी विनंती करते आणि मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

---------

श्री.रवि राणा (बडनेरा) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभाग, कामगार विभाग, ग्रामविकास विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व महसूल विभागाच्या माध्यमातून मी माझ्या जिल्ह्यासाठी व मतदारसंघासाठी काही मागण्या करणार आहे.

अध्यक्ष महोदय, अमरावती तालुक्याच्या लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. तसेच बडनेरा हे शहर अमरावती तालुक्याला जोडलेले आहे. त्यामुळे अमरावती तालुक्याच्या शासकीय कार्यालयावर प्रचंड लोड येत आहे. त्यामुळे अमरावती तालुक्याचे विभाजन करून बडनेरा हा स्वतंत्र तालुका निर्माण करणे आवश्यक आहे. जेणेकरून बडनेराला लागून असलेली गावे बडनेरा तालुक्याला जोडता येतील. जे लोक २५ ते ३० किलोमीटरवरून अमरावतीला येतात ते बडनेरा स्वतंत्र तालुका झाल्यानंतर त्या ठिकाणी स्वतंत्र तहसील कार्यालय, नायब तहसील कार्यालय उभारण्यात येईल व त्या भागातील लोकांची चांगली सोय होईल.

अध्यक्ष महोदय, अमरावती तहसीलमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होते. लोकांची असुविधा होत आहे. इंग्रजांच्या काळामध्ये बांधलेल्या इमारतीमध्ये अजही अमरावती तहसीलचे काम चालत आहे. त्या कार्यालयामध्ये ठिकाणी बसायला खूर्च्या नाहीत. कार्यालयामध्ये कामासाठी आलेल्या लोकांना उभे राहावे लागत आहे. अमरावती तहसील कार्यालयासाठी आणि उप विभागीय अधिकारी कार्यालयालयासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मेळघाटमधील चिखलदरा तालुका आणि चुर्नी यामध्ये कमीत कमी १०० ते १२५ किलोमीटरचे अंतर आहे. एकाच तालुक्यामध्ये १०० ते १२५ किलोमीटर एवढा अंतर असेल तर गावागावातून तालुक्याच्या ठिकाणी

येण्यासाठी आदिवासी बांधव ाना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. त्यामुळे चिखलदरा तालुक्याचे विभाजन करुन चुर्नी हा एक स्वतंत्र तालुका केला तर त्या भागातील आदिवासी बांधवांची चांगली सोय होईल. चुर्नीमध्ये स्वतंत्र तहसील कार्यालय उभारण्यात यावे. तसेच आवश्यक अधिकारी/कर्मचारी देखील उपलब्ध करुन देण्यात

श्री.रवि राणा.......

यावेत. तसेच या अधिकारी/कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी शासकीय निवासस्थान देखील उपलब्ध करुन देण्यात यावेत. चुर्नी हा नवीन तालुका केल्यानंतर त्या भागातील लोकांना १०० ते १२५ किलोमीटर जाण्याची आवश्यकता पडणार नाही. त्यामुळे त्यांना त्रास होणार नाही. त्यामुळे चुर्नी हा स्वतंत्र तालुका झाला पाहिजे आणि तो करावा अशी मी आपल्या माध्यमातून मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, ४० ते ५० वर्षापूर्वी भातकुली तालुका झाला. परंतु आजतागायत त्या ठिकाणी स्वतंत्र तहसील कार्यालयाची इमारत नाही. तेथील तहसीलचा कारभार भाड्याच्या इमारतीमध्ये चालतो. भातकुली तहसील कार्यालयासाठी जागा उपलब्ध आहे. परंतु कार्यालय बांधकामासाठी निधी नाही. त्यामुळे शासनाने लवकरात लवकर निधी उपलब्ध करून त्या ठिकाणी तहसील कार्यालयाची भव्य इमारत उभी करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, वलगाववरून ३० ते ४० किलोमीटरचा अंतर पार करुन भातकुली येथे यावे लागत आहे. त्यामुळे वलगाव येथे देखील स्वतंत्र तहसील कार्यालय झाले तर लोकांची सोय होईल म्हणून वलगाव हा एक स्वतंत्र तालुका झाला पाहिजे, अशी आपल्या माध्यमातून माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, अमरावती शहराला लागून असलेल्या गावामध्ये गिट्टी खदानाचे काम मोठ्या प्रमाणावर केले जात आहे. त्यामुळे त्या भागातील पाण्याची पातळी खालावत आहे. यामुळे त्या भागातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. मागील अधिवेशनामध्ये महसूल मंत्री महोदयांनी सांगितले होते की, सदर

असुधारित प्रत

भागामध्ये अवैध गिट्टी खदान खोदणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल. परंतु अद्याप कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही.

अध्यक्ष महोदय, चौरसिया स्टोन क्रेशर या नावाच्या गिट्टी माफीयाने राज्य सरकारचा जवळपास १५ ते २० कोटी रुपयांचा महसूल बुडविलेला आहे. सदर प्रकरणी माननीय जिल्हा अधिकारी यांनी कार्यवाही केल्यानंतर सुद्धा महसूल मधील

श्री.रवि राणा........

खालचे अधिकारी त्याला पाठीशी घालून शासनाचा महसूल बुडविण्यास मदत करीत आहेत. तसेच शासनाच्या महसुलाचा दुरूपयोग करण्याचे काम सुरु आहे. ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रॉयल्टी घेऊन स्टॉक ठेवला जात आहे आणि तो स्टॉक मोठ्या प्रमाणात अवैध पद्धतीने विकला जात आहे. महसुली नियमामध्ये जेवढी रॉयल्टी भरती जाते तेवढ्या रॉयल्टीचा माल विकल्यानंतर दुसरी रॉयल्टी आपल्याला इश्यु करावी लागते.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. रवि राणा...

जुन्या रॉयल्टीच्या आधारे स्टॉक जमा करुन अवैध पद्धतीने गिट्टी विकाण्याचे काम सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, मी ग्राम विकास विभाग आणि जलसंपदा विभागासंदर्भात माझे विचार मांडणार आहे. अमरावती जिल्ह्यात निम्न पेढी प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे काम मागील दहा वर्षापासून सुरु आहे. या प्रकल्पाची किंमत सुरुवातीला २०० कोटी रुपये होती. ती आता हजार कोटी रुपये गेली आहे. या प्रकल्पातील पाच ते सहा गावांचे अद्यापपर्यंत पुनर्वसन झालेले नाही. निम्न पेढी प्रकल्पासारखी अनेक प्रकल्प अमरावती जिल्ह्यात आहेत. अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आजही काही प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन सुरु आहे. या आंदोलनाकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो.

**तालिका सभाध्यक्ष :** मी आपणास सांगू इच्छितो की, आपण थोडक्यात मुद्दे मांडावेत. इतरही सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी संधी द्यावयाची आहे.

श्री. रवि राणा : अध्यक्ष महोदय, जेव्हा आम्ही बोलण्यासाठी उभे राहतो तेव्हा आपण सर्वांना संधी देत असता. परंतु काही सन्माननीय सदस्य २०-२० मिनटे बोलत असतात. अशा वेळेस आम्हाला केवळ एकेक मिनिट बोलण्यासाठी दिला जातो. मी अतिशय महत्त्वाचे विषय मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, अमरावती जिल्ह्यात आंदोलन सुरु आहे. प्रकल्प लाभार्थ्यांना सन २०१३ च्या कायद्याप्रमाणे ४ चा गुणक लागू झाला पाहिजे, अशी त्यांची मागणी आहे. अर्थसंकल्पामध्ये ४ चा गूणक २ वर करण्यात आला आहे. यामुळे त्या लाभार्थ्यांवर अन्याय होत आहे. मी विनंती करतो की, पूर्वीप्रमाणेच ४ चा गूणक कायम असला पाहिजे. राज्य सरकारकडे पैशाची कमतरता असेल तर त्या लाभार्थ्यांना जमिनीच्या मोबदल्यात जमीन दिली पाहिजे. अशा प्रकारे मध्यममार्ग काढावा. हे लाभार्थी एक महिन्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन करीत आहेत. त्यांना न्याय देण्याची आवश्यकता आहे. माननीय जलसंपदा मंत्र्यांनी

श्री. रवि राणा...

दोन दिवसांपूर्वी बैठक घेऊन सांगितले की, एक महिन्यात यावर तोडगा काढला जाईल. ज्या ज्या प्रकल्पाचे लाभार्थी आहेत त्यांना सन २०१३ च्या कायद्याप्रमाणे ४ चा गूणक लागू करावा. अन्यथा त्यांना त्यांच्या जमिनीच्या मोबदल्यात जमीन दिली जावी, अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, मी उद्योग, ऊर्जा विभागासंदर्भात आपले लक्ष वेधू इच्छितो. मागील दोन वर्षापूर्वी विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग निर्माण झाले आहेत. माननीय उद्योग मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मागील सरकारने ज्याप्रकारे उद्योगास चालना दिली आहे, त्याप्रकारे उद्योगाला चालना देण्यासाठी अनुदान दिले पाहिजे. विजेसाठी सूट दिली पाहिजे. जेणेकरुन विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे येतील. जे उद्योगधंदे बंद पडत आहेत ते बंद पडणार नाही. मी यानिमित्ताने माननीय ऊर्जा मंत्र्यांना विनंती करणार आहे. कोरोना काळात शेतकऱ्यांना कृषि पंपाचे वीज बिल आले आहे. मंत्री महोदयांनी मोठे मन करुन त्यांचे अर्धे वीज बिल माफ करावे. हे केले तर विदर्भातील जनता मंत्री महोदयांचे आभार मानेन. कोरोना काळात अनेकांकडे रोजगार नव्हता. त्यांना अतिशय कठीण परिस्थितीत दिवस काढावे लागले होते. त्यांचे अर्धे बिल माफ केले तर शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळेल.

अध्यक्ष महोदय, मी ग्राम विकास विभागांसदर्भात माझे थोडक्यात मत मांडणार आहे. गणोरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. येथील इमारतीकरिता निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागासंदर्भात मत मांडू इच्छितो. कोरोना काळात रेशन दुकानदारांनी लाभार्थ्यांना धान्य दिले आहे. यात श्री. ज्ञानेश्वर सुखदेवराव देवरी हे लाभार्थी आहेत. कोरोना काळात ३ रेशन दुकानदार मृत्युमूखी पडले होते. यात श्री. अग्रवाल, श्री. मनोहर बापुराव निखाले, रा. असारा येथील रेशन दुकानदार मृत्युमूखी पडले होते. त्यांना ५० लाख रुपयांची मदत दिली जावी.

असुधारित प्रत

श्री. रवि राणा...

अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक आरोग्य विभागासंदर्भात बोलणार आहे. मी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी कोरोना काळात अतिशय चांगले काम केले आहे. त्यांनी सर्वांना मदत केली आहे. कोरोना काळात मंत्री महोदय चांगले काम करीत होते. असे असताना जिल्ह्यामध्ये कोरोनाच्या नावे मोठमोठे घोटाळे होत होते. त्याबाबत मंत्री महोदयांनी जिल्हानिहाय श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली पाहिजे. राज्यातील अनेक जिल्हा शल्य चिकित्सकांना दोन वर्षाची मुदतवाढ दिली आहे. ते आता सेवानिवृत्त झालेले आहे. परंतु या काळातील घोटाळे बाहेर आल्यानंतर मंत्री महोदयांचे नाव यात बदनाम होऊ नये, म्हणून त्यांनी श्वेतपत्रिका काढावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, अमरावती येथील जिल्हा रुग्णालयातील एका खाटावर चार-चार रुग्ण उपचार घेत असतात. तेथे खाटा वाढविल्या पाहिजेत. कोरोना काळात डॉक्टर्स, नर्स, सफाई कर्मचारी यांनी काम केले आहे. ज्या लोकांनी कोरोना काळातील दोन वर्षे काम केले आहे, त्यांची कोणतीही स्पर्धा परीक्षा किंवा इतर परीक्षा न घेता त्यांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्यात यावे, अशी मी आपणास यानिमित्ताने विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, अमरावती जिल्ह्यात डफरीन हॉस्पिटल, सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, हातकुला येथील तालुका रुग्णालय आहे. येथील रुग्णालयातील जवळपास सर्वच यंत्रसामग्री बंद आहे. तेथे डॉक्टर्स, नर्स उपलब्ध नाहीत. आरोग्य विभागासाठी यावर्षी चांगला निधी मिळाला आहे. यात नवीन इमारती बांधण्यासोबतच जुन्या इमारतीमध्ये अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले पाहिजेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

धन्यवाद !

असुधारित प्रत

श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी सर्वप्रथम महसूल आणि वन विभागाच्या मागण्यांबाबत बोलणार आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील दहिसर, पोईसर, आकुर्ली, बोरीवली, मालाड, मुलुंड, पाचपाखाडी, घोडबंदर येथील वन विभागाच्या जागेवर जवळपास २५ हजार १४४ आदिवासी आणि बिगर आदिवासी कुटुंब राहत आहेत. मागील २५ वर्षापासून याठिकाणी या वस्त्या आहेत. दिनांक ०७/०५/१९९७ रोजी माननीय न्यायालयाने आदेश देऊन सांगितले की, सर्व पात्र झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन एसआरए अंतर्गत करावे. तेथे असणारे ४३ आदिवासी पाडे आणि त्या कुटुंबातील १,७९५ सदस्य यांच्यासाठी वेगळी निवासस्थाने आणि २५ हजार ४४४ लोकांकरिता एसआरए अंतर्गत २६९ चौ.फुटाचे घर सरकारने बांधून देण्याबाबतचे आदेश तेव्हा देण्यात आले होते. त्यावेळेस पात्र झोपडपट्टीधारकांकडून प्रत्येकी ७ हजार रुपये घेण्यात आले होते. दिनांक १७/०७/१९९९ रोजी पात्रताधारकांकरिता चांदिवली येथे भूखंड उपलब्ध करुन दिला गेला व तेथे घरे बांधण्यात आली होती. माझ्या माहितीप्रमाणे तेथे उपलब्ध घरांची संख्या ११,६५८ इतकी होती. मागील २५ वर्षापासून १३ हजार लोकांना घरे उपलब्ध करुन दिली नाहीत. याबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. मागील सरकारच्या काळात एक विधेयक संमत करण्यात आले होते. तेव्हा शासकीय किंवा खाजगी जमिनीवर जे झोपडपट्टीधारक राहतात, त्यांना सन २०११ च्या जनगणनेनुसार वास्तव्याचा अधिकार दिला गेला.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

श्री.सुनिल प्रभू.....

त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे मी मागणी केली होती की संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील लोकांना देखील मानवी हक्काप्रमाणे सन २०११ ची जनगणना लागू करावी. त्याला माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली व बायोमेट्रिक सर्व्हे करण्यात आला. सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे राहणारे सुमारे २५ हजार १४४ आदिवासी व बिगर आदिवासी लोकांपैकी आजमितीस ७ हजार रुपये भरलेल्या ११ हजार ६५८ लोकांना घरे मिळू शकलेली नाहीत. या लोकांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी सरकारने आरे कॉलनीमध्ये ९० एकर क्षेत्र आरक्षित ठेवले होते. तेथे बांधकाम करुन लोकांना घरे दिली जाणार होती.

अध्यक्ष महोदय, यासंदर्भात नंतर आम्ही माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे मागणी केली. त्यावरुन सर्वपक्षीय आजी-माजी आमदार, खासदारांची माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली. त्यावेळी माननीय पालकमंत्री, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली. केवळ आरे कॉलनीच नव्हे तर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाला लागून जी अतिरिक्त जमीन उपलब्ध आहे ती ताब्यात घेऊन घरे बांधण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली. त्याबाबत सरकारने लवकरात लवकर निर्णय घ्यावा. माननीय वन मंत्र्यांनी या विषयावर सकारात्मक उत्तर द्यावे व २५ वर्षांपासून घरांपासून वंचित असलेल्या राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी व पात्र झोपडपट्टीवासियांना लवकरात लवकर न्याय द्यावा. तसे झाल्यास मी सरकारचा आभारी असेन. माननीय वन मंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये या मुद्दयाचा समावेश करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी महसूल विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. ग्रामीण भागात उन्हाळयात दरवर्षी प्रत्येक गावातील दोन-चार घरांना आगी लागण्याच्या घटना घडतात. उन्हाळयात सुमारे ४८ ते ४९ से. पर्यंत तापमान वाढते व त्यामुळे आगी लागण्याच्या दुर्घटना घडतात. माझ्या मतदारसंघात दरवर्षी सुमारे ४० ते ५० घरांना आगी लागतात. अशा घटनांमध्ये गरिबांची घरे पूर्णपणे उध्वस्त होतात. पंचनामा होते, सर्व लोक झालेल्या घटनेबद्दल हळहळ व्यक्त करतात परंतु संबंधित पिडीत व्यक्तीला शासनाकडून आवश्यक ती मदत मिळत नाही. अशा पिडीत व्यक्तीला केवळ १० किलो धान्य व ३ हजार ते ६ हजार रुपयांपर्यंत मदत दिली जाते. माझी विनंती आहे की, यासंदर्भातील शासन निर्णयामध्ये बदल करुन दारिद्रय रेषेखालील व्यक्तीचे घर किंवा गोठा आगीमध्ये जळाला तर किमान १ लाख रुपयांची मदत मिळाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील प्रत्येक गावात एक वार्ड असा तयार झाला आहे की, तेथे वीस-पंचवीस वर्षांपासून चाळीस-पन्नास लोक अतिक्रमण करुन राहत आहेत. मागील सरकारने 'सर्वांसाठी घरे' अंतर्गत सन २०११ पूर्वीच्या अतिक्रमणधारक लोकांना पट्टे देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु प्रत्येक गावातील अशा अतिक्रमणग्रस्त जमिनी वन विभागाच्या ताब्यात आहेत. अगोदर या जमिनी महसूल विभागाच्या होत्या परंतु महसूल विभागाने त्या वन विभागाकडे हस्तांतरित केल्या आहेत. आता या जमिनी ग्रामपंचायत किंवा छोटया शहरांच्या हद्दीमध्ये असून त्यावर लोक राहत आहेत. या लोकांना पट्टे मिळण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे माझी या निमित्ताने शासनास विनंती आहे की, ज्या जमिनी महसूल विभागाने वन विभागाकडे हस्तांतरित केलेल्या आहेत त्या पुन्हा महसूल विभागाकडे घेतल्या पाहिजेत. तसे करुन अतिक्रमण धारकांना पट्टे दिले तर अतिक्रमणधारकांना घरकुल मिळण्याचा मार्ग देखील मोकळा होईल.

असुधारित प्रत

श्री.समीर कुणावार.....

अध्यक्ष महोदय, साप हा वन्य प्राणी आहे. परंतु तरीही माझा वन विभागाला प्रश्न आहे की, साप हा वन्य प्राणी आहे की पाळीव प्राणी आहे ? अनेक वेळा बैलांना साप चावून त्यामध्ये त्यांचा मृत्यू होतो. एकेका बैलाची किंमत दीड-दीड लाख रुपयांपर्यंत असते. अशा बैलांचा साप चावून मृत्यू झाल्यानंतर शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची मदत मिळत नाही. ज्याप्रमाणे वीज पडून बैल मेल्यानंतर शेतकऱ्यांना मदत मिळते त्याप्रमाणे साप वाचून बैल मेल्यानंतर देखील शेतकऱ्यांना देखील मदत मिळावी यासाठी वन विभागामार्फत तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना खरेच मदत करायची असेल तर सरकारने पांधण रस्त्यांसाठी निधी दिला पाहिजे. प्रत्येक गावात चार ते पाच पांधण रस्ते असतात. परंतु त्यांच्यासाठी कुठेही तरतूद केली जात नाही. मागील सरकारच्या काळात देखील आम्ही प्रयत्न केल्यानंतर पालकमंत्री पांधण रस्ते योजनेच्या माध्यमातून काही कामे झाली. माझी या सरकारला देखील विनंती आहे की, पांधण रस्त्यांच्या कामांसाठी भरीव तरतूद केली पाहिजे. किमान मातीकाम, मुरुमीकरण करण्यासाठी निधी दिला पाहिजे. आम्ही ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी आहोत. माझ्या मतदारसंघामध्ये २९० गावे आहेत. प्रत्येक गावामध्ये चार-पाच पांधण रस्ते आहेत. या रस्त्यांची दुरावस्था असल्यामुळे पावसाळयात शेतकरी शेतात जाऊ शकत नाहीत, खते नेऊ शकत नाहीत, बियाणे, मजूर नेऊ शकत नाहीत. त्यामुळे शेती करणे कठीण होते. तरी सरकारने याबाबत विचार करावा, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये आदनसरा बॅरेज आहे. सन २००१ मध्ये स्व.विलासराव देशमुख आणि माजी उपाध्यक्ष श्री.प्रमोदभाऊ शेंडे यांच्या हस्ते या कामाचे भूमिपूजन झाले. त्यावेळी मोठी शिला लावण्यात आली. १० हजार शेतकरी कार्यक्रमासाठी उपस्थित होते. परंतु अद्यापपर्यंत प्रकल्पाची सुरुवात देखील झालेली नाही. या बॅरेजमुळे २७ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकते.

असुधारित प्रत

श्री.समीर कुणावार.....

तसेच १६० गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील सुटू शकतो. त्यामुळे या बॅरेजसाठी तरतूद करुन कामास सुरुवात करावी, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये लोअर वणा प्रकल्प असून या प्रकल्पाखाली सुमारे २८ हजार हेक्टर क्षेत्र ओलित आहे. या प्रकल्पाचे १२८ किलोमीटर लांबीचे डावे आणि उजवे कालवे आहेत. गेल्या २५ वर्षांपासून कालव्यांवर एक रुपया देखील खर्च करण्यात आलेला नाही. हे कालव्यांचे काम जुने व मातीचे आहे. त्यामुळे सुमारे ५० टक्के पाणी वाया जाते. १२८ किलोमीटर लांबीच्या कालव्यातील ५० टक्के पाणी वाया जात असेल तर हे खूप मोठे राष्ट्रीय नुकसान आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, या कालव्यांच्या लाईनिंगसाठी निधी दिला पाहिजे. आम्ही याबाबत वारंवार मागणी करीत आहोत परंतु निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. या कालव्यांचे लाईनिंग झाले तरच पाण्याची बचत होऊन शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहचू शकेल.

अध्यक्ष महोदय, माझ्या हिंगणघाट नगरपालिकेला लोअर वणा प्रकल्पाने सुमारे ८ कोटी रुपये पाणी बिल दिले आहे. या रकमेमध्ये दंड व व्याजाचीच रक्कम खूप जास्त आहे. बिलाचा खरा आकडा तीन ते चार कोटींच्या आसपास आहे परंतु नगरपालिकेला ८ कोटी रुपयांचे बिल पाठविण्यात आले असून ते भरण्यासाठी तगादा लागला आहे. प्रत्यक्षात नगरपालिका हे ८ कोटी रुपयांचे बिल भरु शकत नाही. त्यामुळे सदर बिल कमी झाले पाहिजे, अशीही या निमित्ताने माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये ५ मोठया कापड मिल्स् आहेत. या उद्योगांमध्ये सुमारे १५ हजार कामगार काम करतात. तेथे ई.एस.आय.सी. चे रुग्णालय देखील आहे. परंतु तेथे कधीही डॉक्टर्स, औषधे, नर्स उपलब्ध नसतात. काम करणाऱ्या सुमारे १५ हजार कामगारांच्या वैद्यकीय सुविधेपोटी उद्योगांकडून ई.एस.आय.सी. ला प्रति माह २० लाख रुपये मिळतात. परंतु त्या बदल्यात कुठलीही आरोग्य सुविधा कामगारांना मिळत नाही.

श्री.समीर कुणावार.....

त्यामुळे माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना माझी विनंती आहे की, सदर ई.एस.आय.सी. च्या रुग्णालयामध्ये डॉक्टर्स, औषधे व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत व्यवस्था करावी.

अध्यक्ष महोदय, कंत्राटदारांना देयके अदा न केल्यामुळे ग्रामसडक योजनांची कामे बंद आहेत. ही कामे तातडीने सुरु झाली पाहिजेत. माझ्या वर्धा जिल्हयामध्ये जिल्हा परिषदेच्या मालकीचे सुमारे ३ हजार २०० किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. परंतु जिल्हा परिषदेकडे मात्र एक टोपली मुरुम टाकण्यासाठी देखील पैसे नाहीत. दरवर्षी जिल्हा परिषद फक्त ५० किलोमीटर रस्त्यांची दुरुस्ती करु शकते. या वेगाने रस्त्यांची दुरुस्ती केली तर पुढील ७५ वर्षांमध्ये देखील हे रस्ते दुरुस्त होणार नाहीत. त्यामुळे माझी विनंती आहे की, जिल्हा परिषदेच्या ताब्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ग्रामविकास विभागाने निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. पथदिव्यांचा देखील प्रश्न आहे. ग्रामपंचायती पैसे भरु शकत नसल्यामुळे जिल्हयातील पथदिवे बंद आहेत. शासनाने हे पैसे भरावेत, अशी माझी या निमित्ताने विनंती आहे. तसेच नवीन वस्त्यांमध्ये वाढीव पोलची मागणी आहे. त्यासाठी एमएसईबी कडे पैसे भरुन देखील वीज जोडण्या दिल्या जात नाहीत. त्यांचे म्हणणे आहे की, जोपर्यंत तुम्ही वीज बिल भरत नाहीत तोपर्यंत आम्ही वाढीव पोल देणार नाहीत. त्यामुळे ग्रामविकास विभागाने तातडीने हा प्रश्न सोडवून ग्रामीण भागातील अंधारात असणाऱ्या लोकांना वाढीव पोल उपलब्ध करुन दिले पाहिजेत.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. समीर कुणावार...

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर मी मागे २-३ गोडाऊनची तपासणी केली होती. त्यावेळी तेथील गोडाऊन किपरने मला एकच माहिती सांगितली होती की, बाहेरुन जे गहू आणि तांदळाचे ट्रक येतात त्यातून येणारा माल बदलला जातो. एकाच ट्रकमध्ये ३ प्रकारचा तांदुळ आणि २ प्रकारचा गहू येतो कसा, असा गहू आल्यानंतर लोकांच्या माथी तो मारला जातो. म्हणून याची चौकशी करणे गरजेचे आहे. जो वाहतूकदार असतो तो गहू किंवा धान्य बदलतो म्हणून त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर मी एवढेच सांगेन की, आमच्या पीएचसीमधील रिक्त पदे तातडीने भरावीत, डॉक्टर्सची पदे रिक्त आहेत ती देखील भरली गेली पाहिजेत. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, माझ्या आमदार निधीमधून १ कोटी २० लाख रकमेच्या ७ ॲम्बुलन्स दिल्या. कारण दूरवरच्या पीएचसीकडे ॲम्बुलन्स जात नव्हत्या आणि कोरोना काळात अनेक लोक मृत्यू पावले. म्हणून मी या ७ ॲम्बुलन्स दिल्या. पण त्या ॲम्बुलन्सला ड्रायव्हर नाही. कसे तरी ड्रायव्हर मिळाले तरी त्याला डिझेलचे पैसे मिळत नाहीत. आम्ही याबाबत डीपीसीमध्ये मागणी केली तर जिल्हा परिषदेचे सीईओ सांगतात की, आम्ही वर्षाला फक्त १० ते १५ हजार रुपये एका रुग्णवाहिकेला देऊ शकतो. जर एका पीएचसीमध्ये ५० गावे येत असतील आणि तेथे आकस्मिक काही झाले तर म्हणजे कोणाला साप चावला असेल, अपघात झाला असेल, गरोदर महिला असतील तर त्यांना रुग्णवाहिका देणार नसाल तर त्याचा फायदा काय आहे. कारण शासन म्हणून आपणही हा निधी देत नाही. आमदार निधीमधून आम्ही ज्या रुग्णवाहिका दिल्या आहेत त्यासाठी आपण ड्रायव्हर्स आणि डिझेल खर्चासाठी पैसे दिले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, शेवटची मागणी करतो की, मागच्या २०२० च्या खरीपामध्ये ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले. संपूर्ण वर्धा जिल्ह्याचे नुकसान झाले होते व त्यात ९० टक्के सोयाबिन पीक हातातून गेले होते. ९० टक्के कापूस

असुधारित प्रत

श्री. समीर कुणावार...

पीक हातातून गेले. तेथील जिल्हाधिकारी आणि सीईओ, जि.प. यांनी ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान असल्यामुळे १७८ कोटी रुपयांची मागणी शासनाकडे केली. आजही तो प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. त्यातील ७९ कोटी रुपये सोयाबीनसाठी तर ९८ कोटी रुपये कापसासाठीचे आहेत. यासंबंधी मी सतत पाठपुरावा करीत आहे. वर्धा येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मी ७ दिवस उपोषण केले होते. तसेच याबाबत मी माननीय उपमुख्यमंत्री यांना पत्र व्यवहार केला तसेच मदत व पुनर्वसन मंत्री श्री. विजय वडेट्टीवार यांना देखील मी भेटलो. विभागाच्या सचिवांना सुध्दा मी भेटलो. माझा सारखा पाठपुरावा सुरू आहे. पण तरी देखील फक्त वर्धा जिल्हा वगळलेला आहे. यामध्ये १७८ कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. निकषाप्रमाणे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. त्यामुळे आमच्या वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तातडीने हा नुकसान भरपाईचा निधी मिळाला पाहिजे. कारण यामध्ये जवळपास १ लाखाहून अधिक शेतकरी बाधित झाले आहेत. त्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळाली पाहिजे, एवढी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---------

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब आजबे (आष्टी) : अध्यक्ष महोदय, मी सन २०२२-२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी उभा आहे.

श्री. संजय गायकवाड : अध्यक्ष महोदय, सभागृहाच्या कामकाजाच्या प्रथेप्रमाणे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना आपण दीड दीड तास इतका वेळ दिला आहे. पलिकडचे ५ सन्माननीय सदस्य बोलले त्यानुसार त्यांचे आतापर्यंत ८६ मिनिटे पूर्ण झाली आहेत. इकडच्या सर्व लोकांचे मिळून फक्त ५५ मिनिटे झाली आहेत. दीड दीड तासाच्या हिशेबाने केवळ त्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे ४ मिनिटे शिल्लक आहेत. त्यामुळे आपण उरलेल्या वेळेची संधी आमच्याकडील सन्माननीय सदस्यांना द्यावी, ही विनंती.

श्री. बाळासाहेब आजबे : अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभागावर बोलत असताना मी आपल्याला सांगू इच्छितो की, माझ्या मतदार संघामध्ये वीजेची परिस्थिती अत्यंत भयानक आहे. दिवसा वीज मिळावी म्हणून तेथील शेतकऱ्यांनी आंदोलने केली आहेत. १३२ के.व्ही.चे एक उपकेंद्र कार्यरत असून त्यावर १६ ठिकाणी ३३ के.व्ही.ची उपकेंद्रे कार्यरत आहेत. जामखेड आणि कर्जत तालुक्यातील ४ सबस्टेशन त्यावर जोडले आहेत. त्यामुळे इतक्या मोठ्या प्रमाणात सब स्टेशन जोडलेले असल्यामुळे शेतकऱ्यांना कमी वीज मिळते. गेल्या आठवड्यात सुध्दा माझ्या भागामध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची ओरड होती की, कमी दाबाने वीज पुरवठज्ञ केला जात आहे. म्हणून माझ्या मतदार संघात २२० के.व्ही.चे सबस्टेशन होणे गरजेचे आहे. याबाबत मागील काळात मी ऊर्जा मंत्री महोदयांना पत्र दिले आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे माझ्या मतदार संघात जवळपास १० हजार हेक्टर गायरान जमीन आहे. याबाबत माहिती घेतल्यानंतर जवळपास ९ सब स्टेशनच्या अंतर्गत ५ कि.मी.च्या परिसरात १००-१०० एकर गायरान जमीन उपलब्ध आहे. म्हणून माझी माननीय ऊजा मंत्री आणि महसूल मंत्री यांना विनंती आहे की, आपण जर संयुक्तपणे निर्णय घेतला आणि येथे सौर ऊर्जेचे प्रकल्प उभे केले तर शेतकऱ्यांना जी रात्री वीज द्यावी लागते ती दिवसा देणे शक्य होईल आणि यातील काही जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. परंतु शासनाची जी

श्री. बाळासाहेब आजबे...

जमीन या प्रकल्पासाठी उपलब्ध आहे. अशा ठिकाणी अशा पध्दतीचे ऊर्जा प्रकल्प उभे केले तर लोकांचा वीजेचा प्रश्न सुटेल. जामखेड तालुक्यात एक ऊजा प्रकल्प उभा होत असताना मी पाहिला आहे. २ महिन्यात त्यांनी तो प्रकल्प उभा केला आहे. हा जवळपास १० मेगावॅटचा वीज प्रकल्प आहे. शासनाने ठरविले तर किती तरी खाजगी कंपन्या या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यास तयार आहेत. त्यामुळे शासनाने ही जमीन उपलब्ध करुन दिली तर निश्चितपणे शेतकऱ्यांचा हा प्रश्न मार्गी लागल्याशिवाय राहणार नाही. त्या त्या गावच्या जमिनीच्या बाबतीत तेथील ग्रामपंचायतींनी सुध्दा ना हरकत दिलेली आहे आणि संबंधित ग्रामपंचायतींना त्यामधून काही प्रमाणात उत्पन्नाचा वाटा मिळाला तर ग्रामपंचायती सुध्दा सक्षम होतील आणि कमी भावात ऊर्जा विभागाला या जमिनी भाड्याने मिळतील व शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागेल असे मला सांगायचे आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघामध्ये सावरगांव, दौलतगाव आणि म्हसोबाची वाडी असे ३ सब स्टेशन विंड एनर्जीवर जोडले जाऊ शकतात. मी त्यासंबंधी माननीय ऊर्जामंत्र्यांकडे मागणी केली आहे. पण अजून ते काम मार्गी लागलेले नाही. तसेच माझ्या मतदार संघातील पाटोदा तालुक्यातील घुमरा, पारगांव आणि आष्टी तालुक्यातील दादेगांव आणि पारोडी येथे सब स्टेशनची मागणी आहे. ते मंजुरीसाठी प्रलंबित आहे. ते मार्गी लागले तर तेथील शेतकऱ्यांना मदत होईल.

अध्यक्ष महोदय, वन विभागाच्या बाबतीत बोलताना माझ्या मतदार संघामध्ये ज्या अडचणी आहेत त्या मी आपल्यासमोर मांडणार आहे. माझ्या मतदार संघात मोठ्या प्रमाणात डुकरे, काळवीट आणि हरणांचा प्रादुर्भाव होतो. मागच्या सरकारच्या काळात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत वन विभागाच्या आसपासच्या जमिनींसाठी तारेचे कुंपण करायचे किंवा वन विभागाला सलग तारेचे कुंपण करायचा शासन निर्णय झाला होता. पण प्रत्यक्षात ते झाले नाही. वास्तविक पाहता आजची परिस्थिती पाहिली तर शेतकऱ्यांना पीके घेणे मुश्कील आहे. शेतकरी वन्य प्राण्यांपासून त्रस्त आहेत. आता तर रानटी डुकरांपासून नुसते

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब आजबे...

पिकांनाच नाही तर आता शेतकऱ्यांवर सुध्दा त्यांचे हल्ले होऊ लागले आहेत. या हल्ल्यांमुळे महिन्यात माझ्या मतदार संघातील ३ लोकांना रुग्णालयात दाखल केले. म्हणून याबाबत शासनाने काही तरी निर्णय घेतला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर १९६२ पूर्वीचे काही तलाव माझ्या मतदार संघात झाले आहेत आणि त्यांचे कालवे आज नादुरुस्त झाले आहेत. त्या कालव्यामधून आता शेतीला पाहिजे त्या प्रमाणात मिळत नाही. पाण्याची गळती होते. म्हणून मंत्री महोदयांना मी अशी मागणी करतो की, त्या जुन्या कालव्यांचे अस्तरीकरण होणे गरजेचे आहे. ते अस्तरीकरण झाले तर सिंचन क्षेत्र वाढेल. कारण आमचा दुष्काळी भाग आहे. २-२, ३-३ वर्षे आमच्या भागात दुष्काळ पडतो आणि परिस्थितीत शेतकऱ्यांना पाणी मिळण्यास अडचणी येतात. म्हणून याबाबत आपण लक्ष दिले तर बरे होईल. माझ्या मतदार संघामध्ये निजामकालीन एक प्रकल्प आहे. त्या कालव्याची दुरुस्ती करणे गरजेचे आहे. त्याबाबत माननीय जलसंपदा मंत्र्यांनी लक्ष द्यावे अशी मी त्यांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभागाच्या माध्यमातून कोविडच्या काळात माननीय आरोग्यमंत्र्यांकडून अतिशय चांगले काम झाले असल्याचे संपूर्ण महाराष्ट्रात आपल्याला पहायला मिळाले आहे. आष्टीसारख्या ग्रामीण तालुक्याच्या ठिकाणी ऑक्सीजनचे २ प्लॅन्ट उभे राहिलेत. प्रत्येक पीएचसीच्या ठिकाणी ॲम्बुलन्स पुरविली गेली आहे. आरोग्याची सेवा गेल्या वर्षभरात आपण पाहिले असेल तर अतिशय चांगल्या पध्दतीने त्याकडे लक्ष दिले गेले आहे. माझ्या मतदार संघातील आष्टी या ठिकाणी उप जिल्हा रुग्णालय होणे गरजेचे आहे. तसेच इतर काही पीएचसीच्या मागण्या आहेत. त्या देखील आरोग्य मंत्र्यांनी पूर्ण कराव्यात, अशी मी मागणी करतो आणि आपण बेल वाजविण्याच्या आत माझे बोलणे संपवितो.

--------

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. संग्राम थोपटे (भोर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. महसूल विभाग, वन विभाग, जलसंपदा विभाग, उद्योग, ऊर्जा विभाग, ग्रामविकास विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग अशा विविध विभागांच्या मागण्यांवर चर्चा सुरु आहे. अध्यक्ष महोदय, मला आपल्याकडून संरक्षण पाहिजे....

अध्यक्ष महोदय, मी माझे भाषण सुरु केले आहे. परंतु सभागृहामध्ये काही अशांत टापू आहेत. त्यासाठी आपण त्यांना काही सूचना द्याव्यात. कारण तिथे जाणीवपूर्वक चर्चा होते.

अध्यक्ष महोदय, अनुदानाच्या बाबतीतील चर्चा आम्ही सभागृहात वारंवार सादर करीत असतो. सभागृहातील बरेच सन्माननीय सदस्य हे २ टर्म, ३ टर्म, ५टर्म किंवा कोणी ८ टर्मचे आहेत. अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होते, भाषणे होतात आणि त्याचे प्रोसिडिंगही होते. परंतु या भाषणांमध्ये मांडण्यात आलेल्या मुद्यांची किती प्रमाणात अंमलबजावणी होते, असा प्रश्न आमच्या मनामध्ये आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या बाबतीत मागणी मांडत असताना माननीय महसूल राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. या निमित्ताने माननीय राज्यमंत्र्यांना मला काही प्रश्न विचारायचे आहेत. महसूली विभागाच्या मागण्यांच्या संदर्भात बोलताना मी असे सांगू इच्छितो की, हा विभाग राज्याला मोठया प्रमाणात आर्थिक महसूल जमा करुन देणारा आहे. विशेष करुन या विभागामध्ये असणाऱ्या पदांची बऱ्यापैकी कमतरता आहे. विविध तालुक्यांतील मुख्य तहसिल कार्यालय, प्रांत कार्यालय, तलाठी कार्यालय किंवा सर्कल या ठिकाणी पदांची संख्या कमी असल्यामुळे त्याचा राज्याच्या थेट महसूलावर परिणाम होतो. त्याही व्यतिरिक्त सर्वसामान्य माणसांच्य नित्यनियमाच्या अडचणी किंवा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना वारंवार नाहक हेलपाटयांना सामोरे जावे लागते. यानिमित्ताने माझी अशी मागणी आहे की, तात्काळ ही पदे भरली जावीत. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे महसूल विभागाच्या माध्यमातून आपण जी घरे किंवा जागा अकृषिक, एनए करतो त्या प्रॉपर्टीची कर तेथील रहिवाशी दरवर्षी शासनाला भरत असतात. परंतु अनाधिकृत घरे, बांधकाम

श्री. संग्राम थोपटे.....

ज्या बिगर एनए प्रॉपटी आहेत त्यांचा कोणत्याही प्रकारे एनएचा कर वसूल होत नाही. राज्य शासनाचा एनएचा कर प्रत्येक ग्राहक भरत आहे. परंतु एका बाजुला असे दिसते की, जी प्रॉपर्टी एनए केली जात नाही त्याचा कोणताही प्रकारचा कर शासनाला येताना दिसत नाही. खरी महसूली तूट पाहिली तर आपल्या लक्षात येईल की, एनएचा कर आणि उत्पन्नाच्या बाबतीत ती महत्त्वाची आहे. ग्रामीण भागामध्ये प्रत्येक गावांच्या सजेमध्ये, तलाठी कार्यालये व मंडळ कार्यालये असली पाहिजे, अशी मागणी वारंवार होते. आमच्या तालुक्यातील, मतदारसंघातील तलाठी व मंडल कार्यालये बजेटमध्ये यावीत यासाठी प्रयत्न करीत असतो. परंतु यासाठी असणारी तरतूद खूप कमी आहे. राज्य शासनाचा सर्वात जास्त महसूल जमा करणारा हा विभाग आहे. त्यामुळे या विभागाला तलाठी आणि मंडल अधिकारी कार्यालये चांगली आणि सुस्थितीत व्हावीत, यासाठी तरतूद वाढविणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने मला माननीय महसूल मंत्र्यांना विशेष करुन सांगायचे आहे, कारण आज आमच्याकडे त्यांचे लक्ष नाही असे मला वाटते. महसूल विभागाच्या माध्यमातून मंडळ अधिकारी कार्यालय आणि तलाठी कार्यालय यासाठी जी आर्थिक तरतूद आहे ती अत्यल्प आहे. आम्ही सर्व आमदार तलाठी कार्यालय आणि मंडळ अधिकारी कार्यालय यासाठी वारंवार मागणी करीत आहोत. परंतु त्या कामांचा समावेश होत नाही. आपल्याला विशेष बाब म्हणून यासाठी निधी द्यावा लागेल, अशी माझी आग्रही विनंती आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे महसूलाच्या बाबतीत जी कार्यालये आहेत तेथील प्रशासकीय इमारतीमधील असणाऱ्या सुविधांबाबत वारंवार प्रश्न निर्माण केले जातात. खरे म्हणजे माझ्या मतदारसंघात भोर, वेल्हा, मुळशी या तीन्ही तालुक्यांसाठी प्रशासकीय इमारतींची खरी गरज होती. मागील अधिवेशनामध्ये राज्याचे माननीय महसूल मंत्री, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी तरतूद केली होती, यासाठी मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. राज्यामध्ये महसूल जमा करणारे जे टॉप-१० तालुके आहेत त्यामध्ये मुळशी तालुक्याचा समावेश होतो. त्याकरिता तिथे तहसिल कार्यालयासाठी मागणी केली

अस्वाक्षरित प्रत

श्री. संग्राम थोपटे....

होती. त्यासाठी मागच्या अर्थसंकल्पात १५ कोटी रुपयांची तरतूद झाली होती. त्याबद्दल मी राज्य शासनाचे आणि विशेष करुन महसूल विभागाचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाच्या बाबतीतही बोलले पाहिजे. कारण आज पुणे शहारातील पिण्याच्या पाण्याची तसेच सर्वच बाबतीतील पाण्याची तहान भागविण्याचे काम माझ्या मतदारसंघातील धरणातून होते. पाणशेत, वरसगाव, टेंमघर हे तीन मोठे प्रकल्प माझ्याच मतदासंघात आहेत. त्या व्यतिरिक्त नीरा-देवधर, गुंजवणी,भाटघर हे प्रकल्प देखील माझ्याच मतदारसंघात आहेत. पुणे शहराची कायमस्वरुपी पाण्याची तहान भागविण्याचे काम माझ्या मतदारसंघातील प्रकल्पाच्या माध्यमातून होत आहे. परंतु या प्रकल्पाच्या शेतीच्या पाण्याची व्यवस्था आजपर्यंत पूर्णत्वाकडे जाताना दिसत नाही. या संदर्भात माननीय जलसंपदा मंत्र्यांनावारंवार पत्र, निवेदने दिले आणि बैठका देखील झाल्या आहेत. त्यांनी काही प्रमाणात प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात प्रयत्न केले आहेत. त्यांच्याकडून काही प्रयत्न झाले नाही असे मी म्हणणार नाही. परंतु जेवढ्या सक्षमपणे प्रयत्न व्हायला पाहिजे होते तेवढे प्रयत्न होताना दिसत नाहीत. परिणामी, आज डोंगरी भाग असला तरी देखील तिथे सिंचनाची व्यवस्था चांगल्या प्रकारची झाली तर या ठिकाणच्या शेतकऱ्यांना स्वत:च्या पायावर उभे राहाण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. माननीय मंत्र्यांना माझी विनंती आहे की, गुंजवणी सारखा मोठा प्रकल्प होत असताना जवळपास राज्यातील बंद पाईपलाईनद्वारे शेतीची सिंचन व्यवस्था करणारी ११०० कोटी रुपयांची योजना माझ्या मतदारसंघात मंजूर झाली आहे. या योजनेचे काम करावे आणि त्या व्यतिरिक्त या योजनेच्या वाजेगर, वांगणी, शिवगंगा खोरे अशा ज्या काही पर्यायी लिफ्ट योजना आहेत त्यासाठी देखील मी सातत्याने पाठपुरावा करीत होतो. त्याला राज्य शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे. परंतु अंतिम मान्यता मिळत नाही. त्यामुळे विशेष करुन त्याला मान्यता दिली पाहिजे. २० ते २५ कोटी रुपयांच्या छोट्या छोटया लिफ्ट आहेत. आपण जर याला मान्यता दिली तर वेल्हे किंवा भोर तालुक्यातील सिंचनाचा प्रश्न १०० टक्के सुटणार आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे

असुधारित प्रत

श्री. संग्राम थोपटे....

पुरंदर, गुंजवणी येथील लाभक्षेत्र वेल्हा, भोर आणि पुरंदर.... प्रश्न असा आहे की, आज पुरंदर हा संपूर्ण दुष्काळी तालुका म्हणून घोषित आहे. या तालुक्याला मुख्य पाणी द्यायचे असेल तर गुंजवणी प्रकल्पातीलच पाणी जाऊ शकते. त्यामुळे पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांची, त्यांच्या कुटुंबाची प्रगती व्हावी, असा आमचा मनापासून हेतू आहे. परंतु ती योजना शासनाच्या लालफितीमध्ये अडकलेली आहे. जवळपास ५ ते ५.५ हजार एचपीच्या मोटरद्वारे पुरंदर तालुक्याला उपसा सिंचन करण्यासंदर्भातील योजना मंजूर आहे. अद्यापी, त्या योजनेचे काम सुरु होताना दिसत नाही. त्यामुळे हे काम तातडीने करावे. माननीय जलसंपदा मंत्र्यांचे मी विशेष आभार मानेन. कारण त्यांनी मध्यंतरी बैठक घेऊन गुंजवणी प्रकल्पासंदर्भात वेळोवेळी सूचना व मार्गदर्शन केले. खरे म्हणजे, माननीय मंत्र्यांना माझी विनंती आहे की, हा प्रकल्प ११०० कोटी रुपयांचा प्रकल्प असून आतापर्यंत मागच्या दोन अधिवेशनामध्ये अनुक्रमे १९० आणि १००कोटी रुपये अशा जवळपास २०० कोटी रुपयांची तरतूद झाली. दोन अधिवेशने झाली म्हणजे दोन वर्षामध्ये २९० कोटी रुपये देण्यात आले. त्यामुळे आता ११०० कोटी रुपयांची तरतूद होणयासाठी किती कालावधी लागेल, असा माझ्या मनात प्रश्न आहे. त्यामुळे हा प्रश्न सुटावा अशी सर्वांची मनापासून इच्छा आहे. याकरिता राज्य शासनाने भरीव अशी तरतूद करुन किमान कमी कालावधीमध्ये या प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन राज्य शासनाचे जे पैसे वाचविता येतील ते वाचविण्याचा प्रयत्न करावा. अशी मी आग्रही विनंती करतो.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. संग्राम थोपटे .....

अध्यक्ष महोदय, उद्योग हा महत्त्वाचा विषय आहे. या ठिकाणी मघाशी माननीय मंत्री श्री. सुभाष देसाई होते. आता ते येथे उपस्थित नाहीत. माझ्या मतदारसंघात उतरवली, वडगाव एमआयडीसी संबंधी बैठक घेतली होती. माझे वडील आमदार असताना त्यांच्या काळात सन १९९२ साली प्रकल्पाकरिता या जमिनीचे संपादन करण्याचे शिक्के लावण्यात आले. आज २०२२ साल उजाडले आहे. या करिता जवळपास ३० वर्षे होत आली आहेत. मात्र या भागात एमआयडीसी होत असल्याचे अद्याप दिसत नाही. या संबंधी मी अनेकदा मागणी केली आहे. जे चालू बाजारमुल्य आहे त्या नुसार, शेतकऱ्यांना आज ५ पट दराने शेत जमिनी देण्याबाबत शासन निर्णय आहे. या संबंधी तातडीने बैठक घ्यावी जेणेकरुन या शेतकऱ्यांना चांगला दर मिळेल व तालुक्यातील रोजगाराचा प्रश्न मिटेल.

अध्यक्ष महोदय, भोर शहर औद्योगिक वसाहतीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या करिता एमआयडीसीकडे अनेकदा मागणी केली. त्यांनी सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली. मात्र या कामाला मुहूर्त काही लागत नाही. या करिता विशेष प्रयत्न करावेत.

अध्यक्ष महोदय, ग्राम विकास विभागाबाबत मी बोलू इच्छितो. माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ उपस्थित आहेत. माझा मतदारसंघ आपल्याला माहीत आहे. भोर, मुळशी हा अतिशय दुर्गम व डोंगरी भाग असून येथे लहान ग्रामपंचायती आहेत. बऱ्याचशा ग्रामपंचायतींना १४ व्या वित्त आयोगाचा निधी उपलब्ध होत आहे. एका एका ग्रामपंचायतीमध्ये ४-५ गावांचा समावेश असल्यामुळे ग्रामपंचायतीचा निधी किती गावात वाटायचा या करिता वाद होत आहेत. ही ग्रामपंचायती स्वतंत्र व विभक्त करणे गरजेचे आहे. डोंगरी विभागाकरिता एक हजार लोकसंख्येचा निकष लावलेला आहे. हा निकष सरसकट न ठेवता भौगोलिकदृष्टया लोकसंख्येचा विचार करुन ग्रामपंचायती स्वतंत्र कराव्यात, अशी मागणी आहे.

अस्वच्छ प्रत

श्री. संग्राम थोपटे .....

अध्यक्ष महोदय, पंचायत समिती, ग्राम पंचायत कार्यालय व शासकीय कार्यालयात लाईट असतात. ते सौर ऊर्जेवर असावेत अशी आग्रही मागणी आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री माननीय श्री. टोपे येथे आहेत. त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी कोरोना काळात सक्षमपणे आरोग्य विभागाचे काम केलेले आहे. त्यांना अनेकदा मी पत्रव्यवहार केला असून त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. ग्रामीण रुग्णालयाची दर्जा वाढ करण्याबाबत त्यांना बैठकीचे पत्र दिलेले आहे. तेही सकारात्मक आहेत. माझ्या भागातील उप केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या रिक्त जागेबाबत सातत्याने पाठपुरावा करीत आहे. हे प्रश्न लवकर सुटावेत, अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

असुधारित प्रत

श्री. किशोर जोरगेवार ( चंद्रपूर ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, चंद्रपूर मतदारसंघातील जनतेला स्थायी स्वरुपाचे पट्टे मिळावेत, अशी मी मागणी करू इच्छितो. चंद्रपूर येथे ३९ झोपडपट्टया असून ११ हजार ८८१ लोकांचे कुटुंबे येथे राहतात. ५० हजार लोकांच्या जीवनाशी निगडित हा प्रश्न आहे. शासनाच्या वतीने केवळ १४ झोपडपट्टयांचे सर्व्हेक्षण झाले असून उर्वरित २५ झोपडपट्टयांचे सर्व्हेक्षण करुन सर्वांना कायमस्वरुपी पट्टे मिळावेत, अशी मागणी आपल्या माध्यमातून करीत आहे. येथे सर्व सोयीसुविधा आहेत. शेकडो कोटी रुपयांची विकास कामे केली जातात. मात्र पट्टे नसल्याने अनेकांना प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून घरे मिळत नाहीत. नैसर्गिक आपत्ती येते, कधी पाऊस येतो, कधी पूर येतो, कधी घराला आग लागते. अशा वेळी या झोपडपट्टीधारकांना शासकीय अनुदान मिळत नाही. त्यांचे नुकसान होते. माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे. या भागात जे लोक ५०ते ६०वर्षांपासून घरे बांधून राहत आहेत, त्यांना ताबडतोब कायमस्वरुपी पट्टे द्यावेत.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभागासंबंधी मी बोलू इच्छितो. चंद्रपूर जिल्हा हा सर्वाधिक वीज निर्मिती करणारा जिल्हा आहे. येथे ५ हजार मे.वॅ पेक्षा अधिक वीज निर्माण होते. राज्यातील एकूण गरजेच्या २५ टक्के वीज येथे निर्माण होते. मात्र चंद्रपूरच्या लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. येथे थर्मल एनर्जी तयारहोते. जगातील सर्वात प्रदूषित थर्मल एनर्जी आहे. मात्र ही थर्मल वीज आम्ही निर्माण करतो. या चंद्रपूर जिल्ह्यात ४९ टक्के वने असून दुसरीकडे राज्यातील, भारतातील चौथा क्रमांकाचा प्रदूषित जिल्हा म्हणून त्याची नोंद होते. चंद्रपूर जिल्ह्यातील लोकांची मागणी आहे की, जे वीज निर्मिती करणारे जिल्हे आहेत त्यांना घरगुती वापराकरिता २०० युनिट वीज मोफत मिळाली पाहिजे. आम्ही प्रचंड प्रमाणात वीज निर्माण करतो. येथील स्टील व इतर उद्योगांना जास्त दराने वीज दिली जाते. यामुळे छत्तीसगड,तेलंगणा येथे हे उद्योग जातात. चंद्रपूर जिल्ह्यातील उद्योगांना सवलतीच्या

असुधारित प्रत

श्री. किशोर जोरगेवार...

दराने वीज दिली पाहिजे. ही मागणी पुढील काळात पूर्ण झाली नाही तर वीज निर्मितीचे प्रकल्प जनतेच्या रोषाला बळी पडतील. यामधून जन आंदोलन उभे राहू शकते.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात भाषण पूर्ण करावे.

अध्यक्ष महोदय, येथे माननीय कामगार मंत्री, माननीय जलसंपदा मंत्री आहेत. या सर्वांचे काम कौतुकास्पद आहे. चंद्रपूर हा औद्योगिक जिल्हा आहे. येथे अनेक कामगार आहेत. त्यांचे अनेक प्रश्न आहेत. कोणताही उद्योग सुरु करताना त्या भागातील जमीन, पाणी कमी किमतीमध्ये घेतले जाते व येथे रोजगार देऊ असे सांगितले जाते. उद्योग सुरु करताना सांगितले जाते की, हजार लोकांना रोजगार देऊ मात्र नंतर केवळ १० टक्के लोकांना कंपनी पेरोलवर घेते व उर्वरित सर्व कंत्राटी कामगार घेतले जातात. त्यांची आर्थिक पिळवणूक केली जाते. त्यांच्याकडून १२ तास काम करुन घेतले जाते. तसेच मिनिमम वेजेस देखील त्यांना दिले जात नाहीत. या बाबत मंत्री महोदयांनी नोंद घ्यावी. जिल्ह्यातील सर्व उद्योगांकरिता आपण बैठक घ्यावी. चंद्रपूर जिल्ह्यातील कामगारांचे प्रश्न सोडवण्याकरिता एक ड्राईव्ह घेतला पाहिजे. कामगार कायद्यानुसार जे देय आहे, त्या संबंधी अनेक केसेस कामगार आयुक्तालयाकडे प्रलंबित आहेत. ते विशेष ड्राईव्ह घेऊन पूर्ण करावेत अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, येथे माननीय जलसंपदा मंत्री श्री. जयंत पाटील आहेत. मी त्यांना विनंती करणार आहे. आपल्याला राज्याकरिता वीज पाहिजे. तसेच पाण्याची देखील मोठया प्रमाणात आवश्यकता असते. चंद्रपूरच्या वर्धा नदीवर कोणताही मोठा प्रकल्प झालेला नाही. या नदीतून ७३६ घ.मी. पाणी दुसऱ्या ठिकाणी जाते. या करिता धानोरा, आंबडी, आर्वी या तिन्ही ठिकाणचे बॅरेज करावेत अशी जलसंपदा मंत्री यांना मी विनंती करतो. शेतीला, उद्योगाला व पिण्याच्या पाण्याला या बॅरेजच्या माध्यमातून पाणी मिळू शकेल. ऊर्जा विभागाची एक छोटीशी मागणी आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित

श्री.किशोर जोरगेवार ...

अध्यक्ष महोदय, गडचिरोली येथील सुरजागड येथे अतिशय उत्तम प्रकारचे लोह खनिज मिळालेले आहे. त्या लोह खनिजाचे यिल्ड ६७ टक्के आहे. एवढी सुंदर टक्केवारी असलेले लोह खनिज त्या ठिकाणी मिळालेले आहे. या लोह खनिजावर आधारित उद्योग चंद्रपूर, गडचिरोली व विदर्भातील भागात यावेत, या दृष्टिकोनातून शासनाने धोरण आखणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भ हा मध्यवर्ती भाग आहे. भारताच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात जाण्याकरिता येथे सोईसुविधा आहे. कोणत्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती येथे येत नसल्याने उद्योगांकरिता अतिशय पोषक असा हा भाग आहे. सुरजागडचे जे लोह खनिज आहे त्यावर आधारित उद्योग तेथे येण्याकरिता सरकारने काही विशेष अनुदान, विशेष सूट, विशेष घोषणा करावी, अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वांनी आरोग्य मंत्री महोदयांचा या ठिकाणी उल्लेख केला. मी जर आरोग्य मंत्री महोदयांचा, आरोग्य खात्याचा उल्लेख केला नाही, तर ते न्याय्य होणार नाही. मी आरोग्य मंत्री महोदयांना विनंती करतो की, चंद्रपूर येथे महिलांकरिता १०० खाटांचे रुग्णालय घोषित झालेले आहे. परंतु, त्या ठिकाणी मेडिकल कॉलेज आल्यामुळे ती जागा मेडिकल कॉलेजने ॲक्वायर केलेली आहे. मेडिकल कॉलेजचे बांधकाम जवळजवळ पूर्ण होत आले आहे. मी आरोग्य मंत्री महोदयांना विनंती करतो की, जे १०० खाटांचे रुग्णालय युती शासनाच्या काळात मंजूर झाले होते ते त्या ठिकाणी लवकरात लवकर सुरु करावे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली याकरिता आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

........

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.कुणाल पाटील)**

यानंतर श्री.नितनवरे ....

असुधारित प्रत

श्री अबू आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, आपने मुझे अनुदानों की मांगों पर बोलने के लिए समय दिया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं. समय बहुत कम है इसलिए मैं केवल मुद्दे ही रखना चाहता हूं.

अध्यक्ष महोदय, मैं राजस्व विभाग पर अपने विचार व्यक्त करना चाहता हूं. मुंबई शहर में रेलवे की जगह पर तथा रेलवे के आसपास लाखों की तादाद में स्लम की स्थिति है जिसको लेकर केंद्र सरकार ने उसको उजाड़ने का प्रयास शुरु किया है. सरकार से मेरा निवेदन है कि रेलवे द्वारा बहुत सारी जमीन लिज पर दी जा रही है. राज्य सरकार ने रेलवे विभाग से लिज पर जमीन लेकर, उसी जगह पर जो सैकड़ों सालों से लोग रहते है, उनको बसाने का काम करना चाहिए. अमरावती शहर में जो जमीन खरीदी जाती है, ग्रीन झोन की जमीन खरीदकर लोग मकान बना रहे है और उसका ऑथॉराईज्ड मॅप और ले-आऊट नहीं बनता है. जो जमीन बेची जाती है, उसमें ले-आऊट और एन.ए. नहीं करवाया जाता. इस वजह से इसकी बिक्री नहीं होती है और सरकार को भी रेवेन्यू का बहुत बड़ा घाटा हो रहा है. मनपा को डेव्हलपमेंट चार्जेस नहीं मिलता है. इसके कारण मनपा को भी रेवेन्यू का बहुत बड़ा घाटा होता है. इसके कारण जो प्लॉट खरीदता है उसे मुलभूत सुविधाएं भी नहीं मिलती है और लोगों के पास लिगल डॉक्युमेंट्स भी नहीं रहते है. अमरावती और बडोदरा में ३०० एकड़ जमीन बेची गई है. ये धंधा बड़े जोर-शोर से शुरु है. इसके कारण अमरावती का विकास नहीं हो रहा है. सरकार का करोड़ो रुपये का नुकसान हो रहा है. आम लोगों का नुकसान हो रहा है. इसका फायदा भूमाफिया उठा रहे है. सरकार ने ऐसी घटनाओं पर सख्त से सख्त कार्रवाई करनी चाहिए. भूमाफिया से रेवेन्यू वसूल करना चाहिए. जिन्होंने जमीन खरीदी की है उनको मुलभूत सुविधाएं देनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, मैं ऊर्जा विभाग के बारे में कहना चाहता हूं. मेरे विधानसभा क्षेत्र में टाटा और अदानी, इन दोनों कंपनी का बिजली का कनेक्शन है. अदानी की तरफ से बिजली बिल का जो ब्याज है, उस ब्याज पर ब्याज लगाया जा रहा है. पता नहीं इस आदमी को कितने पैसे की प्यास है. ये क्या चाहता है, पूरा हिंदुस्तान खरीद

असुधारित प्रत

श्री अबू आजमी.........

लेना चाहता है ? गरीब लोगों से ब्याज पर ब्याज लेता जा रहा है. इसके कारण लोगों को बिजली का बिल भरना बहुत मुश्किल हो गया है. मेरी मांग है कि बिजली बिल पर लगाया गया ब्याज तुरंत हटाया जाना चाहिए, क्योंकि कोविड के समय में लोग बहुत परेशान रहे है. लोगों से केवल वास्तविक बिल लिया जाना चाहिए. मेरे विधानसभा क्षेत्र में अदानी कंपनी का बिजली का बिल वसूल करने के लिए उन लोगों ने क्रिमिनल लोगों को, माफिया लोगों को रखा है. उन लोगों को हायर करके, बिना किसी युनिफॉर्म के, डंडा लेकर लोगों के घरों में भेजकर, लोगों को धमकाते है और ये लोग हफ्ता वसूलते है, बिजली की चोरी भी करते है. लोगों को परेशान करते है. मेरी मांग है कि जिन लोगों को वे भेजते है, वे लोग युनिफॉर्म में आने चाहिए, अपना नाम लगाकर आना चाहिए. उनको कॅरेक्टर सर्टीफिकेट मिलना चाहिए. जिनके पास सर्टीफिकेट है, ऐसे लोग वहां पर आने चाहिए. हमने निवेदन किया था कि लॉकडाऊन के समय में जो बिजली बिल है वह कम किया जाए. क्योंकि उस समय सभी कारोबार, रोजगार बंद थे. लोगों के पास पैसे नहीं थे. उस पर कोई कार्रवाई नहीं हुई है. मेरी मांग है कि कम से कम लॉकडाऊन के समय का, नागरिकों का बिजली का बिल कम से कम ५० प्रतिशत कम किया जाए. दूसरे राज्यों में बिजली का बिल कम हुआ है.

अध्यक्ष महोदय, मैं राशन के बारे में अपनी बात कहना चाहता हूं. मैं आदरणीय श्री छगन भुजबल साहब का ध्यान इस ओर दिलाना चाहता हूं. सरकार की तरफ से कहा जाता है कि ऑनलाईन राशन प्रणाली शुरु की गई है. ऑनलाईन के लिए ऑफिस की मशीन हमेशा खराब रहती है. ऑनलाईन नाम रजिस्ट्रेशन करने के बाद भी राशन कार्ड चार महीने के बाद आता है. राशन कार्ड मिलने के लिए जो समय है वह कम किया जाना चाहिए. इसके लिए समय निर्धारित किया जाना चाहिए. निर्धारित समय में राशन कार्ड मिलना चाहिए. कई लोगों के राशन कार्ड अब तक आधार कार्ड से लिंक नहीं हुए है. ऐसे लोगों को राशन नहीं मिल रहा है. इस बारे में भी कुछ कार्रवाई

श्री अबू आजमी.........

की जानी चाहिए. राशन लेने के लिए गरीब लोग आते है. उनके साथ यदि कुछ रहम नहीं किया गया तो मैं समझुंगा कि सरकार रहम दिल नहीं है और आप तो रहम दिल आदमी है, आप जल्द ही कुछ करेंगे.

अध्यक्ष महोदय, राशन की दुकानों पर बड़े पैमाने पर राशन का कालाबाजार होता है. मेरे विधानसभा क्षेत्र में एक राशन कार्ड पर दो लोगों के नाम है, तो केवल एक ही आदमी के लिए राशन दिया जाता है और चार लोगों के नाम होंगे, तो केवल दो लोगों को ही राशन दिया जाता है. इसकी बहुत शिकायत मिल रही है, कालाबाजारी हो रही है. इसके लिए किसी अच्छे अधिकारी को चेक करने के लिए भेजा जाना चाहिए. मेरा मानखुर्द-शिवाजीनगर क्षेत्र बहुत बड़ा है. वहां पर दूसरा भी विधानसभा क्षेत्र आता है. कुर्ला और चांदिवली में राशन का केवल एक ही कार्यालय है. मेरी मांग है कि चांदिवली में भी राशन का एक कार्यालय शुरु किया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मैं हेल्थ के बारे यह कहना चाहता हूं. जे.जे. अस्पताल में परेशानी का बहुत सामना करना पड़ता है. मैं माननीय आरोग्य मंत्री जी से कहना चाहता हूं कि वहां पर दवाएं नहीं मिल रही है. ४० दवाइयों में से केवल १० दवाइयां मिलती है और बाकी की दवाएं बाहर से मंगवानी पड़ती है. लोग कोविड के कारण परेशान है. लोगों के पास पैसे नहीं है. लोगों को दवा के लिए कई घंटे तक कतार में खड़ा रहना पड़ता है. लोगों का इलाज फ्री में करना मुश्किल हो गया है. एक रिपोर्ट मिली है. उस रिपोर्ट के अनुसार अस्पताल की दवाएं खरीदने का काम डॉक्टरों और मॅनेजमेंट के बजाय आऊटसोर्स किया जा रहा है. जे.जे.अस्पताल की दवा की खरीददारी डायरेक्टोरेट ऑफ मेडिकल ॲण्ड रिसर्च (DMER) के लोग करते है. एक हॉकिंग एजेन्सी है. उसको नियुक्त किया गया है. सरकारी अस्पतालों के लिए, मेडिकल कॉलेजेस के लिए, प्राईमरी हेल्थ के लिए ये लोग दवाइयां खरीदते है. मेरा कहना है कि इसको आसान करना चाहिए, दवाइयां मिलना शुरु होना चाहिए. फंड की कोई कमी नहीं है. केवल प्रोसेस सही होना चाहिए.

असुधारित प्रत

श्री अबू आजमी.......

अध्यक्ष महोदय, सबसे जरुरी काम यह है कि कोविड-१९ के बाद लोगों का मेंटल हेल्थ का बहुत बड़ा प्रॉब्लम खड़ा हो गया है. सुसाईड की थॉट्स बढ़ती जा रही है. मेंटल हेल्थ के बारे में सही इलाज नहीं हो रहा है. टाटा इन्स्टिट्यूट ने एक रिसर्च किया. मानखुर्द-शिवाजीनगर में मेडिकल और हेल्थ के बारे में सर्व्हे हुआ. वहां ज्यादातर माईग्रंट लेबर, अन-ऑर्गनाईज्ड लेबर, सेक्टर के लेबर्स को स्मॉल स्केल लेबर, गोवंडी और शिवाजीनगर इलाके में बहुत छोटे छोटे कमरों में रहने वाले लोगों का पेंडामिक में बहुत नुकसान हुआ है. उनकी सेहत पर बहुत असर पड़ रहा है. उस इलाके में ऐसे डॉक्टर्स नहीं है कि उनका इलाज करा सके. इसके लिए उचित बंदोबस्त किया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, माननीय आरोग्य मंत्री जी का मैं बहुत शुक्रिया अदा करना चाहता हूं. मानखुर्द-शिवाजीनगर में जो नया अस्पताल खुला है, वहां पर आप जल्द से जल्द सारी सुविधाएं उपलब्ध करके देंगे, तो मुझे उम्मीद है कि वहां पर जल्द से जल्द काम हो जाएगा.

अध्यक्ष महोदय, ऑर्गनाईज्ड सेक्टर में लेबर्स के लिए श्रमिक कार्ड जारी किए गए है. इनकी मदद की योजनाएं भी है, लेकिन मर्यादित है. जो रजिस्टर्ड लेबर्स है उनको सरकार की तरफ से श्रमिक कार्ड दिया जाता है. ऐसे लोगों को एक साल में ५-१० हजार रुपये की मदद की जाती है. योजनाएं मर्यादित है. एक प्रतिशत फंड कन्स्ट्रक्शन्स से लिया जाता है. मेरी जानकारी के अनुसार ७० हजार करोड़ रुपये आते है. एक साल में पांच हजार करोड़ रुपये भी मजदूरों को नहीं दिए जा रहे है. जो प्लंबर्स है, मजदूर है, लेबर्स है, इनकी हालत आज बहुत खराब है. इस ओर अच्छी तरह से ध्यान दिया जाना चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

--------

........यानंतर श्री शिंदे.

श्री कैलास गोरंटयाल (जालना) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ के अर्थसंकल्प में की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मैं उद्योग, ऊर्जा और सार्वजनिक आरोग्य विभाग पर बोलना चाहता हूं.

"देखी नहीं गई मुझसे अंधेरों की सरकशी,

आफताब बनकर मुझे फिर निकलना पड़ा था."

अध्यक्ष महोदय, मराठवाड़ा और विदर्भ के बैकलॉग के बारे में उस समय की सरकार ने केलकर समिति बिठायी. केलकर समिति का रिपोर्ट यह आया कि मराठवाड़ा और विदर्भ का बैकलॉग यदि भरना है ...(व्यवधान)... इनको बैकलॉग से निकालना है, तो वहां की एमआईडीसी, वहां की इंडस्ट्रीज को बिजली की सब्सिडी दी जानी चाहिए. सन २०१६ में भारतीय जनता पार्टी के सम्माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस जी थे. उन्होंने सब्सिडी दी. यह सब्सिडी सन २०१९ तक चली. सन २०१९ से २०२४ तक उन्होंने फिर से सब्सिडी को एक्सटेंशन दिया. सन २०१६ से २०१९ तक सब्सिडी दी गई है. उसके बाद उस समय की सरकार ने सन २०२४ तक सब्सिडी को एक्सटेंशन दिया. इसका फायदा यह हुआ कि मराठवाड़ा में जो उद्योग है उसको जिंदा रखने का काम उस समय की सरकार ने किया. मुझे यह कहते हुए अत्यंत दुख होता है कि अपनी सरकार आने के बाद ये सब्सिडी जो १२०० करोड़ रुपये थी, उसको आज तक केवल ६०० करोड़ रुपये दिए गए और ६०० करोड़ रुपये नहीं दिए गए. मैं जिस मतदार क्षेत्र से चुनकर आता हूं, वह जालना शहर है. सिड्स के बारे में हम लोग विदेशों तक गए है. स्टील इंडस्ट्री के बारे में पूरे भारतवर्ष में हमारी पहचान है. आज स्टील इंडस्ट्री में तकरीबन २५ हजार लेबर्स है और यदि उनका परिवार को भी पकड़ा जाए तो सवा लाख से ज्यादा लोग होते है. आज ये इंडस्ट्री जालना शहर में, जालना जिले में या महाराष्ट्र में रहने के लिए तैयार नहीं है. एक तरफ हम कहते है कि हमारा राज्य एक ट्रिलियन डॉलर का बनने जा रहा है, तो एक तरफ हम देखते है कि इंडस्ट्री को कोई सहुलियत नहीं दी जा रही है जिसके कारण ये इंडस्ट्री बाहर जाने की तैयारी में है.

अमुद्रित प्रत

श्री कैलास गोरंटयाल....

अध्यक्ष महोदय, मैं एमईसीबी के बारे में यह कहना चाहता हूं कि जो लाईन लॉस होता है, जो १९ प्रतिशत लाईन लॉस होता है, जो आपको रात में मुफ्त में बिजली छोड़ना पड़ता है, यु.पी., एम.पी. या जो भी छोटे राज्य है, उनको तीन रुपये यूनिट के हिसाब से आप लेते है. वे सब लाईन लॉस हम यूज करते है. १९ प्रतिशत लाईन लॉस होता है और केवल एक प्रतिशत लाईन लॉस पर लाया है. मेरी माननीय मुख्यमंत्री और माननीय उपमुख्यमंत्री महोदय से विनती है कि जालना जिला ही नहीं, मराठवाड़ा और विदर्भ की जो सब्सिडी आपने दी है, उसको कन्टीन्यू किया जाना चाहिए. आने वाले दिनों में इस कन्टीन्यू के कारण हमारी इंडस्ट्री बढ़ेगी. आज जालना जिले में २ हजार करोड़ रुपये की इंडस्ट्री लगेगी. यदि सब्सिडी नहीं मिली, तो ये इंडस्ट्री यहां से निकलकर तेलंगाना या छत्तीसगढ़ में जाएगी.

अध्यक्ष महोदय, यह दुर्भाग्य की बात है कि महाराष्ट्र में हम एक ट्रिलियन डॉलर का ख्वाब देखते है और जालना जिला, मराठवाड़ा या विदर्भ को न्याय देने का काम नहीं करते है.

अध्यक्ष महोदय, मैं सम्माननीय मंत्री श्री राजेश टोपे जी को धन्यवाद देना चाहता हूं. उन्होंने ट्रॉमा केअर सेंटर और पागलखाने का एक दवाखाना दिया.

"इस बिगड़े हुए दिमागों में है खुशियों के छल्ले,
हमें पागल ही रहने दो, हम पागल ही अच्छे है. "

अध्यक्ष महोदय, हमारी धारणा मेडिकल कॉलेज की थी. जालना जिले को मेडिकल कॉलेज मिलना चाहिए. मराठवाड़ा में हिंगोली और जालना को छोड़कर सभी को मेडिकल कॉलेज मिला है. प्रस्ताव हमारा है, लेकिन हमारा प्रस्ताव रहने के बाद भी मेडिकल कॉलेज परभणी को दिया गया. मेरा विरोध परभणी को देने का नहीं है. लेकिन जब हमारा मौका आता है तो परभणी वाले लेकर जाते है, उस्मानाबाद वाले लेकर जाते है. मैं सम्माननीय मंत्री श्री राजेश टोपे जी के लिए एक शेर बोलने वाला था. वे अभी यहाँ पर नहीं है. आप सभी के कहने पर मैं एक शेर बोल देता हूं.

असुधारित प्रत

श्री कैलास गोरंटयाल....

"ना खुदा हम डुबे तो कोई बात नहीं थी,

हम तो डुब गए सनम तुमको खुदा मानकर.

अध्यक्ष महोदय, आपने मुझे बोलने के लिए समय दिया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं. जय हिंद, जय महाराष्ट्र.

---------

....यानंतर श्री शिंदे

असुधारित प्रत

ॲड.आकाश फुंडकर (खामगाव) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल व वन विभाग – बुडलाणा जिल्ह्यात अतिवृष्टी किंवा दुष्काळाची मदत देण्यात येते त्यावेळी उक्त मदत महाविकास आघाडी सरकारमधील सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघामध्ये देण्यात येत आहे, असा अनुभव आला आहे. ही भावना बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मनात निर्माण होत आहे. हे सरकार विरोधी पक्षाच्या मतदारसंघामध्ये अतिवृष्टी, दुष्काळ, प्रधान मंत्री किसान योजनेची मदत देणार नसेल तर आम्हाला त्यांनी तसे सांगितले पाहिजे. सदरहू मदत निधी बुलडाणा जिल्ह्यास कधी देणार, हे मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात स्पष्ट करावे.

अध्यक्ष महोदय, रेतीच्या विषयावर अनेक सन्माननीय सदस्य बोलले असल्याने मी त्यावर अधिक बोलणार नाही. माझ्या मतदारसंघातील बोनगाव येथे अवैध रेती खनन केल्यामुळे झालेल्या खड्ड्यात पडून एका मुलाचा मृत्यू झाला आहे. शासनाने त्याच्या कुटुंबियांना तत्काळ मदत द्यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग – खामगाव एमआयडीसी क्षेत्रवाढीची कार्यवाही अतिशय संथ असून त्याबाबत तत्काळ कार्यवाही करुन त्यास गती देण्यात यावी. आमच्या जिल्ह्यात उक्त एकमेव एमआयडीसी असून तिच्या क्षेत्रामध्ये वाढ केल्याने युवकांना रोजगार मिळेल.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभागाच्या माध्यमातून खामगाव ग्रामीण उप विभाग केंद्राचे दोन विभाग करण्यात यावेत, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग –ज्या जिल्ह्यातील माथाडी कामगार संस्था असेल ती त्याच जिल्ह्यात काम करील, असा नियम आहे. परंतु बुलडाणा जिल्ह्यातील सर्व शासकीय अन्न धान्य गोडाऊनवर नाशिक जिल्ह्यातील माथाडी संस्था काम करीत असल्याने आमच्या जिल्ह्यातील माथाडी संस्थांवर अन्याय होत आहे.

ॲड.आकाश फुंडकर...

अध्यक्ष महोदय, अकोला, बुलडाणा व वाशिम या तीन जिल्ह्यांमध्ये अवैध बायो-डिझेलची विक्री करण्यात येत आहे. हे डीएस-१ वर्गातील आखातामध्ये वाया जाणारे डिझेल सारखे ऑईल आहे. ते गुजरात, कर्नाटक, बेंगलोर येथील बंदराच्या माध्यमातून अवैध मार्गाने आपल्या राज्यात विक्रीसाठी आणले जाते. आपल्या राज्यात सदरहू ऑईल विक्री करण्याची परवानगी नाही. आपल्या राज्यात इंडियन ऑईल, भारत पेट्रोलिअम यांनाच केवळ ५ टक्के बायो-डिझेलला ब्लेंड करुन विक्री करण्याची परवानगी आहे. खुल्या बाजारात कोणीही बायो-डिझेल किंवा इंडस्ट्रीयल ऑईलची विक्री करु शकत नाही. परंतु आमच्या तीन जिल्ह्यातील गरीब शेतकरी यांना ३-३ लाख रुपयांची फ्रँन्चायझी देऊन अवैध बायो-डिझेल विक्री करण्यास भाग पाडण्यात येत आहे. त्यामुळे वाहने खराब होत आहेत.

अध्यक्ष महोदय, कोरोनाच्या दुसऱ्या लाटेच्या काळात इंडियन ऑईल, भारत पेट्रोलिअम यांचेशी संपर्क साधून १०० कि.मी. अंतरावरील पेट्रोल पंपांचा आम्ही सर्व्हे केला आहे. त्यावेळी लक्षात आले की, आपल्या राज्याचा ४ महिन्यात ६०० कोटी रुपये महसूल लॉस झाला आहे. तो आता किती झाला याची माहिती नाही. परंतु सरकारने त्याची माहिती मागितली तर ती मिळू शकेल.

अध्यक्ष महोदय, इंडियन ऑईलच्या ऑथराईज्ड लॅबकडून आम्ही अवैध विक्री करण्यात येत असलेल्या बायो-डिझलची तपासणी केली असून त्याचा अहवाल तहसिल कार्यालयास दिला आहे. त्या अहवालामध्ये नमूद केले आहे की, ते ऑईल डिझेल किंवा बायो-डिझेल नाही, ते फ्ल्यूरेस ऑईल आहे. अशा प्रकारचे ज्वलनशील ऑईल विक्री करण्यात येत आहे. बुलडाणा जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अनेक वेळा निर्माण होतो, हा भाग संवेदनशील आहे. या जिल्ह्यात खुल्या बाजारामध्ये सदरहू ऑईल विक्री करण्यात येत आहे. यामुळे शासनाचा महसूल बुडत आहे. तसेच सदरहू ऑईल फ्ल्यूरेस ऑईल असल्याचे सिद्ध झाले आहे. त्याचे अहवाल आमच्याकडे असून मी ते आपणासही दाखवू शकतो. सदरहू ऑईल

ॲड.आकाश फुंडकर...

विक्री करणारे लोक पत्रकारांवर हल्ले करीत आहेत. त्यांनी आम्हालाही धमक्या देण्यास सुरुवात केली आहे. जिल्हाधिकारी, पुरवठा विभाग, अतिरिक्त पोलीस अधीक्षक, यांना सदरहू ऑईल विक्री करणाऱ्या ठिकाणांची माहिती देण्यात आली आहे. तरी देखील ते कारवाई करीत नाहीत. या प्रकरणी एक बैठक घेऊन या प्रकरणातील संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व शासनाचा महसूल वाचवावा.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

-----------------

असुधारित प्रत

श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : अध्यक्ष महोदय, अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, वन विभाग – माझ्या मतदासंघामध्ये ६० टक्क्यांपेक्षा अधिक वन विभाग आहे. तेथे मागील ३० वर्षापासून कोणत्याही सुविधा देण्यात येत नाही. सभागृहामध्ये वन मंत्री महोदय आता उपस्थित नाहीत.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.प्रकाश सुर्वे........

माझ्या मतदारसंघातील दामोपाडा, भिमनगर, जाणूपाडा, वैभवनगर, केतकीपाडा व धारकाडी या विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर झोपडपट्टी आहे. तेथील लोकांचे पुनर्वसन करण्यात यावे, यासाठी मी मागील सात वर्षापासून मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मी मागील एका अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित केल्यानंतर माननीय श्री.एकनाथ शिंदे व माननीय डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी एक बैठक घेतली होती. उक्त बैठकीमध्ये सांगितले होते की, वन विभागाच्या बाजूला जमीन उपलब्ध असेल तर त्या ठिकाणी त्या लोकांचे पुनर्वसन करण्यात येईल. परंतु अद्याप त्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. मी मंत्री महोदयांना जमिनी देखील सूचविलेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री यांनी देखील बैठक घेतली होती. दामोपाडा व भिमनगरच्या बाजूला महानगरपालिकेची गोरक्षधाम ही २७ एकर ३२ गुंठे इतकी जमीन आहे. या जमिनीवर या सर्व लोकांचे पुनर्वसन केले तर वन विभागाची एक इंच देखील जमीन घ्यायची गरज नाही. याबाबत निर्णय घेतला तर तेथील लोकांचे पुनर्वसन होऊन त्यांना चांगली घरे मिळतील.

अध्यक्ष महोदय, आता त्या ठिकाणी वीज, पाणी, रस्ते आणि शौचालय यापैकी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी म्हटले होते की, घोडा बांधण्यासाठी ३०० चौरसफुटांची जागा द्यावी लागते आणि असा शासन निर्णय देखील आहे. त्या ठिकाणी तर माणसे राहतात. तेथील लोकांनी वीज घेतली तर त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातात. चोरुन वीज घेतली तर त्यांना कोणीही काही म्हणत नाही. कोरोना काळामध्ये अनेकांचे वीज कनेक्शन कापण्यात आले होते. कारण कोरोना काळामध्ये अनेकजण बाहेर गावी गेले होते. त्यामुळे त्यांना वीज देयके अदा करता आली नाही. परंतु तेथील लोक आता वीज देयके अदा करण्यास तयार आहेत. परंतु तेथील अधिकारी श्री.कपिल शर्मा हे त्या लोकांचा फोन देखील उचलत नाहीत. त्यामुळे ऊर्जा मंत्री महोदयांनी याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. येथे फक्त घोषणा देऊन चालणार नाही. ग्रामीण भागातील लोकांची विजेचे कनेक्शन कापले जात आहेत.

असुधारित

श्री.प्रकाश सुर्वे........

वीज नसेल तर तेथील लोकांनी कसे राहावे, तेथील मुलांनी अभ्यास कसा करावा? अंधारामध्ये कोणत्याही वेळी बिबट्या वस्तीमध्ये येतो. आतापर्यंत अनेक लोकांवर प्राणघातक हल्ला देखील केलेला आहे. त्यामुळे दामोपाड व भिमनगर येथेच तेथील लोकांचे पुनर्वसन करण्यात यावे, अशी मी विनंती करतो. केतकीपाडा आणि धारकाडी येथे आरटीओची २५ एकर जागा खाली झालेली आहे. या जागेवर अन्य काही करण्यापेक्षा तेथील लोकांचे त्या जागेवर पुनर्वसन करणे आवश्यक आहे. आम्हाला वन विभागाची एक इंच देखील जागा नको आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये वैभवनगर जाणूपाडा आहे. तेथे एसडी स्पेशल झोन म्हणून घोषित केले आहे. वन विभागाविरुद्ध बिडकोची केस चालू आहे. सदर जागा खाजगी असून देखील तेथे आपण पुनर्वसन करु शकत नाही. त्यामुळे याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी मी विनंती करतो आणि वेळेअभावी मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.राजेश पाटील (बोईसर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यावर चर्चा करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, बहुजन विकास आघाडीचे फक्त तीन आमदार आहेत. त्यामुळे आपण आम्हास अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेसाठी अधिक वेळ द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मी प्रथम आरोग्य विभागाच्या मागण्यावर बोलणार आहे. आता माननीय आरोग्य मंत्री महोदय उपस्थित आहेत. त्यांनी कोरोना काळामध्ये अतिशय चांगले काम केलेले आहे, त्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो.

अध्यक्ष महोदय, माझा पालघर हा अतिवासी बहुल जिल्हा आहे. त्या जिल्ह्यामध्ये बोईसर हा माझा मतदारसंघ आहे. या जिल्ह्यामध्ये ग्रामीण भाग जास्त आहे.

श्री.दीपक चव्हाण : अध्यक्ष महोदय, अनुदानाच्या मागण्यावर चर्चा करण्यासाठी तीन तासांचा वेळ देण्यात आला होता. जवळ जवळ सर्व पक्षांची वेळ संपत आली होती. शिवसेना पक्षाची तीन मिनिटे वेळ शिल्लक होती. भाजपाची चार मिनिटे वेळ शिल्लक होती. राष्ट्रवादी पक्षाची सात मिनिटे वेळ शिल्लक होती. राष्ट्रवादी पक्षाचे फक्त दोन सन्माननीय सदस्य बोलले आहेत. त्यामुळे अजून ७ मिनिटे वेळ शिल्लक आहे. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्यास प्रथम संधी द्यावी, अशी मी विनंती करतो.

श्री.राजेश पाटील : अध्यक्ष महोदय, बहुजन विकास आघाडी हा एक पक्ष आहे. त्यामुळे या पक्षासाठी देखील वेळ राखीव ठेवण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पालघर जिल्ह्यामध्ये ३०० खाटांचे ग्रामीण रुग्णालय आहे. या रुग्णालयाच्या पहिल्या मजल्याचे विस्तारीकरण करण्यात आले आहे. सदर ग्रामीण रुग्णालयास उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊन आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री.राजेश पाटील.......

तसेच पालघर जिल्ह्यातील सफाळा येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव सह संचालक, आरोग्य सेवा, यांच्याकडून माननीय प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे दिनांक ७ डिसेंबर, २०१८ रोजी सादर करण्यात आलेला आहे. सफाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अंतर व बाह्य रुग्णाची संख्या जास्त असल्याने सफाळा येथे प्राथमिक आरोग्य केंद्राचे ६० खाटांचे ग्रामीण रुग्णालय श्रेणीवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मी मंत्री महोदयांना विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, वसई तालुक्यामध्ये खानवडी येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय बांधण्यास मान्यता देण्यात आली आहे. या रुग्णालयाचा फायदा वसई भागातील अनेक लोकांना होणार आहे. सदर रुग्णालयासाठी वन विभागाकडून ९९ गुंठे जमीन देखील प्राप्त झालेली आहे. परंतु सदर जमीन एक वर्षाच्या आता रुग्णालयाचे काम सुरु झाले नाही तर सदर जमीन परत घेण्यात येईल, अशी वन विभागाने अट घातलेली आहे. उक्त रुग्णालयाचे २० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक आरोग्य विभागाकडे सादर करण्यात आले आहे. उक्त अंदाजपत्रकास लवकरात लवकर मंजुरी द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, बोईसर येथील ग्रामीण रुग्णालयाची इमारत सन १९४६ मधील आहे. तसेच ती खाजगी जागेमध्ये आणि आता ती खूप जीर्ण अवस्थेत आहे. या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडिट करण्यात आले होते. त्यानंतर ती इमारत धोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेली आहे. या रुग्णालयासाठी जागा उपलब्ध आहे. परंतु निधीची तरतूद करण्यात आली नाही. त्यामुळे उक्त रुग्णालयासाठी निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये वादंरी, हत्तीपाडा व सुर्या अशी तीन धरणे आहेत. या धरणाचे डावे आणि उजवे कालवे अतिशय खराब झालेले आहेत. या धरणामध्ये पाणी उपलब्ध असून देखील कालव्यामुळे शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध

अप्रकाशित प्रत

श्री.राजेश पाटील.......

करुन देता येत नाही. त्यामुळे शासने या कालव्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मी विनंती करतो व मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

------------

असुधारित प्रत

श्रीमती श्वेता महाले (चिखली) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन वर्षामध्ये चिखली मतदारसंघामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडून शेतकऱ्यांचे प्रंचड नुकसान झाले आहे. अतिवृष्टी झाल्यानंतर सर्व्हे करण्यात आला. परंतु अद्याप संबंधित शेतकऱ्यांना मदत देण्यात आली नाही. मागील जून महिन्यामध्ये चिखली मतदारसंघातील शेतकऱ्यांचे सर्वाधिक नुकसान झालेले आहे. पिकाची आणेवारी देखील ५० टक्क्यांच्या खाली आहे. याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी व आयुक्त यांच्यामार्फत शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. परंतु उक्त प्रस्तावावमध्ये वारंवार त्रुटी काढल्या जात आहेत. आम्ही सर्व त्रुटींची पूर्तता करुन अंतिम अहवाल शासनाकडे सादर केलेला आहे. तरी देखील शासनाने उक्त अहवालाची दखल घेतलेली नाही. त्यामुळे उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने योग्य कार्यवाही करावी, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, या सदनातील अनेक आमदार महोदयांच्या मोठ-मोठ्या शैक्षणिक संस्था आहेत. त्यापैकी अनेकजण मंत्री तर काहीजण मुख्यमंत्री म्हणून देखील काम केले आहे. माननीय श्री.शरद पवार, स्व.विलासराव देशमुख, स्व.गोपीनाथ मुंडे व माननीय श्री.विखे-पाटील यांनी आपल्या संस्था मोठ्या करताना शासनाचा कोणताही कर बुडवलेला नाही. माझ्या मतदारसंघामध्ये सावरगाव व भोगावती या दोन ग्रामपंचायती आहेत. या दोन ग्रामपंचायतीमध्ये रामकृष्ण परमहंस शिक्षण संस्था ही सन १९९० पासून कार्यरत आहे. या शिक्षण संस्थेंतर्गत अनुराधा इंजिनिअरींग, फॉर्मसी, पॉलिटेक्नीक, इंग्लिश मेडियम अशा ८ ते १० शिक्षण संस्था कार्यरत आहेत. जेव्हा गावातील लोकांनी या संस्था चालकाकडे कराची मागणी केली,

यानंतर श्री.कुलकर्णी.......

श्रीमती श्वेता महाले....

तेव्हा तेथील संस्था चालकांनी गावातील लोकांना हकलून दिले होते. त्या लोकांनी माझ्याकडे तक्रार केली होती. मी याबाबत गट विकास अधिकाऱ्यांकडे चौकशी केली होती. गट विकास अधिकाऱ्यांनी ज्यावेळेस याची चौकशी केली, तेव्हा असे लक्षात आले की, रेकॉर्डवर या संस्थेचे नाव नाही. या संस्थेच्या जागेचा एनए झाला आहे किंवा नाही, हे तपासण्यासाठी हे प्रकरण तहसिलदार यांच्याकडे पाठविण्यात आले. तेव्हा असे लक्षात आले की, या संस्थेचा एनए झाला नाही. या संस्थेने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा कर बुडविला आहे. राज्य शासन या संस्थेवर कोणती कार्यवाही करणार आहे ?

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानते आणि माझे भाषण संपविते.

धन्यवाद !

------

असुधारित प्रत

श्री. मनोहर चंद्रिकापुरे (अर्जुनी मोरगाव) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी राज्याचा अर्थसंकल्प आणि मतदारसंघाचा विचार करतो. विधिमंडळामध्ये २८८ आमदार आहेत. मी विचार करीत असताना मला असे वाटते की, या क्रमामध्ये माझा मतदारसंघ २८८ व्या क्रमांकाचा असला पाहिजे. मी कालपासून सभागृहामध्ये काही गोष्टी पाहत आहे. कधी कधी मला गुदमरल्यासारखे वाटते आणि कधी कधी मला गहिवरुन येते. गहिवरुन येण्याचे कारण असे की, प्रचंड ताकदीने काही ज्येष्ठ सन्माननीय सदस्यही आपली बाजू मांडत असतात. आमच्यासारख्या नव्या सदस्यांना बोलण्याची संधी मिळत नाही. ज्यावेळेस आम्ही बोलण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आमचा आवाज दाबण्यात येतो. यानिमित्ताने मी आपल्याला एक शेर सांगू इच्छितो.

"अपनी पहचान मिटाने को कहा जाता है,
बस्तियां छोड़कर जाने को कहा जाता है,
पत्तियां रोज गिराती है जहरीली हवा,
और हम ही को पेड़ लगाने को कहा जाता है."

अध्यक्ष महोदय, मी महसूल आणि वन विभागासंदर्भात सुरुवातीला माझे मत मांडणार आहे. महसूल विभाग आणि वन विभाग यांचा एकमेकांशी अतिशय जवळचा संबंध आहे. या दोन्ही विभागातून शासनाला महसूल मिळत असतो. या दोन विभागाचे अत्यंत ज्वलंत प्रश्न जंगलव्याप्त परिसरामध्ये आहेत. त्यामुळे मी ज्या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करतो तो वनव्याप्त आहे. याच मतदारसंघात काही मोठे/मध्यम प्रकल्प, धरणे आहेत. या धरणांमध्ये अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत, शेतकरी विस्थापित झाले आहेत. वन विभागास शासनाने निधी दिला आहे. परंतु सन १९६३ पासून अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील विस्थापित झालेल्या १५ ते २० गावांना आणि तेथील लोकांना महसुली गाव म्हणून घोषित करण्यात आलेले नाही. ही अतिशय दुर्दैवी बाब आहे.

श्री. मनोहर चंद्रिकापुरे.....

अध्यक्ष महोदय, वन विभागाने वन कायदा लागू केला आहे. सन २००६ पूर्वी वन जमिनीवर ज्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण केले होते त्या वन जमिनी शेतकऱ्यांना दिल्या पाहिजेत, असा निर्णय घेण्यात आला आहे. परंतु त्यात एक अट नमूद करण्यात आली आहे. ७५ वर्षापूर्वीचे जे रहिवाशी आहेत, त्यांनाच वन जमिनीचे पट्टे दिले जाणार आहेत. माझ्या मतदारसंघामध्ये जवळपास १३ हजार हेक्टर जगोवरील लोक ७५ वर्षापूर्वीचे नाहीत. ते लोक गैरआदिवासी आहेत. ७५ वर्षाचा दाखल्याचा नियम आदिवासींना लागू होत नाही. परंतु गैरआदिवासी शेतकऱ्यांना यातून सूट मिळण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात ईटेहाडोह धरणासाठी ८० कोटी रुपयांची मागणी केली आहे. उमरदरी धरणासाठी १७ कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. कलपात्री प्रकल्पाकरिता १२ कोटी रुपये, जुन्या प्रकल्पांकरिता १५ कोटी रुपये अशा प्रकारे एकूण जवळपास १४० कोटी रुपयांची मागणी आम्ही केली आहे. त्यामुळे ही मागणी पूर्ण करावी.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

धन्यवाद !

---------

असुधारित प्रत

श्री. दीपक केसरकर (सावंतवाडी) : अध्यक्ष महोदय, शिवसेना पक्षातून बोलण्यासाठी माझे दुसऱ्या क्रमांकावर नाव होते. अशा वेळेस आम्हा सदस्यांना बोलण्यासाठी किती वेळ मिळणार आहे, याचा विचार झाला पाहिजे. मी केवळ मुद्दे मांडणार आहे. कारण सविस्तर भाषण करण्यासाठी वेळ नाही. माझे दुसऱ्या क्रमांकावर नाव होते. आवश्यकता वाटल्यास मी पक्षाची यादी आपणाकडे पाठवितो. (....अडथळा...)

**तालिका सभाध्यक्ष :** मी आपणास सांगू इच्छितो की, आपले नाव आपल्या पक्षाकडून ८ व्या क्रमांकवर देण्यात आले आहे. (....अडथळा...) मी सांगू इच्छितो की, सायंकाळी ०६.०० वाजता मंत्री महोदय उत्तर देणार आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांनाही उत्तराकरिता पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. यामुळे आपण सर्वांनी वेळेचे बंधन पाळले पाहिजे. मी सन्माननीय सदस्य श्री. दीपक केसरकर यांना विनंती करतो की, त्यांनी भाषणाला सुरुवात करावी. (....अडथळा....) मी सर्वांना विनंती करतो की, सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे. (...अडथळा....) अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी दुपारी २.३० ते सायंकाळी ०५.३० असा वेळ देण्यात आला होता. यात अर्धा तास वाढविण्यात आला आहे.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सकाळी माननीय विधानसभा उपाध्यक्ष, माननीय संसदीय कार्यमंत्री ॲड. अनिल परब आणि मी माननीय उपाध्यक्षांच्या दालनात बसलो होतो. खरे तर तेथील गोष्टी येथे सांगणे योग्य नाही. परंतु आपण मला बोलण्याची परवानगी द्यावी. त्यावेळेस असे ठरले की, आज सायंकाळी ८.३० वाजेपर्यंत यावर चर्चा करावयाची. यावेळेस इन्फॉर्मली आम्ही कामकाजपत्रिकेवर चर्चा केली होती. आज रात्रौ ८.३० वाजेपर्यंत मागण्यांवर चर्चा करावी आणि नंतर उत्तरे घ्यावयाची, असे ठरले होते. आवश्यकता वाटल्यास आपण माननीय उपाध्यक्षांकडून याबाबत माहिती घ्यावी. सायंकाळी ६.०० वाजेपर्यंतचा विषय झाला नव्हता. तसेच माननीय मंत्री ॲड. अनिल परब यांच्याकडूनही आपण माहिती घ्यावी.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, असे काही ठरले नाही. अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी वेळेचे वाटप केले आहे. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये शासकीय विधेयके, नियम २९३ अन्वयेचा प्रस्ताव आणि पाच अर्धा-तास चर्चा आहेत. आता दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली आहेत. पक्षाने दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार सर्व सन्माननीय सदस्यांनी भाषणे केली आहेत. न संपणारी चर्चा करण्यापेक्षा मंत्री महोदयांची उत्तरे आता घेण्यात यावीत, अशी मी विनंती करतो. तसेच अंतिम आठवडा प्रस्तावही येणार आहे. तेव्हा सर्व सन्माननीय सदस्यांना त्यावर बोलता येणार आहे. त्यामुळे आता मंत्र्यांच्या उत्तरास सुरुवात करावी, अशी मी आपणास विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** नवीन सन्माननीय सदस्यांना दोन-दोन मिनिटे बोलण्यासाठी दिले जातील व पुढील १० मिनिटानंतर मंत्र्यांच्या उत्तरास सुरुवात केली जाईल. आता सन्माननीय सदस्य श्री. दीपक केसरकर यांनी थोडक्यात मुद्दे मांडावेत. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी सर्वाधिक वेळ दिला आहे.

श्री. दीपक केसरकर : अध्यक्ष महोदय, मी मुद्दे वाचून दाखवितो. (....अडथळा...)

यानंतर श्री. चौधरी...

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.जयंत पाटील हे असत्य बोलत आहेत. कारण ते त्यावेळी तेथे उपस्थित नव्हते... (अडथळा...) असत्य हा शब्द बरोबर आहे... (अडथळा...) मी मंत्री महोदयांना असेही म्हणालो होतो की, आपण माहिती घ्यावी. परंतु ते थेट नाही कसे म्हणू शकतात ? जर अशा प्रकारे सभागृहाचे कामकाज चालवायचे असेल तर आम्ही बाहेर जातो. तुम्ही चर्चा करावी. ही पध्दत बरोबर नाही. त्यामुळे मी म्हणालो की, माननीय मंत्री ॲड.अनिल परब यांना बोलवावे व त्यांना विचारावे की यासंदर्भात चर्चा झाली आहे किंवा कसे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये सत्तारुढ पक्षाचा नियम २९३ चा प्रस्ताव दर्शविण्यात आलेला आहे. या प्रस्तावावर रात्री ०८.०० वाजता चर्चा सुरु केली तर सन्माननीय सदस्य काय बोलतील ? तसे करायचे असेल तर अंतिम आठवडा प्रस्तावावरील पहिले भाषण देखील रात्री ०८.०० वाजेनंतरच करावे लागेल. मला असे वाटते की, सर्वांनीच वेळेचे बंधन पाळले पाहिजे. आपल्या पक्षातील ज्या सदस्यांना आपण प्राधान्य दिले आहे त्यांचे बोलून झाले आहे. काही सदस्यांना आपण कमी प्राधान्य दिले असेल तर त्यामध्ये सभागृहाचा दोष नाही. ज्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळालेली नाही त्यांनी दुसऱ्या विषयावर बोलावे. आम्ही उत्तर देण्यास तयार आहोत.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण सभागृहाचा १० मिनिटे वेळ गोंधळामध्ये घालवला आहे. त्यामुळे आता आपण मंत्री महोदयांच्या उत्तरास सुरुवात करु.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.जयंत पाटील हे पुन्हा एकदा जे बोलले ते सत्याला धरुन नाही. त्यामुळे मी म्हणतो की, माननीय मंत्री हे दुसऱ्यांदा असत्य बोलले आहेत. आम्ही कोणालाही प्राधान्य दिलेले नसून सर्वांचीच नावे दिली आहेत. मंत्री महोदयांनी अशा प्रकारचे वक्तव्य करुन कितीही प्रयत्न केला तरीही ते विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांमध्ये छेद निर्माण करु शकणार नाहीत.

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार.....

कारण सत्याच्या आधारावरील आर्ग्युमेंट टिकत असते असत्याच्या आधारावरील नव्हे.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझा पॉइंट ऑफ प्रोसिजर आहे. मी तिसऱ्यांदा या सभागृहाचा सदस्य म्हणून निवडून आलो आहे. ज्या आसनावर आपण बसलेले आहात त्या आसनावर बसून मी देखील चार-साडे चार वर्षे सभागृहाचे कामकाज चालविले आहे. अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाते. मग ते कोणत्याही पक्षाचे सदस्य असोत. त्यातून आपण असा मार्ग काढतो की, जर सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावर बोलण्याची संधी मिळाली नाही तर अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये विभागनिहाय बोलण्याची संधी दिली जाते.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी ग्रामीण भागातील अनेक सन्माननीय सदस्य आहेत. त्यांच्या अनेक समस्या असतात. परंतु हे अधिवेशन संपत आले असतानाही अद्यापपर्यंत औचित्याचे मुद्दे मांडण्याची संधी दिली नाही. तसेच माहितीच्या मुद्दयाच्या माध्यमातून देखील दोन्ही बाजुंच्या सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात आली नाही. सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव किती वाजता चर्चेला येईल यावर काहीही अवलंबून नाही. विरोधी पक्ष पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. आपापल्या मतदारसंघातील मागण्या सन्माननीय सदस्यांना या ठिकाणी मांडायच्या आहेत. अर्थात, त्या स्विकारल्या जातील किंवा नाही हा नंतरचा मुद्दा आहे. परंतु आम्ही केलेल्या कमिटमेंटप्रमाणे आम्ही तुमचा प्रश्न राज्याच्या सर्वोच्च सभागृहामध्ये मांडला आहे हे तरी त्यांना मतदारसंघामध्ये जाऊन सांगण्याची संधी मिळाली पाहिजे. यासाठी वेळेचे बंधन असता कामा नये. माननीय अध्यक्षांच्या दालनात वेळेचे बंधन ठरविले जाते. किती तास बोलायचे याबाबत नियमामध्ये नमूद केलेले असले तरीही...(अडथळा...)

**तालिका सभाध्यक्ष :** आता आपण पुन्हा चर्चेला सुरुवात करु. सन्माननीय सदस्य श्री.दीपक केसरकर यांनी आपल्या उर्वरित भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन माझी आपणास विनंती आहे की, मागण्यांवरील चर्चेसाठी आणखी अर्धा तास वेळ वाढवून द्यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, ०६.३० वाजता आपण मंत्री महोदयांच्या उत्तरास सुरुवात करणार आहोत. त्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी कमीत कमी वेळेत आपले म्हणणे मांडावे. आता सन्माननीय सदस्य श्री.दीपक केसरकर यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री.दीपक केसरकर : अध्यक्ष महोदय, वेळेअभावी मी केवळ मुद्दे वाचून दाखवितो.

अध्यक्ष महोदय, दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये कन्व्हर्ट करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यावेळी मी वित्त खात्याचा मंत्री होतो. या शासन निर्णयानुसार सदर प्रक्रियेसाठी २ वर्षांची मुदत देण्यात आली होती. त्यामागील उद्देश असा होता की, महसूल विभागाला जास्तीत जास्त कर मिळावा. परंतु यातील बहुतांश वेळ कोरोना काळातच गेला आहे. त्यामुळे मंत्री महोदयांना विनंती आहे की, या मुदतीमध्ये आणखी तीन वर्षांची वाढ करावी. असे केल्यास सर्वच नागरिकांना दिलासा मिळू शकेल.

अध्यक्ष महोदय, आमच्याकडे जी वाळू काढली जाते त्यासाठी पर्यावरण खात्याची केवळ चॅनेल नेव्हिगेशनला परवानगी असते. आपण जे परवाने देता त्यांच्याकडून नदीमध्ये केवळ खड्डे केले जातात. कोकणामध्ये पर्यटन हा एकमेव व्यवसाय आहे. त्यामुळे तेथे कॅनॉल तयार करुन त्यामधून निघणाऱ्या वाळूचा लिलाव करावा. यामुळे खऱ्या अर्थाने नौकानयन सुरु होईल. तरी बंदरे खात्यासोबत यासंदर्भात ताबडतोब बैठक आयोजित करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांकडे सावंतवाडी येथील मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचा मुद्दा दिलेला आहे. आमच्या भागातील लोक उपचारांसाठी गोव्याला जातात. या हॉस्पिटलचे टेंडर होऊन वर्कऑर्डर झाली आहे.

असुधारित प्रत

श्री.दीपक केसरकर.....

परंतु दोन वर्षांपासून यासंदर्भात बैठक झालेली नाही. माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, याबाबत ताबडतोब बैठक आयोजित करावी. तसेच आमच्या जिल्हयामध्ये वैद्यकीय कर्मचारी कमी आहेत. त्यांची पदे भरण्यात यावीत, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आमच्या एकटया सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये ४२ हजार हेक्टर वनसदृश जमीन आहे. या विषयाच्या संदर्भात बैठक घेऊन न्याय देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, वेस्टर्न घाटाच्या बाहेर इको सेन्सिटिव्ह झोन जाहीर झालेला आहे. याबाबत देखील लोकप्रतिनिधींची बैठक घेण्याची आवश्यकता आहे. तरी बैठक घ्यावी अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय कृषीमंत्र्यांनी कृषी धोरण जाहीर केले आहे. परंतु कृषी पर्यटनाला एन.ए. घेण्यात येऊ नये अशी आमची मागणी आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये याबाबत सांगावे, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पाटबंधाऱ्यांमध्ये पर्यटनाचे पोटेन्शिअल असून देखील त्याबाबतचे धोरण निश्चित झालेले नाही. त्यामुळे ९० वर्षांसाठी जागा दिल्यास मोठया प्रमाणात पाटबंधारे खात्यांच्या जमिनीवर गुंतवणूक येऊ शकेल. माझ्या मतदारसंघामध्ये इरडी नावाचे धरण आहे. या धरणासंदर्भात गोवा राज्याबरोबर डिस्प्यूट असल्यामुळे या धरणाची उंची वाढविण्याचे रद्द केले होते. ही उंची न वाढविल्यामुळे ५ गावांना पाणी जात नाही. तरी सदर गावांना ऊपसा सिंचन योजनेद्वारे पाणी उपलब्ध करुन द्यावे.

अध्यक्ष महोदय, वाईल्डलाईफ कॉरिडॉर जाहीर करण्यात आला त्यावेळी मी उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. मी जसे सांगितले होते तसाच कॉरिडॉर न्यायालयाने मान्य केला. तरी खोटा कॉरिडॉर रद्द करण्याबाबत शासनाने घोषणा करावी, ही विनंती आहे.

असुधारित प्रत

श्री.दीपक केसरकर.....

अध्यक्ष महोदय, कोकणातील ग्रामीण पर्यटनासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा ही देखील या निमित्ताने विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आंबा-काजू क्लस्टरसाठी देखील....(अडथळा...) पाच गावांचे पाणी एमआयडीसी ने अडविले आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.शिरीषदादा चौधरी (रावेर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी जलसंपदा विभागासाठी या अर्थसंकल्पामध्ये १३ हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद केली त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. तसेच माझ्या मतदारसंघातील तापी नदीवरील शेगाव बॅरेज मध्यम प्रकल्पासाठी १०० कोटी रुपयांचे प्रावधान करण्यात आले त्याबद्दल देखील मी मन:पूर्वक आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, माननीय जलसंपदा मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे यावल ऊपसा जलसिंचन योजनेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास माननीय मुख्यमंत्र्यांनी लवकरात लवकर मंजुरी द्यावी. जेणेकरुन या भागातील ९ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येईल. तसेच जवळजवळ १०० ते १२५ कोटी रुपयांपर्यंत उत्पादन वाढेल. तसेच या पाण्याचा वापर झाला नाही तर वाहून जाणाऱ्या पाण्यामुळे दरवर्षी सुमारे २७ ते ३० कोटी रुपये नुकसान होणार आहे, ही बाब देखील विचारात घ्यावी.

अध्यक्ष महोदय, मी महसूल विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. या विभागाच्या योजनेनुसार भोगवटा वर्ग-२ मधून भोगवटा वर्ग-१ असा बदल करण्यासाठी दिनांक ८ मार्च पर्यंत ५० टक्के नजराणा भरणे आवश्यक होते. परंतु ८ मार्च नंतर यामध्ये वाढ होऊन ७५ टक्के नजराणा भरावा लागणार आहे. तसेच गृहनिर्माण संस्थांना देखील ८ मार्चनंतर १५ टक्क्यांऐवजी ६० टक्के नजराणा भरावा लागणार आहे. माझी माननीय महसूल मंत्र्यांना विनंती आहे की, हा नजराणा कमी करावा किंवा योजनेची मुदत वाढवून द्यावी. जेणेकरुन लोकांना दिलासा मिळू शकेल.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. शिरीष चौधरी...

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाबतीत मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, माझ्या मतदार संघातील रावेर आणि यावल तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी आणि नर्सेस यांच्या निवासस्थानाची व्यवस्था नसल्यामुळे त्यांची अतिशय परवड होते. त्यामुळे त्यांच्या निवासस्थानासाठी निधीचे प्रावधान करावे. तसेच महसूल विभागाच्या बाबतीत दोन्ही तालुक्याचे तहसिलदार व प्रांत अधिकारी यांच्या निवासस्थानाची व्यवस्था नाही. तसेच प्रांत अधिकारी यांच्या कार्यालयासाठी इमारत नसल्यामुळे खूप अडचण निर्माण होते. त्याकरिता निधीचे प्रावधान करावे अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाबतीत रावेर तालुक्यात गोदामांची अपुरी व्यवस्था असल्यामुळे ते खाजगी भाडेतत्त्वावर घ्यावे लागतात. त्यामुळे भरड आणि धान्याची खरेदी उशिरा सुरू होते. परिणामी लोकांना खूप त्रास होतो. त्या दृष्टीने आपण कार्यवाही करावी.

अध्यक्ष महोदय, आता २ वर्षे आपल्या अधिवेशनाचे दिवस कमी झाले आहेत. पूर्वी अशी परिस्थिती होती की आपले सभागृह रात्री १२-१२ वाजेपर्यंत सुरू असायचे. आताच काय झालं, इतकी काय घाई झाली. मंत्री महोदय असोत किंवा विरोधी पक्षनेते असतील त्यांना इतरही अनेक प्लॅटफॉर्म आहेत. आम्हा आमदारांना दुसरे कोणतेही प्लॅटफॉर्म नाहीत आणि हा एकमेव प्लॅटफॉर्म असताना आम्हाला बोलण्याची संधी मिळत नसेल तर हे योग्य नाही.

---------

असुधारित प्रत

श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागावर बोलताना महिलांमध्ये सर्व्हायकल कॅन्सरचे वाढते प्रमाण विचारात घेता मी मंत्री महोदयांना विनंती करते की, १८ ते ३५ वयोगटातील महिलांना कॅन्सरचे व्हॅक्सीन मोफत देण्यासाठी आपण प्रयत्न करावेत. तसेच मेमोग्राफी आणि पॅप्समेअर या तपासण्या सरकारी व खाजगी रुग्णालयात सरकारतर्फे मोफत स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी. जेणेकरुन आपण सर्व्हायकल कॅन्सरचे नियंत्रण करु शकू. तसेच आमच्या मुंबई उपनगरामध्ये एम्सच्या धर्तीवर एक हॉस्पिटल निर्माण करावे, अशी सुध्दा मी मंत्री महोदयांना विनंती करते. आज आपण महात्मा ज्योतिबा फुले आरोग्यदायी योजनेमधून लोकांना लाभ देतो. परंतु कॅन्सर झाल्यानंतर केमो आणि रेडियशन यांचा खर्च बघता आपण या योजनेमधून दीड लाखापर्यंत मदत देतो ती किमान गुजरातच्या धर्तीवर "मॉ" कार्डाच्या माध्यमातून ३ लाख इतकी दिली जाते तेवढी ती मर्यादा करावी, अशी मी मंत्री महोदयांना विनंती करते.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या बाबतीत बोलताना माझ्या मतदार संघामध्ये जे कोळीवाडे आणि गावठाणे आहेत त्यांचे सीमांकन करायचे राहिले आहे. उदाहरणार्थ कांदळपाडा, दहिसर गावठाण, एकसर या भागातील सीमांकन तातडीने करुन घेण्यात यावे. तसेच कोकणातील काही नदी पात्रामध्ये खाडीतील साचलेला गाळ काढण्यासाठी कमी दराने रॉयल्टीची परवानगी देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर सातपाडी खाडीतील गाळ काढण्यासाठी परवानगी द्यावी.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभागाच्या बाबतीत बोलत असताना ऊर्जा मंत्र्यांनी आमच्या चिकू बागायतदार, पान बागायतदार, फूल बागायतदार यांना जो वाणिज्य वीजेचा दर आकारला आहे तो भूर्दंड आमच्या शेतकऱ्यांना न लावता आधीप्रमाणे जे दर होते त्याप्रमाणे ते करावेत, अशी मी मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाच्या बाबतीत बोलत असताना मी माननीय मंत्री यांना सांगू इच्छितो की, आपण पालघरला आणि वानगावला श्री आनंद

असुधारित प्रत

श्रीमती मनिषा चौधरी...

ठाकूर यांच्याकडे गेले होते. त्यावेळी आपण तेथील शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते की, सूर्या धरणाचे पूर्वेकडील पाणी पश्चिमेला आणायचे आहे ते आम्ही लवकरात लवकर आणू. अनेक राजकीय नेत्यांनी तेथे नारळ फोडले. जेवढे नारळ फोडून पाण्याचे थेंब खाली पडले तेवढे थेंब पाणी पूर्वेचे पश्चिमेला आलेले नाही. म्हणून मी आपणास विनंती करते की, आमच्या पालघर जिल्ह्यातील जो पश्चिमेचा भाग आहे, समुद्रसपाटीवर आहे, त्याची पाण्याची पातळी खूप खाली गेली आहे, तेथील पाणी खारट झाले आहे. जवळजवळ त्याचा हार्डनेस १४०० पीपीएमपर्यंत गेला आहे. आपण एमएमआरडीए रिजनला सूर्या धरणाचे पाणी देतो. पण ते आमच्या आदिवासी उपयोजनेतून बनलेले धरण आहे. त्यामुळे सूर्या धरणाचे पाणी हे पूर्वेपासून पश्चिम बंदर पट्टीला देण्यात यावे, अशी मी आपणास विनंती करतो.

----------

असुधारित प्रत

ॲड अशोक पवार (शिरुर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी व त्यांना पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी प्रथमत: माननीय महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात व माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना मनापासून धन्यवाद देतो की त्यांनी हवेली येथे अप्पर तहसिल निर्माण करण्याचे जाहीर केले आहे. त्याचा फायदा या भागातील लाखो लोकांना होणार आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल आणि वन विभागाने २ जीआर काढले आहेत. आमच्या परिसरातील हवेली तालुक्यातील कोणत्याही गावाला भामा-आसखेड धरणाचे पाणी मिळणार नाही आणि म्हणून त्याचे शेरे काढावेत. खरं म्हणजे सरकारी यंत्रणा असे काम करु शकते. यासंबंधी माननीय उच्च न्यायालयाचे आदेश आहेत ताबडतोब हे शेरे काढावेत. आपण जर आम्हाला थेंबभर पाणी देणार नसाल तर ते शेरे कशासाठी ठेवले आहेत. ते शेरे ठेवताना अधिकाऱ्यांनी कशी मेक मारली ते मी आपल्याला वाचून दाखवितो.

"पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने राज्य शासनाचे भूसंपादनाचे अधिकार अबाधित ठेऊन फक्त शेती व्यवहारासाठी हस्तांतर व्यवहार अनुज्ञेय."

आम्ही जर आपल्या धरणातील पाणी घेत नाही तर आमच्या जमिनीवर आपण तो शेरा का मारता. आमचा ७/१२ आपण मोकळा का करीत नाहीत. यासंबंधी मी अनेकवेळा माननीय मदत व पुनर्वसन मंत्री श्री. विजय वडेट्टीवार यांच्याकडे हेलपाटे मारले आहेत. आज फक्त खाली आदेश दिला आहे. खरं म्हणजे मंत्री महोदयांनी मोठं मन दाखवून एक मोठी बैठक घेऊन शेतकऱ्यांना बोलावून माननीय उच्च न्यायालयाने दिलेले आदेश... या ठिकाणी माननीय जलसंपदा मंत्री उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आम्ही आपल्या धरणातील एक थेंबही पाणी घेत नाही तर आमच्या जमिनीवरील ते शेरे का काढत नाहीत. हीच परिस्थित चासकमाण धरणाच्या बाबतीत आहे. ३० वर्षापासून आपण शेरे मारुन ठेवले आहेत. आमच्या जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार होत नाहीत किंवा वारसाहक्काच्या नोंदी

असुधारित प्रत

ॲड अशोक पवार..

होत नाहीत. मग आम्ही काय करायचे. आपण जर त्या जमिनीवर अशा प्रकारचे शेरे मारता. जो कोणी संबंधित अधिकारी असेल त्याच्यावर कारवाई करण्याची गरज आहे. प्रशासनातील हे शुक्राचार्य शोधले पाहिजेत. जर भामा-आसखेड धरणाचे पाणी पुणे महापालिकेला जात असेल आणि आमच्या भागात थेंबभरही पाणी येत नसेल तर आमच्या जमिनीवर ते शेरे का मारले आहेत. तसेच चासकमाणचे पुनर्वसनाचे शेरे आमच्या ७/१२ वर मारले आहेत. आपण अशा पध्दतीने अन्याय करणार आहात काय ?

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी माननीय आरोग्यमंत्री यांचे कौतुक केले पाहिजे. कारण ज्यांनी कोरोनाच्या काळात ऑक्सीजनची कमतरता होती तेव्हा आम्ही फोन केल्यानंतर आम्हाला मदत झाली. ऑक्सीजनचे बेड निर्माण करण्यासाठी त्यांची मदत झाली. कोरोनाच्या काळात माननीय आरोग्य मंत्री श्री. राजेश टोपे यांच्या माध्यमातून आमच्या असंख्य कार्यकर्त्यांना मदत झाली आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाच्या वतीने जीआर काढले जातात. पण त्यांच्या प्रती सन्माननीय सदस्यांना का दिल्या जात नाहीत. आपण या जीआरच्या प्रती आमदारांना पोस्टाने पाठविल्या पाहिजेत. कोणत्या आमदारांना जीआर माहिती आहेत. आपण जो नवीन जीआर निघतो तो प्रत्येक आमदाराला ऑनलाईन किंवा पोस्टाने पाठविला पाहिजे. काही ठिकाणी आमदारांचा उल्लेख असतो आणि इतर सचिव आणि अमुक तमुक यांचा उल्लेख असतो. आमदारांचे नाव टाकले तर काय बिघडते. म्हणून आमदारांचे नाव या जीआरमध्ये टाकले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. आपण या प्रती जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि इतरांना देता.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांच्या दृष्टीने वीजेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. आपण मधल्या काळात जी शेतकऱ्यांची वीज कपात केली त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. आता आपण फक्त काही महिन्यांसाठी शब्द दिला आहे. पण मी सरकारला विनंती करतो की, शेतकऱ्यांच्या कृषी पंपांची वीज तोडू नका आणि त्यांचे नुकसान करु नका. आपल्याला जे काही अर्थकारण करायचे असेल ते आपण

ॲड अशोक पवार..

करीत रहा. पण शेतकऱ्याला किमान ८ तास नियमाने वीज द्या. ३०-३० आणि ४०-४० वर्षे झाली. पण अजूनही आमच्या वीजेच्या तारा त्याच आहेत. वीजेच्या तारा तुटतात. म्हणून त्या बदलल्या पाहिजेत.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ॲड. अशोक पवार...

जिथे ७० हजारापेक्षा जास्त कन्झ्युमर आहेत. त्या मानाने तिथे फक्त एकच अधिकारी असेल तर आमचे काम कसे चालणार आहे ? त्यामुळे त्या ठिकाणी जास्त अधिकारी उपलब्ध करुन दिले पाहिजे.  एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद !

-------

असुधारित प्रत

श्री. रमेश कोरगावकर (भांडूप) : अध्यक्ष महोदय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या मागणीवर मी बोलणार आहे. राज्यातील गोरगरीब अल्प उत्पादक गटातील नागरिकांना स्वस्त दरात शिधावाटप केंद्रामार्फत गहू व तांदूळ वितरीत करण्यात येत आहेत. स्वस्त दरात धान्य मिळण्यासाठी असलेली वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ५९ हजार रुपये आहे. गेल्या अनेक वर्षापासून आपण तीच मर्यादा ठेवली आहे. त्यामुळे अनेक गरजु नागरिकांना शासनाच्या स्वस्त धान्य वितरणापासून वंचित राहावे लागत आहे. सदर वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ करून ती २.५ लाख रुपयांपर्यंत करण्यात यावी अशी मी विनंती करतो. तसेच शिधावाटप केंद्रामार्फत वितरीत करण्यात येणारे गहू व तांदूळ हे अतिशय खराब व निकृष्ट दर्जाचे असल्याच्या अनेक तक्रारी लाभार्थ्यांकडून वारंवार शिधावाटप केंद्राकडे तसेच संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांकडे करण्यात येतात. या प्रकरणी तातडीने चौकशी करुन राज्यातील शिधावाटप केंद्रातून वितरीत करण्यात येणाऱ्या धान्याच्या दर्जाबाबत तसेच उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याबाबत कारवाई करावी.

अध्यक्ष महोदय, मुलुंड येथे सध्या अस्तित्वात असणारे कामगार रुग्णालय म्हणजे ईएसआय रुग्णालय बंद अवस्थेत आहे. कारण तिथे रुग्णच नसतात. त्यामुळे ते रुग्णालयजे.जे. रुग्णालय किंवा सेंट जॉर्जेस यासारखे अत्याधुनिक व नव्याने सुख सुविधा करुन उभारण्यात यावे. महसूल आणि वन विभागाच्या बाबतीत बोलताना मी सांगू इच्छितो की, बोरिवली राष्ट्रीय उद्यानाचे मी प्रतिनिधीत्व करीत असलेल्या आदिवासी पाडा, खिंडी पाडा आणि माता रमाई नगर ही क्षेत्र लागून असलेल्या ठिकाणी नेहमीच बिबटयाचा वावर दिसतो. अशावेळी अनेक भटक्यापाण्यांची अनेकवेळा भक्ष्य केली जाते. तसेच माझ्या विभागात नरभक्ष्य देखील झालेला आही. अशी शक्यता असताना तिथे असणारी आधार भिंत उंच करुन संरक्षण मिळण्यासाठी सहकार्य करावे.

अध्यक्ष महोदय, भांडूप विधानसभा क्षेत्र हे मुख्यत: मुंबई उपनगरामध्ये अस्तित्वात येत असून येथे विद्युत वितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा केला जातो. परंतु या कंपनीमार्फत मुलुंड, भांडूप आणि कांजूरमार्ग हे विभाग ठाणे(ग्रामीण) मध्ये

श्री. रमेश कोरगावकर....

नोंदविले गेले असल्यामुळे प्रामुख्याने ग्रामीण भागात ज्यावेळी लोडशेडींग केले जाते अशावेळी या क्षेत्रासाठी देखील हे नियम लागू होतात. तरी सदर विभाग हा ग्रामीण विभागातून वगळून स्वतंत्र विभाग करुन विद्युत पुरवठा सुरळित करावा, अशी मी मागणी करतो. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद !

------

असुधारित प्रत

श्री. जितेश अंतापूरकर (देगलूर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय,महसूल विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर माझ्या बिलोली व देगलूर तालुक्यातील तसेच नगरपरिषद हद्दीतील थोडी थोडकी नव्हे तर सुमारे २३८ मालमत्ता धारकांच्या जवळपास४०० एकर जमिनींचे भोगवटार वर्ग-१ ऐवजी वर्ग २ नोंद झाल्याची गंभीर बाब उघडकीस आली आहे.

अध्यक्ष महोदय, जवळपास दहा महिने झाले या सर्व मालमत्तांचे खरेदी विक्री व्यवहार बंद करण्यात आले आहेत. वास्तविक आपल्या सरकारने चार टक्के स्टॅम्प ड्युटी कमी करूनही चुकीच्या वर्ग नोंदीमुळे एकाही मालमत्ता धारकाला याचा लाभ तर घेता आलाच नाही, उलटपक्षी कोणाला कोरोना सारख्या संकटाला, घरी लग्न वा अन्य आर्थिक खर्चाचा मेळ भागविण्यासाठी सदर मालमत्ता विकता आलेली नाही. यामध्ये महसूल विभागाच्या चुकीचा नाहक फटका संबंधित मालमत्ताधारकांना बसला असून शासनाचाही महसूल बुडत आहे. त्यामुळे या गंभीर तांत्रिक चुकीवर लक्ष केंद्रित करून तातडीने फेरफार दुरुस्ती करण्याची महसूल विभागावर जबाबदारी असतानाही, ती जबाबदारी कुठलाच अधिकारी स्वीकारण्यास तयार नाही. अध्यक्ष महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनास विनंती करतो की, वर्ग २ ची नोंदणी घेऊन याप्रकरणी दोषी संबंधित कर्मचारी अधिकारी यांच्याविरुद्ध कडक कारवाई केल्याशिवाय भविष्यात अशा चुका होणार नाहीत. अशी माझी धारणा आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार यांनी केलेल्या विनंतीनुसार आपण आणखी वेळ वाढवावी,अशी माझी विंनती आहे. अन्य सन्माननीय सदस्यांना देखील बोलण्याची संधी आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार ऐकटेच बोलणे योग्य नाही. माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह आपण आणखी अर्धातास वेळ वाढवावी अशी आमची विंनती आहे. त्यानंतरही जर चर्चा संपली नाही तर उत्तरासहित रात्री ७.३० वाजता पूर्ण करु.

असुधारित प्रत

श्री. जितेश अंतापूरकर : अध्यक्ष महोदय, आमचे नेते मा.अशोकरावजी चव्हाण साहेब यांचा ड्रिम प्रोजेक्ट म्हणून ओळखला जाणारा लेंडी अंतरराज्यीय प्रकल्प असून या प्रकल्पावर सुमारे २०३३ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, वेगवेगळया कारणांमुळे हा लेंडी प्रकल्प मागील ३३ वर्षां पासून रखडलेला आहे. माझी विनंती आहे की, या प्रकल्पाची मूळ किंमत ५४ कोटी रकमेचा हा प्रकल्प केवळ रखडल्यामुळे २०३३ कोटीपर्यंत प्रस्तावित झालेला आहे. शासनाकडून प्रकल्पासाठी प्रदान केलेली १२ गावे यात आहेत. त्या १२ गावांपैकी ९ गावांचे पुनर्वसनाचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पा अंतर्गत २३९८ हेक्टर जमीन बुडीत क्षेत्रात जात आहे. या धरणाच्या माध्यमातून २६ हजार ९२४ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. आमचे श्रध्दास्थान स्वर्गीय डॉ. शंकररावजी चव्हाण साहेब यांनी महाराष्ट्रातील सिंचनाच्या दृष्टीने आयुष्यभर जी एक दुरदृष्टी बाळगली दुरष्टीतूनच या जायकवाडीचा प्रकल्प आकारास आला. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद !

--------

असुधारित प्रत

श्री. राम सातपुते (माळशिरस) : अध्यक्ष महोदय, सन १९८४ साली माननीय माजी मुख्यमंत्री श्री वसंतदादा पाटील असताना त्यांनी पुणे-सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागाला पाणी मिळावे यासाठी निरा देवधर योजना तयार केली. या योजनेला सन १९९५ साली युती सरकारच्या काळात मान्यता भेटली होती. परंतु सन २००१ साली हे १२ टीएमसी क्षमतेचे धरण पूर्ण झाले. त्यातून वीर धरणात पाणी सोडण्यात येत आहे. सध्या या पाण्याचा उपयोग कार्यक्षेत्राबाहेरील गावांना होत आहे. परंतु माझ्या मतदारसंघातील या निरा देवधर धरणाचे लाभार्थी असणारी २२ गावे सध्या पिण्याच्या पाण्यासाठी वंचित आहेत. त्यांना शेतीचे पाणी तर दूरच परंतु पिण्याचे पाणी सुद्धा नाही. माझ्या मतदारसंघातील धर्मपूरी येथे पंप हाऊस बांधून कोथळे येथे पाईपलाईनने पाणी नेऊन निरा देवधर योजनेंतर्गत देण्यात येणारे आमच्या हक्काचे पाणी या २२ गावांना देण्यात यावे. कोथळे कारंडे पासून माझ्या मतदारसंघातील २२ गावे या योजनेमुळे वंचित आहेत. माननीय जलसंपदा मंत्री श्री. जयंत पाटील यांना मी विनंती करीत आहे की, यासाठी आपण या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावी. त्यासाठी मी आपल्याला पत्र दिले परंतु दुर्दैवाने या बाबीला अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट केलेले नाही. आपण या निरा देवधर योजनेमध्ये माझ्या माळसिरस तालुक्यामधील जी २२ गावे वंचित आहेत त्यासाठी कॅनॉल आणि इतर दुरुस्तीच्या कामासाठी भविष्यात अर्थसंकल्पात निधी मंजूर करावा. माझ्या मतदारसंघातील २२ गावे ही पाण्यापासून वंचित राहणार नाहीत याची आपण काळजी घ्यावी आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद !

-------

अस्वाक्षरित

श्री. पी.एन.पाटील (करवीर) :अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्यापुरवणी मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि माझे विचार मांडण्साठी मी उभा आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य आता सभागृहाबाहेर जात आहेत. मला फक्त एवढेच म्हणायचे आहे की, सन्माननीय सदस्यांचे भाषण संपल्यानंतर त्यांनी उत्तर ऐकण्यासाठी थांबले पाहिजे. द कश्मिर फाईल्स हा चित्रपट बघण्यासाठी सन्माननीय सदस्यांनासभागृहाच्या बाहेर पाठवले जात आहे. हे अतिशय गंभीर आहे. आपल्याला पाहिजे असेल तर द कश्मिर फाईल्स हा चित्रपट बघण्यासाठी मी वेगळी अरेंजमेंट करुन देतो.

श्री. पी.एन. पाटील : अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभागावर बोलत असताना मी आपल्याला सांगू इच्छितो की, परवाच्या दिवशी माननीय ऊर्जा मंत्र्यांनी सन्माननीय सदस्यांची मागणी असताना शेतकऱ्यांची वीज कनेक्शन तोडणे थांबविण्यासाठी आश्वासन दिले. परंतु खऱ्या अर्थाने मागच्या पावसाळयात कोल्हापूर जिल्ह्यात मोठया प्रमाणात पाऊस झाला. अनेक शेतकऱ्यांची शेती वाहून गेली, तिथे कडा कोसळल्या.....

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझी हरकत अशी आहे की, माननीय जलसंपदा मंत्री आणि माझे मित्र श्री. जयंत पाटील असे बोलले की, द कश्मिर फाईल्स हा चित्रपट बघण्यासाठी सनमाननीय सदस्यांना सभागृहाबाहेर पाठवले जात आहे. याबाबत त्यांनी खुलासा करावा.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. कुणाल पाटील** ) : सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर मी आपल्याला सांगू इच्छितो की, ही हरकत होऊ इच्छित नाही. कामकाजावर काही हरकत असेल तर बोलू शकता.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. पी.एन.पाटील : अध्यक्ष महोदय, कोल्हापूर भागातील शेतकऱ्यांचे गेल्या वर्षीपासून प्रचंड नुकसान झालेले आहे. हरपुडे गावामध्ये कडा कोसळला येथे ३ महिन्यांनतर आताच कनेक्शन जोडले होते. आता पुन्हा ३ महिन्यानंतर शेतकरी हे वीज कनेक्शन कसे जोडणार ? गगनबावडा व परळा तालुक्यातील शेतकऱ्यांचे देखील प्रचंड नुकसान झालेले आहे. २०० टन ऊस होत होता. आता तेथे केवळ ४० टन ऊस झालेला आहे. अशा वेळी हे शेतकरी विजेचे बिल कसे भरणार, अशी परिस्थिती आहे. ज्यांचे नुकसान झालेले आहे, त्यांचा सर्व्हे करणे आवश्यक आहे. माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे, मुख्यमंत्री असताना एक वर्षाकरिता शेतकऱ्यांचे विजेचे बिल माफ केले होते. शेतकऱ्यांचे कोरोना व पुरामुळे बरेच नुकसान झालेले आहे. या करिता शेतकऱ्यांचे बिल माफ करावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी जलसंपदा विभागावर मी बोलू इच्छितो. माझ्या मतदारसंघात धामणी प्रकल्प आहे. सन २००० पासून अतिशय धिम्या गतीने या प्रकल्पाचे काम सुरु आहे. माननीय जलसंपदा मंत्री यांना आम्ही या प्रकल्पाकरिता भेटलो होतो. या प्रकल्पाकरिता २१७ कोटी रुपयांची निविदा काढली. मात्र अद्याप हे काम झालेले नाही. हे काम लवकर सुरु करावे. या भागातील लोकांना पुढील २ महिने पिण्यास पाणी मिळत नाही.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागासंबंधी मी बोलू इच्छितो. सामान्य शेतकरी, कुंभार आपल्या व्यवसायाकरिता माती नेतात. त्यांनी पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी असा आदेश आता न्यायालयाने दिलेला आहे. पूर्वी तहसीलदार व जिल्हाधिकारी परवानगी द्यायचे. रॉयल्टी भरल्यानंतर कुंभार यांना परवानगी मिळत होती. मात्र आता रॉयल्टी भरल्यानंतरही परवानगी मिळत नाही. कुंभार समाजातील माणूस पर्यावरण विभागाची परवानगी घेण्याकरिता नागपूरला जाऊ शकत नाही. कॅबिनेटमध्ये या संबंधी निर्णय घ्यावा. न्यायालयाने निर्णय घेतल्या नंतर कोल्हापूर व राज्यातील कुंभारांचा व्यवसाय बंद झाला आहे. या बाबत उपाययोजना करावी. अध्यक्ष महोदय, या मागण्यांना मी पाठिंबा देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

असुधारित प्रत

श्री. प्रताप अडसड ( धामणगाव रेल्वे ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी थोडक्यात बोलू इच्छितो. माझ्या मतदारसंघातील समृध्दी महामार्गाच्या कामाकरिता सबकॉंट्रॅक्टर यांनी अवैध उत्खनन केल्यामुळे २५ कोटी रुपयांचा दंड तहसीलदार यांनी केला. अपिलात गेल्यानंतर हा दंड शून्य करण्यात आला. याची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी. असेच प्रकरण धामणगाव तालुक्यात झाले आहे. परवानगीच्या आधीच उत्खनन केले आहे. यामध्येही मोठा दंड होऊ शकतो. ते प्रलंबित आहे. रेती घाटाच्या बाबत मी जास्त बोलणार नाही. याचे कारण या पूर्वी सदस्यांनी या संबंधी अतिशय विस्तृत सांगितलेले आहे. शासनाने या बाबत लक्ष घातल्यास शासनाचा महसूल वाढेल व अवैध उत्खनन बंद होईल. एसडीओ यांच्याकडे तिन्ही नगरपरिषदांचे चार्ज दिले आहे. महसूल क्षेत्र मोठे असल्याने हा चार्ज काढून सीईओ यांना द्यावा, अशी विनंती करतो. भोगवटादार २ चे १ करण्याकरिता अनेक दिवसांपासून फाईल पडून आहेत. यामुळे शासनाला महसूल मिळेल व लोकांची सोय होईल यामुळे कालावधी लवकर निश्चित करुन कार्यवाही करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, रेणुका बस स्टेशन, नांदगाव खांडेश्वर येथे इव्हेक्युएशन ऑफ पॉवर करिता दि. १५.४.२०२१ ला साडे पाच कोटी रुपयांचे टेंडर फ्लोट झाले. या करिता निधीची तरतूद करावी. जिल्हा परिषदेचे रस्ते एका पावसाळ्यातच वाहून जातात. हे रस्ते गुणवत्तापूर्ण करावे व त्याची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी. पीसीआय इंडेक्सनुसार कोणतीही कामे होत नाहीत. प्राधान्य क्रमांक १ सोडून ४ मधील कामे घेण्यात येतात, या बाबत कारवाई करावी अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

असुधारित प्रत

श्री. धर्मरावबाबा आत्राम ( अहेरी ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आम्हाला बोलण्याकरिता वेळ द्यावा अशी मी विनंती करतो. इतरांना वेळ संपल्यावरही बोलण्याची संधी दिली जाते मात्र आम्हाला वेळ दिला जात नाही. आपण वेळ दिल्याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार व्यक्त करतो. महसूल व वन विभागावर मी बोलू इच्छितो. आमच्याकडे कमलापूर गाव असून तेथे हत्ती कॅम्प आहे. येथे १७ हत्ती असून पर्यटन स्थळ आहे. हे स्थळ गुजरातला नेण्याचा प्रयत्न केंद्र शासनाकडून केला जात आहे ते थांबवण्यात यावे अशी मी विनंती करतो. हा आदिवासी भाग असून वन विभाग असल्यामुळे कोणत्याच रस्त्याचे काम होत नाही. पूर्ण राज्यात जेथे वन विभागाच्या अंतर्गत रस्ते असतील त्यांना वन विभाग अडथळा करतो. कामाला एनओसी देत नाही. हजारो कोटी रुपयांचे काम गडचिरोली जिल्ह्यात सुरु आहे. मात्र यास एनओसी मिळत नसल्याने कामे होत नाहीत. या बाबत ताबडतोबीने विचार करावा, अशी विनंती करतो व वेळ कमी असल्यामुळे मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदयांनी उत्तराचे भाषण सुरु करावे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आज सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत वेळ ठरविण्यात आली होती. मी प्रस्तावित केले होते की, सदस्यांची बोलण्याची भावना आहे. या नंतर काही सदस्यांनी माझ्या जवळ कानात येऊन अतिशय प्रेमाने सांगितल्यामुळे मी या निष्कर्षावर आलो आहे की, सर्वांचे म्हणणे ऐकून घेऊ. प्रत्येकाला २-५ मिनिटांची संधी द्यावी. या नंतर उत्तर दिले जाईल. सन्माननीय सदस्य सर्वश्री रत्नाकर गुट्टे, यशवंत माने, प्रकाश आवाडे, हिरामण खोसकर इ. अनेकांना बोलायचे आहे. त्यांना २-३ मिनिटांचा वेळ द्यावा. जास्त पाल्हाळ लावल्यास त्यांचा माईक बंद करावा.

अप्रकाशित

श्री. उदयसिंग राजपूत ( कन्नड ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या भागात वन विभागाची ४० टक्के जमीन आहे. यामुळे येथे रस्ते होत नाहीत. शेतीमध्ये जंगलातील प्राणी येऊन नुकसान करतात. याकरिता तार कंपाऊंड करण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक आरोग्य विभागाबाबत बोलू इच्छितो. आमच्या येथे १०० खाटांचे रुग्णालय करण्याकरिता विनंती केली आहे. हे लवकरात लवकर सुरु करावे. कन्नड शहरात महिला व बालकांना शहराच्या मध्यभागी दवाखान्याची परवानगी दिली तर खूप चांगले होईल.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाबाबत मी बोलू इच्छितो. मोठमोठया बँरेजची साईट आमच्याकडे आहे. माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांना मी निवेदन दिले आहे. तेथे बँरेज तयार केले तर चांगले होईल. आमच्या कन्नड मतदारसंघात डोंगरी भाग असून नदी नाले अधिक असल्याने गुजरदरी, कोटी अशा ३-४ धरणाच्या साईट्स आहेत. या बाबत विचार करावा. येथे डोंगर भाग असल्यामुळे काही गावांमध्ये नदीचे पाणी येते. येथील नदीवर संरक्षक भिंत केली तर चांगले होईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

असुधारित प्रत

श्री. अभिमन्यू पवार ( औसा ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागावर मी बोलू इच्छितो. माननीय जलसंपदा मंत्री यांना मी गेल्या वर्षी दि. २५ मार्च रोजी भेटलो होतो, त्यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. निम्न तेरणाच्या उजव्या कालव्याच्या जवळ सरवडी कोकडगाव हा रस्ता असून तो पूर्णपणे अडलेला आहे. या कॅनलची उंची २० मी. पेक्षा अधिक आहे. ७५ टक्के लोकांची शेती दुसऱ्या बाजूला आहे. येण्या-जाण्याकरिता त्यांना ७ कि.मी चा वळसा घालावा लागतो. माझी विनंती आहे. या कॅनलला एक बोगदा करुन द्यावा किंवा दोन्ही बाजुला रस्ता करावा. ही मागणी २०-२५ वर्षांपासून प्रलंबित आहे. याकडे मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे. निम्न तेरणाच्या खालच्या बाजूपासून नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाकरिता मंत्री महोदयांना विनंती केली होती. मात्र त्याची अद्याप परवानगी मिळाली नाही. नदीचे पात्र अरुंद झाल्यामुळे नदीचे पाणी शेतीत शिरत आहे.यामुळे जमीन खराब होत आहे. मी नाम फाऊंडेशन, श्री श्री. रवी शंकर यांच्या ट्रस्टला विनंती केलेली आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.अभिमन्यू पवार ....

या तिन्ही संस्था मला यामध्ये मदत करण्यास, मशिनरी देण्यास तयार आहेत. डिझेलची व्यवस्था आपल्याला करावयाची आहे. माननीय पालक मंत्री यांनी मला डिझेलकरिता पैसे देण्यास मान्यता दिलेली आहे.

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा विषय असा आहे की, निम्न तेरणामध्ये प्रचंड गाळ साचलेला आहे. त्या गाळाचे सर्व्हेक्षण व्हावे, म्हणून मी मागणी केली होती. त्या सर्व्हेक्षणाचे काय झाले याची मला अजूनही माहिती नाही. तो जो गाळ साचतो त्यामुळे वाहून जाणाऱ्या पाण्याच्या अतिरिक्त साठ्याच्या अगेन्स्ट आम्हाला त्याच भागात साठवण तलाव मंत्री महोदयांनी करुन दिले तर ते खूप चांगले होईल.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा खात्याच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, आमच्या भागातच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यामध्ये ३०-४० वर्षांपासूनच्या जुन्या तारा आहेत. त्या तारांमधून कमी दाबाने विद्युत पुरवठा होतो व तारा तुटतात. त्या तारा तुटल्यामुळे माझ्या भागामध्ये लोगदा, गुळखेडा वाडीमध्ये काल घटना घडली. गुळखेडा वाडी, गुळखेडा येथील जवळपास २५ ते २० शेतकऱ्यांचा ऊस जळून खाक झाला. ऊर्जा खात्याच्या माध्यमातून खूप नुकसान होत आहे. ऊर्जा खाते याकडे गांभीर्याने पाहत नाही. सर्व्हे करायला देखील येत नाही. ऊर्जा खात्याने सर्व्हे करावा व शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, अशी मागणी मी या निमित्ताने करणार आहे.

अध्यक्ष महोदय, उद्योग विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना मला हे सांगावयाचे आहे की, माझ्या औसामध्ये एमआयडीसीमध्ये आता प्लॉट शिल्लक नाही. मी गेल्या २ वर्षांपासून विनंती करीत आहे. अतिरिक्त एमआयडीसीची आमची औसाकरांची मागणी आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या एमआयडीसीमध्ये रस्त्यांची व लाईटची फार दुरवस्था झालेली आहे. तो विषय देखील या निमित्ताने करावा.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना मला हे सांगावयाचे आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी औरंगाबाद येथील पहिल्या बैठकीत

श्री.अभिमन्यू पवार ...

माझ्या येथील कासारशिरसीला अप्पर तहसीलदारांची मान्यता दिलेली आहे. परंतु, अद्याप देखील महसूल मंत्री महोदयांकडून सकारात्मक उत्तर मिळत नाही.

अध्यक्ष महोदय, माझ्या भागात शेती रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात सुरु आहेत. परंतु, स्टाफ उपलब्ध नाही. आमच्या येथे दोनच नायब तहसीलदार आहेत. महसूल सहाय्यकांची ३ पदे रिक्त आहेत. तलाठ्यांची ५ पदे रिक्त आहेत. शिपायांची ६ पदे रिक्त आहेत. याचा कामावर परिणाम होतो. या रिक्त जागा ताबडतोब भरल्या जाव्यात.

अध्यक्ष महोदय, आमच्याकडे उप अधीक्षक, भूमी अभिलेख हे एकच आहेत. त्यांच्याकडे ५ तालुक्यांचा चार्ज आहे. एक माणूस ३-४ ठिकाणी कसे काय काम करु शकेल? त्यामुळे या रिक्त जागा ताबडतोब भरल्या जाव्यात, अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, स्मशानभूमीचा विषय खूप गंभीर आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून आज ७५ वर्षे झाली आहेत. आजही अनेक गावांमध्ये स्मशानभूमी नाही. दहन व दफन भूमी देण्याचे काम सरकारचे असताना आज अनेक गावांमध्ये स्मशानभूमी नाही. यामध्ये वन खाते खूप आडवे येत आहे.

अध्यक्ष महोदय, गायरानच्या जमिनी वन खात्याकडे वर्ग झालेल्या आहेत. त्या गायरानच्या जमिनी वन खाते द्यायलाच तयार नाही. महसूल व वन विभागाने या संदर्भात बैठक घ्यावी. हा केवळ माझ्या मतदारसंघातील विषय नाही. हा संपूर्ण महाराष्ट्रातील विषय आहे. आपण अनेकदा पेपरमध्ये वाचतो, टि.व्ही.वर पाहतो की, तहसील कार्यालयामध्ये प्रेत नेऊन ठेवले आहे, अन्य ठिकाणी नेऊन ठेवले आहे. त्यामुळे मृत शरीराची अवहेलना होते. याकरिता शासनाने प्रत्येक गावामध्ये स्मशानभूमी देत असताना दहन भूमी व दफन भूमी या वेगवेगळ्या द्याव्यात, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत

श्री.अभिमन्यू पवार ...

अध्यक्ष महोदय, वन विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला असे सांगावयाचे आहे की, किल्लारी येथे वन विभागाची जागा आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...........

असुधारित प्रत

श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता उभा आहे. आपण मला बोलण्याकरिता संधी दिली याकरिता मी आपल्याला प्रथम धन्यवाद देतो.

अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक आरोग्य विभाग व जलसंपदा तसेच वन विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. माझ्या मतदारसंघामध्ये आमगाव विधानसभा क्षेत्रामध्ये रावणवाडी-विरशी राष्ट्रीय मार्ग ३६५ हा एक महत्वपूर्ण रस्ता आहे. त्याची लांबी २९ कि.मी.ची आहे. या मार्गाची दुरवस्था झालेली आहे. या मार्गाला लागूनच एक खूप महत्वाचे म्हणजे रावणवाडी-विरशी-कामठा येथे एक विमानतळ आहे. त्या विमानतळावर जाण्याकरिता चांगला रस्ता पाहिजे. मात्र तो रस्ता एवढा खराब झालेला आहे की, एखाद्याला विमानाने प्रवास करावयाचा असेल तर त्याला विमानतळावर जाण्याकरिता उशीर होतो.

अध्यक्ष महोदय, या रस्त्याकरिता आम्ही अनेकदा मागणी केलेली आहे. या रस्त्यावर चालत असताना तेथील नागरिकांचे अनेकदा खूप मोठ्या प्रमाणात अपघात झालेले आहेत. अनेक लोकांचे जीव गेलेले आहेत. या रस्त्यावरील वाहतूक सुरळीत झाली पाहिजे म्हणून सदर रस्ता आशियन विकास बँकेंतर्गत प्रस्तावित असल्याने मागील ५ वर्षांपासून कोणतेही मोठे काम या रस्त्यावर झालेले नाही.

अध्यक्ष महोदय, प्रस्तावित रस्त्यावर रुंदीकरणासह सुधारणा करावयाची असून रुपये १६७ कोटी २२ लक्ष रुपयांचा प्रस्ताव दि.२५.६.२०२० रोजी विभागीय कार्यालयाकडून सदर विभागाला सादर करण्यात आलेला आहे. परंतु, आतापर्यंत एक रुपया देखील या प्रकल्पाला मंजूर झालेला नाही. अध्यक्ष महोदय मी आपल्या माध्यमातून विनंती करतो की, या रस्त्यासाठी लवकरात लवकर निधी मंजूर करुन या रस्त्याची सुधारणा व त्याचे नविनीकरण करण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, मी माननीय अर्थ मंत्री श्री.अजित पवार व जलसंपदा मंत्री माननीय श्री.जयंत पाटील यांना धन्यवाद देतो. माझ्या मतदारसंघामध्ये बाग प्रकल्पाच्या अंतर्गत ३ धरणे आहेत. या धरणामुळे जवळजवळ ९२ हजार हेक्टर

असुधारित प्रत

श्री.सहसराम कोरोटे....

क्षेत्राला पाणी मिळते. यामध्ये पुजारी टोला धरण, शिरपूर बान व कालीसरण धरण आहे. डाव्या कालव्याची लांबी ६० कि.मी. आहे. उजव्या कालव्याची ६५ कि.मी. आहे. याच्या दुरुस्तीसाठी माननीय अर्थ मंत्री श्री.अजित पवार व जलसंपदा मंत्री माननीय श्री.जयंत पाटील यांनी अर्थसंकल्पात २५ कोटी रुपयांची तरतूद करुन दिली. मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

अध्यक्ष महोदय, आम्ही आदिवासी बहुल क्षेत्रामध्ये राहतो. हा नक्षलग्रस्त भाग आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...........

असुधारित प्रत

श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, माझ्या कार्यक्षेत्रातील पूर्णा तालुक्यातील सिंचन प्रकल्पाच्या देखभाल, दुरुस्तीच्या कामांना गती देऊन सिंचनाकरिता वेळेत व मुबलक पाणी देणे अत्यावश्यक आहे. परंतु, पाटबंधारे विभागाकडून कालवा स्वच्छता कामे करण्याकरिता पाखरण कार्यक्रम मंजूर असतानाही त्या अंतर्गत यंत्रसामुग्रीद्वारे कालव्यातील गाळ काढणे, भराव काम करणे इत्यादी कामे करण्याकरिता यांत्रिकी विभागाकडून आवश्यक यंत्रसामुग्रीचा पुरवठा करुन ४३.४९ कि.मी. मुख्य कालव्याची, १४०.९२ कि.मी., शाखा कालव्याची, २४९.४९ कि.मी. वितरिकेची स्वच्छतेची कामे आवश्यक असतानाही ही कामे वेळेवर होत नाहीत. त्यामुळे सिंचनाकरिता पाणी पुरवठा वेळेवर होत नसल्याने शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान होत आहे.

अध्यक्ष महोदय, पूर्णा प्रकल्पाच्या कालवा वितरण प्रणालीचे बांधकाम सन १९६८ मध्ये झालेले असून मुख्य कालवा दगडी अस्तरीकरणासह बांधण्यात आलेला असल्याने जागोजागी अस्तरीकरण ढासळल्याने व कालव्यात झाडे-झुडुपे वाढल्याने मुख्य कालव्याची वहनक्षमता ५० टक्क्यांवर आली आहे. त्यामुळे मुख्य कालव्याच्या संकल्पीत २००० क्युसेक्स विसर्गापैकी सद्य:स्थितीत केवळ ११०० क्युसेक्स इतका विसर्ग होऊ शकतो. सर्व शाखा, कालवे, वितरिका या अस्तरीकरण विरहित आहेत. त्यामुळे पावसाळ्यात कालव्यात गाळ येणे, कालवा फुटणे, कालव्यामध्ये गवत, झाडे, झुडपे इत्यादी वाढल्याने कालव्याची वहनक्षमता कमी झाली आहे.

अध्यक्ष महोदय, विभागांतर्गत मंजूर पदांपैकी तांत्रिक व अतांत्रिक आस्थापनेवर केवळ २० टक्के अधिकारी व कर्मचारी कार्यरत असल्याने संबंधित विभागाचे काम चालते तरी कसे, असा प्रश्न निर्माण होतो. सिंचन प्रकल्पाच्या

श्री.रत्नाकर गुट्टे ...
देखभाल व दुरुस्तीची कामे तत्काळ करुन शेतकऱ्यांना सिंचनाकरिता मुबलक पाणी पुरवठा करण्यात यावा, यासाठी जलसंपदा मंत्री माननीय श्री.जयंत पाटील यांच्याकडे वेळोवेळी मागणी व पाठपुरावा केला असून त्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

अध्यक्ष महोदय, जायकवाडी धरणात मुबलक पाणी असतानाही माझ्या शेतकऱ्यांना जलसिंचनाकरिता आवश्यक पाणी पुरवठा केला जात नाही, तो केव्हा देणार माझ्या मतदारसंघात जलसंपदा अंतर्गत येणाऱ्या अडीअडचणी केव्हा सोडवणार, त्या सोडविण्याकरिता निधी केव्हा देणार?

अध्यक्ष महोदय, मी परळी औष्णिक विद्युत केंद्रातून बाहेर पडणाऱ्या राखेबद्दल काही बाबी मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. परळी औष्णिक विद्युत केंद्रातून २४ तास हजारो राखेचे ट्रक बाहेर पडतात. विद्युत केंद्राच्या राखेचे प्रदूषण दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ज्येष्ठ नागरिक तसेच फुफ्फुसाचा आजार असलेल्या नागरिकांना या राखेच्या प्रदुषणामुळे त्रास होत आहे. आतापर्यंत शेकडो नागरिकांना राखेच्या प्रदुषणामुळे आपले आरोग्य धोक्यात टाकावे लागलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मोठमोठ्या कार्पोरेट कंपन्यांना परळी येथून विद्युत पुरवठा केला जातो. मात्र याचे दुष्परिणाम परळी शहर व ग्रामीण भागातील जनतेला भोगावे लागतात. कोळशापासून वीज निर्मिती केल्यानंतर बाहेर पडणारी राख मोठ्या प्रमाणात वातावरणात मिसळलेली आहे. जवळपास ५ ते ६ कि.मी. अंतरावरील परिसरात ही राख हवेत पसरलेली डोळ्याने दिसत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून राखेचे धुक्याप्रमाणे चित्र निर्माण झाले आहे. दिवसेंदिवस हे प्रदूषण वाढत असून यामुळे दररोज १० ते १५ अपघात होत आहेत. नागरिकांना स्वत:चा जीव मुठीत धरुन आपला मार्ग काढावा लागत आहे. मी या संदर्भात माननीय पर्यावरण मंत्री श्री.आदित्य ठाकरे, पर्यावरण राज्यमंत्री माननीय श्री.संजय बनसोडे व ऊर्जा मंत्री महोदय तसेच प्रदूषण प्रदूषण नियंत्रण मंडळाला पत्र दिलेले आहे. यावर आजपर्यंत कुठलीही कार्यवाही केलेली नाही, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

........ यानंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

ॲड.राहूल कुल (दौंड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील रस्त्यांची अतिशय दुरवस्था झाली आहे. नॉन प्लॅन अंतर्गत २५:१५ च्या माध्यमातून काही प्रमाणात तरतूद केल्यामुळे रस्त्यांची परिस्थिती काही प्रमाणात सुधारली असली तरी अर्थसंकल्पामध्ये त्याकरिता अधिक तरतूद करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, मोजणीसाठी टोटल सर्व्हे स्टेशन नाहीत, ही गंभीर बाब आहे. मशीनरी नसल्याने मनुष्य बळ असतानाही मोजणी होत नाही. त्यामुळे नागरीकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत उचित कार्यवाही करावी, ही विनंती.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाची एमएलआरसीमध्ये एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला खरेदी खत करुन दिले व त्याच्याशी संबंध नसलेल्या तिसऱ्या व्यक्तीला आक्षेप घेण्याची तरतूद आहे. त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात ब्लॅकमेलिंग सुरु आहे. या तरतुदीमध्ये दुरुस्ती करण्यात यावी व खरेदी खतावर ज्याचा संबंध असेल त्याच व्यक्तीला आक्षेप घेण्यास मुभा देण्यात यावी. अशी दुरुस्ती केल्यामुळे अशा प्रकरणांतील ब्लॅकमेलिंगला आळा बसेल.

अध्यक्ष महोदय, महसूल विभाग – या विभागाचे अधिकारी क्वासी ज्युडीशिअल अथॉरिटीमध्ये बसताना त्यांच्याकडून दोन तीन गोष्टींची अपेक्षा आहे. अपिलमध्ये एखादा व्यक्ती जातो त्याप्रकरणी खालील स्तरावरुन नस्ती आल्या शिवाय त्यावर निर्णय घेणे अपेक्षित नाही. परंतु नस्ती न मागवता सर्रासपणे निर्णय घेण्यात येत आहेत. यामुळे कायद्याची पायमल्ली होत आहे. यासंदर्भात कडक सूचना संबंधितांना देण्यात याव्यात. तुकडे बंदीचे सर्वत्र उल्लंघन होत आहे, त्याबाबत धोरण ठरविण्यात यावे, अशी माझी सूचना आहे.

असुधारित प्रत

ॲड.राहूल कुल...

अध्यक्ष महोदय, वाळूच्या संदर्भात सातत्याने मागणी करुनही धोरण ठरविण्यात येत नाही. कृत्रिम वाळूला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असून त्याबाबत धोरण ठरविण्यात यावे, अशी माझी सूचना आहे.

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभाग – महात्मा फुले जन आरोग्य योजनेची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढविण्यात यावी. त्यामुळे अधिक प्रमाणात गरजू रुग्णांना योजनेचा फायदा घेता येईल.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील वरवण येथील ग्रामीण रुग्णालयाची श्रेणीवाढ करण्यात यावी. तसेच तेथील आरोग्य केंद्र पाटस या ठिकाणी स्थलांतरित करण्यात यावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, उद्योग विभाग – केमिकल एमआयडीसीच्या माध्यमातून प्रदूषणाच्या समस्या वाढणार नाहीत याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. माझ्या मतदारसंघातील कुरकुम एमआयडीसीच्या माध्यमातून प्रचंड प्रदूषण होत आहे. यासंदर्भात गंभीरपणे विचार करण्यात यावा व प्रदूषण विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

-------------

असुधारित प्रत

श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभाग – माझ्या मतदारसंघातील विल्होळी गवळणे येथील नाशिक कालवा क्रमांक १,२ व ३ चे भूसंपादन रद्द करण्याची विनंती मी शासनास केली होती. या विषयाच्या संदर्भात बैठकही घेण्यात आली होती. माननीय जलसंपदा मंत्री श्री.जयंत पाटील यांनी उक्त भागातील शेतकऱ्यांचा प्रश्न अत्यंत सकारात्मकपणे हाताळला व शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील लघु पाट बंधारे विभागाच्या नोंदी कमी केल्या. राज्यात प्रथमच अशा प्रकारचा निर्णय घेणारे एकमेव जलसंपदा मंत्री महोदय यांचे सर्व शेतकऱ्यांच्या वतीने मनापासून आभार व्यक्त करते.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील काही विकास कामांना निधीची आवश्यकता आहे. जलालपूर येथे मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून रस्ता तयार करण्यात आला आहे. परंतु तो सर्व रस्ता नदीच्या पुरामुळे वाहून गेला आहे. जलालपूर येथील ५ कोटी रुपये निधीची गॅबीयन वॉलसाठी आवश्यकता आहे. तो उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, वालदेवी नदीच्या पूराचा मोठा परिणाम नदी तटावरील वडनेरी, चेडी या गावांतील गोरगरीब लोकांच्या वस्तीत पाणी जाऊन दरवर्षी त्यांचे पावसाळ्यातील ४ महिने कालावधीत अत्यंत हाल होतात. त्याकरिता या ठिकाणी गॅबीयन वॉलचा ३२ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तो मंजूर करुन त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, वालदेवी नदीवरील १० बंधाऱ्यांची अतिशय दुरवस्था झाली आहे. त्यांचे गेट ओपन होत नाहीत. त्या ठिकाणी एक तरुण मुलगा वाहून गेला होता. त्याचा १२ वा झाल्यानंतर त्याचा मृतदेह सापडला होता. याकरिता सदरहू गेटची दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याकरिता दीड कोटी रुपयांच्या निधीची

असुधारित प्रत

आवश्यकता असून तो उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग – मी माझ्या मतदारसंघाच्या वतीने माननीय आरोग्य मंत्री यांचे आभार मानते. स्वातंत्र्यवीर सावकर यांची जन्मभूमी असलेल्या भुगूर येथे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयास मंजुरी दिली. माननीय उप मुख्यमंत्री व मुख्यमंत्री यांचेही मी याप्रकरणी मनापासून आभार व्यक्त करते. मी त्यांचेकडे ११ तारखेला माझ्या वाढदिवसाच्या दिवशी विनंती केली होती की, मला सदरहू भेट वाढदिवसानिमित्त द्यावी. या सर्व महोदयांनी मला मनापासून उक्त भेट दिली. त्याकरिता मी मनस्वी आभार व्यक्त करते.

अध्यक्ष महोदय, पुणे महामार्गावर शिंदेला येथे रुग्णालयाची अत्यंत आवश्यकता होती तेथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात आले आहे. त्याबद्दल मी आरोग्य मंत्री यांचे मनापासून आभार व्यक्त करते. ग्रामीण भागातील गिरणारे येथे मोठी बाजारपेठ असून हा भाग आदिवासी बहूल आहे. सदरहू ठिकाणच्या ग्रामीण रुग्णालयाची श्रेणीवाढ करुन त्याचे रुपांतर उप जिल्हा रुग्णालयात करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासंदर्भातील प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. त्यास मंजूर देण्यात यावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कृषि विभाग – आमच्या नाशिक जिल्ह्यात द्राक्ष व कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. कोविड काळ किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे द्राक्षाला कवडीमोल भाव मिळत आहे. त्यामुळे आमच्या जिल्ह्यासाठी शासनाच्या वतीने कोल्ड स्टोरेज उपलब्ध करुन देण्यात यावे. त्यामुळे या भागातील खाजगी कोल्ड स्टोरेज मालकांकडून होणारी शेतकऱ्यांची लूट थांबेल व शेतकऱ्यांना मोठा आधार मिळेल. त्यांचे हाती आलेले पीक साठवणूक करण्यासाठी कोल्ड स्टोरेजची मागणी मी सर्व शेतकऱ्यांच्या वतीने करते ती मंजूर करावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

अप्रकाशित प्रत

श्री.दिलीप लांडे (चांदीवली) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या विभागामध्ये हिरानंदानी वसाहत असून त्यावरील भागामध्ये वन विभागाची जमीन आहे. त्या ठिकाणी काही विकासकांनी डोंगर खोदल्यामुळे तेथील झाडे व वनस्पती कोसळून नष्ट होत आहे. सदरहू ठिकाणच्या झाडांचे संरक्षण करण्यात यावे, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, संजय गांधी उद्यान येथील झोपडपट्टी संघर्ष नगर येथे स्थलांतरीत करण्यात आली आहे. त्यांना नागरी सुविधा देण्यात आल्या नाहीत. त्या देण्याकरिता वन विभागाच्या माध्यमातून निधीची तरतूद करण्यात यावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास विभाग – माझ्या गावी जाताना दीडघर नदीवर एक लहान पूल असून तो धोकादायक आहे व केव्हाही कोसळू शकतो. सदरहू ठिकाणी नवीन पूल उभारण्यसाठी निधीची तरतूद करण्यात यावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभाग – आमच्या भागामध्ये एक लहान बंधारा असून त्यामाध्यमातून जनावरांना पिण्यासाठी पाणी मिळते. हा बंधारा लिक झाल्यामुळे त्याची दुरुस्ती करण्याची तरतूद करण्यात यावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभाग – चांदीवली येथे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे नवीन कार्यालय स्थापन करण्यात यावे, याकरिता तरतूद करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभाग - मुंबई शहराचा व्याप वाढत असून एकही नवीन रुग्णालय उभारण्यात आले नाही.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.दिलीप लांडे........

मुंबई शहराचा व्याप वाढत चाललेला आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण येत आहे. तरी देखील मुंबईमध्ये नवीन एकही रुग्णालय उभारण्यात आले नाही

अध्यक्ष महोदय, प्रिमिअर कंपनीच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या ६५० खाटांच्या हॉस्पिटलचे काम अर्धवट अवस्थेत आहे. ते हॉस्पिटल आहे त्या अवस्थेत MMRDA ताब्यात घेऊन त्या हॉस्पिटलची दुरुस्त करावी. उपनगरामध्ये राज्य शासनाने ६५० बेडचे एकही हॉस्पिटल नाही. त्यामुळे सदर हॉस्पिटल ताब्यात घेऊन त्याचे बांधकाम पूर्ण करण्यात यावे. त्याच ठिकाणी नर्सिंग कॉलेजची व्यवस्था आहे. सदर कॉलेजचे बांधकामही अर्धवट अवस्थेमध्ये आहे. तेही आपण ताब्यात घ्यावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-४ जवळ चेलाडी या ठिकाणी महाराष्ट्र शासनाची जागा असून गेली १० ते १२ वर्षापासून ती विनावापर पडलेली आहे, ती ताब्यात घेण्यात यावी. सदर राष्ट्रीय महामार्गावर शिरवळपासून पुण्यापर्यंत एकही हॉस्पिटल उपलब्ध नाही आहे. त्यामुळे सदर ठिकाणी एक हॉस्पिटल बांधण्यात यावे, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, महात्मा ज्योतिबा फुले ही योजना गोरगरिबांसाठी, झोपडपट्टीतील लोकांसाठी अतिशय महत्त्वाची आहे. सदर योजना चांगल्या प्रकारे सुरू आहे, त्यासाठी लागणारा निधी देखील शासन देत आहे. या योजनेची अजून व्याप्ती वाढवावी, अशी मी गोरगरिबांसाठी विनंती करतो आणि मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--------

असुधारित प्रत

डॉ.तुषार राठोड (मुखेड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागणीवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे आणि मी माझ्या मतदारसंघातील अतिशय महत्त्वाच्या मुद्यांवर सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील लेंडी हा आंतरराज्यीय प्रकल्प मागील ३७ वर्षापासून प्रलंबित आहे. बाधित क्षेत्रातील १२ गावांच्या पुनर्वसनाचे आणि नागरी सुविधांचे प्रश्न अजूनही प्रलंबित आहेत. नागरी सुविधांचे प्रश्न प्रलंबित असल्यामुळे या भागातील नागरिक अतिशय हलाखीचे जीवन जगत आहेत. पहिले पुनर्वसन आणि नंतरच धरण असा पवित्रा विस्थापितांनी घेतला आणि सन २०१२ मध्ये त्या ठिकाणी फार मोठे आंदोलन झाले होते आणि विस्थापितांनी धरणाचे काम बंद पाडले होते. तेव्हापासून आजपर्यंत सदर ठिकाणचे काम बंद आहे. मागील शासनाने सदर धरणाच्या कामाला गती देण्याच्या अनुषंगाने भरीव निधीची तरतूद केली होती. बाधित क्षेत्रातील सर्वात मोठे गाव मुक्रामाबादच्या स्वेच्छा पुनर्वसनाच्या प्रस्तावाला तत्वत: मंजुरी दिली होती. अंतिम मंजुरीसाठी सदर प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. आपण या प्रस्तावाला मंजुरी द्यावी, अशी मी मंत्री महोदय आपणास विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मागील ३७ वर्षाच्या कालावधीमध्ये उक्त ११ गावातील बाधित कुटुंबांच्या संख्येमध्ये वाढ झालेली आहे. जी मुले त्यावेळेस लहान होती, ती आता प्रौढ झालेली आहेत, त्यांची नवीन कुटुंबे तयार झालेली आहेत. त्यामुळे सदर कुटुंबांचे नव्याने सर्वेक्षण करण्यात यावे आणि मुक्रामाबादच्या धर्तीवर त्यांना सुद्धा स्वेच्छा पुनर्वसनाचा लाभ द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, ठराविक कालावधीमध्ये धरण पूर्ण होत नाही. नागरी सुविधांचे प्रश्नही मार्गी लागत नाहीत. त्यामुळे धरण पूर्ण होत नसल्यास शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना परत देण्यात याव्यात, अशी मागणी विस्थापितांकडून पुढे येऊ लागलेली आहे.

असुधारित प्रत

डॉ.तुषार राठोड.......

अध्यक्ष महोदय, बाधित क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन सन १९९४-९५ ते २००४-०५ या कालावधीमध्ये झालेले आहे. जमिनीचे दर सन १९९४-९५ साली ठरविले गेले होते आणि त्याचा मावेजा हा सन २००५ साली दिला गेलेला आहे. अतिशय कमी आणि अल्प मावेजा देऊन सदर ठिकाणी जमिनीचे संपादन करण्यात आलेले आहे. त्यामुळे सन २०१३ च्या केंद्र सरकारच्या भूसंपादन कायद्याप्रमाणे या जमिनींचा पाचपट मावेजा संबंधितांना द्यावा किंवा असे शक्य नसल्यास शासनाकडून सदर धरण पूर्ण करण्यापूर्वी विस्थापितांना सहानुभूतीपूर्वक एखादे पॅकेज जाहीर करून सदर धरणाचे काम पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी करतो आणि मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.अमित झनक (रिसोड) : अध्यक्ष महोदय, जलसंपदा मंत्री महोदय आज येथे बसलेले आहेत. आमचा वाशिम जिल्हा हा आकांक्षी जिल्हा म्हणून केंद्र शासनाने घोषित केलेला आहे. केंद्र शासनाचा एक महत्त्वाचा नदीजोड प्रकल्प आहे. पूर्व विदर्भातून पश्चिम विदर्भामध्ये होणाऱ्या प्रकल्पाच्या DPR चे काम सध्या चालू आहे. सदर DPR तयार करताना वाशिम जिल्ह्याचा समावेश करावा अशी, मी मंत्री महोदयांना विनंती करतो. आमच्या जिल्ह्यातील ज्येष्ठ लोकप्रतिनिधींनी देखील याबाबत आपल्याकडे मागणी केलेली आहे. सदर प्रकरणी आपल्या दालनामध्ये एक बैठक आयोजित करावी, अशी मी आपणास विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, स्वर्गीय शंकररावजी चव्हाण यांच्या कार्यकाळामध्ये पैनगंगा नदीवर कोल्हापुरी बंधारे बांधण्याची कामे झाली होती. आज जलदिवस आहे. स्वर्गीय शंकररावजी चव्हाण यांना आपण जलनायक असे संबोधतो. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हे कोल्हापुरी बंधारे बॅरेजेसमध्ये जर रुपांतरित करता आले तर आमच्या भागातील शेतकऱ्यांना नक्कीच न्याय मिळेल.

अध्यक्ष महोदय, जालना-पुलगाव या राष्ट्रीय महामार्गावर जळुका गावाजवळ साकापुरी प्रकल्प आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या पुलामुळे सदर प्रकल्पाचे ६० टक्के काम झालेले आहे. मी जलसंपदा मंत्री महोदयांना विनंती करतो की, सदर पुलासाठी निधीची तरतूद जर आपण करू शकलो तर पुलाची उंची वाढल्यानंतर सदर प्रकल्प १०० टक्के पूर्ण होईल.

अध्यक्ष महोदय, उद्योग विभागाबाबत एक सूचना मी या ठिकाणी मांडणार आहे. राज्यामध्ये प्रत्येक तालुक्यात MIDC असावी असा आपल्या शासनाचा संकल्पना आहे. आमच्या रिसोड तालुक्यात अजूनही MIDC झालेली नाही आहे. आदरणीय ताईंच्या कार्यालयामध्ये एक बैठक आयोजित केली होती. परंतु सदरचा प्रस्ताव अजूनही पुढे गेलेला नाही. त्यामुळे उक्त प्रस्तावावर योग्य ती कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, ग्राम विकास विभागाच्या बाबतीत मला थोडेसे बोलावयाचे आहे. राजस्थान आणि छत्तीसगडच्या राज्य शासनाने ग्रामीण कर्मचारी, शिक्षक या

असुधारित प्रत

श्री.अमित झनक........

सर्वांना जुनी पेंशन योजना लागू करण्याचा आदेश काढला आहे. आपल्या राज्यामध्ये सुद्धा संबंधित कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा आणि जुनी पेंशन योजना लागू व्हावी, अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आमच्या भागामध्ये घरकुल लाभधारकांच्या याद्या ग्राम सभेमध्ये जाहीर झालेल्या आहेत. परंतु पुन्हा नव्याने सर्व्हे करून संबंधितांची नावे कमी करण्यात आलेली आहेत. अशा गरजू लोकांना न्याय देण्यासाठी सर्व्हे चुकीचे असतील तर त्यामध्ये दुरुस्ती करून संबंधित लोकांचा समावेश सदर सर्व्हेमध्ये करून घेण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आमच्या वाशिम जिल्हा परिषदेच्या विविध पदांच्या परीक्षा कोविड परिस्थितीमुळे झालेल्या नाहीत. सदर परीक्षा लवकर घेऊन पद भरती लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मंत्री महोदयांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मागील तीन वर्षाच्या काळामध्ये त्यांनी कोविड परिस्थितीत अतिशय चांगले कार्य असल्यामुळे मी माननीय श्री.राजेश टोपे यांचे मी अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, वाशिम जिल्ह्यातील मुसळवाढी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची व येवता येथील उपकेंद्र ा ंची इमारत मागील चार वर्षापूर्वी बांधलेली आहे. परंतु कर्मचाऱ्यांअभावी सदर इमारती बंद अवस्थेत आहेत. सदर ठिकाणी कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देता आला तर या आदिवासी भागामध्ये, दुर्गम भागामध्ये आरोग्याची सुविधा त्यांना उपलब्ध होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, शिरपूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे रूपांतर ग्रामीण रुग्णालयामध्ये करण्याबाबतचा एक प्रस्ताव आरोग्य विभागाकडे सादर केलेला आहे. उक्त प्रस्तावास लवकरात लवकर मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, समुदाय आरोग्य अधिकारी ( CHO ) या पदावर राज्य शासनाचे जवळपास ११ हजार कर्मचारी कार्यरत आहेत. यांच्या बदल्या करण्याचे

असुधारित प्रत

श्री.अमित झनक.......

किंवा अंतर्गत बदल्या करण्याचे कोणतेही निकष राज्य शासनाने अजूनही तयार केलेले नाहीत. मंत्री महोदयांना माझी अशी विनंती आहे की, या कर्मचाऱ्यांची बदली करावी व काही कर्मचाऱ्यांनी राजीनाम े दिलेले आहेत त्या रिक्त जागेवर भरती करावी, अशी मी विनंती करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो आणि थांबतो. धान्यवाद.

----------

असुधारित प्रत

डॉ.राहुल पाटील (परभणी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागणीवर चर्च ा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी सर्व प्रथम उद्योग विभागावर बोलणार आहे. मराठवाड्यामधून समृद्धी महामार्ग गेलेला आहे. रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण झालेले आहे. जालना-मनमाड किंवा जालना – चाळीसगाव ही रेल्वे नव्याने सुरू होत आहे. उद्योग क्षेत्रामध्ये सोयीसुविधा चांगल्या प्रकारे विकसित झाल्यामुळे परभणीमध्ये नव्याने एक MIDC निर्माण करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय,य आमच्या परभणी जिल्ह्यामध्ये सन १९७४ नंतर दुसरी MIDC झालेली नाही. परभणीमध्ये Black Cotton Soil आहे. अशा परिस्थितीत बऱ्याच उद्योगांची मागणी आहे की, सोयाबिन सालवंट प्लांट, एक्सटॅक्ट प्लांट, स्पिनिंग मिल अशा उद्योगांसाठी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर मागणी असल्यामुळे माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, या अर्थसंकल्पामध्ये परभणी MIDC चा उल्लेख करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आता येथे माननीय जलसंपदा मंत्री श्री.जयंत पाटील उपस्थित आहेत. दुधना बंधाऱ्यावर उच्च पातळीचे चार बॅरेजेस मंजूर झालेले आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी 28 MM Cube पाणी साठविले जाणार आहे. त्याआधारे ६ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. यासाठी जवळपास ८०० कोटी रुपये लागणार आहेत. त्यामुळे या अर्थसंकल्पामध्ये सदर कामासाठी निधीची तरतूद कर ावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, परभणीमधून जायकवाडीचा डावा कालवा जातो. त्याची जवळपास २०८ किलोमीटर एवढी लांबी आहे. कित्येक वर्षापासून सदर कालव्याची दुरुस्ती न झाल्यामुळे जेथे २२०० क्युसेक्स प्रमाणे पाणी वाहत आले पाहिजे. परंतु त्या ठिकाणी ११०० क्युसेएक्सप्रमाणे पाणी वाहते.

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

डॉ. राहुल पाटील.....

ज्यावेळेस माननीय जलसंपदा मंत्री श्री. जयंत पाटील हे परभणी येथे आले होते, तेव्हा त्यांनी जाहीर केले होते की, कॅनॉल क्लिनिंगकरिता जागतिक बँकेचे कर्ज काढण्यात येईल व डाव्या कालव्याची दुरुस्ती करण्यात येईल. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, परभणी जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी विनंती करतो की, शिधापत्रिकादेखील ऑनलाईन केल्या पाहिजेत. उत्पन्न दाखला, रहिवाशी दाखला ऑनलाईन पद्धतीने काढला जातो. केवळ शिधापत्रिका मिळविण्यासाठी ऑनलाईन अर्ज करता येत नाही. प्राधान्य कुटुंब योजना लाभार्थी निवडीसाठी उत्पन्नाचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाते. यासाठी सन २०१३ ची मर्यादा घालून देण्यात आली आहे. अंत्योदय योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड करीत असताना उत्पन्नाच्या मर्यादेसाठी सन १९९९ चा शासन निर्णय आहे. आता रुपयाचे अवमूल्यन झाले आहे. तसेच महागाई देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ५० हजार व १५ हजार रुपयांच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र कोणताही तहसिलदार देत नाही. म्हणून उत्पन्नाची मर्यादा वाढविली पाहिजे. तसेच एक पालक अंतर्गत आईच्या नावे उत्पन्न प्रमाणपत्र आणि रहिवाशी प्रमाणपत्र ग्राह्य धरले पाहिजे. एक पालक म्हणून आईच्या नावे रहिवाशी प्रमाणपत्र किंवा उत्पन्नाचा दाखल मिळाला पाहिजे. यासाठी मंत्री महोदयांनी नव्याने आध्यादेश काढावेत.

अध्यक्ष महोदय, माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. कोविड – १९ मध्ये त्यांनी अतिशय चांगले काम केले आहे. याबाबत मी त्याचे अभिनंदन करतो. महात्मा ज्योतिबा फुले अंतर्गत जे इंडियन पॅथीजमध्ये होमिओपॅथी, आर्युवेदिक यांचा समावेश केला जाणार आहे काय ? परभणी जिल्ह्यात एमआरआय मशिन उपलब्ध करुन द्यावी. मुंबई शहरात कस्तुरबा गांधी रुग्णालय आहे. तशाच प्रकारे मराठवाड्यातील परभणी येथे असे रुग्णालय निर्माण करण्यात येणार काय ? आता कोविड – १९ हा संसर्गजन्य आजार आहे. असेच संसर्गजन्य आजार पुढील काळात येऊ शकतात. म्हणून ज्याप्रमाणे जालना येथे सायक्रॅटीक

अग्रिम प्रत

डॉ. राहुल पाटील.....

हॉस्पिटल मंजूर केले आहे, तशाच प्रकारे परभणी येथे इन्फेक्शन डिसिज हॉस्पिटल मंजूर करावे. याचा उल्लेख मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये करावा अशी मी विनंती करतो. मराठवाड्यात सर्वाधिक ऑक्सिजन प्लँट निर्माण केल्याबद्दल मी सार्वजनिक आरोगय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, ग्राम विकास विभागाबाबत मी थोडक्यात मत मांडणार आहे. ग्राम विकास विभागाच्या जन सुविधेच्या शासन निर्णयामध्ये जे हेड आहेत, त्यामध्ये ग्रामपंचायत भवन, ग्रामसुविधा अग्रगण्य प्रमाणात घेण्यात याव्यात. नागरी सुविधेकरिता सन २०११ च्या लोकसंख्येची अट आहे. अशा वेळेस वाढलेली लोकसंख्या ग्राह्य धरली जाणार आहे काय ? यासाठी नव्याने शासन निर्णय निर्गमित केला जाणार आहे काय ? याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मनातो.

धन्यवाद !

-------

असुधारित प्रत

श्री. दिलीपराव बनकर (निफाड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी सर्वप्रथम जलसंपदा विभागासंदर्भात बोलणार आहे. माझ्या मतदारसंघामध्ये ब्रिटीशकालीन नांदूरमधमेश्वर धरण आहे. सन २००८-०९ मध्ये माननीय जलसंपदा मंत्र्यांनी ८ गेटचे काम केले होते. आता तेथे १० गेटच्या कामासाठी तत्वत: मान्यता जलसंपदा मंत्री महोदयांनी दिली आहे. तेथे जवळपास ३० ते ३५ गावे पाण्याखाली जात आहेत. यासाठी १३० कोटी रुपयांचा निधी तात्काळ उपलब्ध करुन द्यावा व यासाठी मान्यता द्यावी, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, दुसऱ्या कॅनॉलच्या ठिकाणी पाच गावे दुष्काळी भागात येतात. त्या गावात पोटचऱ्या करण्याचा प्रस्ताव मागविण्यात आला आहे. त्या प्रस्तावाला मान्यता देण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यात आणि विशेषत: माझ्या मतदारसंघात शेतकरी विजेमुळे त्रस्त झाले आहेत. शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज उपलब्ध झाली पाहिजे. याबाबत मंत्री महोदयांकडे सातत्याने मागणी करण्यात येत आहे. तसेच अनेक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त आहेत. तेथे वीज मिळत नाही. मंत्री महोदयांनी दारणा-सांगवी येथील ३३ के.व्ही. सब स्टेशन सांगितले आहे. तसेच तामसवाडी येथील १३३ के.व्ही.च्या सब स्टेशनचा प्रस्ताव मंत्री महोदयांनी मागविला आहे. या प्रस्तावाला तात्काळ मान्यता द्यावी व तेथील काम पूर्ण करावे, अशी मी यानिमित्ताने विनंती करतो. वॉटर सप्लाय आणि स्ट्रीट लाईट कापली जात आहे. याबाबतच्या सूचना क्षेत्रीय स्तरावर द्याव्या लागतील. शेतकऱ्यांना दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत थकबाकीचे पैसे भरण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. यात तीन महिन्यांची वाढ करावी. दिनांक ३१ मार्च, नंतर ही मुदत संपणार आहे. यात वाढ करावी. शेतकऱ्यांना एमएसईबीसीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. हा त्रास दूर करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माननीय ग्राम विकास मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मागील काही वर्षापासून नगरोत्थान योजनेसारखी ग्रामोत्थान योजना तयार केली

असुधारित प्रत

श्री. दिलीपराव बनकर ....

आहे. माननीय उप मुख्यमंत्री आणि मंत्री महोदयांची याबाबत बैठक झाली आहे. माझ्या मतदारसंघातील पिंपळ आणि ओझर येथे ७० हजार लोकसंख्या आहे. या गावांकरिता ग्रामोत्थान योजना मंजूर झाली आहे. यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, माननीय आरोग्य मंत्र्यांनी मागील अडीच वर्षापासून अतिशय चांगले काम केले आहे. यानिमित्ताने मी त्यांचे अभिनंदन करतो. निफाड येथील उप ५० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाचे रुपांतर १०० खाटांमध्ये करण्यासाठी आणि पिंपळगाव येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर ५० खाटांच्या रुग्णालयात करण्याबाबतचा श्रेणीवर्धन प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. मंत्री महोदयांनी या प्रस्तावाला तात्काळ मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

धन्यवाद.

--------

असुधारित प्रत

श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे. माननीय उप मुख्यमंत्री यांनी अर्थसंकल्प सादर करताना विकासाच्या पंचसुत्रीचा उल्लेख केला होता. यात प्रामुख्याने उद्योगवाढीकरिता प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर हे मोठे शहर आहे. या शहरामध्ये राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग आणि लोहमार्ग आहेत. तेथे पाण्याची उपलब्धता आहे. तेथे चार अभियांत्रिकी महाविद्यालय, चार सुसज्ज शाळा, विद्यालये आहेत. येथून बाहेर पडणाऱ्या युवकांना काम मिळण्यासाठी पंढरपूर शहरात एमआयडीसी निर्माण होण्याची नितांत आवश्कता आहे. पंढरपूर शहरातून हजारो युवक बाहेर रोजगारासाठी जात आहेत. त्यांच्या हाताला काम मिळण्यााठी एमआयडीसीची स्थापना पंढरपूर शहराच्या जवळपास व्हावी.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात पंढरपूर आणि मंगळवेढा ही दोन शहरे आहेत. या शहरामध्ये उप जिल्हा रुग्णालय आहे. मागील आठ ते दहा वर्षापासून तेथे २०० खाटांचे रुग्णालय झाले पाहिजे, अशी मागणी होत आहे. परंतु प्रशासनाकडून यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. मी मंत्री महोदयांनाही याकरिता भेटलो होतो. त्यांनी याकरिता सकारात्मक प्रतिसाद देऊन कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. परंतु प्रशासनाने त्यावर कार्यवाही केली नाही. पंढरपूर आणि मंगळवेढा शहरातील जनतेने शासनाच्या आरोग्य सेवेचा लाभ घेऊ नये काय ? पंढरपूर शहरातील २०० खाटांच्या रुग्णालयाची मागणी पूर्ण झाली पाहिजे. मंगळवेढा शहरात १०० खाटांच्या रुग्णालयाची मागणी केली होती. तीदेखील मान्य झाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मंगळवेढा तालुक्यातील निंबोनी या गावातील ग्रामीण रुग्णालयाचा प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. त्या प्रस्तावाला मंत्री महोदयांनी मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वीय सहायक मतदारसंघातील कामांचा पाठपुरावा करण्यासाठी कोविड – १९ काळात मंत्रालयात येत होते. त्यावेळेस अनेक स्वीय सहायकांना कोविड काळात प्राण गमवावे लागले आहेत.

श्री.समाधान आवताडे.....

माझी या निमित्ताने विनंती आहे की, त्यांना देखील अपघात व आरोग्य विमा योजनेमध्ये समाविष्ट केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माननीय जलसंपदा मंत्र्यांशी माझी चर्चा झाली आहे. माझ्या मतदारसंघातील मंगळवेढा तालुक्यातील पौट या साठवण तलावाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी बैठक घेण्याचे मान्य केले आहे. सदर बैठकीमध्ये माझा प्रश्न सुटेल अशी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, मंगळवेढा दक्षिण तालुक्यातील वढापूर येथील कोल्हापूर पध्दतीच्या बॅरेजची उंची सध्या ३.५ मीटर एवढी आहे. ती उंची ५ मीटरपर्यंत वाढविल्यास पाठीमागच्या माचनूर बंधाऱ्यामध्ये दीड ते दोन मीटर पाणी साठवून राहील. त्यामुळे परिसरातील बेगमपूर, अरबळी, बोराळे, रहाटेवाडी, मुंडेवाडी या गावांना पिण्यासाठी, जनावरांसाठी व शेतीच्या पाण्यासाठी फायदा होईल. त्यामुळे माझी विनंती आहे की, वढापूर बंधाऱ्याची उंची वाढवून ५ मीटर एवढी करण्यात यावी.

---------

असुधारित प्रत

श्री.संजय जगताप (पुरंदर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या मागण्यांवर मी बोलत आहे. माझ्या मतदारसंघातील तलाठी कार्यालयांचा प्रस्ताव माननीय महसूल मंत्र्यांकडे सादर करण्यात आलेला आहे. त्यासाठी मंत्री महोदयांनी विशेष अनुदान उपलब्ध करुन द्यावे, ही विनंती आहे. तसेच आमच्या महसूल क्षेत्रातील कार्यालयांमध्ये पुरेसे कर्मचारी नसल्यामुळे कामामध्ये दिरंगाई होत आहे. तरी नायब तहसिलदार, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक यांची पदे त्वरित भरण्याबाबत निर्णय घ्यावा, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी कुंभार समाजाचा विषय या ठिकाणी मांडला आहे. मी देखील माननीय महसूल मंत्र्यांना सांगू इच्छितो की, कुंभार समाजाचा विषय अतिशय गहन आहे. त्यांना देण्यात आलेले तात्पुरते परवाने बेकायदेशीर ठरविण्यात येत आहेत. त्यामुळे गौण खनिज उत्खननासाठी विशिष्ट आराखडा मंजूर करावा व ५०० ब्रासपर्यंत मातीचे स्वामित्वधन माफ करावे, अशी या निमित्ताने विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या पुरंदर-हवेली मतदारसंघामध्ये माजी वनमंत्री कै.डॉ.पतंगराव कदम साहेब आणि माझे वडील माजी आमदार आदरणीय श्री.चंदुकाका जगताप यांच्या प्रयत्नातून श्री क्षेत्र जेजुरी, माळशिरस, भुलेश्वर, बोपगाव, कानिफनाथ मंदिर अशा पाच ठिकाणी वन पर्यटन केंद्र विकसित करण्यात आले होते. त्यांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी वन मंत्र्यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये सन १९८० साली कुष्ठरोग्यांसाठी वन विभागाच्या जागेवर अंतुले नगर नावाची वसाहत उभारली गेली होती. सदर जागेचे डिफॉरेस्टेशन करुन महसूल विभागाच्या माध्यमातून या जागेबाबत निर्णय घ्यावा. कारण या अंतुलेनगर परिसरामध्ये अनेक कुष्ठरोग्यांचे परिवार राहत आहेत. याच परिसरातील येवलेवाडी येथे बंदरवाला कुष्ठरोग रुग्णालय आहे. सदर रुग्णालयाचा परिसर खूप मोठा असून तो पुणे शहरामध्ये आला आहे.

असुधारित प्रत

श्री.संजय जगताप.....

या रुग्णालयासाठी देखील अधिकचा निधी देण्यात यावा अशी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना विनंती आहे. तसेच पुणे शहरामध्ये ससून रुग्णालयासह अनेक रुग्णालये आहेत. परंतु या बंदरवाला कुष्ठरोग रुग्णालयाच्या परिसरात हृदयरोग, कर्करोग, किडनी, मेंदू, इत्यादी आजारांसाठी आणखी एक रुग्णालय होऊ शकते. माझी विनंती आहे की, असे रुग्णालय प्रस्तावित करावे.

अध्यक्ष महोदय, माननीय ग्रामविकास मंत्र्यांना माझी विनंती आहे की, पुरंदर तालुक्यातील पंचायत समितीच्या इमारत बांधकामासाठी अधिकचा निधी उपलब्ध करुन द्यावा. तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेसाठी देखील निधी द्यावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.शेखर निकम (चिपळूण) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, चिपळूण शहरामध्ये पुरामुळे खूप मोठे नुकसान झाले. जलसंपदा विभागाकडून चिपळूण शहरामध्ये चुकीची व अन्यायकारक पुररेषा आखण्यात आली. या पुर रेषांमुळे कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नाही. आता तेथील गाळ काढण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, गाळ काढल्यानंतर नव्याने पुर रेषा आखावी. यामुळे सुमारे १ लाख लोकवस्ती असलेल्या या शहरातील छोटया-मोठया घरांची दुरुस्तीची कामे अडली आहेत ती तातडीने सुरु करण्यासाठी प्रयत्न करावेत.

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये काढले जाणारे कालवे पूर्णपणे मातीचे असतात. एक वर्षात ते भरतात. त्यामुळे माझी विनंती आहे की, पी.डी.एन. नेटवर्कच्या माध्यमातून पाणी नेले जावे. अनेक धरणांची उंची वाढविण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती मिळत आहे. एम.आय.डी.सी. च्या पाण्यासाठी धरणांची उंची वाढविली जाणार असेल तर अगोदर एम.आय.डी.सी. मंजूर करावी व नंतरच धरणांची उंची वाढवावी, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा व जलसंधारण हे शासनाचे दोन वेगवेगळे विभाग आहेत. जलसंधारणाची छोटी कामे करताना पाणी पुरवठा दाखला मिळविण्यासाठी काही शुल्क आकारले जाते. सदर शुल्क वगळण्यात यावे. जेणेकरुन, जलसंधारणाची कामे मोठया प्रमाणात केली जातील.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांचे मी मनापासून आभार मानतो. कारण त्यांच्यामुळे कोकणातील हातपाटीच्या व्यवसायाचे नवीन धोरण अस्तित्त्वात आले आहे. ६०० रुपये रॉयल्टी भरुन तेथील स्थानिक लोक अतिशय सोप्या पध्दतीने हा व्यवसाय करीत आहेत. नदीतील गाळ काढून, गोटे गोळा करुन त्यापासून विना रॉयल्टी वाळू निर्मितीचे काम करण्याबाबत निर्णय घ्यावा, अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

असुधारित प्रत

श्री.शेखर निकम.....

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये गेल्या १०० वर्षांपासून कोकणातील घराघरात कात व्यवसाय उत्तम पध्दतीने केला जातो. या व्यवसायासाठी शासनाने सुलभ धोरण निश्चित करावे व खैराच्या लागवडीला प्राधान्य देताना सुलभ नियम व अटी घालाव्यात. परिस्थिती अशी आहे की, वन विभागाचे अधिकारी काहीही करुन कोकणात येण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे बऱ्याचदा हा व्यवसाय अडचणीत येतो. त्यामुळे यामध्ये सुलभता आणावी, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये नारळ बाग, सुपारी बाग, आंबा बाग, हाय डेन्सिटी प्लांटेशन किंवा नर्सरीसाठी पाणी योजना घेतली तर कमर्शिअल दर आकारला जातो. हा नियम इतर भागातील संत्रा, मोसंबी, डाळिंब, ऊस या पिकांसाठी लागू करीत नाहीत. त्यांना शेतीचा दर आकारला जातो. आम्ही कोकणातील लोक वीज चोरी करीत नाहीत, वीज बिले वेळेवर भरतो तरीही आमच्यावरच हा अन्याय का केला जातो हा माझा या निमित्ताने प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी याबाबत देखील आपल्या उत्तरामध्ये उल्लेख करावा अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाच्या मागण्यांवर मी बोलत आहे. मोताळा तालुका हा अमरावती विभागातील ५६ अवर्षणग्रस्त तालुक्यांतील आहे. सन २००२ मध्ये या ठिकाणी तापी खोऱ्यातून बोदवड ऊपसा सिंचन योजना प्रस्तावित करण्यात आली व सन २०१६ मध्ये योजनेचे काम सुरु झाले. आज २०२२ येऊनही या योजनेचे काम पुर्णत्वास जात नाही. त्यामुळे मोताळा व मलकापूर तालुक्यातील ४४ गावे अवर्षणग्रस्त म्हणून घोषित झालेली आहेत. या गावांना पाणी मिळत नाही. माननीय जलसंपदा मंत्र्यांनी ही योजना पूर्ण करण्यासाठी तातडीने पावले उचचली पाहिजेत, ही माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझा मतदारसंघ बुलढाणा आहे. बुलढाणा जिल्हयातील प्रत्येक तालुक्याला एमआयडीसी ची सुमारे ५०० एकर जागा आहे. परंतु बुलढाणा हे जिल्हयाचे ठिकाण असूनही केवळ २५ एकर जागा आहे. मोताळा येथे देखील २५ एकर जागा आहे. त्यामुळे कुठलाही मोठा उद्योग किंवा औद्योगिक वसाहत या ठिकाणी उभी राहत नाही. त्यामुळे मंत्री महोदयांनी जागा उपलब्ध करुन द्यावी, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मोताळा तालुक्यातील तळणी आणि पिंपळा गावदेवी या ठिकाणी ३३ के.व्ही. क्षमतेचे २ विद्युत उपकेंद्र प्रस्तावित आहेत.

यानंतर श्री.धुमाळे.....

अप्रकाशित प्रत

श्री. संजय गायकवाड ...

त्यामुळे ६३, ६५ च्या डी.पी. १०० क्षमतेच्या कराव्यात अशा एकूण ५०० डी.पीं.चा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. जेणेकरुन लोडशेडिंग कमी होईल आणि जास्तीत जास्त पाणी शेतकऱ्यांना देता येईल.

अध्यक्ष महोदय, महत्त्वाचा विषय म्हणजे ग्रामविकासचे २५१५ या लेखाशीर्षाखाली जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विकास कामे केली जातात. पण २५१५ ची एक विषयाची फाईल जिल्हा परिषदेमध्ये १६ टेबलवर ३ वेळा फिरते. ही फाईल ३-३ वेळा फिरत असल्याने त्यामध्ये ६-६ महिने ते वर्ष वर्ष त्यामध्ये जाते. त्यामुळे ती कामे वेळेत पूर्ण होत नाहीत आणि तो निधी परत जातो. म्हणून ते १६ टेबलवर जाणारे काम आणि तेही ३ वेळा जाते, ते कमी करुन १ किंवा २ टेबलवर आणण्याचे काम करावे.

अध्यक्ष महोदय, बुलढाणा हे जिल्ह्याचे ठिकाण असून येथे मेडिकल कॉलेज प्रस्तावित आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता राज्य मंत्रिमंडळाची त्याला मान्यता मिळाली तर या ठिकाणी मेडिकल कॉलेज उभे राहू शकते.

अध्यक्ष महोदय, मोताळा तालुक्यामध्ये जे ग्रामीण रुग्णालय आहे त्याला उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळवून दिला तर बरे होईल.

--------

असुधारित प्रत

श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागातील गडचिरोली जिल्ह्यातील दुय्यम निबंधक कार्यालयातील पदे पूर्ण रिक्त आहेत. ती पदे भरण्यात यावीत. गडचिरोली जिल्ह्यात दुय्यम निबंधकाची एकूण ४ कार्यालये आहेत. या जिल्ह्यातील वळसा या तालुक्याच्या ठिकाणी मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे या ठिकाणी दुय्यम निबंधकाचे एक कार्यालय देण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, वन विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर आमचा गडचिरोली जिल्हा पूर्णपणे वनांनी व्याप्त आहे. या वनांना लागून अनेक शेतकऱ्यांची शेती आहे. तेथे वन्य जनावरे जातात. म्हणून तेथे नियोजन करुन जाळीचे कुंपण देण्याची तरतूद शासनाने करावी.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर आरमोरी व कुरखेडा या दोन तालुक्यांच्या ठिकाणी नगरपंचायतींच्या इमारती खूप वर्षापासून जुन्या आहेत. पावसाळ्यामध्ये त्या इमारती खूप गळतात. म्हणून या नगरपंचायतींच्या इमारतीच्या बांधकामासाठी तरतूद करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर मी माननीय आरोग्यमंत्र्यांना धन्यवाद देईल. कारण त्यांनी मागच्या वेळी पुराळा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर केले होते. आता तशाच प्रकारे देऊळगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा द्यावा. गडचिरोली जिल्ह्यामध्ये मेडिकल कॉलेज उभारले जाऊ शकते. कारण त्या ठिकाणी बेड्सची व्यवस्था झालेली आहे. गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम असून तो नक्षलग्रस्त आहे. या ठिकाणी एसआरपीचे मोठमोठे कॅम्प आहेत. आरोग्य विभागाच्या माध्यमातून या ठिकाणी मेडिकल कॉलेजची तरतूद केली तर बरे होईल. धन्यवाद. खूप मुद्दे आहेत. पण वेळेअभावी मी थांबतो.

---------

असुधारित प्रत

श्री. निलेश लंके (पारनेर) : अध्यक्ष महोदय, आज या ठिकाणी २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी व त्यांना पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी जलसंपदा विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना मंत्री महोदयांना विनंती करतो की, माझा मतदार संघ हा दुष्काळी आहे. गेल्या ५० वर्षापासून या मतदार संघातील अनेक शेतकरी लढा देत आहेत आणि ती महत्त्वाची योजना म्हणजे साखळाई पाणी योजना आहे. आमच्या राळेगण सिध्दी येथील १४ गावांची पाणी पुरवठा योजना असो, दाते गांव उपसा सिंचन योजना, पुणेवाडी उपसा सिंचन योजना, कान्हूर पठार उपसा सिंचन योजना, या सर्व योजना मंजूर झाल्या तर आमच्या भागातील पाण्याचा प्रश्न बऱ्यापैकी सुटल्याशिवाय राहणार नाही. मला खात्री आणि विश्वास आहे की, आमचे जलसंपदा मंत्री श्री. जयंत पाटील आमच्या सर्व मागण्या मंजूर केल्याशिवाय राहणार नाहीत.

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर ढवळपुरी हा भाग अत्यंत दुर्गम आहे. त्या ठिकाणी आरोग्य केंद्र आणि आमच्या पारनेर शहरात उप जिल्हा रुग्णालय झाल्यास आमच्या आरोग्याचा प्रश्न बऱ्यापैकी सुटल्याशिवाय राहणार नाही. मला खात्री आणि विश्वास आहे की आमचे कर्तव्यदक्ष आरोग्यमंत्री आदरणीय श्री. राजेश टोपे यांच्या माध्यमातून सर्व योजना मंजूर होतील.

अध्यक्ष महोदय, अहमदनगर पुणे महामार्गावर जास्त प्रमाणात अपघात होत असल्यामुळे सुपा या भागात ट्रॉमा केअर सेंटर उभारले गेले तर चांगले होईल.

अध्यक्ष महोदय, मी उद्योग विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर माझ्या मतदार संघात ढवळपुरी हा भाग सर्वात दुष्काळी भाग आहे. त्या भागात औद्योगिकरण झाले तर बेरोजगारीचा प्रश्न बऱ्यापैकी सुटेल असा मला विश्वास आहे. मंत्री महोदयांनी यामध्ये लक्ष घालावे, अशी विनंती करतो. आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

------------

असुधारित प्रत

श्री. बळवंत वानखेडे (दर्यापूर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाने गेल्या २ वर्षात शाश्वत सिंचन व जलसमृध्दीच्या दिशेने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. विशेषत: अमरावती विभागातील अनुशेष निमुर्लनाकरिता २५२८ कोटी रुपयांची भरीव तरतूद केल्याबद्दल मी मंत्री महोदय श्री. जयंत पाटील यांचे आभार व्यक्त करतो. माझ्या मतदार संघातील बळीराजा योजनेंतर्गत चंद्रभागा बॅरेज आणि वासणी लघू मध्यम प्रकल्प या दोन्ही प्रकल्पांचे सुधारित अंदाजपत्रक शासन स्तरावर प्रलंबित आहे. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, या दोन्ही प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावी.

अध्यक्ष महोदय, शहानूर या प्रकल्पावर फार मोठ्या प्रमाणात पर्यटनाची सोय होऊ शकते. कारण ते नैसर्गिक असे ठिकाण आहे. मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे. त्यामुळे त्यास मान्यता द्यावी.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघात असलेले अनेक नाले आणि नद्या या गावाच्या मध्यभागातून वाहतात. त्या नदी नाल्यांचे पाणी गावात जाऊन नुकसान होते. त्यामुळे अशा ठिकाणी पूर संरक्षक भिंती बांधण्याची गरज आहे. म्हणून या पूर संरक्षक भिंतीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी विनंती करतो. धन्यवाद.

------------

असुधारित प्रत

श्री. ज्ञानराज चौगुले (उमरगा) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी फक्त मुद्दे मांडतो. महसूल मंत्री यांचे लक्ष वेधताना मी सांगू इच्छितो की, उमरगा येथे स्वतंत्र प्रशासकीय इमारतीची गरज आहे, त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. तसेच आपण नवीन तलाठी मंडळ व तलाठी सजे यांचा आराखडा मंजूर केल्याबद्दल आपले आभार मानतो. पदे मंजूर आहेत. परंतु अद्यापपावेतो मंजूर रिक्त पदे भरली जात नाहीत. तलाठी कार्यालयाचे बांधकाम प्रलंबित आहे. त्यासाठी सुध्दा निधी उपलब्ध करुन द्यावा. तहसिलदार यांच्या वाहनांची अत्यंत दूरवस्था झालेली आहे. मागच्या वेळी देखील मी हा प्रश्न मांडला होता. त्यामुळे तहसिदारांना सुसज्ज वाहने उपलब्ध करावीत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, श्री.महादेव रामू मोतीपिवळे, आंबेवाडी,ता.चाकूर, जि.लातूर या एका सेवानिवृत्त माजी सैनिकाने पेट्रोल पंप मिळावा म्हणून अर्ज केला होता. परंतु त्याला जागा उपलब्ध करुन न देता चाकूरचे तहसिलदार व इतर अधिकारी यांनी मिळून येरमुळे येथे पेट्रोलपंप चालू करण्याकरिता खोटे, बनावट कागदपत्रे तयार करुन वाणिज्य विभागाचा अकृषिक परवाना दुसऱ्याला देऊन त्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यावर अन्याय केला आहे. त्यामुळे तो दूर करावा, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, वन विभागाच्या बाबतीत बोलत असताना लोहारा तालुक्यातील आचलेर हे पर्यटन स्थळ क्षेत्र म्हणून मंजूर आहे. तेथे इको-टुरिझम अंतर्गत पर्यटन क्षेत्र विकसित करण्यात येत आहे. पण वन विभागाकडे २-३ वर्षापासून तो प्रस्ताव प्रलंबित आहे. त्यामुळे वन विभागाच्या राज्यमंत्री महोदयांना मी विनंती करतो की आपण त्यास मान्यता द्यावी, जेणेकरुन तो विषय मार्गी लागेल.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर माझ्या मतदार संघातील पंचायत समितीची इमारत अत्यंत खराब झाली आहे. सन १९५८ ते ६० या काळात त्या इमारतीची निर्मिती झाली आहे. सन २०१७ पासून तो प्रस्ताव प्रलंबित आहे. त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन द्यावा.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री.ज्ञानराज चौगुले...

अध्यक्ष महोदय, उद्योग विभागावर बोलत असताना मी एवढेच सांगू इच्छितो की, माझ्या मतदारसंघातील जगपूर येथे औद्योगिक वसाहत आहे परंतु त्याला लागणाऱ्या पाण्याची अडचण आहे. त्याच बरोबर उमरगा औद्योगिक वसाहतीपासून केवळ २० किमी अंतरावर नारंगवाडी गावाजवळ नॅचरल गॅस पाईपलाईल ईस्ट वेस्ट स्टेशन आहे. तिथून एमआयडीसीने गॅसची मागणी करुन तेथील छोटया उद्योगांना गॅसची व्यवस्था करुन दिली तर तिथे मोठया प्रमाणात उद्योगधंदा वाढेल. माझा तालुका हा कर्नाटक राज्याच्या सीमेवर आहे. तसेच आंध्रप्रदेश राज्य सुद्धा जवळच आहे. त्यामुळे तिथे मोठया प्रमाणात उद्योगाची वाढ होईल. त्याचबरोबर तिथे नव्याने जागा उपलब्ध नाहीत त्यामुळे नवीन अतिरिक्त जागा खरेदी करुन त्याचा विस्तार करावा, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाबतीत बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी अतिशय चांगले काम केले आहे त्यामुळे त्यांच्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. परंतु त्यांच्याकडे माझ्या दोन ते तीन मागण्या आहेत. लोहारा तालुक्यातील रुग्णालयात महिला डॉक्टर नाहीत त्यामुळे आपण तिथे महिला डॉक्टारांची व्यवस्था करावी. त्याचबरोबर नळदूर्ग येथे तुळजापूर तालुक्यात उप जिल्हा रुग्णालयाची निर्मिती केली आहे. परंतु मागच्या ५ वर्षापासून ते बांधकाम सुरुच आहे. त्यामध्ये ज्या काही त्रुटी असतील त्या पूर्ण करुन तेथील गुत्तेदाराचे देयक देऊन लगेच ते रुग्णालय ताब्यात घ्यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय माननीय जलसंपदा मंत्र्यांनी अत्यंत सकारात्मक दृष्टीने काम केले आहे. माझ्या मतदारसंघातील लोहारा या नगरपंचायतीच्या पिण्याच्या पाण्यासाठीचे आरक्षण तेरणा नदीवर आहे. त्यासाठी मी मागणी केली आहे तर आपण ते तात्काळ मंजूर करुन द्यावे. त्याचबरोबर आपण मागच्याच काळात चिंचोली पळसगाव साठवण तलावासाठी सांडवा बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे त्या बद्दल मी आपले आभार व्यक्त करतो. परंतु तो सांडवा बांधल्यानंतर

श्री.ज्ञानराज चौगुले...

काही शेतकऱ्यांची अतिरिक्त जमीन त्या तलावात येणार आहे. त्याचाही सर्व्हे करण्याचे आदेश आपण खालच्या पातळीवर द्यावेत. तसेच आज जी भूसंपादन करण्याची वेळ आली आहे यासाठी आपण पैसे उपलब्ध करुन दिले आहेत. त्यामुळे आपण फक्त लवकरात लवकर कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे. त्याचबरोबर धानोरे लघू प्रकल्प कार्यासाठी बंद पाईपलाईनमधून सिंचनाची व्यवस्था करण्याची मागणी मी करीत आहे. त्यासाठी आपण निधी उपलब्ध करुन द्यावा. अशी मी विनंती करतो. माझ्या ज्या काही समस्या आहेत त्या मी आपल्याला लेखी स्वरुपात देतो. कारण आपण सकारात्मक दृष्टीने मागचे प्रश्न सोडविले आहेत. त्यामुळे आता ही आपण आपल्या स्तरावर बैठक घेऊन भविष्यात देखील ते प्रश्न सोडवावेत अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद !

--------

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष (श्री. कुणाल पाटील) :** यानंतर माननीय मंत्र्यांनी आपल्या उत्तरालासुरुवात करावी.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश आवाडे हे वरिष्ठ आहेत त्यामुळे त्यांना त्यांच्या पक्षाने एवढा वेळ मागे ठेवणे योग्य नव्हते. परंतु नाईलाज आहे. त्यामुळे आपण त्यांना २ मिनिटे बोलण्याची संधी द्यावी. तसेच सन्माननीय सदस्य श्री. यशवंत माने आणि इतर नवीन सन्माननीय सदस्यांना किमान २ मिनिटे बोलण्याची संधी द्यावी, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे, प्रत्येक सन्माननीय सदस्यांना २-२ मिनिटे बोलण्याची संधी देण्यात येईल. परंतु यामध्ये प्रत्येक पक्षाच्या एका सन्माननीय सदस्यांना संधी दिली जाईल. असा एकूण ८ मिनिटे वेळ देण्यात येईल.

असुधारित प्रत

श्री. प्रकाश आवाडे (इचलकरंजी) : अध्यक्ष महोदय, आजचा दिवस एक वेगळया पद्धतीने अतिशय महत्त्वाचा आहे. मी सभागृहाच्या आणि सभागृहाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, दिनांक २१ व २२ मार्च, १९२० साली राजर्षी शाहू महाराज आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना माणगाव परिषद आयोजित केली होती. ती परिषद वंचितांची, बहिष्कृतांची होती. दिनांक २२ मार्च रोजी राजर्षी शाहू महाराज यांनी स्वत: भाषण करुन त्यावेळी सांगितलेले होते की, "तुमचेच नाही तर दलितांचा, वंचितांचा, शोषितांचा सर्वांचा नेतृत्व करण्याची क्षमता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमध्ये आहे. त्यामुळे आपण त्यांच्या मागे राहा ते आपला उद्धार करतील. " त्यांची शताब्दी वर्ष साजरे करण्याचे सन २०२० साली ठरवले होते. आज सभागृहामध्ये तीनही पक्षांचे नेते बसलेले आहेत. त्यांना माझी विनंती आहे. कोरोनाचा काळ आहे म्हणून आपण ते टाळले परंतु आता तो काळ संपलेला आहे. तर तो शताब्दीचा राहिलेला कार्यक्रम शासन घेणार आहे किंवा नाही? त्यावेळी चर्चा झाल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने एक स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढून एक विचारपीठ तयार करण्याचा निर्णय आणि चर्चा त्यावेळी झाली होती. त्याची आंमलबजावणी हे शासन करणार आहे किंवा नाही, हा माझा प्रश्न आहे. हा प्रश्न माननीय वित्त मंत्र्यांशी निगडीत आहे. शाहू-फुले-आंबेडकर यांचे नाव घेऊन आपण रोज महाराष्ट्राच्या राजकारणाची चर्चा करतो. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कारकिर्दीची सुरुवात ज्या माणगाव परिषदेतून झाली त्याबाबतचा निर्णय आपण घोषित करणार आहात किंवा नाही ?

अध्यक्ष महोदय, दिनांक ८ मार्च, २०१९ साली आपण जो शासन निर्णय केला होता की, वर्ग २ चे वर्ग १ करायचे किंवा कृषक जमिनींना वेगवेगळया सुविधा देण्यासाठी रेसिडन्शियल किंवा इंडस्ट्रियल झोन करुन देण्याच्या संदर्भात निर्णयाची मुदत दिनांक ८ मार्च २०२२ रोजी संपलेली आहे. ती मुदत परत तीन वर्षांनी वाढवावी अशी माननीय महसूल मंत्र्यांकडे माझी विनंती आहे. हा रॉयल्टीचा विषय आहे. पंचगंगा नदी ही गाळाने भरलेली आहे. नदीमध्ये गणपतीची विसर्जन करीत असताना आम्ही ते करु दिले नाही. कारण २ मे ३ फुटाचा गणपती असला तरी तो वरच राहायचा अशी परिस्थिती आहे. शासन कोणत्याही नदीतील

श्री. प्रकाश आवाडे....

गाळ काढला जात नाही हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. त्यामुळे तो गाळ काढून नदीतील पाण्याचा साठा वाढविण्याचे काम व्हायला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, इचलकरंजी हे आमचे प्रांत कार्यालय आहे. पण तहसिल कार्यालय आहे. माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांना माझी विनंती आहे की, आपण पूर्वी महसूल मंत्री असताना सुद्धा या विषयावर चर्चा झाली होती त्यानंतर परत पाणी वाहून गेले आणि आज पुन्हा तीच परिस्थिती आहे. त्यामुळे आपण आता तो निर्णय घ्यावा. मागच्या काळात एकदा तो निर्णय घेण्याचे ठरला,कॅबिनेट बैठकीमध्ये तो विषय आला परंतु कोल्हापूर ऐवजी सांगली जिल्ह्यामध्ये एक तालुका वाढला. त्यामुळे आता कोल्हापूर जिल्ह्यात एक तालुका वाढविण्यात यावा. आज इचलकरंजी शहर हे ३.२५ लाख लोकसंख्येचे गाव आहे. पैसे भरले नसल्याने त्या गावातील पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन इरिगेशन विभागाने बंद केले आहे. त्यांना नगरपालिकेचे अनुदान मिळाले नाही म्हणून त्यांनी हे पैसे भरले नाहीत. नगरपालिकेकडून ३२ कोटी रुपयांचे येणे बाकी आहे. काल अधिकाऱ्यांनी त्यांना पाण्याचे पैसे भरण्याचे सांगितले. त्यांनी सांगितले की, आमच्याकडे फक्त ३० ते ३५ लाख रुपये आहेत तेव्हा आपण ते पैसे भरा आम्ही पाणी कट करीत नाही असे अधिकारी म्हणाले. तेव्हा पैसे भरुन घेतले आणि पाणी बंद करण्याचा निर्णय दिला. मग असे असताना लोकांनी रस्तावर यायचे आहे काय ? आमच्या भागातील पाण्यासंबंधीची चर्चा खूप वेगळी आहे. आम्हाला वारणा नदीतून पाणी देणार असे सांगितले. परंतु आता परत माननीय उप मुख्यमंत्र्यांनी काळमवाडीचे पाणी सुळकुड योजनेतून घेण्याचे सांगितले आहे. आता कुठुन पाणी मिळायचे ते मिळू द्या. परंतु जे पाणी आहे ते तरी निदान सुरु ठेवा. शहराचे पाणी बंद करु नका. कारण आमचे पिण्याचे पाणी बंद ठेवण्याइतकी गंभीर परिस्थिती तिथे निर्माण करणे योग्य होणार नाही. माननीय मंत्र्यांनी यामध्ये लक्ष द्यावे अशी आमची विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी माझी शिफारस मला केल्यामुळे सांगावे लागेल की, मी सन १९८५ पासून या सभागृहामध्ये आमदार आहे.

श्री. प्रकाश आवाडे....

आपण आठवण करुन दिले हे चांगले झाले. परंतु पहिल्यांदाच अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये बोलण्यासाठी एवढी धावपळ करावी लागली. यापूर्वी असे कधीही सभागृहात बघितले नव्हते. एवढा वशिला किंवा एवढया वेळा अध्यक्ष महोदय, अध्यक्ष महोदय, असे म्हणून हात वर करुन ओरडणे असे पहिल्यांदा माझ्या वाटण्याला आले आहे. यापूर्वी असे कधीही झाले नव्हते. अर्थसंकल्पावर सर्व बाजुने मुक्तपणे चर्चा होत होती. याबाबत काय निर्णय असेल ते माननीय मंत्री उत्तरामध्ये घेत होते पण बोलण्यासाठीच संधी द्यायची नाही, असे कधीही झाले नाही.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. कुणाल पाटील ):** येथे प्रत्येक पक्षाकडून सन्माननीय सदस्यांच्या नावांची यादी आलेली आहे.

श्री. प्रकाश आवाडे : अध्यक्ष महोदय, माझे सहाव्या क्रमांकावर नाव आहे असे मला सांगण्यात आले होते. आपल्याला सांगून मी डॉक्टरांकडे जाऊन आलो.

**तालिका सभाध्यक्ष** : आपली इच्छा असेल तर आपण पक्ष निहाय नावे सांगू शकतो.

श्री. प्रकाश आवाडे : अध्यक्ष महोदय, आम्ही येथे लोकांचे पक्षाचे प्रश्न मांडण्यासाठी येतो. माझी आपल्याला विनंती आहे. माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांना माझी विनंती आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये काळामोडी धरण बांधले आहे. त्यातून कॅनलमधून पाणी येत नाही म्हणून बोगद्याची मागणी केली. मी स्वत: या करिता संघर्ष केला. बोगदा मान्य झाला व नंतर तो तयार झाला. तत्कालीन उपमुख्यमंत्री माननीय श्री. मुंडे यांच्या हस्ते या बोगद्यात पाणी सोडले. या बोगद्यातून ९.१७ टीएमसी पाणी येणार होते. मात्र आज केवळ ४ ते साडे ४ टीएमसी पाणी येत आहे. याचे एकमेव कारण हे आहे की, या बोगद्याचे लायनिंग झाले नाही. बोगद्यात संरक्षक भिंत नाही,बंदिस्ती केली नाही म्हणून साडे ४ टीएमसी पाणी सोडले जाते. बोगदा तयार झालेला असून केवळ साडे ४ टीएमसी सोडले जाते. आम्ही गटारीचे पाणी पीत आहोत. सर्व ९.१७ टीएमसी सोडले तर वहाते पाणी होईल. येथे शिरोळचे मंत्री महोदय आहेत. आम्ही कसे पाणी पितो हे आपल्याला माहीत आहे. माननीय मंत्री श्री. आदित्य ठाकरे हे देखील येथे आहेत. प्रदूषित पाण्याचा प्रश्न आपल्याला माहिती आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदी वाहती ठेवा. या करिता पाणी सोडा. मात्र या बोगद्यात पाणी सोडले जात नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय कामगार मंत्री येथे आहेत. इचलकरंजी येथे खर्चीवाला यंत्रमागाचा फार मोठा प्रश्न आहे. कामगारांच्या मजुरीचा प्रश्न आहे. काल अधिकाऱ्यांनी प्रांत कार्यालयात बैठक घेतली. खर्चीवाल्या यंत्रमागाचा व यंत्रमाग कामगारांचा प्रश्न सोडवण्याचा निर्णय घ्यावा. यंत्रमाग, रिक्षावाले व घरेलु कामगारांचे

अप्रकाशित प्रत

श्री. प्रकाश आवाडे ...

प्रश्न प्रलंबित आहेत. त्यांचे कल्याणकारी मंडळ नेमावे. अध्यक्ष महोदय, हातखंडे तालुक्यात एमआयडीसी सुरु करावी, अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

असुधारित प्रत

श्री.मोहनराव हंबर्डे ( नांदेड दक्षिण ): अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३च्या अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागासंबंधी मी बोलू इच्छितो. माझ्या मतदारसंघात विष्णुपुरी प्रकल्प व मोठे धरण आहे. हे धरण नांदेड जिल्ह्याकरिता जीवनदायी आहे. या धरणाला १८ दरवाजे आहेत. या पैकी १८ क्रमांकाचा दरवाजा सर्वांपेक्षा मोठा असून ३ कि.मी खोलीचा आहे. हा दरवाजा १० वर्षापासून उघडला नसल्याने धरणात कमीत कमी १० फूट गाळ साचला आहे. हा दरवाजा दर वर्षी उघडला तर धरणातील गाळ निघून जाईल व आजुबाजूच्या विहिरीला व बोरला पाणी येईल. येथे गाळ साचल्यामुळे विहिरीचे पाणी कमी होत आहे. बोरला ५५०फूटपेक्षा पाणी लागत नाही. या १८ क्रमांकाच्या दरवाजाचे काम केले तर गाळ साचणार नाही व विहिरीला पाणी लागेल.

अध्यक्ष महोदय, गेल्या दोन वर्षापासून राज्यात अतिवृष्टी होत आहे. शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. त्यांचे पीक हाताशी येत नाही. महाविकास आघाडी सरकार शेतकऱ्यांना मदत करीत आहे. शासनाने शेतकऱ्यांना कमीत कमी एक वर्ष बिल माफ करावे. औद्योगिक क्षेत्रात रात्री व दिवसा वीज दिली जाते. मात्र शेतकऱ्यांना रात्रीची १० तास व दिवसा ८ तास वीज दिली जाते. या ऐवजी ८ तास दिवसा वीज द्यावी जेणेकरुन शेतकऱ्यांचे विंचू,साप यांच्या दंशामुळे मृत्यू होणार नाहीत. शेतकऱ्याच्या मुलाला साप चावल्यामुळे त्याचा जर मृत्यू झाला तर आईवडिलांची अतिशय दुर्दशा होते. आता महाविकास आघाडी सरकार सत्तेत आले आहे. सरकारने या बाबत विचार करुन शेतकऱ्यांना दिवसा ८ तास वीज द्यावी.

अध्यक्ष महोदय, माझ्या नांदेड तालुका येथे सुमारे ७ लाख मतदार आहेत. येथे दक्षिण व उत्तर असे दोन मतदारसंघ आहेत. येथे एकच तहसील कार्यालय असल्यामुळे लोकांना अडचण होते. लोकांची रेशन कार्ड व इतर कामे होत नाहीत. या करिता दोन तालुके करावेत, अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

असुधारित प्रत

श्री. यशवंत माने ( मोहोळ ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३च्या अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ऑक्टोबर २०२०मध्ये अवकाळी पाऊस झाला होता. तेव्हा मोहोळ मतदारसंघातील बऱ्याच गावांचे फार मोठे नुकसान झाले होते. या गावांना नुकसान भरपाई देण्यात आली. माझ्या मतदारसंघातील पेणूर, पाटकुली, खंडाळी या ३ गावांतील ३ हजार ५०० शेतकऱ्यांचे ३ कोटी २५ लाख रुपयांचे नुकसान भरपाई दिलेली नाही. मंत्री महोदय माननीय श्री. बाळासाहेब थोरात यांना मी विनंती करतो. लवकरात लवकर शेतकऱ्यांचे अनुदान देण्यात यावे अशी विनंती करतो

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील आष्टी व चिरापूर उपसा योजना सन १९९५ मध्ये मंजूर झाली होती. मागील दोन वर्षात जलसंपदा विभागाचे मंत्री माननीय श्री. जयंत पाटील व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या पुढाकाराने ३ वर्षात निधी दिला गेला. सन २०२०-२१ मध्ये ७० कोटी रु, सन २१-२२ मध्ये ८० कोटी रुपये व सन २२-२३ मध्ये ९० कोटी रुपये असे २४० कोटी रुपयांचा निधी दिल्यामुळे या दोन्ही उपसा सिंचन योजना डिसेंबर २०२३ मध्ये पूर्ण होतील. या करिता मी माननीय जलसंपदा मंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांचे आभार मानतो. माझ्या मतदारसंघात ९ गावे पाण्यापासून वंचित आहेत. आष्टी उपसा सिंचन योजने या गावांना वरून पाणी आणता येईल. वाफळी, वडाची वाडी, हिवरे, चिखली, कुरणवाडी, खंडोबाची वाडी, कोंबडेवाडी या ९गावांना शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी पाझर तलाव व साठवण तलावात पाणी सोडले तर या शेतकऱ्यांना पाणी मिळेल एवढी माननीय जलसंपदा मंत्री यांना विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

असुधारित प्रत

श्री.रमेश बोरनारे ( वैजापूर ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३च्या अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांचे मी स्वागत करणार आहे. त्यांनी अतिशय चांगला अर्थसंकल्प मांडलेला आहे. या ठिकाणी वेळ कमी असल्यामुळे मी थोडक्यात बोलणार आहे. मला अर्थसंकल्पावर बोलायचे होते मात्र वेळे कमी असल्याने मी माझ्या भागापुरते बोलणार आहे. राज्यात व देशात कोव्हिड योध्दा म्हणून ज्यांचे नाव झाले असे माननीय आरोग्य मंत्री यांना मी विनंती करतो. वैजापूर मतदारसंघातील दोन प्रश्न मी मांडणारआहे. माझ्या तालुक्यात शिरुर व खंडाळा ही दोन गावे सर्वात मोठी आहेत. या दोन गावांमध्ये ३०-३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय सुरु करावे, अशी विनंती करतो.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.रमेश बोरनारे...

मी स्थानिक आमदार निधीतून आठही ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रांना अँब्युलन्स दिल्या. परंतु, त्या अँब्युलन्स देखभाल व डिझेलअभावी उभ्या राहतात. त्यामुळे ती काळजी आपण प्रामुख्याने घ्यावी.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना मी मंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, वैजापूर तालुक्यामध्ये सिनीदेव गाव या उच्च पातळीच्या बंधाऱ्याला आपण घोषणा केल्याप्रमाणे लवकरात लवकर मंजुरी द्यावी. वाकला परिसरातील सांदेश्वरी या प्रकल्पाला मंजुरी द्यावी, अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, शिवणा टाकळी मध्यम प्रकल्पाच्या कॅनॉलची जी अपूर्ण कामे आहेत, ती अपूर्ण कामे देखील करुन देण्याबाबत मी मंत्री महोदयांना विनंती करतो. महसूलच्या बाबतीत मी फक्त एवढेच सांगेन की, माननीय श्री.बाळासाहेब थोरात यांना धन्यवाद देतो. त्यांनी वैजापूर येथे अतिशय सुंदर तहसील कार्यालय इमारतीस मंजुरी दिली. तलाठी कार्यालय व मंडळ कार्यालय... नागामफान, चिंचरगाव, मालगाव, मनूर, वाकला, खंदाळा नारगाव, लासूर, पालखेड, नेवरगाव, गाजगाव, काठेपिंपळ, राजणगाव या ठिकाणी तलाठी कार्यालयाला मंजुरी देण्यात यावी, अशी मी आग्रहाची विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, वैजापूर तालुका खूप दिवसांपासून एमआयडीसीकरिता मागणी करीत आहे. त्यामुळे मी उद्योग मंत्री महोदय तसेच आमच्या पालक मंत्री महोदयांना विनंती करतो की, वैजापूरच्या रोटेगावचा एमआयडीसीचा जो प्रश्न आहे, त्याबाबत शेतकरी व एमआयडीसी यांच्यामध्ये कुठेतरी समन्वय साधून तो मार्गी लावण्याचा प्रयत्न करावा.

असुधारित प्रत

श्री.रमेश बोरनारे...

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभागाच्या मागण्यांवर बोलताना मी एवढेच सांगणार आहे की, वैजापूर हा मोठा तालुका आहे. तेथे १३२ के.व्ही.चे एकच सेंटर आहे. त्यामुळे शूरबंगाच्या परिसरात १३२ के.व्ही.च्या एका सेंटरची नव्याने उभारणी प्रामुख्याने करावी.

अध्यक्ष महोदय, मी ग्रामविकास मंत्री महोदयांना विनंतीपूर्वक सांगतो की, वैजापूर तालुका हा मराठवाड्याचे प्रवेशद्वार आहे. त्यामुळे ग्रामविकास मंत्री महोदयांनी त्या ठिकाणी मराठवाड्याचे एक मोठे प्रवेशद्वार बांधून द्यावे, अशी मी विनंती करतो व एवढे बोलून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..........

असुधारित प्रत

श्रीमती गिता जैन (मीरा-भाईंदर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता उभी आहे.... (अडथळा) आपण समारोप करावयाचा आहे. मी प्री समारोप करीत आहे. आपण बसावे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाच्या मागण्यांवर मी खूप थोडक्यात बोलणार आहे. मुंबई महानगरपालिकेतर्फे मीरा रोड येथील म्हाडा संकुलात दि.२२ जानेवारी, २०१४ रोजी प्रती दिन दीड दशलक्ष लिटर एवढा पाणी पुरवठा मंजूर केला आहे. त्यासाठी क्रॉस कनेक्शन झालेले आहे. पैसे भरुन झालेले आहेत. तरी देखील सन २०१४ पासून आजमितीपर्यंत ते पाणी मुंबई महानगरपालिकेकडून आम्हाला दिले जात नाही.

अध्यक्ष महोदय, मीरा-भाईंदर महानगरपालिकेकडून त्याकरिता वारंवार पत्रव्यवहार देखील झालेला आहे. सदर प्रकरणी मंत्री महोदयांनी जातीने लक्ष घालून मुंबई महानगरपालिकेकडून मीरा-भाईंदर महानगरपालिकेला मंजूर दीड दशलक्ष लिटर पाणी पुरवठा तत्काळ सुरु करण्याचे आदेश द्यावेत. मी मागणी करते की, आपण लवकरात लवकर त्यासंबंधी एक बैठक आयोजित करुन त्यांना तशा सूचना द्याव्यात.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना मला हे सांगावयाचे आहे की, मीरा-भाईंदरची २० लाख इतकी लोकसंख्या आहे. पंडित भिमसेन जोशी हे रुग्णालय २०० खाटांचे आहे. ते १०० टक्के क्षमतेने सुरु ठेवण्याकरिता, रुग्णालय इमारतीची देखभाल व अद्ययावत करण्यासाठी राज्य शासनाकडून निधीची आवश्यकता आहे व त्याकरिता मी वारंवार पत्रव्यवहार देखील केलेला आहे. मी आपल्याला धन्यवाद देखील देते की, आपण आताच बाहेर सांगितले की, मी तेथे मुलाखतीला येतो व काय मागण्या आहेत त्या मंजूर करतो. मागण्यांची लिस्ट आपण तेथे आल्यावर देण्याकरिता मी बाकी ठेवते. मी तेथेच त्याबाबत आपल्याला सांगेन.

श्रीमती गिता जैन...

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाचा आमच्याकडे खूप ज्वलंत असा प्रश्न आहे, तो म्हणजे जुन्या इमारतींचा डिम्ड कन्व्हीनिअन्स करायची प्रक्रिया अजूनही तेवढी सोपी नाही. आपण त्याकरिताच्या डॉक्युमेंटची संख्या २२ वरुन ८ इतकी केली असली तरी, ती तेवढी सोपी नाही. परंतु, आम्ही जेव्हा ही डिम्ड कन्व्हीनिअन्सची प्रक्रिया करतो तेव्हा ३०-४० वर्षे जुन्या इमारतीचा ७/१२ आम्ही फिरवायला जातो तेव्हा माहिती होते की, त्यावर युएलसीचा बोजा आहे. त्यावर एन.ए. टॅक्सचा बोजा आहे. ४० वर्षे जुन्या इमारतीकडून आपण कायद्यानुसार युएलसीची मागणी देखील करु शकत नाही. महसूल विभाग त्या इमारतींकडून युएलसीची मागणी करु शकत नाही. जोपर्यंत युएलसीचा बोजा हटवत नाही, तोपर्यंत ७/१२ फिरु शकत नाही.... (अडथळा)... आमच्या एमएमआरच्या दृष्टीने हा खूप महत्वाचा विषय आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.बाळासाहेब थोरात आज आपण एन.ए. टॅक्सला तेथे स्थगिती दिलेली आहे. परंतु, आमच्याकडे एन.ए. टॅक्स पूर्ण लेआऊट असेल तर पूर्ण इमारतीला डिव्हीजन करण्यापेक्षा पूर्ण लेआऊटला एकसारखा टॅक्स म्हणजे १०० रुपये डिव्हाईड करण्याऐवजी, १०० रुपये संपूर्ण इमारतीकडून वसूल केले जातात, हा देखील एक प्रश्न आहे. आमच्याकडे देखील एकदा स्थगिती देऊन, त्याचा पूर्ण अभ्यास करुन एन.ए. टॅक्स तेथे लावावा. युएलसीचा टॅक्स लवकरात लवकर जुन्या इमारती वगळून... जुन्या इमारतींचा पुनर्विकास करावयाचा असेल व त्या लोकांच्या जीविताची हानी करावयाची नसेल तर, मला असे वाटते याबाबत लवकरात लवकर निर्णय करावा व त्यांना मदत करावी. धन्यवाद.

........

असुधारित प्रत

श्री.हिरामण खोसकर (इगतपुरी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी महसूल, वन विभाग, जल संपदा विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. माझ्या मतदारसंघातील किकवी धरणास सन २००९ मध्ये शासनमान्यता मिळालेली आहे. सन २०१४ मध्ये त्याचे टेंडर झालेले आहे. परंतु, आतापर्यंत त्या कामाकरिता कुठलीही तरतूद झालेली नाही. त्याच्या बांधकामाकरिता ७३७ कोटी रुपये लागणार आहेत. भूसंपादनाकरिता ६६६ कोटी रुपये लागणार आहेत.

अध्यक्ष महोदय, मी गेल्या २ वर्षांपासून याबाबतीत पाठपुरावा करीत आहे. त्याबाबतीत जलसंपदा मंत्री महोदयांनी २-३ वेळा बैठका देखील घेतलेल्या आहेत. माझ्या मतदारसंघामध्ये वैतरणा धरणातील पाणी किकवी धरणामध्ये टाकायचे आहे. किकवी धरणात पाणी टाकण्याबाबतच्या कामाची टेंडर प्रक्रिया झालेली आहे. परंतु, तेथील काही शेतकऱ्यांच्या ६२३ हेक्टर एवढ्या जमिनी परत द्यावयाच्या आहेत. ते पाणी आपण मुकणे धरणात टाकून मराठवाड्याला सिंचनाकरिता देणार आहात. परंतु, माझी विनंती आहे. महसूल मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. या ठिकाणी ज्या काही जमिनी द्यावयाच्या आहेत त्या जमिनींच्या बाबतीत महसूल खाते जलसंपदा विभागाला सांगते व जलसंपदा विभाग महसूल खात्याला सांगत आहे. त्या ठिकाणी सर्व्हे नंबर त्यांना सापडत नाही. माझी विनंती आहे, तो सर्व्हे नंबर लवकरात लवकर शोधून शेतकऱ्यांना ती जमीन लवकरात लवकर द्यावी.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. माझ्या त्र्यंबकेश्वर तालुक्यात पंचायत समितीची इमारत नसल्यामुळे नगरपालिकेच्या इमारतीमध्ये पंचायत समितीचे कामकाज चालते. तेथे पंचायत समितीच्या इमारतीकरिता निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.हिरामण खोसकर ...

अध्यक्ष महोदय, सभागृहात उद्योग मंत्री महोदय उपस्थित आहेत. माझ्या मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर प्रकल्प झाले. तेथे मोठ्या प्रमाणात एमआयडीसी आहेत. माझी विनंती आहे की, शासनाचा नियम असे सांगतो की, नोकऱ्यांमध्ये ८० टक्के स्थानिक व २० टक्के बाहेरचे असतील. परंतु, शासनाचे काम उलट्या दिशेने चाललेले आहे. तेथे नोकऱ्यांमध्ये ८० टक्के बाहेरचे व २० टक्के स्थानिक आहेत. याची पडताळणी करुन स्थानिकांना नोकरी देण्याबाबत उद्योग मंत्री महोदयांनी निर्णय करावा.

माझी विनंती आहे, आरोग्याच्या बाबतीत आमचे माननीय आरोग्यमंत्री तळागाळात जाऊन .... आमच्या सारख्या छोट्या छोट्या कार्यकर्त्यांना फोन करुन आरोग्याबाबतच्या समस्यांबाबत विचारतात. माझ्या मतदारसंघात घोटी व त्र्यंबकेश्वर येथे उप जिल्हा रुग्णालय व्हावे याकरिता मी वारंवार पाठपुरावा करीत आहे. त्याची नस्ती देखील शासनाकडे आलेली आहे. माझी विनंती आहे की, ते देखील करावे.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, माझा मतदारसंघ भौगोलिकदृष्टया मोठा असल्याने तेथील कोनेवाळा या गावात १३२ के.व्ही.च्या उपकेंद्राबाबत मी सुचविलेले आहे. परंतु, त्याबाबत अजून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तेथे जर १३२ के.व्ही.चे उपकेंद्र झाले तर शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल. तेथे वारंवांर वीज जाते तो प्रश्न मिटेल.

अध्यक्ष महोदय, माझ्यासारख्या कार्यकर्त्याला उशिरा का होईना बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले व मंत्री महोदयांचे मनापासून आभार मानतो. आमच्या सारख्या ज्युनिअर आमदारांना देखील बोलण्याची संधी द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

.......

यानंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल व वन विभाग – माझा मतदारसंघ दुष्काळी असून भौगोकिदृष्ट्या मोठा आहे. त्यामुळे या भागातील महसूल विभागातील सर्व रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत. आमच्या महसूल विभागातील प्रांत, तहसिलदार व अप्पर तहसिलदार यांच्या वापरातील वाहने कालबाह्य झाली आहेत, त्यांना तातडीने नवीन वाहने उपलब्ध करुन देण्यात यावीत. माझ्या मतदारसंघामध्ये गावनिहाय तलाठी कार्यालये सुरु करण्यात यावीत. आणखी एक महत्त्वाचा विषय आहे की, माझ्या मतदारसंघातील ४१ गावांतील सिलींगच्या जमिनी भूमीहीनांना देण्यात आल्या आहेत. त्यांना आर्थिक अडचणी भासू लागल्या असून उक्त जमिनींची विक्री करण्यासाठी शासनाच्या परिपत्रकानुसार जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून अनफीट प्रमाणपत्र घेण्याची अट आहे. माझ्या मतदारसंघापासून जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कार्यालय १५० कि.मी. अंतरावर असल्याने तेथे जाऊन उक्त लाभार्थींना प्रमाणपत्र घ्यावे लागणार आहे. सदरहू परिपत्रकातील अट शिथील करुन तालुका वैद्यकीय अधिकारी यांचा अनफीटचा दाखला त्यांची जमीन विक्री करण्यासाठी ग्राह्य धरण्यात यावा, याकरिता संबंधितांना आदेश देण्यात यावेत. मी केलेल्या सर्व मागण्यांची पूर्तता करण्यात यावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभाग – माझ्या मतदारसंघामध्ये ८ प्राथमिक आरोग्य केंद्र असून तीन आरोग्य केंद्राचे काम पूर्ण होत आले आहे. त्यासाठी २५४ पदे मंजूर असून प्रत्यक्षात १४० पदे भरलेली आहेत व ११४ पदे रिक्त आहेत. उक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, जत तालुका दुष्काळी व भौगोलिकदृष्ट्या मोठा असल्याने तेथे ट्रॉमा केअर सेंटर उभारणे अत्यंत गरजेचे आहे.

श्री.विक्रमसिंह सावंत...

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभाग - जत तालुक्यासाठी म्हैसाळ योजना राबविण्यात आली. त्यामधील एकूण क्षेत्रफळापैकी २२,५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार होते ते अद्याप ओलिताखाली आले नाही. माननीय जलसंपदा मंत्री यांनी २२० कोटी रुपये निधी मंजूर केला, त्याबद्दल मी त्यांना जत तालुक्याच्या वतीने मनापासून धन्यवाद देतो. उक्त योजनेची उर्वरित कामे लवकरात लवकर पूर्ण करवीत, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, म्हैसाळ योजनेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांच्या आराखड्यामध्ये जत तालुक्यातील ११५ गावे आहेत. त्यामधील ३१ गावांसाठी अद्यापही पिण्याच्या पाण्याची योजना राबविण्यात आलेली नाही. म्हैसाळ योजना शेतीकरिताच्या पाण्यासाठी आरक्षित आहे, ती पिण्याच्या पाण्यासाठीही आरक्षित करावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभाग – जत तालुक्याच्या पश्चिम भागामध्ये पाणी आले आहे. डब्बापूर भागामध्ये महापारेषणच्या माध्यमातून १३२ के.व्ही.उप केंद्र उभारण्यात यावे. जत उप विभागातील मौजे सारमळगेवाडी व बिरनाळ येथे ३३ के.व्ही. उप केंद्र उभारण्यात यावे, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी वेळे अभावी माझे भाषण पूर्ण करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

----------

असुधारित प्रत

श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभाग – महसूल विभागाच्या मागण्यांना सभागृहात मंजुरी देण्यात येत आहे. या विभागातील लोक काय काम करतात व त्यांना कशासाठी वेतन देण्यात येते, यावर चर्चा केली पाहिजे. या सभागृहामध्ये बसून आपण सर्व राज्याच्या हिताचे काम करतो. सभागृहाच्या माध्यमातून १-१ रुपयाच्या खर्चास मान्यता दिल्यानंतर तो विविध कामांसाठी वितरित करण्यात येणार आहे. हा निधी वितरित केल्यानंतर महसूल विभागातील काम कशा पद्धतीने सुरु आहे, यासंदर्भात मला मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे. महसूल विभागातील अधिकाऱ्यांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीकोनातून निर्णय घेतले नाही तर एजंटांच्या जीवावर चालणारे महसूल खाते, असे म्हणण्याची वेळ येईल.

अध्यक्ष महोदय, लहानसहान कामासाठी जिल्हाधिकारी, प्रांत, तहसिल या कार्यालयात जाणाऱ्या सामान्य माणसांना नाडले जाते, त्यासंदर्भात काही निर्बंध लावण्यात येतील काय ? माझ्या मतदारसंघातील लोक हे धरणातील पुनर्वसनग्रस्त लोक आहेत. त्यांची अडचण सोडविण्यासाठी जिल्हा पुनवर्सन कार्यालयाकडून त्यांना जमिनी अलॉट करण्यासाठी तत्परता दाखविली पाहिजे ती दाखविण्यात येत नाही. आम्ही याप्रकरणी अपर जिल्हाधिकारी, पुनर्वसन अधिकारी यांचे समवेत सातत्याने बैठका घेत आहोत. आपण या अधिकाऱ्यांना काम केल्याच्या बदल्यात वेतन देतो. परंतु ते काम करीत नसतील तर त्यांचे वेतन थांबविण्याची व्यवस्था करण्यात येईल काय ? या सर्व बाबींकडे गांभीर्याने पाहिले तर अनेक लोकांना न्याय मिळेल. महसूल मंत्री महोदयांनी माझ्या मतदारसंघातील पुनर्वसनाच्या प्रकरणांसंदर्भात बैठक घेतली तर अनेक लोकांवर उपकार होतील व जे चुकीचे काम करतात त्यांच्यावर कारवाई होऊन जरब बसेल. याच गोष्टी मंत्री महोदयांकडून आम्हाला अपेक्षित आहेत. त्यांनी सदरहू प्रकरणी योग्य ते नियम लावावेत, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, शंकराचार्य पीठ, कोल्हापूर व मौनी महाराज ट्रस्ट, पाडगाव

असुधारित प्रत

श्री.प्रकाश आबिटकर...

यांचेकडे हजारो एकर जमिनी आहेत. या संस्थांच्या सनदा छत्रपती शाहू महाराज यांनी रद्द केल्या होत्या. तरी देखील राजरोसपणे त्या जमिनी आपल्या नावावर ठेवून लोकांना भूमीहीन करण्याचे काम करीत आहेत. या विषयाच्या संदर्भातही मंत्री महोदयांनी एक बैठक आयोजित करावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, एका बाजुला माझ्या मतदारसंघातील पुनर्वसनाचा प्रश्न आहे. दुसऱ्या बाजूला दोन्ही ट्रस्टच्या जमिनीच्या चुकीच्या नोंदी विधि व न्याय विभागाकडून तपासून योग्य ते आदेश देण्याची कार्यवाही महसूल मंत्री महोदय यांनी करावी, अशी माझी विनंती आहे. यामुळे अनेक लोकांना न्याय मिळू शकेल यासाठी मी आपल्याकडे आशेने पाहत आहे.

अध्यक्ष महोदय, आमच्या भागामध्ये एक प्रांत भ्रष्टाचार करीत असत. त्याच्या तक्रारीचा भला मोठा पाडा घेऊन मी मंत्री महोदयांची ५ वेळा भेट घेतली. मी आमदार आहे व आपण मंत्री महोदय आहात. आपण सार्वजनिक कामासाठी धावपळ करीत असतो. एखादा व्यक्ती चुकला तर त्याला शिक्षा झाली पाहिजे. त्या अधिकाऱ्याला शिक्षा करण्याऐवजी त्याची बदली सांगली / सातारा येथे केली. त्यामुळे मी बरोबर आहे की चूक आहे, असा प्रश्न माझ्या मनाला पडला. आपण यासर्व गोष्टींचे मुल्यमापन केले नाही तर काळ आपल्याला माफ करणार नाही. अलिकडील काळात लोकांना लोकप्रतिनीधी ऐवजी एजंट आवडू लागले आहेत. त्यांची एक साखळी तयार होत असेल व त्याकडे आपण दुर्लक्ष करीत असू तर यापेक्षा दुर्दैव कोणते नाही. यासर्व बाबींच्या संदर्भात मंत्री महोदयांनी उलगडा करण्यात यावा. या पुढील काळात तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यासंदर्भात चौकशी करावी की संबंधितांना अभय द्यावे, याबाबतही स्पष्ट करावे. या तीन मुद्यांच्या संदर्भात मंत्री महोदयांनी उत्तरातून मार्गदर्शन करावे. ते अनेक लोकांच्या हिताचे होईल. या दृष्टीकोनातून निर्णय घेण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. मी वेळे अभावी माझे भाषण पूर्ण करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

----------

असुधारित प्रत

श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे (बसमत) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभाग – तुकडेबंदी कायद्यातील प्रमाणभूत शेतकऱ्याची अट सर्व शेतकऱ्यांसाठी जाचक होत आहे. आपण गुंठेवारीची पद्धत बंद केली पाहिजे. एखाद्या शेतकऱ्याचे लग्न असेल तर त्यासाठी त्याला त्याची ५-१० गुंठे जमीन विक्री करावयाची असते. परंतु गुंठेवारी पद्धतीमुळे तो ती जमीन विक्री करु शकत नाही. ही पद्धत आपण बंद केली पाहिजे. वारसा हक्काने जमीन नावावर करुन देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे.......

आमच्याकडे बॅरेजेसचे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामासाठी SLDT च्या परवानग्या मिळालेल्या आहेत. आमचा जिल्हा राज्यपाल महोदयांच्या अनुशेषामध्ये येतो. लवकरात लवकर बॅरेजेसचे काम पूर्ण करण्यात यावे. माझ्या मतदारसंघामध्ये केळी पाझर तलाव आहे. या तलासंदर्भात जलसंपदा मंत्री महोदयांनी बैठक देखील घेतलेली आहे. सदर पाझर तलावाला शक्य तितक्या लवकर मंजुरी देण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मी आता उद्योग विभागाच्या मागण्यावर बोलणार आहे. हिंगोली हा ना उद्योग जिल्हा आहे, अशी नोंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील उद्योगासाठी राज्य सरकारने विशेष सबसिडी देऊन हिंगोली जिल्हाला उद्योग क्षेत्रात पुढे आणावे अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मी आता ऊर्जा विभागण्या मागण्यावर बोलणार आहे. कृषी पंपाची वीज जोडणी तोडण्याचा कायदा या सभागृहामध्ये करण्यात आला आणि शेतीची वीज तोडणी बंद केली. परंतु आता दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा चालू आहेत. अशा काळात देखील गावोगावी घरगुती वापराची वीज खंडीत करण्याचे काम चालू आहे. त्यामुळे मी आपल्यामार्फत एवढीच विनंती करतो की, गावातील वीज तोडणी थांबविण्यात यावी. ग्रामीण भागात देखील लोक राहतात, त्या लोकांवर आपण दया केली पाहिजे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, माझ्या वसमत विधानसभा मतदारसंघामध्ये मुडी, पोटा आणि बाराशीव हनुमान या ठिकाणी १३२ केव्ही केंद्राची मान्यता देण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मी आता ग्रामविकास विभागाच्या मागण्यावर बोलणार आहे. वसमत येथील पंचायत समिती इमारत बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. माननीय श्री.हसन मुश्रीफ जे बोलतात ते नक्कीच काम करतात. त्यामुळे त्यांनीसदर इमारतीच्या कामाला मंजुरी द्यावी, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे.......

अध्यक्ष महोदय, मी आता अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मागण्यावर बोलणार आहे. मंत्री महोदयांनी माझ्या तालुक्याला इष्टांक वाढवून द्यावा अशी मी विनंती करतो. माझ्या मतदारसंघातील ज्या लोकांकडे शिधापत्रिका आहे त्यांना देखील धान्य मिळत नाही. त्यामुळे माझ्या मतदारसंघातील सर्व लोकांना धान्य उपलब्ध करुन द्यावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, कोरोना काळामध्ये माननीय श्री. राजेश टोपे यांनी केलेले काम या महाराष्ट्रातील सर्व लोकांनी पाहिलेले आहे. आमच्याकडे बाभुळगाव ता.वसमत, आरळ ता.वसमत आणि साळना ता.औंढा या तीन ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात यावेत, अशी विनंती करतो आणि थांबतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

----------

असुधारित प्रत

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)**

श्री.दत्तात्रय भरणे (वन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या वन विभागाच्या मागण्यांवर डॉ.संजय कुटे, सर्वश्री सुनील प्रभू, समीर कुणावार, बाळासाहेब आजबे, धर्मरावबाबा आत्राम, सुनील शेळके, ज्ञानराज चौगुले, शेखर निकम, संजय जगताप व मनोहर चंद्रिकापुरे आपापले प्रश्न मांडलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय कुटे यांनी उमरखेड-कराड येथे विद्युत प्रवाहामुळे वाघाचा मृत्यू तसेच वन्यजीवाच्या कातीची तस्करी, आंतरराष्ट्रीय टोळी याबाबत सक्रीय उच्च स्तरीय चौकशी होणे आवश्यक आहे, अशी त्यांनी मागणी केलेली आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, नागपूर वन विभागामार्फत उत्तर उमरखेड परिक्षेत्रामध्ये मौजे नरसाळा येथील झुडपी जंगलामध्ये दिनांक १३ मार्च, २०२२ रोजी विद्युत प्रवाहामुळे वाघाचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आलेली आहे. सदर प्रकरणी वन गुन्हा नोंदविण्यात आला असून दिनांक २० मार्च, २०२२ रोजी मध्ये प्रदेश येथून तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आलेले असून त्यांना दिनांक २३ मार्च, २०२२ रोजीपर्यंत वन कोठडी सुनावण्यात आली असून उक्त प्रकरणाचा प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू यांनी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रामध्ये २५ हजार आदिवासी कुटुंब राहत असून सन १९९७ मधील माननीय न्यायालयाचे आदेशानुसार त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे. चांदीवली येथे बांधण्यात आलेली घरे अपुरी असून उद्यानाला लागून असलेल्या जमिनीवर पुनर्वसन करण्यात यावे, असा मुद्दा मांडलेला आहे. आपल्या सर्वांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, रिट याचिका क्रमांक ३०५/९५ मधील माननीय उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे व झोपडपट्टीतील पात्र अतिक्रमांकाचे पहिल्या टप्प्यातील ११३५९ अतिक्रमांकाचे पुनर्वसन संघर्ष नगर व चांदीवली येथे करण्यात आलेले आहे. उर्वरित पात्र अतिक्रमांकाचे पुनर्वसन शिल्लक असून त्यांच्या पुनर्वसनासाठी आरे कॉलनीतील ९० एकर जमीन राखीव ठेवण्यात आली असून त्या

असुधारित प्रत

श्री.दत्तात्रय भरणे.......

व्यतिरिक्त माननीय पालकमंत्री, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली असलेली समिती जी पर्यायी जागा सूचवतील त्या जागेवर पात्र अतिक्रमांकांना २६९ चौ.फुट क्षेत्राचे घर शासनाच्या वतीने लवकरात लवकर देण्यात येईल. संबंधितांना घर देण्यास विलंब झालेला आहे ही गोष्ट खरी आहे. असे जरी असले तरी सर्व संबंधितांच्या पाठीमागे शासन निश्चितपणाने उभे आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. समीर कुणावार यांनी असा मुद्दा मांडला की, साप चावून बैलाचा मृत्यू झाला असल्यास वन विभागाने मदत करावी. सद्य:स्थितीत प्रचलित शासन निर्णयामध्ये वन प्राण्यांमुळे पशुधनाची हानी झाल्यास नुकसान भरपाई देण्यात येत नसल्यामुळे सापाचा वन्य प्राण्यांमध्ये समावेश नाही.

अध्यक्ष महोदय, ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी वन विभागाबाबत प्रश्न मांडलेले आहेत त्या सर्व प्रश्नांची नोंद मी घेतलेली आहे. त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, वन विभागासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता दत्तमत बाबीखाली एकूण रुपये ४ हजार ८८१ कोटी ७ लक्ष ८७ हजार रकमेच्या अर्थसंकल्प मागण्या सभागृहात सादर करण्यात येत आहेत. त्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात, अशी मी सभागृहास विनंती करतो.

----------

## अर्धा-तास चर्चाबाबत

ॲड.राहुल कुल : अध्यक्ष महोदय, अर्धा-तास चर्चा किती वेळा पुढे ढकलणार आहातब? जर सरकारला अर्धा-तास चर्चा घेणे शक्य नसेल तर हा विषय कामकाजपत्रिकेतून काढून टाकावा. मागील दोन दिवसांपासून अर्धा-तास चर्चा पुढे ढकलीत आहात. आम्ही सकाळपासून सभागृहामध्ये बसून राहतो. आम्हाला बोलण्याची संधी देखील दिली जात नाही.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, आज सकाळी ९.०० पासून सभागृहाचे कामकाज सुरु झालेले आहे. आज सकाळी सर्व प्रतोदांची बैठक झालेली आहे. त्या बैठकीमध्ये अर्धा-तास चर्चा गुरुवारी घेण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे अर्धा-तास चर्चा गुरुवारच्या कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविण्यात यावी, अशी माझी सूचना आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** गुरुवारी विशेष बैठकीमध्ये अर्धा-तास चर्चा घेण्यात येईल.

--------

असुधारित प्रत

**पृ. शी.:** अनुदानाकरिता मागण्या
**मु. शी.:** सन २०२२-२०२३च्या अनुदानाकरिता मागण्या:
१) महसूल व वन विभाग
२) जलसंपदा विभाग
३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
४) ग्रामविकास विभाग
५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
६) सार्वजनिक आरोग्य विभागउपाध्यक्ष : आता
१) महसूल व वन विभाग
२) जलसंपदा विभाग
३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
४) ग्रामविकास विभाग
५)अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
६) सार्वजनिक आरोग्य विभाग

(मंत्र्याचे उत्तर पुढे सुरु.......

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, आज महसूल विभागाच्या मागण्यांवर चर्चा झाली. माननीय विरोधी पक्ष नेता यांच्यासह जवळ जवळ ४० सन्माननीय सदस्यांनी महसूल विभागावरील चर्चेमध्ये भाग घेतलेला आहे. आता सभागृहामध्ये अनेक सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत. आपण ज्या विभागाच्या चर्चेमध्ये भाग घेतो त्या विभागाच्या चर्चेचे उत्तर ऐकण्यासाठी आपण थांबले पाहिजे असा संकेत आहे. दुर्दैवाने मात्र चित्र वेगळेच दिसते आहे. ज्यावेळेस आपण हक्क मागतो त्यावेळेस कर्तव्य देखील पूर्ण करणे आवश्यक असते, असे मी यानिमित्ताने सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी निरनिराळ्या प्रश्नांवर चर्चा झालेली आहे. त्यामधील जवळपास ७० विषय माझ्याकडे आलेले आहेत. यामध्ये काही ठराविक प्रश्नांवर खूप चर्चा निश्चितपणे झालेली आहे.

श्री.बाळासाहेब थोरात.......

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश आबिटकर यांनी म्हटले आहे की, महसूल विभागामध्ये कामाच्या दृष्टीने शिस्त असण्याची आवश्यकता आहे. महसूल विभाग हा सामान्य माणसाशी निगडित असा विभाग आहे. रोजच काही ना काही काम पडत असते. हेही खरे आहे की, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार,

अप्रकाशित प्रत

तलाठी या सगळ्यांकडे काही ना काही काम असते. इतर विभागांची कामे देखील त्यांच्याकडे असतात. जिल्हाधिकारी यांच्याकडे तर जवळपास ३६५ समित्या असतील. कोरोनाच्या संकटामध्ये तर सर्व गाव दारी अशी स्थिती होती. सर्व कामे महसूल विभागाकडे असतात.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब थोरात....

महसूल विभागाकडील हे काम बिनचूक, सहजतेने, पारदर्शक पद्धतीने, झाले पाहिजेत याबाबत माझ्या मनात संदेह नाही. हे सर्व व्यवस्थित होण्यासाठी आम्ही काम केले पाहिजे. या विभागाबाबत काहींना कटू अनुभवही आले असतील. चुकीचे काम करणाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे, असे माझे मत आहे. मौनी विद्यापिठाच्या जमिनीबाबत विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तपासणी करण्यात येत आहे. प्रांत अधिकारी श्री. रामहरी भोसले यांच्या चौकशीची कार्यवाही सुरु आहे. पुनर्वसनाचा प्रकल्पाबाबत माननीय मदत व पुनर्वसन मंत्री श्री. विजय वडेट्टीवार यांना सूचना दिल्या जातील. काही ठराविक बाबींवर सभागृहात आज चर्चा करण्यात आली आहे. वाळू हा महसूल विभागाचा कायम चर्चेतील विषय आहे. मी दुसऱ्या वेळेस महसूल मंत्री पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. पहिल्यावेळेस मी महसूल मंत्री असतानाही मला या प्रश्नाला सामोरे जावे लागत होते. त्यानंतर माननीय श्री. चंद्रकांतदादा पाटील हे महसूल मंत्री होते. त्यांनाही या प्रश्नाला सामोरे जावे लागले होते. वाळू हा विषय मंत्र्यांकरिता आणि प्रशासनाकरिता अतिशय किचकट आहे. ही वस्तुस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष जैस्वाल यांचा वाळू या विषयाचा अतिशय चांगला अभ्यास आहे. त्यांनी असे म्हटले की, जेथे बांधकाम सुरु आहेत तेथून वाळूची रॉयल्टी वसूल करावी. वाळू हा विषय किचकट होण्यामध्ये माननीय उच्च न्यायालयाचे निर्णय, माननीय सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आणि हरित लवादाचे निर्णय कारणीभूत आहेत. काही वेळेस एखादी संस्था न्यायालयात जाऊन काही युक्तीवाद करीत असते. त्यावेळेस शासनाची बाजू सक्षमपणे मांडली जात नाही. त्यावेळेस न्यायालयाचा निर्णय शासनावर बंधनकारक असतो. या निर्णयाचा समावेश शासन निर्णयामध्ये करावा लागतो. त्यांनी असे म्हटले की जेथे वाळू वापरली जाते तेथून रॉयल्टी वसूल करावी. यात हरित लवाद आणि पर्यावरण विभागाचा विषय येतो. यातील मुख्य खोच या विषयातील जाणकारांच्या लक्षात येईल. हा विषय सहजतेने हाताळण्याकरिता विभागाकडून सातत्याने प्रयत्न केले

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब थोरात....

जातात. जवळपास अनेक प्रश्न कमी करण्याचा प्रयत्न विभागाकडून केला जात आहे. अपसेट प्राईस आता ६०० रुपयांपर्यंत आणली आहे. ग्राहकांना स्वस्त दरात वाळू मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. वाळू उचलण्याकरिता ६ महिने देखील मिळत नसल्यामुळे ५ वर्षापर्यंत मर्यादा वाढविण्याबाबतचा निर्णयही विभागाने घेतला आहे. वाळुची उपलब्धता ग्राहकांना सहज होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

अध्यक्ष महोदय, प्रशासनानेही मोठ्या प्रमाणात कारवाई केली आहे. सन्माननीय सदस्य श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी रात्री वाळू किंवा गौण खनिज उचलण्यासाठी परवानगी देण्यात यावी, असा मुद्दा उपस्थित केला आहे. यात सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे यांनी सहभाग घेतला आहे. राष्ट्रीय महामार्गाची कामे सुरु आहेत. तसेच डेडीकेटेड कॉरिडॉरची कामे सुरु आहेत. त्यांनी विनंती केली की, या कामांना गती देण्याकरिता रात्री गौण खनिज उचलण्याची परवानगी देण्यात यावी. त्यानुसार तेवढ्यासाठीच ही परवानगी दिली जात आहे. जेणेकरुन हे काम गतीने होईल. वाळू विषयात अधिक पारदर्शकपणा किंवा शिस्तीने काम करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी जमिनीच्या हस्तांतरणाबाबत सन्माननीय सदस्य श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी चर्चा केली होती. आदिवासी जमिनीचे हस्तांतर कायद्याने केले जात होते. मी महसूल मंत्री असताना सन २०१४ पर्यंत ते थांबविले होते. परंतु याबाबत काही लोकांनी माननीय उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावेळेस न्यायालयाच्या अवमानाचे गुन्हे दाखल झाले होते. त्यानंतर माननीय श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या कार्यकाळात काही निर्णय घ्यावे लागले होते. सन २०१५ ते सन २०१९ पर्यंत २४० प्रकरणांना परवानगी दिली होती. पुढील काळातही काही प्रकरणांना मी मंजुरी देत आहे. कायद्याने ही मंजुरी दिली जात आहे. यात कोठेही शंकेला वाव नाही.

अध्यक्ष महोदय, रेडीरेकनरचाही विषय आहे. याची संपूर्ण जबाबदारी आयजीआर यांची असते. याचे संपूर्ण अधिकार आयजीआर यांचे आहेत. याकरिता

श्री. बाळासाहेब थोरात....

संपूर्ण वर्षभर यंत्रणा काम करीत असते. काही सन्माननीय सदस्यांनी भाषणात सांगितले की, काही ठिकाणचे रेडीरेकनरचे दर कमी केले आहेत. याबाबत मी सांगू इच्छितो की, पूर्वी रेडीरेकनरचे दर कमी करण्याची पद्धत नव्हती. सन २०१७ मध्ये सचिवांची समिती नेमली होती. त्या समितीने सांगितले की, वस्तुस्थितीनुसार दर असले पाहिजेत. दर कमी असतील तर ते कमी केले जावेत. त्यानुसार हा निर्णय झाला व काही ठिकाणचे रेडीरेकनरचे दर कमी केले तर काही ठिकाणी ते वाढविण्यात आले होते. खरेदी विक्री व्यवहारापर्यंत पोहचणे हे रेडीरेकनरचे काम असते. हे काम शास्त्रोक्त पद्धतीने केले जाते.

अध्यक्ष महोदय, या शासनाने केलेल्या चांगल्या कामांचा उल्लेख झाला असता तर अधिक आंनद वाटला असता. मी सांगू इच्छितो की, कोरोना संकटामध्ये नोंदणी व मुद्रांक शुल्कामध्ये ५० टक्क्यांची सवलत दिली होती. या सवलतीला उत्सफूर्त प्रतिसाद मिळाला होता. आमच्या कल्पनेपेक्षा अधिक दस्तांच्या नोंदी झाल्या व अपेक्षेपेक्षा अधिक उत्पन्न यातून मिळाले आहे. याचे कौतूक राष्ट्रीय पातळीवरही झाले आहे. कोरोना काळात अर्थव्यवस्थेला गती देण्याकरिता कशा प्रकारे निर्णय करावेत, याची नोंद राष्ट्रीय पातळीवरुन घेण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, आता सातबारा उतारा नव्या फॉरमॅटमध्ये तयार केला आहे. त्यावरील पूर्वीच्या चुकीच्या नोंदी काढून टाकण्यात आल्या आहेत. तरीही यात काही चुकीच्या नोंदी राहिल्या असतील तर त्याची माहिती शेतकऱ्यांना व्हावी किंवा त्या दुरुस्त होण्यासाठी राज्यातील सर्व शेतकऱ्यांना सातबारा उतारा वाटण्याचे काम विभागाने केले आहेत. यात काही दोष असतील तर ते विभागाच्या निदर्शनास आणावे, अशीही विनंती केली होती. त्यात दुरुस्ती केली जाईल, असा विश्वास शेतकऱ्यांना दिला आहे. त्यामुळे आता सातबारा उतारा नव्या फॉरमॅटमध्ये आहे. हा सातबारा उतारा ऑनलाईन मिळण्याची व्यवस्था केली आहे. आता नमुना ८ अ देखील ऑनलाईन मिळत आहे. सन २०१६ नंतरचे सर्व फेरफार आपणास ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश आबिटकर यांनी

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब थोरात....

सांगितले की, यात काळजी घेतली पाहिजे. माझे असे म्हणणे आहे की, हे सर्व दोष दूर करावयाचे असतील तर ऑनलाईनशिवाय पर्याय नाही. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन कामे सहजतेने करावयाची आहेत. याकरिता सॉफ्टवेअरची मदत घेतली जाईल. सन २०२४ पर्यंत अनेक सेवा ऑनलाईनपद्धतीने उपलब्ध होतील, अशी मी यानिमित्ताने हमी देतो. याद्वारे संबंधित सेवक वर्गावरील कामाचा भार कमी होऊन नागरिकांची कामे सहजतेने होतील.

अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांनी आग्रहाने सांगितले की, बांधकाम कार्यालये झाली पाहिजेत. याकरिता कोरोना संकटामुळे कमी निधी उपलब्ध झाला आहे. बांधकामे कार्यालयाची कामे करण्याचा अधिकाधिक प्रयत्न केला जाईल.

अध्यक्ष महोदय, वर्ग – २ च्या जमिनी वर्ग – १ मध्ये रुपांतरीत करण्याबाबतच्या शासन निर्णयाची मुदत ७ तारखेला संपली आहे. यात चांगले बदल करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. वर्ग – २ च्या जमिनी वर्ग – १ मध्ये रुपांतरीत करण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी आग्रह धरला आहे. याबाबत नवीन निर्णय लवकरच जाहीर केला जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागातील रिक्त पदांची संख्या अधिक आहे. नोंदणी आणि मुद्रांकाकरिता जवळपास अर्ध्यापेक्षा कमी अधिकारी आणि कर्मचारी संख्या आहे. नवीन पदभरती आता करण्यात येत आहे. नायब तहसिलदारांची पदे भरली जाणार आहेत. अधिकाधिक पदे भरण्याचा विभागाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. रिक्त पदांची संख्या कमी होईल, अशी मी ग्वाही देतो.

यानंतर श्री. चौधरी.....

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब थोरात.....

अध्यक्ष महोदय, अनेक प्रश्न या ठिकाणी मांडण्यात आले. मी त्यांच्या बारकाव्याने नोंदी घेतल्या आहेत. मी या निमित्ताने ग्वाही देतो की सन्माननीय सदस्यांच्या दोन महिन्यांमध्ये निश्चितपणे लक्षात येईल की, त्यांनी मांडलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सकारात्मक काम झाले आहे.

अध्यक्ष महोदय, महसूल विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी आपल्यामार्फत विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.

---------

असुधारित प्रत

श्री.हसन मुश्रीफ (ग्रामविकास, कामगार मंत्री) : अध्यक्ष महोदय, आज ग्रामविकास आणि कामगार विभागाच्या मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड.आशिष जैस्वाल, डॉ.संजय कुटे, श्री.सुनिल टिंगरे, श्रीमती सुलभा खोडके, श्री.संग्राम थोपटे, श्री.किशोर जोरगेवार, श्री.अबु आजमी, श्री.दीपक केसरकर, ॲड.राहुल कूल, श्री.सुनिल प्रभू, श्रीमती सरोज आहिरे, श्री.दिलीपराव बनकर, श्री.संजय जगताप, श्री.संजय गायकवाड, श्री.कृष्णा गजबे, श्री.ज्ञानराज चौगुले, श्री.प्रकाश आवाडे, श्री.हिरामण खोसकर, श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे, श्री.सुधीर मुनगंटीवार, श्री.रवि राणा यांचा समावेश आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास विभागाच्या संदर्भाने सन्माननीय सदस्यांच्या प्रामुख्याने तीन-चार मागण्या होत्या. त्यामध्ये पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद इमारतींना निधी देण्यात यावा, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेसाठी निधी द्यावा आणि लेखाशिर्ष २५१५ अंतर्गत निधी देण्यात यावा यांचा समावेश आहे.

अध्यक्ष महोदय, मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, आपण मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत १० हजार किलोमीटरचा दुसरा टप्पा घेत आहोत. या योजनेमध्ये आता बराच बदल करण्यात आला आहे. गेल्या सरकारच्या काळात ३० हजार किलोमीटरचा पहिला टप्पा घेण्यात आला होता. परंतु तेव्हाच्या कामांपेक्षा आम्ही आता एका किलोमीटरचे अंतर वाढविले असून रुंदी देखील वाढविली आहे. तसेच रस्त्याचा दर्जा चांगला करण्यासाठी देखील अनेक तरतुदी केल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले की, शाळा खोल्यांची दुरुस्ती होत नाहीत तसेच नवीन बांधकामांसाठीही निधी मिळत नाही. त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, जिल्हा नियोजन व विकास समितीमध्ये यासाठी ५ टक्के निधी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, डॉ.संजय कुटे यांनी बचत गट योजनेचे काम दोन अधिकाऱ्यांच्या भांडणामुळे रखडले असल्याच्या भावना व्यक्त केल्या. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, आम्ही हे काम रखडू देणार नाहीत.

असुधारित प्रत

श्री.हसन मुश्रीफ.....

हे खरे आहे की, दोन वर्षे काम कमी झाले. परंतु आता अतिशय वेगाने काम सुरु केलेले आहे. यावर आम्ही जास्तीत जास्त लक्ष दिले आहे. कारण ५० टक्के संख्या असणाऱ्या महिलांना आपण बचत गटांमार्फत चांगल्या सुविधा देऊ शकलो तर मोठे काम उभे राहील.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापल्या मतदारसंघातील समस्या या ठिकाणी मांडल्या. मी सांगू इच्छितो की, ग्रामविकास विभागाने कोरोना काळात देखील अनेक चांगले निर्णय घेण्याचा प्रयत्न केला आहे. दिनांक ६ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक दिन साजरा केला जातो. या दिवशी राज्यातील ३४ हजार ग्रामपंचायती, ५३० पंचायत समित्या आणि ३४ जिल्हा परिषदांमध्ये सकाळी भगवी गुढी उभारुन 'शिवराज्य दिन' साजरा करण्याचा निर्णय आपण घेतला. तसेच स्मार्ट गाव योजनेचे नाव बदलून राज्याचे माजी ग्रामविकास मंत्री व माजी उप मुख्यमंत्री स्व.आर.आर. पाटील यांच्या नावाने सुंदर गाव पुरस्कार योजना सुरु केली. तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा १० हजार किलोमीटरचा दुसरा टप्पा आपण जाहीर केला आहे. कोरोना काळात ज्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला त्यांना ग्रामविकास विभागामार्फत ५० लाख रुपये विमा कवच देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच महासमृध्दी महिला सक्षमीकरण योजना सुरु करण्यात आली. विरभद्र ताराराणी स्वयंसिध्द योजना सुरु करण्यात आली. पूर्वी वित्त आयोगाचा १०० निधी ग्रामपंचायतींना दिला जात होता. यावेळी आपण असा निर्णय घेतला की १५ व्या वित्त आयोगाचा ८० टक्के निधी ग्रामपंचायतींना, १० टक्के जिल्हा परिषद व १० टक्के निधी पंचायत समित्यांना देण्यात येईल. कारण जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांना विकासासाठी कोणताच निधी मिळत नव्हता. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्या बंदच करुन टाकाव्यात अशी उद्विग्न मागणी होती. ती विचारात घेऊन आपण हा निर्णय घेतला.

असुधारित प्रत

श्री.हसन मुश्रीफ.....

अध्यक्ष महोदय, इंदिरा आवास योजना, पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, इत्यादी योजनांच्या याद्या तयार होत्या परंतु राज्यातील गरिबांचे घराचे स्वप्न प्रत्यक्षात येत नव्हते. त्यामुळे आपण गेल्या वर्षी आणि या वर्षी ५ लाख घरे बांधण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार गेल्या वर्षी ४ लाख घरे बांधून पूर्ण झाली. यावर्षी देखील ५ लाख घरे बांधण्याची योजना आपण हाती घेतलेली आहे.

अध्यक्ष महोदय, देशाचे रक्षणकर्ते आजी-माजी सैनिक आणि विधवा सैनिक पत्नींना ग्रामपंचायतीच्या मालमत्ता करामधून सूट देण्याचा निर्णय आपण घेतला आहे. गेल्या सरकारच्या काळात ग्रामपंचायत हद्दीतील घरांवर कर्ज काढण्याची मुभा नव्हती. परंतु आपण ती अट काढून नमुना-८ मध्ये कर्ज काढण्यासाठीची तरतूद केली आहे. असे अनेक निर्णय आपण घेतले आहेत. पूर्वी घर बांधायचे असेल तर ए.डी.टी.पी. यांची परवानगी घ्यावी लागत होती. आता ३ हजार २०० चौरस फुटांपर्यंतचे घर बांधण्याची परवानगी देण्याचे अधिकार आपण ग्रामपंचायातींनाच दिले आहेत.

अध्यक्ष महोदय, एकूणच काय तर आपण अनेक चांगले निर्णय घेतले आहेत. सन्माननीय सदस्यांनी जास्त अडचणी सांगितल्या नसून प्रामुख्याने निधीची मागणी केलेली आहे. त्यांच्या मागणीप्रमाणे चांगला निधी देण्याचा आम्ही प्रयत्न करु व प्रत्येक सन्माननीय सदस्यांना उत्तर पाठवू, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी आपल्यामार्फत विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आपण कामगार विभागामध्ये एक अतिशय धाडसी निर्णय घेणार आहोत. आपल्या राज्याची लोकसंख्या सुमारे ११ कोटी एवढी आहे. त्यापैकी ४.५ कोटी लोक कामगार या संज्ञेत येतात. त्यामधील ८० लाख कामगार संरक्षित व संघटित आहेत तर ४ कोटी कामगार असंघटित आहेत.

अप्रकाशित प्रत

श्री.हसन मुश्रीफ.....

८० लाख संघटित कामगारांना प्रत्येक महिन्याला पगार मिळतो, प्रोव्हिडंट फंड मिळतो, ग्रॅच्युईटी मिळते, रजा रोखीकरणाचा लाभ मिळतो, बोनस मिळतो व त्यांना कामावरुन कमी केल्यास त्याविरुध्द् कामगार न्यायालयात व औद्योगिक न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे. उर्वरित असंघटित कामगारांमध्ये १ कोटींपेक्षा जास्त शेतमजूर, १ कोटींपेक्षा जास्त रिक्षा-टॅक्सी-ट्रक ड्रायव्हर्स, यंत्रमाग कामगार, मोलकरीण महिला, इत्यादींचा समावेश आहे. यांना जर मालकाने सांगितले की, तुम्ही उद्यापासून कामावर येऊ नका तर यांनी जायचे कुठे हा प्रश्न त्यांच्यापुढे असतो. त्यांचा संसार कसा चालणार, एखादे संकट आले तर ते कसे पेलणार असे अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे आपण कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्याची योजना पहिल्यांदा आपल्या राज्यात आणली. सर्वप्रथम आपण माथाडी कल्याणकारी मंडळे स्थापन केली. राज्यामध्ये आज असे ३६ बोर्ड आहेत. त्यानंतर सुरक्षा रक्षक कल्याणकारी मंडळ, घरकाम करणाऱ्या मोलकरणींसाठी कल्याणकारी मंडळ, बांधकाम कामगारांचे कल्याणकारी मंडळ स्थापन केले. बांधकाम कामगारांचे कल्याणकारी मंडळ हे देशातील सर्वात श्रीमंत कल्याणकारी मंडळ ठरले. सन १९८६ सालचा केंद्र सरकारचा यासंदर्भातील कायदा होता. त्याला आपण मोठया प्रमाणात योजना दिल्या. त्यातून मोठया प्रमाणात सेस जमा व्हायला सुरुवात झाली.

अध्यक्ष महोदय, येत्या वर्षभरात शेतमजूर, यंत्रमाग कामगार यांचे कल्याणकारी मंडळ आपण स्थापन करणार आहोत. आपण ऊसतोड कामगारांचे देखील कल्याणकारी मंडळ स्थापन केले आहे. येत्या वर्षभरात कल्याणकारी मंडळांच्या माध्यमातून ४ कोटी लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणून चांगले दिवस आणल्याशिवाय कामगार विभाग राहणार नाही, अशी मी या निमित्ताने शाश्वती देतो.

अध्यक्ष महोदय, ग्रामविकास व कामगार या दोन्ही विभागांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी आपल्यामार्फत विनंती करतो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलताना अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या. त्या सर्व सूचनांचे मी स्वागत करतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रवि राणा यांनी मागणी केली की, विदर्भातील उद्योगांना सवलती द्याव्यात. मला या निमित्ताने सांगावेसे वाटते की, उद्योग विभागातर्फे राज्याच्या इतर भागांच्या तुलनेत विदर्भातील उद्योगांना सर्वाधिक सवलती दिल्या जातात. औद्योगिक प्रोत्साहन अनुदान योजनेंतर्गत उद्योगांच्या गुंतवणुकीवर १०० टक्के परतावा दिला जातो. तसेच मुद्रांक शुल्कावर पूर्ण सूट आहे. इलेक्ट्रिसिटी डयुटी माफ केली जाते. तसेच विजेच्या प्रत्येक युनिटवर १ रुपया जास्तीचे अनुदान विदर्भातील उद्योगांना दिले जाते. याव्यतिरिक्त विदर्भातील उद्योगांच्या ज्या-ज्या मागण्या असतात त्या अनुषंगाने तात्काळ मदत करण्याचा आमचा प्रयत्न असतो. त्यामुळे विदर्भाच्या उद्योग वाढीकडे उद्योग विभागाचे चांगले लक्ष आहे, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.राहुल कूल यांनी उद्योगाच्या प्रदुषणाचा उल्लेख केला. यावर प्रभावी उपाय केले गेले आहेत.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित

श्री. सुभाष देसाई...

असे उपाय केले जातात.  त्यांच्या मतदार संघाबद्दल विशेष बैठक बोलावून तेथील प्रदुषणाचा बंदोबस्त केला गेला.  सर्व राज्यातील मध्यवर्ती सांडपाणी प्रक्रिया केंद्रे अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही धोरणात्मक निर्णय घेऊन ज्या ठिकाणी अशी केंद्रे चालविणाऱ्या संस्था व्यवस्थित काम करीत नव्हत्या त्यांचे एमआयडीसीमार्फत व्यवस्थापन केले जाते.  पर्यावरण विभागाचे जे नियम किंवा निकष आहेत त्यांचे पालन करुनच प्रदुषणाचे नियंत्रण होऊ शकते याची जाणीव ठेऊन या बाबतीत जास्तीत जास्त दक्षता बाळगली जाते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किशोर जोरगेवार यांनी गडचिरोली जिल्ह्यामध्ये उत्कृष्ट लोहखनिज असल्यामुळे तेथे उद्योग यावेत अशी मागणी केली ती रास्तच आहे.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) :** मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जे सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत त्यांचे नाव घेतले नाही तरी चालेल.

श्री. सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, काही महत्त्वाच्या विषयांचा उल्लेख करीत आहे.  या गडचिरोली जिल्ह्यातील लॉईड उद्योगाचा जो खनिकर्म उद्योग बंद पडला होता तो पोलिसांची विशेष मदत घेऊन आणि त्यासाठी खास पथके तयार करुन... कारण नक्षलवाद्यांच्या दहशतीमुळे तो उद्योग बंद पडला होता.  तो पुन्हा सुरू करण्यामध्ये आपल्या शासनाला यश आले आहे.  त्यामुळे लवकरच खनिजावर आधारित असा कारखाना सुध्दा स्थापन होणार आहे. त्यातून स्थानिकांना रोजगार सुध्दा मिळेल.

अध्यक्ष महोदय, अन्य सन्माननीय सदस्यांनी खासकरुन आपापल्या विभागात, मतदार संघात नवीन एमआयडीसीचे क्षेत्र व्हावे, अशी मागणी केली आहे.  त्यामध्ये परभणीचे माननीय श्री. राहुल पाटील, पंढरपूरचे आमदार श्री. समाधान औताडे, सर्वश्री. ज्ञानराज चौगुले, शेखर निकम, प्रकाश आवाडे, रमेश बोरनारे,

असुधारित प्रत

श्री. सुभाष देसाई...

आणखी काही सन्माननीय सदस्यांची नावे राहून गेली असतील तर मी क्षमा मागतो. परंतु ज्यांनी ज्यांनी त्यांच्या क्षेत्रात नवीन एमआयडीसी स्थापन करावी, अशी मागणी केली त्याबद्दल आम्ही सकारात्मक आहोत आणि तेथील सर्व परिस्थिती पाहून, तपासून लवकरात लवकर नक्कीच निर्णय घेतले जातील. त्यामुळे आता उद्योग विभागाच्या ज्या मागण्या आहेत त्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री. राजेश टोपे (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागावर मी ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली त्या सर्वांची मी मुद्दाम नावे घेऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, या मागण्यांवर बोलत असताना सर्वश्री. किशोर जोरगेवार, बाळासाहेब आजबे, सुनील शेळके, भोयर, संग्राम थोपटे, रवि राणा, समीर कुणावार, परदेशी, राधाकृष्ण विखे पाटील, श्रीमती सुलभा खोडके, डॉ. संजय कुटे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री दीपक केसरकर, राजेश पाटील, अशोक पवार, श्रीमती सरोज अहिरे, डॉ. पवार, सर्वश्री. राहुल पाटील, दिलीप बनकर, समाधान औताडे, निलेश लंके, ज्ञानराज चौगुले, रमेश बोरनारे, माने, श्रीमती गीता जैन, सर्वश्री हिरामण खोसकर, विक्रमसिंह सावंत, चंद्रकांत उर्फ राजू भैय्या नवघरे या सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार व्यक्त केले आहेत आणि त्या माध्यमातून वेगवेगळया संदर्भाने त्यांनी काही मागण्या केल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागात आम्ही ४ ए च्या अनुषंगाने सुरूवात केली आहे. प्रामुख्याने Accessibility यामध्ये पहिला विषय असा आहे की, आजारी पडू नये, यासाठी प्रयत्न करणे. दुसरा आपल्या घराजवळ उपचार करण्याची संधी असणे, तिसरा विषय असा असतो की Affordable म्हणजे आपल्या खिशाला परवडणारी आरोग्य सेवा मिळणे. सर्वात महत्त्वाचा विषय म्हणजे विश्वासार्हता आहे. आरोग्याच्या संदर्भाने आम्ही त्रिसूत्री राबविण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सर्वात पहिला विषय इन्फ्रास्ट्रक्चरचा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपापल्या मतदार संघामध्ये दर्जावाढ करावी, नवीन पीएचसी, उपकेंद्र मिळावे या अनुषंगाने मागण्या केल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मला सभागृहाला सांगण्यास आनंद होत आहे की, नवीन इमारतींसाठी मंत्रिमंडळाने, माननीय मुख्यमंत्र्यांनी ४ हजार कोटी रुपये हुडकोमधून सार्वजनिक आरोग्य विभागासाठी मंजूर केले आहेत. त्यामुळे या निधीमधून आपल्याला ज्या नवीन आरोग्य विषयक संस्था मंजूर झाल्या असतील त्यांच्यासाठी निधी उपलब्ध होण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी नुसती इमारत

श्री. राजेश टोपे...

उभी करुन चालणार नाही तर त्यामध्ये असणारे इन्फ्रास्ट्रक्चर महत्त्वाचे आहे. त्या ठिकाणी लागणारी यंत्रसामग्री वगैरे या सर्व गोष्टींची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, इन्फ्रास्ट्रक्चर व्यतिरिक्त मनुष्यबळ हा देखील एक महत्त्वाचा विषय आहे. आज सर्व सन्माननीय सदस्यांनी रिक्त जागा, मग त्यामध्ये मेडिकल ऑफिसर आणि विशेषज्ञ ही पदे भरली जावीत, अशी मागणी केली आहे. याबाबत आपण सेकंडरी केअर घेतो. त्या संदर्भात जेवढे आपण तालुका स्तरापर्यंत देता येऊ शकतील ते देण्याचा प्रयत्न करतो. पण जे देऊ शकत नाहीत त्याबाबत तेथील खाजगी सेवा भाड्याने घेण्यासाठी एनएचएमच्या माध्यमातून आपल्याला काही स्पेशालिस्ट देता येऊ शकतील. तंत्रज्ञ आणि पॅरामेडिकलच्या ज्या जागा रिक्त होत्या त्यातील ५० टक्के जागा आम्ही भरल्या आहेत. उर्वरित ५० टक्के जागांसाठी ज्या परीक्षा घेतल्या आहेत आणि त्यामध्ये जी अडचण निर्माण झाली आहे त्यासंबंधी पुन्हा परीक्षाा घेण्याबाबत मी सांगू इच्छितो की, लवकरच आपण पोलिसांचा रिपोर्ट घेत आहोत आणि त्याही जागा आपण भरणार आहोत.

अध्यक्ष महोदय, दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे आरोग्याच्या ज्या वेगवेगळया सेवा आहेत त्यामध्ये मला सभागृहाला सांगायला आनंद होत आहे की, आपण याबाबत नवीन कोणत्या गोष्टी करीत आहोत. यावेळी एनएचएमला जो प्रस्ताव पाठविला होता त्यामध्ये आपल्याला मंजुरी मिळाली आहे. त्यात आपण प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी Component separation unit, Blood storage unit, हे दोन्ही युनिट्स असतील. ही सर्वात महत्त्वाची उपलब्धी आहे. दुसरे म्हणजे प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी सार्वजनिक आरोग्य विभागाचे जितकी रुग्णालये असतील त्या सर्व ठिकाणी एमआरआयची मशिन उपलब्ध असेल. जेणेकरुन त्या ठिकाणी सर्व स्कॅनिंग करता येईल. सिटी स्कॅन सुध्दा १०० बेड्स आलेल्या रुग्णालयाच्या ठिकाणी असेल. म्हणजे तालुका स्तरावर जी उप जिल्हा रुग्णालये असतील त्या ठिकाणी अशी सिटी स्कॅन्स मशिन उपलब्ध केली जाईल, हे देखील मला विश्वासाने सांगायचे आहे.

श्री. राजेश टोपे...

अध्यक्ष महोदय, महत्त्वाच्या गरजांमध्ये Dialysis करावी लागते. अलिकडच्या काळात किडनी पेशन्ट खूप आहेत. त्यांना तालुका स्तरावर Dialysis उपलब्ध करणे. Sonography machine उपलब्ध करणे. तालुका स्तरावर STEMI सारखा प्रोजेक्ट ठेवणे, ज्याला आम्ही Tele-radiology म्हणतो. त्या माध्यमातून कुणालाही ECG मध्ये काही अडचण वाटत असेल तर त्याला लगेच Thrombolyise करुन त्याला Stabilise करण्यासाठी जो 1 Golden Hour असतो तो करण्याचे काम केले जाते. ती व्यवस्था तेथे केली गेली आहे.

अध्यक्ष महोदय, आता आपल्या राज्यात शहरीकरण वाढत चालले आहे. आता आपल्या राज्यात ४५ ते ४८ टक्क्यांपर्यंत शहरीकरण झाले आहे. त्यामुळे मला असे सांगावयाचे आहे की, प्रत्येक नगरपंचायतीमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाचे स्वत:चे Urban Health Centre असेल.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. राजेश टोपे.....

त्यामुळे आजपर्यंत नगरपंचायतीमध्ये जे नव्हते त्याची व्यवस्था होण्याचे काम होईल. प्रत्येक १५ हजार लोकसंख्येला महानगरपालिकेमध्ये या सर्व बाबी केल्या जातील. अध्यक्ष महोदय, कॅन्सर हा विषय एनसीडीमध्ये (नॉन कम्युनिकेबल डिसिज) खूप वाढत आहे. मला सांगण्यासाठी आनंद होतो की, कॅन्सरसाठी मोबाईल कॅन्सर डायग्नॉस्टिक व्हॅन ही प्रत्येक जिल्ह्याला एक असेल त्यामुळे जिथे लक्षण दिसतील ती लक्षात घेण्यासाठी अक्षरश: आशा वर्कर्स ला सुद्धा प्रशिक्षण दिलेले आहे. महिलांमध्ये ब्रेस्ट कॅन्सर, सर्व्हाइकल कॅन्सर किंवा माऊथ कॅन्सर सुद्धा मोठया प्रमाणावर पाहायला मिळतात. या सर्व कॅन्सरच्या संदर्भात आपल्याला छोटे काही लक्षण दिसले तरी त्याच्या अनुषंगाने त्याची बायोप्सी करण्याच्या संदर्भातील डायग्नोसिस करण्याच्या व्हॅन सुद्धा मिळतील. जेणेकरुन बायोपसीचे रिपोर्ट पॉझिटीव्ह आले तर त्यांना जवळच्या सेंटरवर ट्रीटमेंटसाठी पाठवता येईल.

अध्यक्ष महोदय, मी सर्वात समाधानाची एक बाब सांगू इच्छितो की, आपण सर्वजण बॉम्बे हॉस्पिटल, लिलावती हॉस्पिटल किंवा ओबेरॉय हॉस्पिटल अशा कार्पोरेट हॉस्पिटल मध्ये जातो. या सर्व रुग्णालयामध्ये जो स्वच्छतेचा दर्जा आहे तो शासकीय रुग्णालयामध्ये पाहायला मिळत नाही. आज अनेक मध्यमवर्गीयापासून सर्वच लोक शासकीय रुग्णालयामध्ये का जात नाहीत तर त्याचे कारण अस्वच्छता आहे. त्यामुळे दोन बाबींच्या माध्यमातून जाणीवपूर्वक लक्ष देऊन स्वच्छता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून एनएचएमच्या माध्यमातून निधीची प्राप्ती केलली आहे. रुग्णालयातील बेडशिट धुण्यासाठीच्या यंत्रसामुग्री आणि रुग्णालयाच्या स्वच्छतेच्या व्यवस्थेसाठीची पूर्ण यंत्रसामुग्री उपलब्ध करुन दिली जाणार आहे.जेणेकरुन दिवसातून दोन वेळा या सर्व रुगणालयांची स्वच्छता व्हावी. तसेच यंत्राद्वारे धुलाई आणि स्वच्छता याचा दर्जा आपल्याला चांगला ठेवता येऊ शकेल.

अध्यक्षमहोदय, किडनी स्टोन खूप वाढत आहेत त्यामुळे लिथोट्रीप्सी नावाचा म्हणजे कोणतीही शस्त्रक्रिया न काढता किडनी स्टोन काढण्याची व्यवस्थासुद्धा आम्ही तालुका स्तरावर आम्ही करीत आहोत. सर्वात महत्त्वाचा विषय असा आहे

असुधारित प्रत

श्री. राजेश टोपे.....

की, महाराष्ट्रामध्ये शासकीय कर्मचारी वर्ग मोठया प्रमाणात आहे. ज्यांचे वय ४० वर्ष पूर्ण झाले असेल की ४० ते ६० वर्ष हा त्याचा सेवानिवृत्तीचा कालावधी आहे. या दरम्यान याशासकीय कर्मचाऱ्यांची आरोग्य विभागाच्या वतीने ४० ते ५० वय वर्षामध्ये एकदा तरी त्याची डायग्नॉसिस चाचणी करणे अनिवार्य करीत आहोत. ५० वर्षानंतर ६० वर्षापर्यंत त्यांनी दोन वेळा ती चाचणी अनिवार्यपणे घेतली पाहिजे. त्यामुळे २५० कोटी रुपये या महत्त्वाकांक्षीयोजनेवर खर्च करण्यात येत आहे. शासकीय कर्मचारी हे आपले सर्वात महत्त्वाचे ॲसेट आहेत. त्यामुळे या दृष्टीकोनातून आम्ही ती व्यवस्था करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून पूर्णपणे टीबीचे निर्मुलन व्हावे. या अनुषंगाने टी.बी. डायग्नोसिससाठी प्रत्येक तालुक्याताल ट्रुनेट मशिन देण्याची व्यवस्थाकरीत आहोत. आपल्या वाढत्या वयानुसार मोतीबिंदू आह आपल्याला प्रत्येक व्यक्तीलातो होणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे अलिकडच्या काळात मोतीबिंदूसाठी फेको तंत्रज्ञान हे सर्वात आधुनिक आणि अद्ययावत असणार आहे. मोतीबिंदू फेको मशिनद्वारेच व्हायलापाहिजे या दृष्टीकोनातून नेत्र विभागाच्या माध्यमातून अतिशय आधुनिक व्यवस्था केलेली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तंत्रज्ञानाचा वापर करुन अलिकडच्या काळात रिमोट एरियामध्ये किंवा आदिवासी भागात स्पेशालिस्ट नाहीत, डॉक्टरर्स नाहीत यासाठी आता आपल्याला सर्व ठिकाणी ४ जी पर्यंतचे नेटवर्क उपलब्ध आहे. त्याचा उपयोग घेऊन टेली मेडिसीन हा सर्वात महत्त्वाचा विषय आहे मुंबईमध्ये बसणारे एखादे चांगले डॉक्टर सुद्धा एखाद्या गावात, खेडयात प्राथमिक आरोगय केंद्राला चांगला सल्लादेऊ शकतात. यासाठी आपण टेली मेडिसीनची सुविधा देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मोठा ॲक्सिडेंट झाल्यांनतर कोणतेही व्यंग आले असेल तर त्यासाठी लागणाऱ्या ब्रेन ऑपरेशन किंवा अन्य प्लास्टिक सर्जनची व्यवस्था करण्यासाठी लेव्हल १ चे ट्रॉमा केअर सेंटर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यामुळे या सर्व बाबींच्या माध्यमातून मला हे सांगायचे आहे की, आपण आरोग्य सेवा ही खऱ्या

असुधारित प्रत

श्री. राजेश टोपे.....

अर्थाने सर्व पद्धतीने सर्वांपर्यंत पोहोचावी. यासाठी निधीची व्यवस्था पूर्ण केली जात आहे. तसेच रिक्त जागा भरण्याचे काम देखील केले जात आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे डायग्नॉसिसि सर्व्हिसेस देण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे मला विश्वास आहे आहे की, या आरोग्य सेवेच्या माध्यमातून आपल्याला निश्चितपणे सर्वसामान्य लोकांना समाधान देण्यात येईल. सामान्य माणूस हा केंद्रबिंदू मानून त्याच्या हिताची जपवणूक करणे ही खऱ्या अर्थाने शासनाची महत्त्वाची जबाबदारी समजून आपण हे काम करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, आमचा ४ A चा प्रिन्सिपल महत्वाचा आहे. महात्मा गांधींनी सुद्धा असे म्हटले आहे की, "It is health that is real wealth and not pieces of Gold and Silver." त्यामुळे खरे असेल तर आपण "Health is Wealth" त्या विषयाने आम्ही आरोग्याच्या दृष्टीने काळजी घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. या सर्वांमध्ये क्वॉलिटी सर्व्हिस मिळाली पाहिजे हेमहत्त्वाचे आहे. त्या दृष्टीकोनातून आपण गुणवत्ता सुधारण्याचे काम म्हणजे हेल्थ सर्व्हिसेस मध्ये ज्या इंडियन स्टॅंडर्डस् मिळायला पाहिजे. आपण ज्याला National Quality Assurance Scheme (NQAS) म्हणतो. यासंदर्भात सार्वजनिक आरोग्याची प्रत्येक संस्था ही त्या दर्जाचीच आरोग्य सेवा द्यावी या दृष्टीकोनातून आम्ही कटीबद्ध आहोत. हा सुद्धा विश्वास मला या निमित्ताने व्यक्त करायचा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रासंदर्भात मी सांगू इच्छितो की, सन २००१ च्या अनुषंगाने बृहत आराखडा केलेला आहे. सन २०११ च्या जनगणनेसाठी जोड बृहत आराखडा करीत आहोत. नवीन वाढत असलेल्या लोकसंख्येच्या अनुषंगाने आम्हाला जिओ मॅपिंग देखील करायचे आहे. त्या संदर्भात जे नवीन प्रस्ताव येत आहेत त्या अनुषंगाने ते निकषात बसतात किंवा नाही हे पाहणार. त्यानंतर नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा नवीन उपकेंद्र मंजूर करण्याच्या दृष्टीकोनातून तत्परतेने कार्यवाही केली जाईल.

असुधारित प्रत

श्री. राजेश टोपे.....

अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षाच्या १४ हजार १३७ कोटी १७ एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्याची विनंती मी सभागृहास करीत आहे.

-------

असुधारित प्रत

श्री. छगन भुजबळ (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) अध्यक्ष महोदय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण या विभगाच्या अर्थसंकल्पिय पुरवणी मागण्यांसंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. आशिष जैस्वाल, सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे, सन्माननीय सदस्य श्री. सुनिल शेळके, सन्माननीय सदस्य श्रीमती माधुरी मिसाळ, सन्माननीय सदस्य श्रीमती सुलभा खोडके, सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा, सन्माननीय सदस्य श्री. अबु आजमी, सन्माननीय सदस्य श्री. आकाश फुंडकर, सन्माननीय सदस्य श्रीमती मनिषा चौधरी, सन्माननीय सदस्य श्री. दिलीप लांडे सन्माननीय सदस्य श्री. राहूल पाटील आणि इतर काही सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडलेली आहे. मी काही जास्त वेळ घेणार नाही.

अध्यक्ष महोदय, कोरोना काळात आरोग्य विभागाने अतिशय चांगले काम केले, हे खरे आहे. सर्वांनीचत्याचे कौतूक केले आणि ते स्वाभाविक आहे. त्यानंतर पोलिसांनीही उत्तम काम केले आहे. रात्रंदिवस ते रस्त्यावर होते. त्यांचे सुद्धा कौतूक केले पाहिजे. पण हे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण हा एक असा विभाग आहे की, सर्व वाहतूक आणि इतर व्यवस्था बंद असताना या राज्यातील १२ कोटी लोकांना ५३ हजार दुकांनातून खेड्यातून घरांघरांपर्यत अन्न पोहोचविण्याचे काम न थांबता लॉकडाऊन असताना केले आहे. त्यामध्ये विशेष असे की, सर्व साधारणपणे ३ लाख ८० हजार मॅट्रीक टन धान्य आपण नेहमी द्यायचो. तेवढेच धान्य भारत सरकारकडून पीएमजेकेवाय मधून आले आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. छगन भुजबळ....

जे अप्राधान्य होते त्यावर जवळजवळ सव्वा सातशे कोटी रुपये खर्च केले आहेत. केशरी कार्ड आहे मात्र ते प्रााधान्य क्रमांकात नाही अशांना ८ रु, १२, रु या दराने धान्य दिले. अशाप्रकारे जवळजवळ ८ लाख टन धान्याचे वाटप या विभागाच्या माध्यमातून केले आहे. दुकानदार,ट्रक ड्रायव्हर, हमाल बंधू, अधिकारी या सर्वांनी मिळून, न थांबता काम केले. कोरोना काळात नेहमीच्या पेक्षा तिप्पट या सर्वांनी काम केले व धान्य दिले. काही दुकानदार, इतर लोकांना कोरोनाची बाधा झाली, यामध्ये ते दिवंगत झाले या बद्दल दु:ख आहे. राज्यात वादळ आले तेव्हा आपण धान्याचा व केरोसीनचा पुरवठा केला. कोरोना काळातही शिवभोजन फुकट दिले. आता पर्यंत ९ कोटी थाळया वाटल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, ' वन कार्ड वन रेशन' या संबंधी बरीच चर्चा होते. आपल्या राज्यात ही योजना सुरु आहे. लाखो लोकांनी त्याचा फायदाही घेतला. बिहारच्या लोकांना देखील या योजनेनुसार धान्य मिळाले आहे. मागील काही दिवसांपूर्वी E-POS मशीनमध्ये बिघाड झाला. हा केवळ आपल्या राज्याचा प्रश्न नव्हता. देश पातळीवर कोठे तरी गडबड झाली होती. संपूर्ण देशात ही यंत्रणा बिघडली होती. ४-५ दिवसात यामध्ये सुधारणा करण्यात आली.

अध्यक्ष महोदय, इष्टांक वाढवा असे सातत्याने सांगण्यात आले. आपल्याला केंद्र शासनाकडून दर महिन्याला ठराविक धान्य येते. ते आपण आहे त्या नुसार वाटप करतो. मात्र काही लोक हे धान्य उचलतच नाहीत. असे ४ ते ५ टक्के धान्य शिल्लक राहते. वर्ष- दोन वर्षे झाले, तरी ते धान्य उचलत नाहीत. त्यामागे काही कारण असेल. या बाबत अभ्यास केला जाईल व इष्टांक वाढवण्याचे ठरवले जाईल. आता आपण राज्यात ७३ हजार अंत्योदय बीपीएलची कार्डे देणार आहोत. १७ लाख लाभार्थ्यांना प्राधान्य क्रमांकाने सामील केले जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्याला लोकसंख्येच्या प्रमाणात वाटले आहे.

अप्रकाशित प्रत

श्री. छगन भुजबळ....

अध्यक्ष महोदय, दुकानदारांची नेहमीच ओरड असते की, आम्हाला फायदा मिळत नाही. या करिता आपण एक पायलट प्रोजेक्ट सुरु केला आहे. यामध्ये त्यांना स्टेशनरी ,प्रमाणित बी-बियाणे, महानंदचे पदार्थ, शासकीय दूध इ. गोष्टी विकण्याची परवानगी दिली आहे.

अध्यक्ष महोदय, दिव्यांग व अनाथ मुले, पीडित महिला व तृतीयपंथी यांच्याकरिता विशेष विचार करुन त्यांना कार्ड देण्याचा निर्णय घेतलेला आहे. मी या ठिकाणी अधिक वेळ घेणार नाही. बायोडिझेलच्या बाबत चर्चा केली गेली. ही देशव्यापी अडचण तयार झालेली आहे. या बाबतीत केंद्र शासनाने काही गाईडलाईन्स दिल्या असून आपणही काही गाईडलाईन्स तयार केल्या आहेत. काही ठिकाणी कडक अंमलबजावणी होते तर काही ठिकाणी होत नाही. कोर्टामध्ये देखील हे टिकणे कठीण होते. आपण जो पदार्थ पकडतो तो हिंदुस्थान पेट्रोलियम, इंडियन ऑईल यांच्या लॅबमध्ये जातो. त्यांना आपण विचारतो की, हे काय आहे. ते सांगतात आमच्याकडे केवळ दोनच गोष्टी होतात. हे पेट्रोल आहे काय, नाही किंवा हो. डिझेल आहे काय, हो किंवा नाही. ते काय आहे हे सांगण्याची त्यांच्याकडे यंत्रणा नाही. इंडियन ऑईलचे प्रमुख अधिकारी या सर्वांची मी बैठक घेतली होती. आमचे सहकारी सांगत आहेत की, त्यांच्याकडे अशी यंत्रणा आहे. आपण त्याचा अभ्यास करु. गुजरात मधून मोठया प्रमाणात हा व्यवहार होत होता. गुजरातमध्ये बरीच आरडाओरड झाल्यानंतर आता तेथे कमी झाले. हे तेल, बायोडिझेल कोठून येते ? जट्रोफा कोठे आहे, त्याचा उगम कोठे होतो ? कोणी सांगते की, ते इंडस्ट्रीयल ऑईल आहे तर कोणी सांगते की, सबस्टँडर्ड डिझेल आहे. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अनेकांचे असे म्हणणे आहे की, हे स्मगलर्ड डिझेल आहे. यामुळे केंद्र व राज्य शासनाचाही कर बुडवला जातो. हे तेल कार, टँकर मधून येत नाही. ते जेएनपीटी गोदीमधून येते. तेथे प्लग करण्याची आवश्यकता आहे. तेथे केंद्रीय यंत्रणा, कस्टम आहे. तथे आपण सहजपणे अडवू शकतो. या संबंधी आम्ही त्यांच्याशी चर्चा केलेली आहे. मुख्य

श्री. छगन भुजबळ....

सचिव यांनी देखील केंद्र व राज्य स्तरावर बैठक घेऊन चर्चा केली व यामध्ये एकसुत्रता कशी आणता येईल, याचा विचार केला जात आहे. जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट व आपल्यामध्ये नोडल अधिकारी नियुक्त केलेला आहे. तो अधिकारी या संबंधी कारवाई करेल. कशा प्रकारे कारवाई करावी या संबंधी विचार सुरु आहे. या करिता बाहेरच्या राज्यातही काही पोलीस अधिकारी पाठवले आहेत. डिझेल व पेट्रोल यापेक्षा वेगळे काही तरी मिश्रण करुन विकले जात आहे. यामुळे आपला कर व केंद्र शासनाचा कर बुडतो हे मान्य आहे. यावर कडक कारवाई करण्याबाबत निश्चितच आपण कटीबध्द आहोत, आपण ते काम करीत राहू.

अध्यक्ष महोदय, संजय गांधी योजनेमध्ये नावे घेण्यात यावीत असे सांगण्यात आले. ही सूचना मला योग्य वाटते. या योजनेमध्ये त्यांचा समावेश असेल तर तो माणूस गरीब आहे. तो जर गरीब बसेल तर त्याचा विचार केला पाहिजे व प्राधान्य क्रमांकात घेतले पाहिजे, ही सूचना रास्त आहे. या दृष्टीने निश्चितपणे पावले उचलण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, E -POS मध्ये सुधारणा केली जाणार आहे. नवनवीन ॲप्लिकेशन्स येत आहेत. त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जात आहे. काही सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, शिवभोजन थाळी बाबत आम्ही मागणी केली, मात्र आम्हाला रुग्णालयाच्या ठिकाणी शिवभोजन केंद्र मिळाले नाही. मागील दोन वर्षात एक लाख व पुन्हा एक लाख अशा दोन लाख थाळयांचे नियोजन वित्त विभागाने करुन दिले. यंदा निधीच्या अडचणीमुळे एक लाख थाळया वाढवून देण्याची मागणी केली होती. मात्र ती मान्य झाली नाही. यामुळे आता दोन लाख थाळया वाटून झाल्या आहेत. यापेक्षा जास्त थाळया किंवा केंद्र आता देता येणार नाही.

असुधारित प्रत

श्री. छगन भुजबळ....

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी काही प्रश्न मांडले आहेत. त्याची आम्ही नोंद घेतलेली आहे. याबाबत जरुर कारवाई करु. मी आपल्या माध्यमातून सदनाला विनंती करतो की, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सन २०२२-२३ मधील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील मागणी क्र. एम १ ते एम ६ अंतर्गत एकूण रक्कम रु. १७०१०.०४ कोटी (१७ हजार १० कोटी ४ लाख) रु. अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. यास सदनाने मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे (ऊर्जा राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील ऊर्जा विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर देखील बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी आपली मते व्यक्त केली. मौलिक सूचना देखील दिल्या.

अध्यक्ष महोदय, वेळेचे थोडेसे बंधन आहे. मी यातील काही सूचनांवर बोलू इच्छितो. महापारेषणवर जास्त कोणी बोलले नाही. परंतु, महावितरण व महानिर्मितीच्या बाबत बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. त्यामध्ये देखील जास्त विषय महावितरणचा होता. विशेषत: शेतीच्या विषयावर बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी चर्चा केलेली आहे. त्यातील मोठा फोकस हा शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी, यावर होता. याबाबत राज्यातील शेतकऱ्यांचा मोठा आक्रोश आहे व रास्त मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी, याबाबतीत देखील बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी त्यांचे मत, त्यांच्या भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. खरे तर जेव्हा महाविकास आघाडीचे सरकार आले त्यावेळेस देखील आदरणीय डॉ.नितीन राऊत व मी आम्ही दोघांनी या संदर्भात सुरुवातीलाच बैठका घेतल्या. राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याकरिता काय काय पर्याय आहेत, याचा आम्ही दोघांनी आढावा घेण्याचा प्रयत्न केला.

अध्यक्ष महोदय, मी बऱ्याच अधिकाऱ्यांना घेऊन काही बैठका घेतल्या. वेगवेगळे काय काय पर्म्युटेशन्स-कॉम्बीनेशन्स करता येतील, शॉर्ट टर्ममध्ये काय करता येईल याचा खूप विचार केला. परंतु, साधारणपणे एखाद्या ग्रामीण भागातील जे सबस्टेशन असते, त्यामध्ये एका पॉवर ट्रान्सफॉर्मरवरुन शेतीचे २ फिडर जातात. मात्र आपल्या त्या सबस्टेशनची क्षमता एवढी आहे की, आपण एकाच वेळेस दोन फिडर चालवू शकत नाही. त्यामुळे एक दिवसा चालवतो व एक रात्री चालवतो.

अध्यक्ष महोदय, एकदम दोन्ही फिडर दिवसा चालवयाचे असतील तर राज्यातील सबस्टेशन्सची मोठ्या प्रमाणात क्षमतावाढ करणे असेल, दिवसा वीज दिली तर, त्याचे चार्जेस असतील या सर्व गोष्टी पाहता थोडेसे शॉर्ट टर्ममध्ये करणे... कोविडची, सरकारची, महावितरणची परिस्थिती पाहता हे थोडे कठीण जरी असले

श्री.प्राजक्त तनपुरे ...

तरी लाँग टर्ममध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा वीज कशी देता येईल, याबाबतीत महाविकास आघाडीच्या सरकारने मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरु केलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, आज आपण ग्रामीण भागामध्ये सबस्टेशनच्या बाजूला २-५ कि.मी.च्या रेडिअसमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पाची निर्मिती करुन त्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याच्यादृष्टीने आजच्या घडीला साधारणपणे १३३ फिडर ... (अडथळा)... ठीक आहे माझ्या विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात परंतु, मला दोन मिनिटे दिवसा विजेच्या विषयावर बोलू द्या, नंतर आपण त्याबाबत सांगू.

अध्यक्ष महोदय, आतापर्यंत आपण जवळपास १३३ फिडरला व सुमारे ६० हजार ग्राहकांना दिवसा वीज देत आहोत. आपण यामध्ये अशी सुधारणा केलेली आहे की, फक्त शासकीय जमिनी व्यतिरिक्त आता आपण खाजगी जमिनी देखील यामध्ये घेण्याचे ठरविले आहे. जे शेतकरी त्यांच्या जमिनी देतील, त्यांना वर्षाला एकरी ३० हजार रुपये भाडे देण्याचे देखील ठरविले आहे. जेणेकरुन शेतकऱ्यांनी देखील यामध्ये जास्त सहभागी व्हावे. या मोहिमेची व्याप्ती वाढावी.

अध्यक्ष महोदय, आता रिसेंटली जवळपास १४४० मेगावॅटचे करार झालेले आहेत. आता ४०० मेगावॅट इन्स्टॉल देखील झालेले आहेत. याला आणखी मोठ्या प्रमाणावर चालना देण्याचा आमचा प्रयत्न आहे. भविष्यकाळात यामध्ये जर म्हणावा असा रिस्पॉन्स आला नाही, तर यामध्ये आणखी काय करता येईल... मी काही डेव्हलपर लोकांशी देखील आपले अधिवेशन संपल्यावर बैठक ठेवलेली आहे. त्यांच्या देखील अडचणी मी समजून घेणार आहे.

अध्यक्ष महोदय, वेळ पडली तर मी महावितरणला आराखडे बनवायला लावलेले आहेत. राज्य सरकार क्रॉस सबसीडीच्या माध्यमातून शेती पंपाला जे काही पैसे देते. आम्ही एक आराखडा तयार करुन माननीय उप मुख्यमंत्री महोदयांकडे

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे ...

सादर करणार आहोत. या योजनेमध्ये राज्य सरकारने जर काही पैसे दिले व त्या माध्यमातून जर राज्य सरकारचीच क्रॉस सबसीडी वाचत असेल, अशा माध्यमातून जर अजून पैसे उपलब्ध होऊन मोठ्या प्रमाणावर जलद गतीने जर का आपण ही योजना राबवू शकलो तर शेतकऱ्यांना दिवसा मोठ्या प्रमाणामध्ये आपण वीज देऊ शकू. उद्योगासाठी देखील क्रॉस सबसीडीचे बर्डन कमी होईल, अशा आशयाचा प्रस्ताव आम्ही निश्चितच लवकरच अर्थ मंत्री महोदयांकडे सादर करणार आहोत.

अध्यक्ष महोदय, इतर बऱ्याच नवीन उपकेंद्रांच्या मागण्या केल्या. लिंक लाईन, फिडर सेपरेशन, नवीन ट्रान्सफॉर्मर याकरिता देखील हे जे काही कृषी वीज धोरण आपण आणलेले आहे, त्या माध्यमातून जो काही ॲग्रिकल्चर कॉन्टीन्जन्सी फंड उपलब्ध होतो, त्या माध्यमातून देखील ही कामे करण्याचे प्रस्तावित आहे. त्या पलीकडे जाऊन नवीन आरडीएसएस ही मोठी स्कीम केंद्र व राज्याची मिळून येणार आहे. त्या स्कीमच्या माध्यमातून वेगवेगळ्या डिव्हिजनचे तालुक्यातील डीपीआर आपण मागवलेले आहेत. खूप मोठ्या प्रमाणावर या योजनेमध्ये देखील उपकेंद्रांची असतील किंवा तद्नुषंगीक काही कामे देखील करण्याचे प्रस्तावित आहे.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, विजेच्या तारा ओढल्या गेल्या.., जुने पोल आहेत. हा इशु जरी विस्तारात थोडासा छोटा वाटत असला तरी त्या त्या मतदारसंघाच्या दृष्टीने हा खरे तसा मोठा गांभीर्याचा विषय आहे. लवकरच सर्व राज्याची एक बैठक घेऊन याबाबतीत देखील मोठा आढावा घेऊन एक चांगले धोरण घेण्याच्या विचारात आम्ही आहोत.

अध्यक्ष महोदय, मी ऊर्जा विभागाकरिता सन २०२२-२०२३ करिता कार्यक्रमांतर्गत खर्चासाठी रुपये ९ हजार ९२६ कोटी व अनिवार्य खर्चासाठी रुपये ६१ कोटी, ५७ लाख, २३ हजार याप्रमाणे एकूण रुपये ९ हजार ९८७ कोटी ५७ लाख २३ हजार रुपयांच्या मागण्या अर्थसंकल्पीत करण्यासाठी आपल्या माध्यमातून सभागृहास विनंती करीत आहे.

.........

श्री.जयंत पाटील (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, सभागृहातील दोन्ही बाजूच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला. मी त्या सर्वांचे सुरुवातीला आभार व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागात जवळपास सर्वच आमदारांनी त्यांच्या भाषणात या विभागाचा उल्लेख करुन त्यांच्या मतदारसंघातील, जिल्ह्यातील प्रश्न मांडलेले आहेत. या सर्वांना मी थोडक्यात उत्तर देण्याचा प्रयत्न करणार आहे. विरोधी पक्षाच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी प्रथम भाषण केले. डिंबे माणिकडोह बोगदा या विषयी त्यांनी एक उल्लेख केला की, खरे म्हणजे भाषण केल्यानंतर उत्तर घेतल्याशिवाय जायचे नसते, अशी प्रथा आहे. परंतु, ते आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ.संजय कुटे आमचा निरोप त्यांना कळवतील याकरिता मी त्यांचे नाव घेऊन उल्लेख करीत आहे.

अध्यक्ष महोदय, डिंबे माणिकडोह बोगद्याचा प्रस्ताव प्रोसेसमध्ये आहे. त्यांनी उल्लेख केला की, मंत्रिमंडळातील एका मंत्री महोदयांचा याला विरोध आहे. परंतु, अजिबात विरोध नाही. सर्व मंत्रिमंडळाचे एकमत आहे. कुकडीच्या नेटवर्कमध्ये हे अतिरिक्त पाणी देण्यासाठी शासनाने महामंडळाला काही शेरेपूर्तता करण्यास पाठविले आहे. ते आल्यानंतर या प्रकल्पाला गती मिळेल. कुकडीच्या नेटवर्कमध्ये लवकरात लवकर हे ॲडिशनल पाणी देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

अध्यक्ष महोदय, पिंपळगाव जोगेचा त्यांनी उल्लेख केला. सर्व लायनिंग करण्याची आवश्यकता नाही. परंतु, काही सुधारणा, दुरुस्त्या या शासनाने, आमच्या विभागाने हाती घेतलेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी उल्लेख केलेला असला तरी ऑलरेडी ते काम सुरु आहे. या वर्षी देखील दोन अडीच कोटी रुपये ... दोन कोटी आठ लाख रुपये वगैरे धरलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, साखळी क्रमांक ०.७२० मधून निघणाऱ्या मायनरमध्ये देखील उर्वरित मातीकाम, बांधकामे करण्यात आलेली आहेत ... आपण करीत आहोत. दुसरा महत्वाचा प्रश्न त्यांनी गोदावरी डाव्या तट कालव्याच्या दुरुस्तीबाबतचा मांडला. मला येथे सांगितले पाहिजे की, तो कालवा क्षतीग्रस्त झाला

श्री.जयंत पाटील ...

आहे वगैरे सन्माननीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले. परंतु, आमचे सरकार आल्यानंतर आम्ही त्या कॅनॉलवरची ३६४ स्ट्रक्चरपैकी १२१ बांधकामे विशेष दुरुस्ती अंतर्गत पूर्ण केलेली आहेत. सन २०२१ मध्ये २२ कामांना ७५.८७ कोटी रुपये प्रशासकीय मान्यता देऊन त्या कामांना देखील सुरुवात केलेली आहे. चालू वर्षी ३३ कोटी निधीची तरतूद करुन निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

अध्यक्ष महोदय, मला हे सांगावयाचे आहे गोदावरी डावा तट कालवा हा सर्वात जुना कालवा आहे. तेथून खूप मोठ्या प्रमाणात पाणी लिक होते. तेथील आमचे प्रतिनिधी सन्माननीय सदस्य श्री.आशुतोष काळे यांचा हा कालवा दुरुस्त करण्याबाबत आग्रह होता. माननीय श्री.छगन भुजबळ यांनी देखील एकदा याबाबत आग्रह करुन बैठक घेण्याबाबत सूचना केली होती. त्यामुळे त्या भागातील या कालव्याच्या सर्व कामाला फार मोठी गती आलेली आहे. गोदावरी डावा तट कालवा सुधारुन लिकेजेसचे प्रमाण अतिशय वेगाने कमी करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

यानंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील ...

मला खात्री आहे पुढील कालावधीत बरेच प्रश्न कमी होतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी निळवंडे प्रकल्पाचा उल्लेख केला आहे. त्यांना तुलना करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु त्यांनी सांगितले की, निळवंडे प्रकल्पाचे काम थांबलेले आहे. यासंदर्भात सभागृहाला सांगू इच्छितो की, सभागृहामध्ये माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात आहेत. ते या प्रकल्पाचा सतत पाठपुरावा करीत असतात. राहुरी मतदारसंघाचे सदस्य माननीय राज्यमंत्री श्री.प्राजक्त तनपुरे आहेत, ते ही त्यांच्या मतदारसंघामध्ये या प्रकल्पाच्या माध्यमातून पाणी कशा पद्धतीने लवकर मिळू शकेल यासाठी प्रयत्न करीत असतात. तसेच सन्माननीय सदस्य डॉ.किरण लहामटे हे या प्रकल्पाच्या माध्यमातून त्यांच्या मतदारसंघात वरील बाजूने अतिरिक्त कालवा घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, पाठपुरावा करीत आहेत. सदरहू प्रकल्पाच्या कालव्यांना या सरकारने खूप गती दिली आहे. अनेकांना वाटते की, हे सरकार काही करते की नाही ?

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.संजय कुटे यांना सांगू इच्छितो की, मागील २ वर्षात कोरोना कालावधी असताना व आर्थिक चणचण असताना महाविकास आघाडीने निळवंडे प्रकल्पावर भरघोस निधी खर्च केला आहे, हे सांगण्यास मला अभिमान वाटत आहे. निळवंडे सारख्या मोठ्या प्रकल्पासाठी सन २०१४ ते सन २०१९ या कालवधीत मागील सरकारने एकूण केवळ ३८८ कोटी रुपये म्हणजे दरवर्षी सरासरी ७७ कोटी रुपये खर्च केले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले आहे की, त्यावेळी श्री.मधुकर पिचड यांनी सांगितल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घातले होते. त्यावेळी गरजेचे होते ते करण्यात आले असेल.

अध्यक्ष महोदय, आमचे सरकार सत्तेत आल्यानंतर निळवंडे प्रकल्पास सन २०१९ ते सन २०२२ या कालावधीत ८२३.७२ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला म्हणजे सरासरी दरवर्षी २७५ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे. या

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील ...

सरकारच्या काळात सदरहू प्रकल्पाचे काम किती वेगाने सुरु आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. उक्त प्रकल्पावर यावर्षी ३६५ कोटी रुपये खर्च गृहीत धरला आहे. डावा व उजवा कालवा यांची ७५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. आमचा विश्वास आहे की, काही नियामक मंडळांनी आणखी तांत्रिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या २-४ कामांना मंजुऱ्या दिल्या आहेत. आता माहे मार्च, २०२२ सुरु असून माहे नोव्हेंबर/डिसेंबर, २०२२ मध्ये मुख्य कालव्यातून पाणी सोडणे शक्य झाले तर सोडण्यात येईल. या प्रकल्पाचा डावा कालवा ८५ कि.मी. व उजवा कालवा ९७ कि.मी. आहे, माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये या कॅनॉलचे काम पूर्ण होईल, अशी आम्हाला खात्री आहे. या प्रकल्पाच्या पोट चाऱ्या अद्याप पूर्ण झाल्या नाहीत. परंतु मुख्य कालव्याचे काम माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, मी या सभागृहाचा सदस्य झाल्यापासून निळवंडे धरणाची कहानी ऐकत आहे. हा प्रश्न सुटला पाहिजे. सदरहू काम फार वर्षापासून सुरु आहे. या दोन वर्षात या प्रकल्पास विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. हे आपण सर्वांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी पश्चिमेकडून गोदावरी खोऱ्यामध्ये पाणी कसे आणणार, त्यासाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, योजना कधी राबविण्यात येणार, याचा उल्लेख करण्यात आला नाही, त्यासाठी तरतूद केली नाही, धोरण तयार केले नाही, असे प्रश्न उपस्थित करुन धोरण जाहीर करण्याची मागणी केली आहे.

अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यामध्ये वळविण्यासाठी ३० प्रवाही वळण योजनांची कामे विविध टप्प्यावर प्रगती पथावर आहेत. माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी मांजरपाडा धरणाचे काम आग्रहाने पूर्ण करुन घेतले. वळण बंधाऱ्यांची योजना किती परिणामकारक होऊ शकते, हे पहावयाचे असेल तर मांजरपाडा धरण पाहण्यासाठी

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील ...

गेले पाहिजे. सदरहू धरण लहान आहे परंतु त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वळविण्यासाठी यश मिळाले आहे. याच धर्तीवर ३० प्रवाही वळण योजनांच्या माध्यमातून ७.४० अब्ज घनफूट प्रवाही पद्धतीने गोदावरी खोऱ्यामध्ये वळविण्याचे नियोजन केले आहे. १४ प्रवाही योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्या आहेत. त्यातून १.०७ अब्ज घनफूट पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये वळविण्यात येणार आहे. ५ प्रवाही योजना बांधकामाधीन असून याद्वारे १.३५ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये वळविण्याचे नियोजन आहे. या योजनांसाठी सन २०२२-२०२३ करिता ५ कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. ११ प्रवाही वळण योजना प्रस्तावित असून त्याद्वारे ४.९८ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे नियोजन आहे. उक्त योजनांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर तत्काळ निधीची तरतूद करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, या व्यतिरिक्त दोन नदी जोड योजनांची कामे प्रस्तावित असून याद्वारे १२.१९ टीएमसी पाणी प्रवाही व उपसा पद्धतीने गोदावरी खोऱ्यामध्ये वळविण्याचे नियोजन आहे. या दोन्ही नदी जोड प्रकल्पातून गोदावरी खोऱ्यामध्ये पाणी वळविण्यासाठी त्यांचे सर्वेक्षण, अन्वेशन व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत प्रगती पथावर आहे. दमणगंगा एकदरी योजनेद्वारे १०५ टीएमसी पाणी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी लींकद्वारे ७.१३ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्याकरिता अहवाल मागविला आहे. यामधील एका प्रकल्पाचा अहवाल प्राप्त झाला आहे. या दोन्ही नदी जोड योजनांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यांची कामे तत्काळ सुरु करण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला उक्त माहिती यासाठी देत आहे की, हा विषय महत्त्वाचा आहे. गोदावरी खोऱ्यात शक्य तेवढी ताकद लावून पाणी आणण्याचे काम करण्यात येत आहे. वैतरणा व मुकणे यामध्ये एक सॅडल वॉल होती त्यामधून एक टीएमसी पाणी ट्रान्स्फर करण्याची व्यवस्था मागील सरकारच्या पूर्वीच्या काळापासून

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील ...

होती. सदरहू डिझाईन बदलून ११ टीएमसी पाणी ट्रान्स्फर होईल या अशा पद्धतीने भींत बांधण्यात येत आहे. सदरहू पाणी मुकणे धरणात आल्यावर अप्रत्यक्षपणे ते गोदावरी खोऱ्याकडे वळणार आहे. त्यामुळे दीड दोन वर्षांच्या कालावधीत पाण्याचा मोठा चंक ट्रान्स्फर करता येईल. मुंबईला पाणी कमी पडत नसेल त्या उर्वरित काळात पाणी पुढील भागामध्ये ट्रान्स्फर करण्यात येईल. तसेच खालील भागामध्ये काही योजना करण्यात येत आहेत. ते पाणी लिफ्ट करुन वैतरणा धरणात आणले तर ११ टीएमसी + ७ टीएमसी पाणी आणता येऊ शकेल. या ठिकाणी कोणत्या भागात पाणी सोडवयाचे यासाठी ऑप्शन मिळेल. अशा वेगवेगळ्या योजनांचे आराखडे तयार करण्यात आले आहेत. काही प्रकरणी वन विभागाचा अडथळा आहे. त्याकरिता मुख्य अभियंता यांच्या नेतृत्वाखाली एक टीम तयार करण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून दर सोमवारी योजनांचे मॉनेटरींग करण्याचे काम करण्यात येते. त्यामुळे बऱ्याच कामांना गती मिळाली तर पुढील माहे जुन किंवा माहे डिसेंबर मध्ये पुरवणी मागणीच्या माध्यमातून अतिरिक्त मागणी करता येईल. काही प्रकरणांतील वन विभागाच्या अडचणी दूर होऊन डिझायनींग पूर्ण झाल्या तर महाराष्ट्राच्या गोदावरी खोऱ्याच्या माध्यमातून बीड येथील धरणातून लातूरकरांना पाणी देण्यासाठी अतिरिक्त व्यवस्था होईल.

अध्यक्ष महोदय, गोदावरी खोऱ्याचे पैठण येथून निघालेले डावे व उजवे कालवे क्षतीग्रस्त झाले आहेत. डॉ.राहूल पाटील यांनी पैठण-जायकवाडीच्या २०८ कि.मी. डाव्या कालव्याची दुरुस्ती करण्यात यावी, असा मुद्दा मांडला आहे. आम्ही त्यांच्या चार पावले पुढे जाऊन दोन्ही कालवे आधुनिक पद्धतीने करण्यासाठी त्या कालव्यांच्या क्षतीग्रस्ततेचा सर्व्हे करणार आहोत.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील.......

सदर प्रकल्पाचा सर्व्हे करण्यात येईल. जर हा प्रकल्प मोठा होत असेल तर तो वित्तीय संस्थाच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येईल. जर हा प्रकल्प लहान होत असेल तर त्या चे काम तत्काळ सुरु करण्यात येईल. दोन्ही बाजुच्या कालव्यांचे कंट्रोल रिमोटली करता येईल, एवढे ते कालवे आधुनिक पद्धतीने करण्यात येणार आहेत. या कालव्याच्या माध्यमातून गंगाखेडपर्यंत पाणी गेले पाहिजे, असा आम्ही प्रयत्न करीत आहेत.

अध्यक्ष महोदय, लातूर आणि बीड हे दोन्ही पाण्यापासून वंचित असलेले जिल्हे आहेत. परंतु या दोन जिल्ह्यामध्ये प्रवाही सिंचनासह अन्य पाणी उपलब्ध आहे. अतिरिक्त पाणी मिळविण्यासाठी हे शासन वळण बंधारे बांधत आहे. काही तुटीचे प्रश्न आहेत. अलीकडील काळामध्ये असे लक्षात आले आहे की, माजलगाव येथील धरण सन १९७५ पूर्वी बांधण्यात आले आहे. परंतु काही त्रुटीमुळे त्या धरणाची नोंद सन १९७५ नंतर करण्यात आली. त्यामुळे आपल्याला १९ टीएमसी पाणी कमी मिळत होते. सन १९७५ मधील करारामध्ये असे ठरले होते की, आपणास फक्त १०२ टीएमसी पाण्याचा वापर करता येईल. कारण १९ टीएमसीचे धरण नंतर करण्यात आले, असे दाखविण्यात आले होते. परंतु याचे सर्व रेकॉर्ड पाहिल्यानंतर असे लक्षात आले आहे की, उक्त १९ टीएमसी धरणाचे काम सन १९७५ पूर्वीच पूर्ण झालेले आहे. तसेच त्या धरणाचे पेमेंट देखील सन १९७५ पूर्वीच केलेले आहे. त्यामुळे आता आपण १९ टीएमसी पाण्याच्या धरणाची कामे करु शकतो. याचा अर्थ आता आपणास १९ टीएमसी अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे.

अध्यक्ष महोदय, नांदेड येथील दुसऱ्या राज्यामध्ये जाणाऱ्या पाण्याचे रि-कॅल्क्युलेशनकरुन त्यात काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र सरकारने मराठवाड्याकडे पूर्ण लक्ष केंद्रीत केले आहे. पुढील तीन ते पाच वर्षामध्ये मराठवाड्यातील पाण्याचे दुर्भिक्ष मोठ्या प्रमाणावर कमी व्हावे, यासाठी हे शासन प्रयत्न करीत आहे. पुणे जिल्ह्याच्या प्रकल्पातून उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये दोन उपसा सिंचन प्रकल्प राबवित आहोत.

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील.......

आष्टी व पाटोदा येथील उपसा सिचंन प्रकल्पाचे काम अतिशय गतीने करीत आहोत. माहे डिसेंबर, २०२३ पर्यंत उस्मनाबाद जिल्ह्याला डिझाईनमध्ये असलेले पाणी देण्यात येईल. दुष्काळी भागात पाणी योजनांना गती देण्याचे काम या सरकारने केले आहे.

अध्यक्ष महोदय, उस्मानाबाद जिल्ह्यातील काही प्रकल्पाची कामे घाईगडबडीत पूर्ण केली आहे. परंतु उर्वरित काही प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात आले नाही. आता आपण पूर्ण प्रकल्पांची कामे हाती घेतलेली आहेत. पुढील दीड ते दोन वर्षांमध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील दोन्ही प्रकल्प पूर्ण करण्यात येतील. त्यामुळे कृष्णा खोऱ्यातील जे ७ टीएमसी पाणी मराठवाड्याला देण्याची जबाबदारी होती त्यापैकी चार-पाच टीएमसी पाणी लिफ्ट एरिगेशन-३ च्या माध्यमातून उस्मानाबाद व बीड जिल्ह्याला देण्यात येईल. त्यामुळे गोदावरी खोऱ्याकडे आम्ही विशेष लक्ष दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संगाम थोपटे यांनी गुंजवणी प्रकल्पाचा मुद्दा उपस्थित केला होता. या प्रकल्पाला १३१७ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी ५५० कोटी रुपये खर्च झालेले आहेत. सन २०२१-२२ मध्ये गुंजवणी प्रकल्पासाठी १९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु यावर्षी १०० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.संग्राम थोपटे यांनी वाजेघर, शिवगंगा, वागंणी येथील उपसा सिंचन योजनेचा उल्लेख केलेला आहे. याबाबत सांगू इच्छितो की, या कामाच्या सर्व्हेचे काम पूर्ण झालेले आहे. डिझायनींग काम अंतिम टप्प्यामध्ये आहे. गुंजवणी प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये या तिन्ही योजनांचा समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे या सर्व प्रकल्पाचे काम पूर्ण होणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.संजय कुटे यांनी दोन-तीन अतिशय महत्त्वाचे विषय मांडलेले आहेत. कोरोनामुळे पहिल्या वर्षामध्ये खर्चाला काही मर्यादा आल्या होत्या. ही बाब आपणा सर्वांना माहिती आहे.

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील.......

या सर्व कामांचा कालबद्ध कार्यक्रम तयार केलेला आहे. पुढील दोन वर्षामध्ये १०४ प्रकल्प पूर्ण करणार आहोत.

अध्यक्ष महोदय, कुऱ्हा, वडोदा हे दोन्ही प्रकल्पाचे काम ९० टक्के पूर्ण झालेले आहे. परंतु सदर प्रकल्पाच्या प्रस्तावास सन २०२० पासून केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाची मान्यता मिळालेली नाही. एखाद्या प्रकल्पाची मान्यता दोन वर्षे थांबविणे हे चांगले लक्षण नाही. मी केंद्र सरकारवर टीक करीत नाही. परंतु विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांचा केंद्र सरकारशी चांगला संपर्क आहे आणि चांगला संबंध देखील आहे. या संबंधाचा चांगला उपयोग करुन सदर प्रकल्पास लवकरात लवकर मान्यता मिळवून द्यावी, अशी मी विनंती करतो. सदर प्रकल्पाच्या मान्यतेसाठी राज्य शासनाने केव्हा पत्र पाठविले याबाबतची सर्व माहिती सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, आरकचेरी आणि आलेवाडी या प्रकल्पाना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे बाकी आहे. सदर प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आल्यानंतर उक्त प्रस्तावास मंजुरी देण्यात येईल. सदर प्रकल्पाचे वित्त व नियोजन करुन सदर प्रस्ताव मुख्य सचिव यांच्याकडे सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव लवकरात लवकर मंत्रिमंडळापुढे आणून त्यास लवकरच मान्यता देण्यात येईल.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील....

अध्यक्ष महोदय, जे सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत, त्यांच्याबाबत बोलून मी सभागृहाचा अधिक वेळ घेऊ इच्छित नाही. झिगाव प्रकल्पाचे उत्तर मी सर्वात शेवटी देणार आहे. सन्माननीय सदस्य डॉ. राहुल पाटील यांनी दुधना नदीवरील उच्च पातळीच्या २८ एमएमक्युबच्या चार बंधाऱ्यांची मागणी केली आहे. याचा निश्चितपणे विचार केला जाणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय जगताप यांनी त्यांचे मुद्दे माझ्याकडे लेखी स्वरुपात दिले आहेत. पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या देखभाल दुरुस्तीची आवश्यकता आहे. देखभाल दुरुस्तीकरिता शासनाकडून तातडीने प्रस्ताव तयार करुन त्याला मंजुरी देण्याची व्यवस्था करण्यात येईल. गुंजवणी प्रकल्पाकरिता सोमर्डी पंपगृहाकरिता आग्रहाची मागणी केली आहे. याबाबतची माहिती घेऊन तपासणी करण्यात येत आहे. त्यांच्यासोबत प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्याकरिता बैठक घेण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. मनोहर चंद्रिकापुरे हे सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे मी त्यांच्या भाषणाची उत्तरे सभागृहाच्या पटलावर ठेवू इच्छितो. तसेच सन्माननीय सदस्य श्री. दीपक केसरकर यांचेही भाषण मी सभागृहाच्या पटलावर ठेवू इच्छितो. त्यांनी पाटबंधारे प्रकल्पाच्या विकासाच्या जमिनी पर्यटन विकासाकरिता देण्याचे धोरण तयार केले आहे, असा मुद्दा मांडला आहे. परंतु याबाबत काही न्यायालयीन याचिका प्रलंबित आहे. त्या याचिकेचा निकाल लवकरच अपेक्षित आहे. यानुसार सुधारित धोरण आखण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. शिरीष चौधरी यांनीही काही मुद्दे मांडले आहेत. त्याबाबतचे उत्तर मी उद्या सभागृहाच्या पटलावर ठेवेन. सन्माननीय सदस्य श्री. जितेश अंतापूरकर आणि सन्माननीय सदस्य श्री. तुषार राठोड यांनी लेंडी प्रकल्प पुनर्वसनाचा मुद्दा मांडला आहे. तसेच मुक्रामाबाद येथील आकरा गावांच्या स्वेच्छा पुनर्वसनाबाबतचा मुद्दा मांडला आहे. सन १९९५ ला जमीन अधिग्रहनाची सूचना दिली, सन २००५ मध्ये पैसे मिळाले, तरीही अद्यापपर्यंत तेथे प्रकल्प पूर्ण झाला नाही. तेथील लोकांची मानसिकता आज बदलत आहे. तसेच याबाबत तेथे आंदोलन करण्यात येत आहे. तेलंगाणा राज्य तेथील ३८ टक्के पाणी घेत आहे. त्यांचा तेवढा हक्क आहे. त्या राज्याने सांगितले की, महाराष्ट्र राज्य जो निर्णय घेईल त्याच्या ३८ टक्के पैसे ते राज्य

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील....

देणार आहे. याकरिता शासन विचार करीत असून पुढील आठ दिवसांमध्ये याबाबतचा निर्णय घोषित केला जाणार आहे. त्यामुळे लेंडी धरणातील प्रकल्पग्रस्तांना दिलासा मिळेल व त्यांच्या शंका दूर होतील. वाढीव कुटुंबाकरिता स्वेच्छा पुनर्वसन देण्यात यावे, अशी त्यांनी मागणी केली आहे. परंतु याबाबत अद्यापपर्यंत सरकारने निर्णय घेतला नाही. मी सांगू इच्छितो की, यासंदर्भात राज्य सरकार सकारात्मक आहे. तेथील प्रकल्प पूर्ण होण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. पी.एन. पाटील हे सभागृहात उपस्थित नाहीत. धामणी धरणाचे कामही लवकरच सुरु होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. राम सातपुते हे देखील सभागृहात उपस्थित नाहीत. पाणी पुरवठा विभागाने मागणी केल्यास २२ गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणाबाबतचा प्रश्न उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अशोक पवार यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहे. भामा-आसखेड-चासकमान या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील पुनर्वसनाचे शिक्के कधी काढले जाणार ? असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांची ही मागणी योग्य आहे. मंत्रीमंडळाच्या बैठकीत याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ न्यावा लागणार आहे. तत्पूर्वी सन्माननीय सदस्य श्री. दिलीप मोहिती यांचे याकरिता ना हरकत प्रमाणपत्र आणावे. जेणेकरुन हा प्रस्ताव पुढे जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी देखील सभागृहात उपस्थित नाहीत. तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री. उदयसिंह राजपूत, अभिमन्यू पवार, श्री. रत्नाकर गुट्टे हे सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांच्याबाबत मी मघाशी माहिती दिली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती सरोज अहिरे यांनी सांगितलेले जवळपास सर्व प्रस्ताव आम्ही मान्य केले आहेत. काही राहिले असतील तर त्याबाबतही विचार केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव बनकर हे देखील सभागृहात उपस्थित नाहीत. मी स्वत: नांदूरमधमेश्वर येथे भेट दिली आहे. तेथे अतिरिक्त दहा गेट बसवायचे असून त्याकरिता १३० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या कामास मान्यता देण्याची प्रक्रिया सुरु आहे. परंतु ती पूर्ण झाली नाही. कळवा प्रकल्पाच्या मुख्य

श्री. जयंत पाटील....

कालव्याला पाटपोठ चाऱ्या करण्याची त्यांनी मागणी केली आहे. यासाठी योग्यती कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. मोहनराव हंबर्डे यांनीही मते मांडली आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे यांच्या मतदारसंघात पूर्णा प्रकल्पांतर्गत ३ उच्च पातळीचे बंधारे सुरु करण्यात येणार आहेत. या तिनही बंधाऱ्याकरिता पाणी उपलब्ध झाले आहे. परंतु मापदंडात काही अडचण असल्यामुळे त्याबाबत मंत्रीमंडळासोमर प्रस्ताव घेऊन लवकरच त्यास मान्यता मिळेल, असा मला विश्वास आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेश अंतापूरकर यांच्या ७७ कोटी रुपयांच्या लेंडी प्रकल्पाच्या पुनर्वसनाकरिता निधी खर्च केला जाणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. शेखर निकम यांनी वशिष्ठी नदीतील गाळ काढल्यानंतर चिपळूण शहरातील पूर रेषा पुनर्निश्चित करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. हा प्रश्न सर्वांच्या अडचणीचा वाटतो. परंतु पूर आल्यानंतर ती पुर रेषा योग्य वाटते. त्यामुळे पूर रेषा कोणासही म्यॅन्युप्युलेट करता येत नाही. जिथे पाणी पोहोचले जाते तेथे पूर रेषा निश्चित केली जाते. परंतु दोन-चार वर्षे पूर आला नसेल तर वाटते की, ही पूर रेषा नसली पाहिजे. परंतु कोणाचाही हस्तक्षेप न करता अतिशय शास्त्रोक्त पद्धतीने ती पूर रेषा तयार केली जाते. वशिष्ठी नदीतील गाळ काढल्यानंतर नदीची खोली व रुंदी वाढली तर पाणी आत जाईल, असे गृहीत धरुन भविष्यात सुधारित पूर रेषा निश्चित करता येईल. पावसाळा सुरु होण्यापूर्वी नदीतील गाळ काढल्यानंतर सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. नदीची जेवढी खोली, रुंदी वाढेल तेवढी पूर रेषा आत घेता येईल, असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री. निलेश लंके यांच्या राळेगणसिद्धी योजनेसाठी काही करता येईल. परंतु साकळे उपसा सिंचन योजना, कानूरपठार येथे पाणी उपलब्धतेची समस्या सुटली तर याबाबत अडचण दूर होईल. सन्माननीय सदस्य सर्वश्री. प्रकाश आव्हाडे, रमेश बोरनारे, यशवंतराव माने, हिरामण खोसकर हे सभागृहात उपस्थित नाहीत. या सर्वांचे मुद्दे मी सभागृहाच्या पटलावर ठेवेन.

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील....

सन्माननीय सदस्य श्री. विक्रमसिंह सावंत यांनी म्हैसाळ योजनेची उर्वरित कामे लवकर करावीत, अशी मागणी केली आहे. याबाबत आज त्यांच्यासोबत बैठक होऊ शकली नाही. त्यांच्या सूचनांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्या श्रीमती गीता जैन यांनी पाण्याचा प्रश्न सांगितला आहे. याबाबत बैठक घ्यावी लागेल. याबाबत मला आता काही सांगता येणार नाही. ही बैठक घेण्यात येईल. (...अडथळा...) मंत्रालयात प्रस्ताव आल्यानंतर सुप्रमाची प्रक्रिया अतिशय जटील करुन ठेवलेली आहे. यात अनेक टप्पे आहेत. यामुळे याकरिता जवळपास २ वर्षाचा कालावधी लागत असतो. प्रोजेक्ट फर्स्ट म्हणून आता....

अध्यक्ष महोदय, मी झिगाव प्रकल्पाबाबत सांगू इच्छितो. सन २०२०-२१ करिता दिलेले निदेश आधारभूत मानून आर्थिक वर्ष सन २०२२-२३ करिता अनुशेष काढण्याचे जे सूत्र आहे त्याप्रमाणे विदर्भाकरिता २५.६५५ टक्के, मराठवाडा २२.५४ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्राला ५१.८१ टक्के असे वाटप होत आहे.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदय, जिगाव ऊपसा सिंचन योजनेची उर्वरित किंमत ८ हजार ५५६ कोटी रुपये एवढी आहे. अर्थात, ती यापेक्षा जास्त आहे परंतु सध्या ८ हजार ५५६ कोटी रुपयांची तांत्रिक मान्यता आहे. या कामासाठी सन २०२०-२१ या वर्षात ७९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सन २०२२-२३ मध्ये वाढ करुन ९०० कोटी रुपये करण्यात आली. जिगाव योजनेसंदर्भात आपण मधला पर्याय काढण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व जमीन संपादित करण्याचे काम आपण थांबविणार नाहीत. परंतु एका लेव्हलला थोडेसे पाणी अडविण्याची सुरुवात आपण करीत आहोत. त्याचाच भाग म्हणून मोठया धरणाच्या बाजूला कमी उंचीचे धरण आपण बांधत आहोत. तेथे एकूण १२ योजना प्रस्तावित केल्या असून त्यापैकी ६ योजनांची कामे होऊन अनेक वर्षे उलटली आहे. त्यामुळे त्यांचे पाईप सडण्याची शक्यता आहे... (अडथळा...) ते मला माहिती नाही. या योजनांची कामे पूर्वी झालेली आहेत.

अध्यक्ष महोदय, या योजना वापरात याव्यात यासाठी एक कमी उंचीचे धरण बांधायचे व त्याचे गेट ओरिजनल उंचीवर ठेवायचे. जेणेकरुन आपल्याला जिगाव योजनेची पूर्ण क्षमता या माध्यमातून निर्माण करता येईल. असे करीत असताना भूसंपादनाची प्रक्रिया आपण थांबविणार नाहीत. ४५ गावे संपादित करायची आहेत. परंतु झालेली कामे वापरात आणली नाहीत तर ती कामे निकामी होतील. त्यामुळे हे एक सोल्युशन आपण काढत आहोत. तसेच मी मघाशी सांगितल्याप्रमाणे बुलढाणा जिल्हयातील सर्व सन्माननीय सदस्यांसोबत परवा एक बैठक घेण्यात येईल. माननीय मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांना देखील सदर बैठकीस बोलावण्यात येईल. या बैठकीमध्ये जिगाव योजनेच्या कामाची प्रगती आणि पुढील धोरणाबाबत माहिती देण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता जलसंपदा विभागाच्या मागणी क्रमांक आय-२ ते आय-५ आणि आय-७ अंतर्गत अनिवार्य घटकांतर्गत ३ हजार ५२५ कोटी, आणि कार्यक्रम घटकाखाली रुपये १३ हजार ८७९ कोटी ३ हजार ११६ रुपये अशा एकूण १७ हजार ४०४.९५ कोटी रुपयांच्या मागण्या मंजूर करण्याची विनंती मी सभागृहास करीत आहे.

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदय, असे करीत असताना समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्य अनुपस्थित आहेत... (अडथळा...) आपण दोघे आहात. परंतु आमची भाषणे ऐकून आपण आमच्या एवढे प्रभावाखाली आले आहात की, आपण देखील आमचेच झाले आहात.

अध्यक्ष महोदय, या पाचही विभागांबद्दल विरोधी पक्षाला किती विश्वास आहे हे यावरुन आपल्या लक्षात आले पाहिजे. द काश्मीर फाईल्स या जास्त महत्त्वाच्या आहेत आणि राज्याचे विकासाचे प्रश्न फारसे महत्त्वाचे नाहीत, असे मला मघापासून वाटायला लागले आहे. विरोधी पक्षातील दोन सन्माननीय सदस्यांनी द काश्मीर फाईल्स हा चित्रपट न पाहून जो त्याग केला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे (मदत व पुनर्वसन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मदत व पुनर्वसन विभागाकरिता सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात मागणी क्रमांक सी-५ सामाजिक सुरक्षा व कल्याण अंतर्गत रुपये ५३ कोटी ४१ लक्ष १८ हजार, मागणी क्रमांक सी-६ नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य अंतर्गत रुपये ११ हजार ३०८ कोटी ४६ लक्ष ५३ हजार, मागणी क्रमांक सी-९ अंतर्गत रुपये १ कोटी ५ लक्ष १८ हजार तसेच मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्चांतर्गत रुपये ४० कोटी असे एकूण रुपये ११ हजार ४०२ कोटी ९२ लक्ष ८९ हजार इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली असून ती सभागृहापुढे सादर करण्यात येत आहे. त्यास सभागृहाने मान्यता द्यावी, अशी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** आता मी सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील १) महसूल व वन विभाग २) जलसंपदा विभाग ३) उद्योग , ऊर्जा व कामगार विभाग ४) ग्रामविकास विभाग ५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ६) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक सी-१, सी-२, सी-४, सी-५, सी-६, सी-७, सी-९, सी-१०, सी-१२, आय-२, आय-३, आय-४, आय-५, आय-७, के-१, के-३, के-५, के-६, के-७, के-८, के-९, के-१०, के-११, के-१३,एल-२, एल-३, एल-४, एल-५, एल-७, एल-८, एम-१, एम-२, एम-३, एम-४, एम-५, एम-६, आर-१, आर-२, आर-३, आर-४ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. X OF 2022**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.)

श्री.प्राजक्त तनपुरे (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १०- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १० मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** मुद्रांक (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XI OF 2022**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.)

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ११ - महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ११ मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** निकमार विद्यापीठ, पुणे विधेयक.

**L. C. BILL NO. I OF 2022**

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT, INCORPORATION AND REGULATION OF NICMAR UNIVERSITY, PUNE FOR THE DEVELOPMENT AND ADVANCEMENT OF HIGHER EDUCATION IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.प्राजक्त तनपुरे (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे, सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक १- महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता, निकमार विद्यापीठ, पुणे याची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक १-महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता, निकमार विद्यापीठ, पुणे याची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ५२, (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक १ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक १ संमत झाले आहे.

---------

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

**पृ.शी. :** मुंबईसह राज्यातील इतर ठिकाणच्या इमारतींचा पुनर्विकास करणे

**मु.शी. :** मुंबईसह राज्यातील इतर ठिकाणच्या इमारतींचा पुनर्विकास करणे या विषयावर सर्वश्री सुनिल प्रभू, अमिन पटेल, अनिल पाटील, रविंद्र वायकर, नाना पटोले, यशवंत माने, अजय चौधरी, पृथ्वीराज चव्हाण, प्रकाश सोळंके, सदा सरवणकर, सुरेश वरपुडकर, ॲड अशोक पवार, सर्वश्री मंगेश कुडाळकर, झीशान सिद्दीकी, रोहित पवार, सुनील राऊत, संग्राम थोपटे, दीपक चव्हाण, प्रकाश सुर्वे, कैलास गोरंट्याल, दौलत दरोडा, रमेश लटके, अमित झनक, ॲड माणिकराव कोकाटे, सर्वश्री संजय पोतनीस, कुणाल पाटील, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, शिरीष चौधरी, शेखर निकम, प्रताप सरनाईक, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री बाबासाहेब पाटील, भास्कर जाधव, सुभाष धोटे, बाळासाहेब आजबे, रमेश कोरगावकर, माधवराव जवळगांवकर-पाटील, संग्राम जगताप, राजन साळवी, पी.एन.पाटील (सडोलीकर), संजय राठोड, शिरीषकुमार नाईक, डॉ.किरण लहामटे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री राजेश एकडे, निलेश लंके, ज्ञानराज चौगुले, बळवंत वानखडे, संदिप क्षीरसागर, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री विकास ठाकरे, सुनिल शेळके, अनिल बाबर, रणजित कांबळे, संजय जगताप, भरतशेठ गोगावले, नितीन पवार, धीरज देखमुख, वैभव नाईक, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री सुनिल टिंगरे, दिलीप लांडे, विक्रमसिंग सावंत, जितेश अंतापूरकर, दिपक केसरकर, चेतन तुपे, संजय शिरसाट, राजू पारवे, सहसराम कोरोटे, चिमणराव पाटील, मोहनराव हंबर्डे, लहू कानडे, प्रकाश आबिटकर, ऋतुराज पाटील, राजू आवळे, किशोर पाटील, चंद्रकांत नवघरे, शांताराम मोरे, डॉ.राहुल पाटील, श्री.श्रीनिवास वनगा, ॲड.शहाजी पाटील, सर्वश्री संजय गायकवाड, नितीन देशमुख, बालाजी कल्याणकर, उदयसिंग राजपूत, रमेश बोरनारे, सुहास कांदे, महेंद्र थोरवे, विश्वनाथ भोईर, संतोष बांगर, योगेश

अग्रिम प्रत

कदम, श्रीमती लता सोनवणे, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, महेश शिंदे, महेंद्र दळवी, वि.स.स. यांचा प्रस्ताव.

श्री. सुनील प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम २९३ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"मुंबईतील बऱ्याच इमारती ५० वर्षांपेक्षा जास्त जुन्या झाल्यामुळे सदर इमारतींचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील हवाईमार्गात (फनेल झोन) येणाऱ्या विमानतळाच्या परिसरातील इमारतींना उंचीची मर्यादा असणे, त्यामुळे या इमारतींचा विकास व पुनर्विकास आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असणे, मुंबई महापालिकेने सदर इमारतींचा नमूना गणनेच्या आधारे पुनर्विकास करण्यासाठी नगरविकास विभागाने योग्य निर्णय घेण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिका हद्दीत भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या व वर्षानुवर्षे प्रतिक्षेत असलेल्या इमारतींचा भोगवटा प्रमाणपत्रांबाबत "क्षमापित" निर्णय घेणे व मध्यम वर्गीय नागरीकांना दिलासा देणे, राज्यातील शहरांमधील एसआरएच्या सक्षम प्राधिकाऱ्याने झोपडीधारकांची पात्रता प्रक्रिया ९० दिवसात पूर्ण करण्याची आवश्यकता, मुंबई उपनगर, ठाणे व पुणे जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक तसेच सहकारी गृहनिर्माण संस्था व अन्य वेगवेगळ्या संस्थांना सन १९९६ पासून २०२१ पर्यंत २५ वर्षांच्या कालावधीच्या एकत्रित अकृषिक आकारणीच्या नोटीसा देण्यात येणे, सदर नोटीसांमधील अकृषिक आकारणीचे प्रमाणदर अवाजवी असणे, सदर रक्कम भरण्यासाठी देण्यात आलेल ा अल्प कालावधी, सदर रक्कम न भरल्यास संबंधितांची बँक खाती/कार्यालये सील करणे, कोविड-१९ जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरीक/व्यावसायिक अडचणीच्या काळात ून जात असतांना शासनाकडून या अकृषिक आकारणीमध्ये मदतीची अपेक्षा, पी.एम.जी.पी. प्रकल्पांतर्गत शासनाच्या / खाजगी जमिनीवरील व म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील सोसायट्यांना लावण्यात आलेल्या व्याजासहीत एन. ए. टॅक्स रद्द करण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, म्हाडाच्या थकीत सेवा शुल्काबाबत उपाययोजना जाहीर करणे, प्रत्येक तालुक्यात म्हाडा प्रकल्पाची आवश्यकता, पुणे येथील जुन्या व जीर्ण झालेल्या म्हाडा इमारती ंच्या पुनर्विकासाची आवश्यकता, राज्यभरातील जमिनीवरील म्हाडाचे असलेले आरक्षण व त्या जमिनी ंचा विकास व पुनर्विकास,

श्री. सुनील प्रभू...

म्हाडामार्फत नोकरदार महिलांसाठी वसतीगृह व मुला-मुलींकरीता वसतीगृह बांधण्याबाबत कार्यवाही, पश्चिम उपनगरात आरक्षित भूखंडावर म्हाडामार्फत मोठ्या रुग्णालयाची उभारण◌ी करणे, मुंबईतील वांद्रे (पश्चिम) येथे म्हाडाच्या जागेवर पशुवैद्यकीय दवाखान्यांची उभारणी, शासकीय जमिनीवर असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांच्या इमारतींचा पुनर्विकास म्हाडामार्फत करण्याचा पर्याय उपलब्ध करण्याबाबत, रखडलेल्या झोपडपट्ट्यांचा विकास करण्यासाठी ॲमनेस्टी स्किम त्वरीत अंमलात आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाच्या जागेवर असलेला झोपडपट्ट्यांचा रखडलेला पुनर्विकास, एसआरए योजना संपूर्ण महाराष्ट्राला लागू करणे, धारावी झोपडपट्टी व बीडीडी चाळीचा पुनर्विकास करणे, याबाबत राज्य शासनाने करावयाची व केलेली निर्णयात्मक कार्यवाही विचारात घेण्यात यावी. "

अध्यक्ष महोदय, या विषयावर मला सविस्तर विचार मांडायचे आहेत. त्यामुळे मला ऑनलेग ठेवावे. उद्या जेव्हा आपण मला चर्चेला परवानगी द्याल त्यावेळी मी माझे सविस्तर विचार मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) :** आता सन्माननीय सदस्य या प्रस्तावावर ऑनलेग राहतील. अर्धा तास चर्चा गुरुवार, दिनांक २४ मार्च २०२२ रोजी सकाळी घेण्यात येतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार दिनांक २३ मार्च २०२२ रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी ९.०० ते १०.४५ या वेळेत भरेल. विशेष बैठकीमध्ये लक्षवेधी सूचना चर्चेकरिता घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ १० वाजून १३ मिनिटांनी बुधवार, दिनांक २३ मार्च २०२२ रोजीच्या सकाळी ९ वाजेपर्यंत स्थगिती झाली.)

------------